# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## दूरशिक्षण केंद्र

**एम. ए. भाग–१ : राज्यशास्त्र**

# राजकीय सिद्धांत

**(Political Theory)**

**सत्र १ : पेपर १ (आवश्यक)**

(शैक्षणिक वर्ष २०१८–१९ पासून)

© **कुलसचिव,** शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर (महाराष्ट्र)

**प्रथमावृत्ती :** २०१८

एम. ए. (राज्यशास्त्र) भाग-१ पेपर १ (आवश्यक)

सर्व हक्क स्वाधीन. शिवाजी विद्यापीठाच्या परवानगीशिवाय कोणत्याही प्रकाराने नक्कल करता येणार नाही.

**प्रती : १०००**

■

**प्रकाशक :**
**डॉ. व्ही. डी. नांदवडेकर**
कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर - ४१६ ००४.

■

**मुद्रक :**
**श्री. बी. पी. पाटील**
अधीक्षक,
शिवाजी विद्यापीठ मुद्रणालय,
कोल्हापूर - ४१६ ००४.

■

ISBN-978-93-89327-11-3

★ दूरशिक्षण केंद्र आणि शिवाजी विद्यापीठ याबद्दलची माहिती पुढील पत्त्यावर मिळू शकेल.
शिवाजी विद्यापीठ, विद्यानगर, कोल्हापूर-४१६ ००४ (भारत)

★ दूरशिक्षण विभाग-विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली यांच्या विकसन अनुदानातून या साहित्याची निर्मिती केली आहे.

## दूरशिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

### ■ सल्लागार समिती ■

**प्रा. (डॉ.) डी. बी. शिंदे**
मा. कुलगुरू,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) डी. टी. शिर्के**
प्र-कुलगुरू,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एम. एम. साळुंखे**
माजी कुलगुरू,
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

**प्रा. (डॉ.) के. एस. रंगाप्पा**
माजी कुलगुरू,
म्हैसूर विद्यापीठ, म्हैसूर

**प्रा. पी. प्रकाश**
अतिरिक्त सचिव-II
विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली

**प्रा. (डॉ.) सीमा येवले**
गीत-गोविंद, फ्लॅट नं. २,
११३९ साईक्स एक्स्टेंशन,
कोल्हापूर-४१६००१

**प्रा. (डॉ.) पी. एस. पाटील**
I/c अधिष्ठाता, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) ए. एम. गुरव**
I/c अधिष्ठाता, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) भारती पाटील**
I/c अधिष्ठाता, मानवविज्ञान विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) पी. डी. राऊत**
I/c अधिष्ठाता, आंतर-विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**डॉ. व्ही. डी. नांदवडेकर**
कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**श्री. एम. ए. काकडे**
संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**श्री. व्ही. टी. पाटील**
वित्त व लेखा अधिकारी,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एम. ए. अनुसे** (सदस्य सचिव)
संचालक, दूरशिक्षण केंद्र,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

दूर शिक्षण केंद्र
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर

**राजकीय सिद्धांत**
**एम. ए. भाग–१ : राज्यशास्त्र आवश्यक पेपर १**

## अभ्यास घटकांचे लेखक

| लेखक | घटक क्रमांक |
|---|---|
| **डॉ. सूर्यकांत गायकवाड**<br>समन्वयक, दूर शिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर | १, २, ४ |
| **श्री. दत्ता जाधव**<br>शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे महाविद्यालय, मिरज | ३ |

**■ संपादक ■**

**प्रा. (डॉ.) भारती पाटील**
राज्यशास्त्र विभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# प्रस्तावना

शिवाजी विद्यापीठाने दूरशिक्षण केंद्राच्या माध्यमातून शिक्षणापासून वंचित राहिलेल्या अनेकांना पुन्हा शिक्षण प्रवाहात आणण्याची सुवर्णसंधी उपलब्ध करून दिली, याचे संपूर्ण श्रेय विद्यापीठाला जाते. 'ज्ञानमेवामृतम्' या शिवाजी विद्यापीठाच्या ब्रीद वाक्याप्रमाणे ज्ञानरूपी अमृत प्राप्त करण्याची संधी दूरशिक्षण केंद्राने सर्वांसाठी उपलब्ध करून दिली. याच दूरशिक्षण केंद्राद्वारे नोंद झालेल्या बहिःस्थ विद्यार्थ्यांना स्वयंअध्ययन साहित्य उपलब्ध करून दिले आहे.

एम. ए. भाग १ च्या राज्यशास्त्र विषयाच्या आवश्यक पेपर क्रमांक १, सत्र १ साठी असलेले 'राजकीय सिद्धांत' हे पुस्तक विद्यार्थ्यांच्या हाती देताना आम्हाला विशेष आनंद होत आहे.

राजकीय सिद्धांत यामध्ये राजकीय सिद्धांताची ओळख, राज्याचे दृष्टीकोन, मूलभूत संकल्पना भाग-१ आणि मूलभूत संकल्पना भाग-२ या घटकांचा विस्ताराने अभ्यास करणार आहोत.

या पुस्तक निर्मितीमध्ये शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू मा. डॉ. डी. बी. शिंदे यांची प्रेरणा व प्रोत्साहन आम्हाला मिळाले त्याबद्दल त्यांचे मनःपूर्वक आभार. त्याचप्रमाणे प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी वेळोवेळी केलेले मार्गदर्शनही आम्हास उपयुक्त ठरले. राज्यशास्त्र विभागप्रमुख डॉ. रविंद्र भणगे, राज्यशास्त्र विभागाचे माजी विभागप्रमुख डॉ. प्रकाश पवार, शिवाजी विद्यापीठ राज्यशास्त्र अभ्यास मंडळाचे सर्व सन्माननीय सदस्य व सर्व लेखक यांचे सहकार्य लाभल्याबद्दल त्या सर्वांचे मी आभार मानते.

वरील सर्वांइतकेच महत्त्वाचे म्हणजे दूरशिक्षण केंद्राचे संचालक प्रा. डॉ. एम. ए. अनुसे, दूरशिक्षण केंद्रातील सर्व सहकारी विद्यापीठाचे सर्व पदाधिकारी यांच्या सहकार्याबद्दल व तत्परतेबद्दल सर्वांचे मनःपूर्वक आभार.

**■ संपादक ■**

**प्रा. (डॉ.) भारती पाटील**

राज्यशास्त्र विभाग,

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# दूर शिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर


## अभ्यासमंडळ : राज्यशास्त्र

अध्यक्ष – **प्रा. डॉ. भारती तुकाराम पाटील**
राज्यशास्त्र अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

- **प्रा. डॉ. पी. आर. पवार**
  राज्यशास्त्र अधिविभाग,
  शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
- **डॉ. राजेंद्र कुरळपकर**
  के.आर.पी. कन्या महाविद्यालय, उरुण-इस्लामपूर,
  जि. सांगली
- **डॉ. एस. जी. कुंभार**
  राजा श्रीपतराव भगवंतराव कॉलेज, औंध,
  जि. सातारा
- **डॉ. आर. आर. कांबळे**
  कर्मवीर हिरे आर्टस, सायन्स, कॉमर्स अॅण्ड
  एज्युकेशन कॉलेज, गारगोटी, जि. कोल्हापूर
- **डॉ. अमिता संजिव कणेगांवकर**
  डी.डी. शिंदे सरकार कॉलेज, महालक्ष्मी मंदीर जवळ,
  कोल्हापूर
- **डॉ. शिवाजी सुबराव पाटील**
  छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा
- **डॉ. शिरिषकुमार धोंडिराम पवार**
  बाळासाहेब देसाई कॉलेज, पाटण, जि. सातारा
- **प्रा. डॉ. उत्तरा सहस्त्रबुद्धे**
  राज्यशास्त्र अधिविभाग,
  मुंबई विद्यापीठ, मुंबई
- **डॉ. मृदुल निळे**
  राज्यशास्त्र अधिविभाग,
  मुंबई विद्यापीठ, मुंबई
- **प्रा. डॉ. ए. एस. चौसाळकर**
  आर. के. नगर हौसिंग सोसायटी,
  एमएसईबी ऑफीस समोर, कोल्हापूर
- **श्री. वैभव नायकवडी**
  हुतात्मा किसन अहिर शुगर मिल, वाळवा,
  जि. सांगली
- **श्री. दशरथ विठोबा पारेकर**
  फ्लॅट नं. ५०८, एव्हरग्रीन होम्स, फेज-४,
  टॉवर डी, प्रभू हॉस्पिटल रोड, नागाळा पार्क, कोल्हापूर

# अनुक्रमणिका


| घटक क्रमांक | घटकाचे शीर्षक | पान क्रमांक |
|---|---|---|
| १. | राजकीय सिद्धांताची ओळख | १ |
| २. | राज्यासंबंधीचे दृष्टीकोन | ३३ |
| ३. | मूलभूत संकल्पना भाग १ | ८५ |
| ४. | मूलभूत संकल्पना भाग २ | १०९ |

## ■ विद्यार्थ्यांना सूचना

प्रत्येक घटकाची सुरुवात उद्दिष्टांनी होईल. उद्दिष्टे दिशादर्शक आणि पुढील बाबी स्पष्ट करणारी असतील.

१. घटकामध्ये काय दिलेले आहे.

२. तुमच्याकडून काय अपेक्षित आहे.

३. विशिष्ट घटकावरील कार्य पूर्ण केल्यानंतर तुम्हाला काय माहीत होण्याची अपेक्षा आहे.

स्वयं मूल्यमापनासाठी प्रश्न दिलेले असून त्यांची अपेक्षित उत्तरेही देण्यात आलेली आहेत. त्यामुळे घटकाचा अभ्यास योग्य दिशेने होईल. तुमची उत्तरे लिहून झाल्यानंतरच स्वयं अध्ययन साहित्यामध्ये दिलेली उत्तरे पाहा. ही तुमची उत्तरे (किंवा स्वाध्याय) आमच्याकडे मूल्यमापनासाठी पाठवायची नाहीत. तुम्ही योग्य दिशेने अभ्यास करावा, यासाठी ही उत्तरे 'अभ्यास साधन' (Study Tool) म्हणून उपयुक्त ठरतील.

प्रिय विद्यार्थी,

हे स्वयंअध्ययन साहित्य या पेपरसाठी एक पूरक अभ्याससाहित्य म्हणून आहे. असे सूचित करण्यात येते की, विद्यार्थ्यांनी २०१७-१८ पासून तयार केलेला नवीन अभ्यासक्रम पाहून त्याप्रमाणे या पेपरच्या सखोल अभ्यासासाठी संदर्भपुस्तके व इतर साहित्याचा अभ्यास करावा.

घटक–१

# राजकीय सिद्धांताची ओळख

## (An Introduction to Political Theory)

अनुक्रमणिका


१.० उद्दिष्ट्ये

१.१ प्रास्ताविक

१.२ विषय विवेचन

    १.२.१ राजकीय सिद्धांत : स्वरूप, व्याप्ती व महत्त्व

    १.२.२ राजकीय सिद्धांतातील विचारसरणीची भूमिका

    १.२.३ अभिजात राजकीय सिद्धांताची प्रस्तुतता

    १.२.४ राजकीय सिद्धांताचा ऱ्हास आणि पुर्नरुज्जीवन

१.३ सारांश

१.४ पारिभाषिक शब्द

१.५ सरावासाठी स्वाध्याय

१.६ अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ


## १.० उद्दिष्ट्ये

राज्यशास्त्रामध्ये राजकीय सिध्दांताला महत्त्वाचे स्थान आहे, कारण कोणताही विषय समजून घेताना त्यासंबंधीचे सिद्धांत अभ्यासणे आवश्यक असते. म्हणून राजकीय सिद्धांताचे स्वरूप, व्याप्ती व महत्त्व अभ्यासणे गरजेचे आहे. राजकीय सिद्धांतामध्ये विचारप्रणालीची भूमिका, अभिजात राजकीय सिद्धांताची प्रस्तुतता आणि राजकीय सिद्धांताचा ऱ्हास व पुर्नरुज्जीवन इत्यादी घटकाचा अभ्यास करणे आवश्यक आहे. जगातील अनेक घडामोडी, अनेक प्रश्न व राजशास्त्रातील वेगवेगळ्या प्रवाहाच्या संदर्भात राजकीय सिद्धांत निर्माण झालेले असतात. याद्वारे समाजातील ज्या समस्या निर्माण झाल्या आहेत त्या राजकीय सिद्धांताद्वारे निराकरण करणे हे महत्त्वाचे उद्दिष्ट आहे.

## १.१ प्रास्ताविक

राज्यशास्त्र हे प्राचीन काळापासूनच सामाजिकशास्त्राचा भाग मानण्यात आले आहे जेव्हा मनुष्यप्राणी संघटित समाजात राहू लागले तेव्हापासून या शास्त्राचे अस्तित्व दिसून येते. सामाजिक व्यवहाराचे नियमन व नियंत्रण, समाजातील व्यक्तीची जीवित सुरक्षितता आणि सामाजिक जीवनातील संघर्षाचे निवारण इत्यादी प्रश्न संघटित समाजात निर्माण झाले. यातूनच राज्याची निर्मिती झाली. राज्यनिर्मिती व त्याच्या कार्यासंबंधी गोष्टीचा उहापोह राजकीय सिद्धांतात केला जातो. थोडक्यात राजसंस्थेची ध्येये, मूल्ये आणि कार्यपध्दती यावरून राज्यसंस्थेचे स्वरूप काय असावे यासंबंधी जे निरनिराळे विचारप्रवाह निर्माण झाले त्यांना राजकीय सिद्धांत म्हणून ओळखले जाते. राजकीय सिद्धांतामध्ये ग्रीक तत्त्ववेत्त्यांनी महत्त्वाचे योगदान दिले आहे. ॲरिस्टॉटलने आपल्या ग्रंथाचे नाव 'पॉलिटिक्स' असे दिले. तेव्हापासून त्याला राज्यकारभाराचे शास्त्र असा अर्थ प्राप्त झाला. ॲरिस्टॉटलने राज्यशास्त्राला शास्त्राचे शास्त्र असे म्हटले. परंतु त्या काळामध्ये राज्य आणि समाज यांच्यात भेद केला जात नसे, त्यामुळे राज्यशास्त्राचे स्वरूप सर्वसमावेशक होते.

आधुनिक काळामध्ये राजकीय सिद्धांत, त्याचे स्वरूप, व्याप्ती आणि सद्यकालीन परिस्थितीमध्ये त्याचे महत्त्व स्पष्ट करणे गरजेचे आहे. तसेच राजकीय सिद्धांतामध्ये विचारप्रणालीची भूमिका महत्त्वाची आहे. कारण जगामध्ये अनेक विचारप्रणाली निर्माण झाल्या असून त्याचे प्रतिबिंब राजकीय सिद्धांतामध्ये पडल्याचे दिसून येते. तसेच राजकीय सिध्दांतामध्ये अभिजात राजकीय सिद्धांत व त्याची सद्यकालीन प्रस्तुतता याचा अभ्यास करणे क्रमप्राप्त आहे. २० व्या शतकामध्ये राजकीय सिद्धांत मृत पावले आहे अशी घोषणा अनेक विचारवंतांनी केली, त्यानंतर जगामध्ये अनेक घटना घडल्यामुळे असे सांगण्यात आले की, आता राजकीय सिद्धांत हे मृत पावले नसून त्याचे पुर्नरुज्जीवन झाले आहे. अशाप्रकारे प्रस्तुत प्रकरणामध्ये राजकीय सिद्धांताचे स्वरूप, व्याप्ती आणि महत्त्व, राजकीय सिद्धांतातील विचारप्रणालीची प्रस्तुतता, अभिजात राजकीय सिद्धांताची प्रस्तुतता आणि राजकीय सिद्धांताचा ऱ्हास व पुर्नरुज्जीवन इत्यादी घटकांचा अभ्यास करणार आहे.

## १.२ विषय विवेचन

राजकीय सिद्धांत हे राज्यशास्त्र किंवा राजकारणासंबंधी संकल्पना नसून ते राज्यशास्त्राचे विज्ञान आणि राजकारणाचे तत्त्वज्ञान ही आहे. राजकीय सिद्धांत ही कोणती विचारधारा नाही यामध्ये संकल्पना, विज्ञान, तत्त्वज्ञान आणि विचारधारेचे मूळ सिध्दांत आहे. राजकीय सिध्दांतात विभिन्न विचारवंतांनी आगमन पध्दती, निगमन पध्दती, विश्लेषणात्मक पध्दती, संश्लेषणात्मक पध्दतीचा वापर करून

व्यवस्थितरित्या सिध्दांताची मांडणी केली आहे. त्यासंबंधी पुढीलप्रमाणे अभ्यास करणे आवश्यक आहे.

## १.२.१ राजकीय सिद्धांत : स्वरूप, व्याप्ती व महत्त्व

### ❑ राजकीय सिध्दांताचा अर्थ

थिअरी हा शब्द ग्रीक शब्द थिआ (Thea) या शब्दापासून निर्माण झालेला आहे. Thea म्हणजे दृष्टी किंवा दृश्य पाहणे होय. म्हणजेच जाणून घेण्याची दृष्टी असा अर्थ होतो. सिध्दांत म्हणजे घटनांचा परस्परसंबंध आणि वास्तवता जाणून घेणारा दृष्टीकोण होय. सुसंघटित ज्ञानाच्या आधारे संशोधन करून निष्कर्ष काढले जातात. माहितीचे संकलन आणि विश्लेषण जेवढे अचूक असेल तेवढ्या प्रमाणात निष्कर्षाचा पडताळा येऊन तो सिध्दांत वास्तववादी व प्रमाणभूत ठरतो. अर्थात मानवाने आपल्या समूह जीवनाचे व संघटनेचे प्रश्न जाणीवपूर्वक समजावून घेण्याचा व सोडवण्याचा केलेला प्रयत्न म्हणजे राजकीय सिध्दांत होय. राजकीय सिध्दांतामध्ये तत्त्वज्ञान, विचारप्रणाली व विज्ञान यांच्या मूलतत्त्वाच्या आधारे बौध्दिक मांडणी केलेली असते. काळानुसार आणि परिस्थितीनुसार राजकीय सिध्दांतावर त्या काळातील संस्कृतीचा प्रभाव पडलेला असतो. राजकीय सिध्दांताच्या अनेक विचारवंतांनी व्याख्या केल्या आहेत त्या पुढीलप्रमाणे :-

**ॲड्रयू हॅकर** यांच्या मते, ''ज्या तत्त्वज्ञानात्मक आणि शास्त्रीय ज्ञानाच्या संकल्पनामुळे, मग ते केव्हाही आणि कुठेही केलेले असो, आम्ही राहत असलेल्या वर्तमानकालीन आणि भविष्यकालीन जगाविषयीची आमची समजूत वाढते त्यास राजकीय सिध्दांत असे म्हणतात.''

**सेबाईन** यांच्या मते, ''राजकीय सिध्दांत ही एक बौध्दिक परंपरा आहे आणि तिच्या इतिहासात माणसाने काळाच्या ओघात राजकीय प्रश्नावर ते विचार मांडले त्या प्रश्नाची शिस्तबध्द मांडणी करणे म्हणजे राजकीय सिध्दांत होय.''

**डान्टे जर्मिनो**च्या मते, ''मानवाच्या सामाजिक अस्तित्वासाठी आवश्यक असणाऱ्या योग्य अशा व्यवस्थेच्या तत्त्वाचा चिकित्सात्मक अभ्यास म्हणजे राजकीय सिध्दांत होय.''

**एफ. डब्ल्यू कोकर**च्या मते, ''मानवाच्या कायमस्वरूपी गरजा, अपेक्षा आणि मते या दृष्टीकोणातून राजकीय शासनसंस्था व त्याच्या विभागाचे कार्य याचे मूल्यांकन केले जाते तेव्हा त्या अभ्यासास राजकीय सिध्दांताचे स्वरूप प्राप्त होते.''

वरील सर्व व्याख्यांवरून असे दिसून येते की, राजकीय सिध्दांत मुख्यत: मानवी जीवनातील समस्या सोडवणे, मानव हिताच्या दृष्टीकोणातून राज्यसंस्थेचा अभ्यास करणे, त्याचबरोबर राजकीय व्यवस्थेतील प्रश्नाची व्यवस्थीत मांडणी करणे, म्हणजेच राजकीय सिध्दांत होय. समाजातील जे प्रश्न आहेत किंवा समाजातील निर्माण होणारे संभाव्य प्रश्न आहेत, त्याचे निराकरण करण्यासाठी साधकबाधक दृष्टीकोणातून चर्चा करणे व मार्गदर्शन करणे हे काम राजकीय सिध्दांत करते. म्हणूनच असे म्हणता येईल की, राजकीय विषयावरील सर्वसाधारण तत्त्वज्ञानात्मक चिंतन की ज्यामध्ये तत्त्वज्ञान विचारप्रणाली व विज्ञान यांची मूलतत्त्वाद्वारे मांडणी केली जाते, त्याला राजकीय सिध्दांत असे म्हणतात.

## ❑ राजकीय सिध्दांताची वैशिष्ट्ये

राजकीय सिध्दांताची वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे सांगता येतील.

१. राजकीय सिध्दांत हे मूलत: व्यक्तीच्या बौध्दिक व राजकीय कार्यावर आधारलेले आहे. कारण एखाद्या व्यक्तीनी चिंतन करून जे राजकीय वास्तव स्पष्ट केले आहे किंवा काही संकल्पना स्पष्ट केल्या आहेत, यातूनच राजकीय सिध्दांताची निर्मिती होते. त्यामध्ये प्रामुख्याने प्लेटोच्या रिपब्लिक, ॲरिस्टॉटल याचे पॉलिटिकल किंवा रॉल्स याची 'ए थेअरी ऑफ जस्टिस' इत्यादी ग्रंथातून राजकीय सिध्दांताची निर्मिती झाल्याचे दिसून येते.

२. राजकीय सिध्दांतामध्ये व्यक्ती, समाज आणि इतिहासाचा समावेश होतो, कारण एखादा समाज कसे संघटित होऊन काम करतो, त्याचे प्रमुख तत्त्व कोणते आहे. समाजातील प्रश्न कसे सोडवता येतील या सर्व गोष्टींचा विचार राजकीय सिध्दांत करीत असतो.

३. राजकीय सिध्दांत हे एका विशेष विषयावर आधारित आहे. कारण विचारवंतांचा उद्देश केवळ राज्याच्या स्वरूप संबंधी विचार व्यक्त करीत असतो. परंतु ती व्यक्ती, तत्त्वज्ञ, इतिहासकार, अर्थतज्ज्ञ, धर्मशास्त्रज्ञ किंवा समाजशास्त्रज्ञ असे कोणीही असू शकते.

४. राजकीय सिध्दांताचा उद्देश केवळ राजकीय वास्तवता समजून घेणे एवढेच नाही तर समाज परिवर्तन करण्यासाठी साधने एकत्रित करणे आणि ऐतिहासिक प्रक्रिया संवर्धित करणे हा आहे.

५. राजकीय सिध्दांतामध्ये विचारधाराही समाविष्ट असते. ही विचारधारा विश्वास, मूल्ये आणि विचाराच्या आधारावर निर्माण झालेली असते. राजकीय विचारधारांच्या माध्यमातून राजकीय मूल्ये, संस्था व व्यवहाराची माहिती कळते.

६. राजीय सिध्दांतातील निष्कर्ष हे तत्त्व आणि व्यवहार यात समन्वय साधून काढलेले असतील तर ते सामाजिक व राजकीय परिस्थितीशी अधिक जुळणारे व सुसंगत ठरतात.

अशाप्रकारे राजकीय सिध्दांताची वैशिष्ट्ये स्पष्ट करता येतील.

## ❑ राजकीय सिध्दांताचे प्रकार

राजकीय सिध्दांताचे दोन प्रकार पडतात. एक, आदर्शवादी राजकीय सिध्दांत आणि दोन अनुभववादी राजकीय सिध्दांत.

### आदर्शवादी राजकीय सिध्दांत

आदर्शवादी राजकीय सिध्दांतामध्ये प्रमाणके आदर्श उभी करून त्यांच्या प्रत्यक्षीकरणासाठी राज्याचे स्वरूप कसे असावे यासंबंधीचा अभ्यास केला जातो. आदर्शवादी राजकीय सिध्दांत मूल्याधिष्ठीत असून तो नैतिक दृष्टिकोनावर भर देतो. त्यामध्ये प्रामुख्याने तत्त्वज्ञानाला महत्त्व दिले जाते. त्याचबरोबर तो राजकीय, सामाजिक आदर्शावर भर देतात. आदर्शवादी राजकीय विचारप्रवाहामध्ये प्लेटो, ऑगस्टीन, हेगेल, कान्ट इत्यादी अनेक विचारवंताचा समावेश होतो. आदर्शवादी राजकीय विचार प्रामुख्याने काय आहे यापेक्षा काय असावे, यावरच जास्त भर देतो. त्याचबरोबर अनुभवाच्या आधारे विश्लेषण करण्यापेक्षा तत्त्वनिष्ठ मूल्यमापनावर भर देऊन समाज जीवनातील विविध राजकीय समस्या सोडविण्याचे काम आदर्शवादी राजकीय सिध्दांतात केले जाते. त्यामुळे वास्तविक मानवी जीवनात आणि मानवी व्यवहारात मूल्ये व आदर्श यांना महत्त्वाचे स्थान आहे. मानवाच्या राजकीय जीवनाचा अभ्यास करताना, संशोधकाला मूल्ये व आदर्श यांचा संदर्भ घेतल्याशिवाय आपले संशोधन पूर्ण करता येणार नाही. त्यामुळे मूल्ये समाजासाठी उपयुक्त आहेत परंतु अनुभववादी विचारवंत मूल्यनिरपेक्षेचा आग्रह करीत असल्यामुळे आदर्श मूल्यांना नाकारले जाते, परंतु डेव्हीड ईस्टनने राजकीय मूल्ये व गृहितके व सिध्दांत यांची संशोधनात गरज असल्याचे मान्य केले आहे.

## ❑ राजकीय सिध्दांताचे स्वरूप

राजकीय सिध्दांताचे स्वरूप स्पष्ट होण्यासाठी काही विचारवंतानी राजकीय सिध्दांताबद्दल मांडलेली मते अभ्यासणे हे क्रमप्राप्त ठरते.

ॲड्रयू हॅकरच्या मते, राजकीय तत्त्वज्ञान व राजकीय विचारप्रणाली यांना राजकीय सिध्दांतात महत्त्वाचे स्थान आहे. व्यापक अर्थाने विचार केला तर असे म्हणता येईल की, राजकीय विषयावरील सर्वाधारणात्मक तत्त्वज्ञान, चिंतन आणि ज्यात तत्त्वज्ञान आहे असे, तसेच विचारप्रणाली व विज्ञान

यांच्या मूलतत्त्वाच्या आधारे बौध्दिक मांडणी केलेली असते, असे प्रतिपादन यांचा अंतर्भाव राजकीय सिध्दांतात करता येईल. त्याद्वारे मानवी समाजजीवनाचे व्यावहारिक प्रश्न समजावून घेणे आणि सोडवणे सहज शक्य होते. हॅकरच्या मते, राजकीय संकल्पना आणि राजकीय सिध्दांत यामध्ये फरक असतो. राज्य, सार्वभौम सत्ता, अधिसत्ता, स्वातंत्र्य, समता, न्याय इत्यादी राजकीय संकल्पनांचे स्पष्टीकरण करण्याचे कार्य राजकीय सिध्दांत करीत असतात. संकल्पनांना प्रत्यक्षात आणण्यासाठी राजकीय सिध्दांताचे मार्गदर्शन उपयुक्त ठरते.

सेबाईन यांनी ऐतिहासिक दृष्टीकोनातून राजकीय सिध्दांताचे स्पष्टीकरण केले आहे. सेबाईनच्या मते, राजकीय सिध्दांत म्हणजे माणसाने आपल्या समूह जीवनाचे व संघटनेचे प्रश्न जाणीवपूर्वक समजावून घेण्याचा व सोडवण्याचा केलेला प्रयत्न होय. याचा अर्थ असा की, राजकीय सिध्दांत ही एक बौध्दिक परंपरा आहे आणि तिच्या इतिहासात माणसाने काळाच्या ओघात राजकीय प्रश्नावर जे विचार मांडले त्यांची उत्क्रांती सामावलेली आहे, त्या-त्या काळातील संस्कृतीची छाप तेव्हाच्या राजकीय सिध्दांतावर स्पष्ट उमटलेली असते. पिढ्यान्‌पिढ्या हस्तांतरित होत जाणाऱ्या संस्कृतीचा राजकीय सिध्दांत हा एक अविभाज्य भाग असतो. सेबाईनच्या मते, राजकीय सिध्दांत म्हणजे राजकारणाविषयीचे किंवा राजकारणाशी प्रस्तुत असलेले सगळेच चिंतन होय.

सेबाईन हे ऐतिहासिक दृष्टीकोनाला महत्त्व देतात. कोणताही राजकीय सिध्दांत हा इतिहासातील विशिष्ट टप्प्यावरच्या विशिष्ट परिस्थितीच्या संदर्भात मांडलेला असतो. त्यामुळे तो सिध्दांत समजावून घ्यायचा तर त्या विशिष्ट स्थळकाळ परिस्थितीचे संदर्भ मनात उभे करूनच ते केले जाऊ शकते. मात्र हे सिध्दांत भूतकाळातील विशिष्ट घटनेतून निर्माण झाले म्हणून ते भविष्यकाळाच्या दृष्टीने अप्रस्तुत आहे असे म्हणता येणार नाही. राजकीय सिध्दांताची निर्मिती एखाद्या विशिष्ट प्रसंगात किंवा परिस्थितीतून झाली असली तरी त्याच महत्त्व मात्र त्रिकालबाधीत असते. ते नेहमीच उपयुक्त व मार्गदर्शक ठरते. त्यामुळे सेबाईनच्या मते, राजकीय सिध्दांताचे हे सार्वत्रिक व त्रिकालबाधित स्वरूपच त्याला आदरपात्र ठरवते. ऐतिहासिक विकासाच्या प्रवाहात विशिष्ट घटितांना ध्यानात ठेवले म्हणजे भविष्यकाळातील परिवर्तनाच्या शक्यता अजमावणे ही शक्य होते. त्यामुळे सेबाईनने कोणत्याही राजकीय सिध्दांतात खालील तीन गोष्टी ठळकपणे आढळतात असे सांगितले आहे.

१. ज्या घडामोडीनी तो सिध्दांत जन्मास घातला त्याची वस्तुनिष्ठ मांडणी.

२. स्थूलमानाने ज्यास कार्यकारण संबंध म्हणता येईल त्याचे विवरण.

३. अमूक एक गोष्ट घडावी किंवा घडणे योग्य होईल व इष्ट होईल असे मूल्यात्मक प्रतिपादन.

अशाप्रकारे कोणतीही राजकीय सिद्धांत असो, त्यामध्ये वस्तुनिष्ठता, कार्यकारणसंबंध आणि मूल्यमापनात्मक प्रतिपादन या गोष्टींचा समावेश असतो असे सेबाईन याचे मत आहे.

राजकीय सिद्धांताचे स्वरूप सुरुवातीच्या काळात तत्त्वज्ञानात्मक होते. पूर्वीच्याकाळी तथ्ये आणि मूल्ये ह्यात फरक केला जात नव्हता, त्यामुळे राजकीय सिध्दांत आणि राजकीय तत्त्वज्ञान यामध्ये फरक मानला जात नव्हता. ॲरिस्टॉटलने राजकीय सिध्दांत व राजकीय कृती यामध्ये फरक केला आहे, परंतु प्लेटोपासून मार्क्सपर्यंत अनेक राज्यशास्त्रज्ञानी आपल्या लिखाणात तात्त्विक गोष्टीनाच महत्त्व देऊन राजकीय सिध्दांताची मांडणी आपल्या कल्पकबुध्दीने केली. यामुळे विशिष्ट परिणामाकडे जाण्याची त्याची पध्दत शास्त्रीय नव्हती. याउलट ॲरिस्टॉटलने १५८ राज्यघटनांचा वास्तववादी अभ्यास करून काही निष्कर्ष काढले. ॲरिस्टॉटलने सांगितलेले तत्कालीन समाजातील वास्तववादी विचार आजही उपयुक्त व मार्गदर्शक ठरतात. हॉब्ज आणि मॅकेव्हेलीने आपले राजकीय सिध्दांत तत्कालीन परिस्थितीच्या अभ्यासावरून मांडले होते ते त्या काळातील घटनाचे कार्यकारण संबंध दर्शविणे त्यादृष्टीने त्यांनी मांडलेले राजकीय सिध्दांत आजही महत्त्वपूर्ण ठरतात. आधुनिक काळात राज्यशास्त्रज्ञानी राजकीय घटना व त्यांचा परस्परसंबंध निश्चित करून शास्त्रीय निष्कर्ष काढण्याचा प्रयत्न सुरू केला. त्यामुळे विसाव्या शतकातील राजकीय सिध्दांताला मूल्यनिरपेक्षतेच्या दृष्टीने महत्त्व प्राप्त झाले. मूल्यनिरपेक्ष दृष्टीनेच आधुनिक राज्यशास्त्रज्ञांनी राजकीय सिध्दांताची मांडणी केली. अवलोकन, निरीक्षण, मुलाखती सर्वेक्षण, मापन या पध्दतीचा अवलंब करून आधुनिक काळात राजकीय सिध्दांत मांडण्यात आले.

वरील सर्व विवेचनाच्या अनुषंगाने राजकीय सिध्दांताचे स्वरूप खालीलप्रमाणे सांगता येईल.

१. राजकीय सिध्दांत हे अनुभवावर आधारलेले असतात, कारण अनुभवाद्वारे प्राप्त होणारे ज्ञान हेच खरे ज्ञान होय.

२. राजकीय सिध्दांत मानवी जीवनापुढे निर्माण झालेले प्रश्न सोडविण्याचे कार्य करतात. समाजाच्या राजकीय जीवनाचे तात्कालिक व संभाव्य प्रश्न इतरांपेक्षा चटकन पाहणे आणि इतरापेक्षा त्याचे अधिक सखोल विश्लेषण करते हे राजकीय सिध्दांताचे कार्य आहे.

३. राजकीय सिध्दांत हे राजकीय विचारप्रणालींना जन्म देतात. उदा. मार्क्सने मांडलेल्या सिध्दांतातून मार्क्सवादी विचारप्रणाली अस्तित्वात आल्याचे दिसून येते.

४. राजकीय सिध्दांत हे सुव्यवस्थित परस्परसंबंध व तर्कशुध्दरित्या मांडलेले असतात.

५. राजकीय सिध्दांत हे सद्यपरिस्थितीचा अभ्यास करतात आणि भविष्यातील समाजाच्या विकासाचा विचार करतात.

६. राजकीय सिध्दांत एखाद्या प्रश्नाचे निराकरण करीत असताना अनुभवलेली गोष्ट व्यवस्थितरित्या मांडणे, त्याचे विश्लेषण करणे व त्याचे मूल्यमापन करणे ही कार्ये करतात.

अशाप्रकारे राजकीय सिध्दांताच्या स्वरूपासंबंधी मुद्दे मांडता येईल. कारण आधुनिक काळातील राजकीय सिध्दांताला राजकीय विश्लेषण असेही म्हटले जाते. राजकीय सिध्दांत हे आदर्शवादी तत्त्वज्ञानात्मक आणि मूल्याधिष्ठीत होते ते स्वरूप विसाव्या शतकात बदलले आणि राजकीय सिध्दांताला अनुभववादी मूल्यनिरपेक्षता याची जोड लाभली, त्यामुळे जुन्या राजकीय सिध्दांताचे पुनरुज्जीवन झाले आहे असे डान्ट म्हणतो.

## ❑ राजकीय सिध्दांत ही समाजजीवनाची एक गरज

राजकीय सिध्दांत ही समाजजीवनाची एक गरज आहे कारण राजकीय सिध्दांत ज्या काळात मांडला जातो, त्याकाळात व्यक्तीच्या जीवनावर त्याचा प्रभाव पडलेला असतो. त्यामुळे मानवी इतिहासात मोठी उलथापालथ होते. त्याचे श्रेय राजकीय सिध्दांताला जाते, कारण त्याकाळात सामाजिक घडामोडी होतात त्याला राजकीय सिध्दांत जबाबदार असतात. हे राजकीय सिध्दांत सामाजिक घडामोडीला वळण देण्यास कारणीभूत ठरतात. समाजातील विशिष्ट परिस्थितीला प्रतिसाद देण्यातून राजकीय सिध्दांत साकार होत असल्यामुळेच त्या काळातील लोकांनी ते अंमलात आणण्यासाठी आपली आयुष्ये समर्पित करण्याची तयारी असंख्य व्यक्ती करतात. म्हणजे याचा अर्थ असा की, हे सिध्दांत समाजाच्या गरजेतून उद्भवलेले असतात. तत्त्वज्ञ हा केवळ सिध्दांत शब्दबध्द करीत असतो.

राजकीय सिध्दांताचा मूलाधार विचारप्रणाली आहे. ती विचारप्रणाली भ्रामक असो अथवा वास्तविक असो, तिच्यामुळे लोक संघटित होतात आणि तिचा परिणाम म्हणून सामाजिक उत्क्रांती किंवा सामाजिक अधोगती होते. राजकीय सिध्दांताची समाजजीवनाला असलेली गरज तंत्रज्ञानाच्या व विज्ञानाच्या प्रगतीमुळे कमी न होता उलट वाढलेली आहे. कारण आधुनिक काळातील माणूस सभोवतालच्या परिस्थितीविषयी अनभिज्ञ राहून जगू शकत नाही. त्यामुळे समाजजीवनाचा जसजसा विकास होत गेला तसतसे नवेनवे राजकीय सिध्दांत माणसाने निर्माण केल्याचे दिसते. म्हणून माणसाला जगण्यासाठी विज्ञान कला वगैरेची जेवढी गरज असते, तेवढीच राजकीय सिध्दांताची गरज आहे.

## ❑ राजकीय सिध्दांताची व्याप्ती

हेन्री मेयो यांनी राजकीय सिध्दांताची व्याप्ती पुढील मुद्यांच्या आधारे स्पष्ट करण्यात आले.

### १. विचारप्रणालीचे अध्ययन

प्रत्येक राजकीय विचारप्रणाली ही विशिष्ट राजकीय सिध्दांत आणि तत्त्वज्ञान सांगते. त्याचबरोबर

प्रत्येक राजकीय व्यवस्था ही कोणत्यातरी राजकीय विचारप्रणालीने प्रभावित झालेले असते. यांचा अभ्यास राजकीय सिध्दांताद्वारे केला जातो. उदा. हुकूमशाही, लोकशाही, सामंतशाही, साम्यवाद, उदारमतवाद, राष्ट्रवाद इत्यादी भारतातील राजकीय व्यवस्था लोकशाही, समाजवादी, धर्मनिरपेक्ष या विचारप्रणालीवर आधारीत आहे. अमेरिकेच्या अध्यक्षीय लोकशाहीत भांडवलशाही विचारप्रणालीचा प्रभाव पडलेला आहे. या सर्व गोष्टीचा अभ्यास राजकीय सिध्दांतात केला जातो.

## २. अभिजात राजकीय वाङ्मयाचे अध्ययन

विविध राजकीय विचारवंतानी आतापर्यंत केलेले अभिजात राजकीय वाङ्मयाचे अध्ययन करणे आवश्यक आहे. कारण प्रत्येक राजकीय व्यवस्था म्हणजे गतकालीन इतिहासाचा आणि घडलेल्या घडामोडीचा इतिहास आहे. त्यामुळे भूतकाळातील घटना वर्तमानकाळातील परिस्थितीचा अभ्यास करून ह्या सिध्दांताच्या आधारे भविष्य कथन करता येते. उदा. प्लेटो, ॲरिस्टॉटल मॅकियाव्हेली हॉब्ज, लॉक रूसो, मार्क्स इत्यादी विचारवंतानी जे काही ग्रंथ लिहिले आहेत, त्या ग्रंथाचा अभ्यास केला आहे तो अभ्यास योग्य किंवा अयोग्य आहे, याचा विचार तत्कालीन परिस्थितीच्या संदर्भात करून वर्तमानकालीन परिस्थितीशी तुलना करून अशा राजकीय वाङ्मयाचा बोध घेण्यास आपणास राजकीय सिध्दांत मदतनीस ठरतो.

## ३. राजकीय व्यवस्थांचे अध्ययन

राजकीय सिध्दांत एखाद्या विशिष्ट राजकीय व्यवस्थेचे स्पष्टीकरण व समर्थन करीत असतो. राजकीय व्यवस्थांचा अभ्यास केला असता विविध राजकीय सिध्दांताचे ज्ञान होऊ शकते. उदा. साम्यवाद हा सोव्हिएट रशिया आणि साम्यवादी चीनच्या राजकीय व्यवस्थेचे समर्थन आणि स्पष्टीकरण करतो. राजकीय व्यवस्थांच्या अभ्यासामुळे राजकीय सिध्दांत आणि त्या राष्ट्रातील प्रत्यक्ष वस्तुस्थिती याचे आकलन होते. थोडक्यात एखादा राजकीय सिध्दांत आणि त्याची त्या देशातील ऐतिहासिक पार्श्वभूमी समजावून घेण्यासाठी राजकीय व्यवस्थाचा अभ्यास उपयुक्त व मार्गदर्शक ठरतो.

## ४. अनुभवप्रामाण्य संशोधन

तथ्यसंकलन व विश्लेषण करून संकल्पनाचे संकलन करणे आणि राजकीय सिध्दांत मांडणे हे कार्य राजकीय सिध्दांत करते. संशोधन पध्दतीचा वापर करून राजकीय संकल्पनांचे जेव्हा विश्लेषण केले जाते तेव्हा त्या संशोधनातून काही राजकीय निष्कर्ष व सिध्दांत मांडले जाते. कल्पनांवर आधारलेले आणि वास्तववादावर आधारलेले सिध्दांत कोणते यांचे मूल्यमापन संशोधन पध्दतीद्वारे होत असते. तरीही संशोधन पध्दतीमध्ये मूल्यव्यवस्थेला अधिक महत्त्व देवून चालणार नाही तर मूल्याची चिकित्सा करून

त्याचे व्यवहारातील महत्त्व विचारात घ्यावे लागते. डेव्हिड ईस्टन, हेन्री मेयो, चार्लस् मेडियम याच्या मते, संशोधनामध्ये सामाजिक वास्तवतेला अधिक महत्त्व दिले पाहिजे. थोडक्यात संशोधन करताना निष्कर्षाच्या आधारावर पडताळून पाहणे आणि त्याद्वारे अनुभवप्रामाण्य ज्ञान प्राप्त करणे हा राजकीय सिध्दांताचा एक भाग आहे.

अशाप्रकारे वरील मुद्यांच्या आधारे राजकीय सिध्दांताची व्याप्ती स्पष्ट करण्यात आली आहे.

## ❑ राजकीय सिध्दांताचा विकास

राजकीय सिध्दांताची वाटचाल पाहताना आपणास असे स्पष्टपणे सांगता येते की, सिध्दांताचा इतिहास प्राचीन ग्रीक वाङ्मयातून निर्माण झाला आहे. प्लेटो आणि ॲरिस्टॉटल यांनी न्यायव्यवस्था स्थापन करण्यासाठी आणि व्यक्तींना उत्तम जीवन देण्यासाठी राज्याची कार्ये आहेत, अशी भूमिका मांडली आहे. त्याचबरोबर ॲरिस्टॉटलने १५८ नगरराज्याचा राज्यघटनेचा तुलनात्मक पध्दतीने अभ्यास करून आदर्श राज्याची कल्पना किंवा सिध्दांत मांडला आहे. त्यामुळेच त्यांना राज्यशास्त्राचे जनक असे म्हटले आहे. त्यानंतर म्हणजे जवळपास पंधराव्या शतकापर्यंत असे राजकीय सिध्दांत व्यवस्थितरित्या मांडण्यात आले नाहीत. सोळाव्या शतकात युरोपमध्ये ज्ञानाच्या पुनरुज्जीवनाचा कालखंड सुरू झाला आणि विवेकनिष्ठेचे युग सुरू झाले. त्यामुळे राज्याच्या विकासाला चालना मिळाली. या काळात हॉब्ज, लॉक रुसोनी सामाजिक करार सिध्दांत मांडला, त्यामध्ये प्रामुख्याने वैज्ञानिक पध्दतीचा, गणितीय पध्दती, काहीनी तार्किक पध्दतीचा स्विकार करून राजकीय सिध्दांत मांडले. परंतु त्यांनी काढलेले निष्कर्ष वस्तुस्थितीशी विसंगत, काल्पनिक असे ठरले त्यामुळे सोळाव्या आणि सतराव्या शतकात मांडलेले सिध्दांत शास्त्रशुध्द नव्हते.

एकोणिसाव्या शतकात राजकीय सिध्दांताच्या विकासाला विशेष चालना मिळाली, कारण या काळात औद्योगिक क्रांती, फ्रेंच राज्यक्रांती इत्यादी घटना घडल्या होत्या. त्यातूनच नवनवीन राजकीय संकल्पना आणि सिध्दांत उदयाला आले. त्यामध्ये प्रामुख्याने राज्य, शासनाचे स्वरूप, शासनाची उद्दिष्ट्ये, कार्य व आदर्श याचा समावेश होतो. यामध्ये गृहीत प्रमेये, इतिहासाचा अर्थ लावून निष्कर्ष मांडण्याची पध्दती आणि शास्त्रशुध्दतेचा स्वयंसिध्द आधार यावर भर देण्यात आला. विसाव्या शतकात राजकीय सिध्दांत मांडण्याच्या पध्दतीमुळे आमूलाग्र बदल झाला, कारण पहिल्या महायुद्धामुळे निर्माण झालेली भीषणता हे आहे. ह्या सिध्दांतानी पाश्चात्याच्या राजकीय जीवनाला अभिप्रेत असलेली मूल्ये नाकारली. सैध्दांतिक विश्लेषणाऐवजी राजकीय जीवनातील विविध माहितीचे संकलन करणे, मूल्याची चर्चा न करता वस्तुस्थितीचे परिक्षण करणे त्या आधारावर संशोधन करणे, संशोधनाच्या नवीन पध्दती

आणि तंत्रे स्विकारून सिध्दांत मांडण्यावर भर दिला. थोडक्यात विसाव्या शतकातील विचारवंतांनी राजकीय जीवनातील प्रक्रियाचे निरीक्षण, संशोधन, निष्कर्ष या मार्गांनी कार्य सुरू केले त्यामुळे नव्या राजकीय सिध्दांताची निर्मिती होऊ शकली नाही. १९७० च्या नंतर रचना आणि व्यवहारनिष्ठ उपयोग त्याच्या संतुलनावर भर देऊन राजकीय सिध्दांत मांडण्यात आले. ही वाटचाल संथगतीची आणि उपयुक्त ठरली. या सिध्दांताच्यामध्ये कल्पनारम्य चित्र रंगविण्याचे नाकारले. डेव्हीड ईस्टन यांनी नव्या सिध्दांत रचनेला अधिक महत्त्व दिले पाहिजे अशी आग्रही भूमिका मांडले. वस्तुनिष्ठ माहितीचे संकलन करणे, वैयक्तिक मताचा त्याग करणे, तटस्थ वृत्तीने निष्कर्ष काढणे, निष्कर्षाचा पडताळा घेणे, राजकीय जीवनातील विविध प्रक्रियांचा शोध घेणे. राजकीय प्रभाव आणि त्याच्या सत्ताकेंद्रावर होणारा परिणाम पाहणे या मानवी राजकीय पैलूवर भर दिला आणि राजकीय सिध्दांत रचनेला व्यापक आधार मिळवून दिला. हे भविष्य काळातील सिध्दांत रचनेला आधारभूत व मार्गदर्शक ठरू शकेल असे वाटते.

## ❑ राजकीय सिध्दांताचे महत्त्व

राजकीय सिध्दांताचे महत्त्व हे त्याच्या कार्यावर आणि त्याच्या उद्देशाच्या आधारावर समजून घेता येते. काही राजकीय विचारवंताच्या मते मात्र राजकीय सिध्दांताचा ऱ्हास झालेला नाही तर राजकीय सिध्दांताचे स्वरूप फक्त बदलले पूर्वी राजकीय सिध्दांताचा भर केवळ शासन संस्थेची निर्मिती कशी झाली, शासनाचे कामकाज कसे चालते, राज्यसंस्थेची साध्ये आणि उद्दिष्ट्ये इत्यादी गोष्टीवर होते. नंतरच्या काळामध्ये राजकीय सिध्दांतामध्ये मूल्यनिरपेक्षता, अनुभववाद इत्यादी शास्त्रीय पध्दतीचा स्विकार करण्यात आल्या. एकूणच राजकीय सिध्दांत हे मानवी समाज जीवन विकसित करण्यासाठी आवश्यक आहे. राजकीय सिध्दांत व राजकीय तत्त्वज्ञान हे एकमेकांशी पूरक आहेत. त्यामुळे मानवी जीवनात राजकीय सिध्दांत व राजकीय तत्त्वज्ञानही महत्त्वाचे आहे. राज्य आणि समाजाची परिस्थिती, सरकारचे सर्वश्रेष्ठ स्वरूप, व्यक्ती आणि राज्य यांच्यातील संबंध त्याद्वारे स्वातंत्र्य, समता, न्याय इत्यादी संकल्पनाचा विकास करण्यासाठी काही दृष्टीकोन व पध्दतीच्या निर्मितीसाठी राजकीय सिध्दांत महत्त्वाचे आहे. राजकीय संशोधक राजकीय सिध्दांताच्या आणि विचारप्रणालीच्या अभ्यासातून मानवी समाजाच्या समस्यांचे निराकरण करू शकतो. भूतकालीन राजकीय सिध्दांताच्या अभ्यासामुळे वर्तमानकालीन समस्या सोडविण्याचे आणि भविष्यकालीन समस्यांना मार्गदर्शन करण्याचे कार्य अधिक सुलभ होऊ शकते. राजकीय सिध्दांत विशिष्ट राजकीय विचारप्रणालीचा पुरस्कार करताना दिसतात. एकूणच राजकीय सिध्दांत हे व्यक्ती, समाज, सरकार विचारप्रणाली तत्त्वज्ञान यासर्व गोष्टीचा आधारे समाजजीवन विकसित करीत असते. राजकीय सिध्दांताचे महत्त्व खालीलप्रमाणे सांगता येईल.

१. राजकीय सिध्दांत हे राज्य आणि सरकार याच्या स्वरूपाची आणि उद्देशांची माहिती उपलब्ध करून देते.

२. समाजामधील वर्तमान काळातील निर्माण झालेल्या प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी राजकीय सिध्दांत मार्गदर्शक व उपयुक्त ठरतात.

३. राजकीय सिध्दांत हे सामाजिक आणि राजकीय परिस्थिती आणि तेथील समाजाचे आदर्श आणि उद्देशाचा समन्वय साधणे आणि त्याचे परस्परसंबंध निर्माण करण्यास मदत करतात.

४. राजकीय सिध्दांत हे मानवाला किंवा व्यक्तीला अधिकार कर्तव्य स्वातंत्र्य, समता, संमत्ती, न्याय इत्यादी गोष्टी सामाजिक जीवनात वापरण्यासाठी प्रेरणा देतात आणि मानवी समाजाला मार्गदर्शक प्रेरक व उपयुक्त ठरतात.

५. राजकीय सिध्दांत हे सामाजिक, आर्थिक व्यवस्था समजून घेण्यासाठी, दृष्टीकोन निर्माण करतात आणि समाजातील गरीबी, हिंसा, भ्रष्टाचार जातीवाद इत्यादी संदर्भात सिध्दांत करून पर्यायी व्यवस्था प्रदान करतात.

६. राजकीय सिध्दांताचे कार्य हे केवळ संकल्पना निर्मिती करणारे नसून सामाजिक सुधारणा आणि क्रांतीकारी विचाराने समाजात परिवर्तन घडवून आणण्यासाठी महत्त्वाचे असतात. त्याचबरोबर समाज परिवर्तनात झालेल्या चुका व अपयशाची कारणे ही समजून येतात.

७. राजकीय सिध्दांताद्वारे समाजातील वास्तविक परिस्थितीचा अभ्यास करता येतो आणि भविष्यात कोणत्या अडचणी येतील हे समजावून घेता येते.

अशाप्रकारे राजकीय सिध्दांत हे मानवी जीवनाच्या विकासासाठी, राज्याच्या शासन व्यवस्थेच्या आणि समाजाच्या प्रश्नाचे निराकरण करण्यासाठी महत्त्वाचे आहे.

## १.२.२ राजकीय सिद्धांतातील विचारसरणीची भूमिका

विचारप्रणाली ही आधुनिक काळात प्रचलीत झालेली संकल्पना आहे. प्रबोधनकाळामध्ये माणूस जन्मत: स्वतंत्र असतो, सर्व माणसे जन्मत: समान आहेत, माणूस हा विचारशील आणि विवेकशील प्राणी आहे असा विचार मांडण्यात आला. त्यामधूनच स्वातंत्र्य, समता, विवेकवाद, न्याय इत्यादी मूल्यांचा उदय झाला. त्यामुळे माणसाला त्याचे हित-अहित समजू शकते. म्हणूनच त्याला विचारांचे, निर्णयाचे निवडीचे स्वातंत्र्य असले पाहिजे असा आग्रह प्रबोधनकाळातील विचारवंतानी, वैज्ञानिकांनी, तत्त्वचिंतकानी धरला. त्यामुळेच समाजातील राजा, धर्मगुरू, सरंजामी वतनदार यांच्या निरंकुश सत्तेला धक्के बसले आणि

त्यातूनच ब्रिटनमधील रक्तविहीन क्रांती, अमेरिकेचे स्वातंत्र्ययुद्ध आणि फ्रान्सची राज्यक्रांती झाली. प्रबोधन युगामध्ये माणसाच्या बुध्दीवादाला चालना मिळाली व बुध्दीप्रामाण्यवादी विचार विकसित झाला. या बुध्दीप्रामाण्यवादाच्या आधारावर सन १७९५ मध्ये अंतोनी दि जेसी या विचारवंताने 'इन्स्टिट्युट दि फ्रान्स' ही संस्था विचार शास्त्राचा अभ्यास करण्यासाठी स्थापन केला व तो त्याचा प्रमुखही बनला. या विचारशास्त्राला दि क्रेसीने 'आयडिऑलॉजी' असा शब्दप्रयोग वापरला, अशाप्रकारे १९व्या शतकात सर्वप्रथम विचारप्रणाली (Ideology) ही संकल्पना उदयास आली.

आज जगामध्ये राष्ट्रवाद, उदारमतवाद, व्यक्तीस्वातंत्र्यवाद, समुदायवाद, समाजवाद, भांडवलवाद, अराज्यवाद, साम्यवाद अशा कितीतरी विचारप्रणाली निर्माण झाल्या आहेत. आपल्याला जाणीव असो वा नसो परंतु राजकीय व्यवस्थांचे, राजकारणाचे समाजातील विविध वर्गाचे आणि घटकाचे आपले आकलन हे मुळात विचारप्रणालीच्यामुळेच निर्धारित झालेले असतात. त्यामुळे विचारप्रणाली ही मानवी जीवनात निर्माण झालेल्या समस्यांची सोडवणूक करण्याचे सूत्र म्हणून तिच्याकडे पाहिले जाते. त्याचबरोबर वर्तमान स्थितीतून बाहेर पडून सुखदायी भवितव्याचे स्वप्न साकार करण्याचे साधन म्हणून विचारप्रणालीचा स्विकार लोक करू लागले.

## ❑ विचारप्रणाली म्हणजे काय?

अनेक विचारवंतांनी, तत्त्वज्ञांनी आणि अभ्यासकांनी विचारप्रणाली ही संज्ञा वेगवेगळ्या अर्थानी वापरली आहे. सर्वसाधारणपणे असे म्हणता येईल की, राजकीय ध्येय, हेतू व उद्दिष्ट्ये यांचा सम्मुचय म्हणजे विचारप्रणाली होय किंवा आदर्श राजकीय व सामाजिक व्यवस्थेचे चित्र रंगवून तिचे समर्थन करणारी व ही व्यवस्था प्रत्यक्षात कशी आणता येईल (अस्तित्वात नसेल तर) याबद्दलची व्यूहरचना सांगणारी मूल्यव्यवस्था म्हणजेच विचारप्रणाली होय. मेसीच्या मते, 'विचारप्रणाली हे विचाराचे शास्त्र आहे' म्हणजे 'विचारांचा जन्म भौतिक प्रक्रियांमधून कसा होतो हे अनुभवसिध्द पध्दतीद्वारे शोधणे एवढेच विचारप्रणालीचे प्रयोजन असते' अशी भूमिका मेसीने मांडली, परंतु ती फारशी उपयोगाची वाटत नाही म्हणून अनेक विचारवंतांनी सांगितलेली व्याख्या पुढीलप्रमाणे :-

१. **मॅक आयव्हर**च्या मते, ''उद्दिष्टांना जन्म देणाऱ्या राजकीय, आर्थिक व सामाजिक मूल्यांची आणि विचारांची पध्दती म्हणजे राजकीय व सामाजिक विचारप्रणाली होय.''

२. **डॅनिअल इंमरकोल**च्या मते, ''प्रत्येक विचारप्रणालीमध्ये वर्तमानस्थितीचे मूल्यमापन आणि भवितव्याबाबतची दूरदृष्टी यांचा समावेश असतो.''

३. **कार्ल फ्रेडरिक**च्या मते, ''एखादी राजकीय व्यवस्था कशी बदलायची, सुधारायची (किंवा

टिकवायची) याच्या व्यावहारिक साधनाची संबंधित बरीचशी सुसंगत विचारसंहिता म्हणजे विचारप्रणाली होय.''

४. **कार्ल मार्क्स**च्या मते, ''विचारप्रणाली नेहमी प्रस्थापित समाजव्यवस्थेचे व उत्पादन पध्दतीचे समर्थन करीत असतात, त्यात कोणताही बदल होऊ देण्यास विरोध करतात आणि त्यामुळे प्रगतीच्या वाटा अडवीत असतात. राज्यकर्ता वर्ग विचारप्रणालीचा उपयोग आपलेच हितसंबंध सुरक्षित करण्यासाठी करून घेतो.''

५. **रॉबर्ट डहाल**च्या मते, ''राजकारणाच्या आधी, राजकारणाच्या वर आणि सभोवती त्याला नियंत्रित करण्याचे व घडवण्याचे कार्य विचारप्रणालीच करीत असते.''

वरील सर्व व्याख्यांमध्ये मतभेद असले तरी विचारप्रणाली ही सामाजिक प्रश्नावर उत्तरे शोधीत असते. राष्ट्राचे, राजकीय पक्षाचे व व्यक्तीचे राजकीय वर्तन दिग्दर्शित व नियंत्रित करण्यात विचारप्रणालीचा वाटा नेहमीच महत्वाचा राहतो.

## ❑ विचारप्रणालींची वैशिष्ट्ये

१. विचारप्रणाली नेहमी राजकीय असते. राजकीय चळवळीची ध्येये, गृहीतके, हेतू व समर्थने विचारप्रणालीतून निर्धारीत झाले आहेत.

२. विद्यमान संरचनाची टीका व निर्भत्सना आणि परिवर्तनाचा आढावा विचारप्रणालीतून घेतला जातो.

३. विचारप्रणाली नेहमीच लोकांना कृतिप्रवण करून उज्वल भविष्याकडे वाटचाल करायला लावतात.

४. सामान्यांना समजतील व आकर्षक वाटतील अशा घोषणा, प्रतीके व मिथके विचारप्रणालीत असतात.

५. चळवळीची धोरणे, क्लृप्त्या व व्यावहारिक उपक्रम यांचे दिग्दर्शन विचार प्रणाली करतात.

## ❑ विचारप्रणालीची साधने

### १. आकर्षक शब्दप्रयोग

विचारप्रणालीचा संदेश हे प्रामुख्याने भाषेच्या व प्रतीकांच्या माध्यमातून जनसामान्यापर्यंत पोहचत असतो. जनतेला कार्यक्षम करायचे असल्यामुळे विचारप्रणालीची मांडणी प्रभावी व भावनिक आवाहन

करणाऱ्या शब्दात करावी लागते. विचारप्रणालीची संपूर्ण सूत्रे व तपशील सांगून विचार प्रवृत्त करण्यापेक्षा या आवाहनाचा हेतू लोकांना कृतीप्रवृत्त करण्याचा असतो, त्यामुळे काही आकर्षक शब्दयोजना किंवा घोषणा वापरून लोकांच्या समोर वारंवार आणणे हे विचारप्रणालीच्या प्रचारकांना पुरेसे वाटते.

## २. मिथके व बोध

मानवी जीवनविषयक दृष्टीकोन, त्यासंबंधीचे निकष, मानवाने काय करावे, काय व्हावे इत्यादी गोष्टींसाठी मिथके मार्गदर्शन करीत असतात, त्यामुळे ती मानवी कृतीची मुख्य निर्धारक ठरतात. समूहातील सर्व सदस्यांना नियमित व सुसंगत वागण्याची प्रेरणा देण्यासाठी मिथके उपयुक्त ठरतात. त्यामुळे विचारप्रणालीचा भर अस्तित्वात असलेली मिथके वापरण्यावर किंवा गरज भासल्यास नवी मिथके निर्माण करण्यावर असतो. मिथके व्यक्तीना त्यांच्या वर्तमान परिस्थितीच्या असाध्य चौकटीतून बाहेर काढून उज्ज्वल भवितव्याच्या स्वप्नात रममाण करतात. त्यांना मूल्यांचा स्विकार अधिक सरळपणे करायला भाग पाडतात आणि विचारप्रणालीतील विधाने सत्यच असली पाहिजेत असा विश्वास निर्माण करतात. मिथके बुध्दीच्या निकषावर टिकत नसली तरी त्यांची प्रेरणा, सामर्थ्य मोठे असते. मिथकांवर आधारित कृती, नियमांना विचारप्रणालीचा बोध (डॉक्ट्रीन) म्हणून ओळखले जाते.

## ३. कृतक-वैज्ञानिक मांडणी

कोणतीही विचारप्रणाली ही शास्त्रीय सत्य म्हणूनच लोकांपुढे मांडली जाते. परंतु सर्वच विचारप्रणाली सामाजिक, आर्थिक-राजकीय वास्तव्याच्या शास्त्रीय अध्ययन पध्दतींचा अवलंब करून केलेल्या अभ्यासावर आधारित असतात असे मात्र मुळीच नाही. बऱ्याचदा त्यात तत्त्वे व गृहीतके यांची सरमिसळ झालेली असते. म्हणून विचारप्रणाली काय असावी याची मांडणी शास्त्रीय परिभाषेत करतात.

## ४. सर्व प्रश्नांची सुलभ उत्तरे

जे विचारप्रणालीचे प्रेरित झालेले असतात. त्यांना त्यांच्या कोणत्याही प्रश्नांची उत्तरे विचारप्रणालीतच मिळते. प्रश्नांच्या जटिलतेतून ते स्वत:ची सोडवणूक, तयार केलेल्या सूत्रांच्या आधारे करून घेत असतात. ज्यांना उज्ज्वल उद्याची पहाट अचूक माहित आहे व ते त्या दिशेने निघाले आहेत आणि जे या वाटचालीत अडथळे उत्पन्न करतात ते विचारप्रणालीच्या आधारावर समाजाची दोन गटात विभागणी करतात.

अशाप्रकारे विचारप्रणाली ही वरील साधनांद्वारे राजकीय कार्याची तर्कसंगत व सुसूत्र आखणी करण्याचे कार्य पार पाडले जाते.

## ❑ विचारप्रणालीची भूमिका

विचारप्रणालीच्या प्रभावामुळे व्यक्ती चळवळीमध्ये पूर्णपणे स्वत:ला झोकून देऊन कार्य करतात. काहीवेळा ते स्वत: प्राणत्याग करायला तयार होतात. समाजात जे आर्थिक वा राजकीय संघर्ष निर्माण झाले आहेत, त्यांचा अन्वयार्थ विचारप्रणालीच्या आधारे लावला जातो, कारण प्रत्येक संघर्षाच्या मुळाशी भिन्न विचारसरणी असते. विचारसरणी ही कळत नकळत आपल्या विचारांचा व जाणीवांचा ताबा घेत असते. याशिवाय विचारप्रणालीतून राजकीय जीवनास घडणारे योगदान महत्त्वाचे आहे. कारण विचारप्रणाली ही राजकीय असते आणि ती कोणत्यातरी राजकीय तत्त्वज्ञानाच्या आधारावर किंवा तत्त्वचिंतनाच्या चिंतनातून प्रेरित झालेला विचार असतो. म्हणून त्याचे मानवी जीवनात महत्त्वाचे स्थान आहे. या विचारप्रणालीची राजकीय सिध्दांतातील भूमिका पुढील मुद्यांच्या आधारे स्पष्ट करता येईल.

## १. विचारप्रणाली केवळ बौध्दिक नसून व्यावहारिक असतात

विचारप्रणाली केवळ बौध्दिकतेवर आधारलेल्या नसून त्याला व्यावहारिक संदर्भ असतो, त्या व्यक्तीच्या राजकीय जीवनातील घडामोडीबाबतच्या प्रतिक्रिया निर्धारित करीत असतात. एखाद्या राजकीय प्रश्नावर व्यक्ती कोणती बाजू घेईल हे त्याच्या विचारप्रणालीशी असलेल्या बांधिलकीनुसार ठरत असते. व्यक्तीच्या राजकीय दिशा, त्याचबरोबर संघटना वा पक्षाचे सदस्यत्वही विचारप्रणालीच्या आधारावरच ठरत असते.

## २. विचारप्रणाली आयुष्याला अर्थपूर्ण बनवतात

मानवी जीवनाला प्राण्यापेक्षा वेगळे जीवन प्राप्त करून देण्याचे कार्य हे मानवी जीवनामध्ये असलेल्या वैचारिक क्षमतेमुळे मिळते. माणूस केवळ आहार, निद्रा भय, मैथुन एवढ्यावरच न थांबता त्याला उच्चतर प्रयोजन किंवा ध्येय साध्य करावयाचे असते. हे प्रयोजन पूर्वी धर्माच्या आधारे मिळत होते; परंतु आज ते विचारप्रणालीच्या आधारे मिळते. कारण धर्म हे केवळ स्वधर्म जपण्यास भाग पाडीत असून तो अविवेकपूर्ण असायचा, परंतु विचारप्रणाली त्याला विवेकपूर्ण भूमिका आखून देत असतो. आपल्या ध्येयावर निष्ठा ठेवून त्यासाठी जगण्याची व मरण्याची प्रेरणा देत असते.

## ३. विचारप्रणालीमुळे विश्वाचे आकलन होते

माणसाचे विचार, त्याला विश्वाचे व विविध प्रक्रियाचे यथार्थ आकलन करून देण्याची क्षमता विचारप्रणालीमध्ये आहे. मार्क्सच्या मते, आपले विचार अशास्त्रीय असता कामा नयेत, शक्य होईल तेवढा त्यांना सत्याचा आधार असला पाहिजे. त्यामुळेच एखाद्या विचारप्रणालीला प्रतिवाद करावयाचे

असेल तर विश्वाचे यथार्थ आकलन असले पाहिजे ते नसेल तर आपण त्याला प्रतिवाद करू शकत नाही, त्यामुळे विचारसरणी विश्वाचे आकलन करू देते.

### ४. विचारप्रणालीमुळे संघर्षाला वैचारिक शस्त्रे उपलब्ध होतात

व्यक्तीची जाणिव ही ती व्यक्ती कोणत्या वर्गाची आहे यावर अवलंबून असते. कारण मार्क्सच्या मते, माणसाच्या जाणिवेनुसार त्याचे अस्तित्व निर्धारित होत नाही, तर अस्तित्वानुसार जाणिवा निर्धारित होतात. त्यामुळे त्यांच्या मते, कोणत्याही विचारप्रणालीचे विश्लेषण करताना प्रथम त्याची सामाजिक व आर्थिक पार्श्वभूमी विचारात घेतली पाहिजे. कारण व्यक्तीला त्याच्या वर्गीय दृष्टीकोणातून दिसते ते प्रत्यक्षात असत नाही, त्यामुळे मार्क्स त्यास भ्रात जाणीव असे म्हणतो. जेव्हा ही जाणीव नाहीशी होते तेव्हा समाजातील वरचढ विचारप्रणाली उभी राहते आणि ती वैचारिक शस्त्रे निर्माण करते. मार्क्सच्या भांडवलदार वर्गाविरुध्द कामगार हा संघर्ष याचे उदाहरण आहे.

### ५. विचारप्रणालीमुळे प्रभावी कार्यक्षमता येते

व्यक्तीला विचारप्रणालीमुळे सहकाऱ्याबरोबर संघटितपणे व शिस्तबध्द कृती करण्याची प्रेरणा मिळते. ध्येय प्राप्त करण्यासाठी नेतृत्वाची गरज असते. संघटनेतील आपली भूमिका प्रभावीपणे पार पाडली पाहिजे आणि ध्येयप्राप्तीच्या भावनेने निस्वार्थ कार्य केले पाहिजे हे व्यक्तीला विचारप्रणाली शिकवते. यातून व्यक्तीगत व सामूहिक पातळीवर नवचैतन्य निर्माण होते आणि कार्य करण्याची क्षमता वाढते.

### ६. विचारप्रणालीमुळे राजकीय सहभाग वाढतो

लोकशाही प्रक्रियामध्ये निवडणूका, संघटना, पक्ष इत्यादी घटक महत्त्वाचे असतात. यामध्ये राजकीय सहभाग होणे गरजेचे असते. विचारप्रणालीचे पक्के अधिष्ठान नसेल तर राजकीय सहभाग केवळ आंधळा सहभाग ठरतो आणि त्यातून अविवेकी व विध्वंसक झुंडशाहीचा धोका असतो. राजकीय सहभागातून जाणीव जागृत होऊन शोाषित घटकाला आपल्या हक्कासाठी संघटित होण्याची जाणीव होते आणि ते संघर्ष करतात, हे संघर्ष विचारप्रणालीच्या आधारावर लढले पाहिजे, म्हणून विचारप्रणालीचे पक्के अधिष्ठान असणे आवश्यक आहे. विचारप्रणालीमुळे राजकीय सहभाग वाढतो आणि नको असलेली प्रस्थापित व्यवस्था बदलू शकतो.

### ७. विचारप्रणालीमुळे राजकीय प्रशिक्षण व समाजीकरण घडते

विचारप्रणालीतून लाभणाऱ्या विचाराच्या व विश्वासाच्या सूत्राच्या आधारे समाजातून येणाऱ्या सर्व

राजकीय पर्यायांची चिकित्सा करून योग्य तो पर्याय निवडण्याचे प्रशिक्षण व्यक्तीला मिळते. हे पर्याय विविध राजकीय पक्षाच्या जाहीरनाम्याचे वा उमेदवारांचे असतील किंवा विशिष्ट राजकीय निर्णयाच्या वा धोरणाच्या समर्थनाचे वा विरोधाचे असतील. आपली राजकीय भूमिका वेळोवेळी कशी असावी व आपण कोणत्या बाजूने उभे रहावे हे विचारप्रणालीच्या आधारे व्यक्ती ठरवू शकते. एकाप्रकारे हे तिचे विचारप्रणालीतून होणारे राजकीय सामाजीकरणच असते.

## ८. विचारप्रणालीमुळे सत्तेला अधिमान्यता मिळते

विचारप्रणालीतून राजसत्तेला जी अधिमान्यता मिळते तेव्हा सत्तासंबंध आणि सुरळीतपणे कार्यान्वित राहतात, कारण लोक जे आज्ञापालन करतात ते केवळ कर्तव्यबुध्दीपेक्षा स्वेच्छापूर्वक करतात. सामाईक गरजांचा सामाईक पाठपुरावा करण्याच्या प्रयत्नातून त्याच्यात टिकाऊ एकजिनसीपणा निर्माण झालेला असतो.

अशाप्रकारे राजकीय विचारप्रणालीच्या विविध भूमिकांची चर्चा करण्यात आली आहे.

## ❑ विचारप्रणालीचा अंत

भांडवलशाहीने २० व्या शतकात सामाजिक, राजकीय बदल घडवून आणल्यामुळे विचारप्रणालीचे सर्वच आधार नष्ट झाले आहेत, त्यामुळे विचारप्रणालीचा अंत झाला आहे, असा सिध्दांत डॅनियल बेल याने आपल्या End of Ideology नामक ग्रंथात मांडला आहे. त्याच्या मते भांडवलशाहीची अनेक सत्तावादी रचना आणि कल्याणकारी राज्याची कल्पना यामुळे लोकांचे प्रश्न सुटलेले आहेत त्याच्या सर्व गरजा पूर्ण झाल्या आहेत. परिणामी समाज एकसंघ झाला आहे. कामगाराचे राहणीमान सुधारले आहे. स्वातंत्र्य व समता ही मूल्ये प्रतिष्ठित झाली आहेत त्यामुळे सद्यस्थितीत मूलभूत परिवर्तनाची गरज कोणालाच भासत नाही.

एकीकडे उदारमतवादी लोकशाही व्यवस्थेचे यश आणि स्टॅलिनच्या कारकिर्दीतील विचारप्रणालीच्या नावाखाली झालेला अत्याचार आणि मार्क्सची चुकलेली अनेक भाकिते यामुळे जगात आता कोणत्याच विचारप्रणालीचे आकर्षण उरलेले नाही. विचारप्रणालीतील मतभेद कमी होत जाऊन अखेरीस विचारप्रणालीचा अंत घडून आला आहे.

लिपसेटच्या मते, औद्योगिक क्रांतीचे मूलभूत प्रश्न सुटले आहेत. कामगारांना औद्योगिक व राजकीय नागरिकत्व मिळाले आहे. कल्याणकारी राज्याला मान्यता दिली आहे. त्यांना पश्चिमेत झालेल्या या सामाजिक क्रांतीमुळे आता अंतर्गत राजकारणात स्थानच उरलेले नाही, परंतु त्याच्या विचारावर टिका

करताना आपल्याला असे म्हणता येईल. कामगाराला नागरिकत्व देण्यातून त्याचे सर्व मानवी प्रश्न सुटलेले नाहीत. उत्पन्न व मालमत्ताविषयक विषमता रोज वाढत आहे. कल्याणकारी सोयी-सुविधा देण्यामागचा हेतू अन्याय दूर करणे नसून उत्पादनवृध्दी आणि औद्योगिक संबंध सुरळीत राखण्याचा आहे. यातून एक नवी सरंजामदारीच निर्माण केली जात आहे. अशाप्रकारे विचारप्रणालीचा अंत झाला आहे असे म्हणत असताना विचारप्रणालींची प्रस्तुतता आज वाढलेली आहे हे दिसून येते.

## १.२.३ अभिजात राजकीय सिद्धांताची प्रस्तुतता

ग्रीक व रोमन परंपरेतील सोफिस्ट, स्केप्टिक, सिनिक, एपिल्युरिच वगैरे सगळ्या विचारप्रवाहाचा अंतर्भाव पाश्चात्य अभिजात राजकीय सिध्दांतकाच्या परंपरेत होतो. राज्यशास्त्राचे समग्र आकलन होण्यासाठी अभिजात राजकीय सिध्दांत अभ्यास महत्त्वाचे आहे. अभिजात राजकीय सिध्दांत हे प्राचीनतम राजीय विचार आहे. प्लेटो, ॲरिस्टॉटल यांच्याप्रमाणेच आधुनिक काळातील रूसो, कांट, हेगेल, ग्रीन, बोसांकी, लास्की इत्यादी राजकीय विचारवंतांचा विचारही अभिजात राजकीय सिध्दांतामध्ये जमा होणार आहे. पाश्चात्य राजकीय विचारात विशेषत: ग्रीक राजकीय विचारामध्ये मानवी संस्कृती, न्याय, आदर्श राज्य, नैतिकता, व्यक्ती व समाज शिक्षण, कायदा इत्यादी घटकाचा समावेश होतो.

### ❑ अभिजात राजकीय सिध्दांत म्हणजे काय?

अभिजात राजकीय सिध्दांत म्हणजे ज्यांना काळाच्या प्रवाहात एक प्रकारचे अमरत्व प्राप्त झालेला सिध्दांत होय. जे विचार किंवा सिध्दांत काळावर मात करून त्याचे अस्तित्व कायम टिकवून ठेवतात. जुन्या विचाराचा नव्याने अर्थबोध होतो, असे विचार किंवा सिध्दांत हे अभिजात म्हणून ओळखले जाते. ज्या विचारांनी समाजजीवनाला ते उदयास आल्यापासून ते आजपर्यंत भेडसावणाऱ्या प्रश्नांची उत्तरे शोधण्यास मदत करतात ते सर्वकालीन मार्गदर्शकाची भूमिका पार पाडत राहतात, अशा विचारांना अभिजात राजकीय सिध्दांत असे म्हणतात. या अभिजात राजकीय सिध्दांतामध्ये सॉक्रेटिस, प्लेटो, ॲरिस्टॉटल यांचे नाव अग्रक्रमाने घ्यावे लागेल. याचा अर्थ असा नव्हे की, अभिजात राजकीय सिध्दांत केवळ ग्रीक विचारांशी संबंधीत आहे त्याकाळी इतर देशामध्ये जे विचार मांडले आहेत, तेही महत्त्वाचे आहेत. ग्रीक राजकीय विचारांची सुरुवात होमरच्या महाकाव्यापासून होते, त्याची इलियट आणि ऑडेसी ही महाकाव्ये जगप्रसिध्द आहेत. ग्रीकांनी साहित्य, कला, गणित, राज्यशास्त्र या सर्व क्षेत्रात मोलाची भर टाकली. ग्रीकमधील सॉक्रेटिस, प्लेटो, ॲरिस्टॉटल यांनी मांडलेले सिध्दांत हे अभिजात राजकीय सिध्दांतामध्ये महत्वाचे आहेत. अभिजात राजकीय सिध्दांताची वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे सांगता येतील.

१. अभिजात राजकीय सिध्दांत हे नैतिक दृष्टीकोनावर आधारलेले आहे. उदा. प्लेटोने आदर्श स्थितीचे समर्थन केले तर ॲरिस्टॉटलने एक सवोत्तम राज्य निर्माण करण्याचे विचार मांडले.

२. अभिजात राजकीय सिध्दांत हे मानवी समाजजीवनातील काही मूलगामी व मूलभूत तत्त्वाच्या आधारे समाजातील प्रश्नाचे निराकरण करीत असते.

३. अभिजात राजकीय सिध्दांत आदर्शवादी स्वरूपाची राज्यव्यवस्था निर्माण करण्याचा व्यापक दृष्टीकोन मांडतो आणि आमूलाग्र परिवर्तन करण्याचा प्रयत्न करतो, परंतु त्याला लोक त्यावर काल्पनिक आणि अवास्तव विचार आहेत अशी टिका करतात.

४. अभिजात राजकीय सिध्दांत, राजकीय घटनांचे स्पष्टीकरण आणि पर्यायी व्यवस्था निर्माण करण्यासाठी तुलनात्मक अभ्यासावर भर देतो. या कारणामुळेच अभिजात राजकीय सिध्दांतने राजकीय वर्गीकरण करून कायदा, नागरिकत्व, न्याय अशा अनेक संकल्पनांचा विकास केला आणि त्यातील साम्यभेद समजावून सांगितले.

५. अभिजात राजकीय सिध्दांत हे आहे त्या परिस्थितीचे विश्लेषण न करता प्राप्त परिस्थितीला पर्यायी आदर्श राज्यासारखी सैध्दांतिक मांडणी करतो आणि आदर्श राज्याची कल्पना मांडतो.

६. अभिजात राजकीय सिध्दांत हे राजकीय प्रश्नाकडे समग्रलक्षी दृष्टीकोनातून पाहतो.

अशाप्रकारे अभिजात राजकीय सिध्दांत हे नैतिक, आदर्शवादी विचार मांडतो.

## ❑ अभिजात राजकीय सिद्धांताची प्रस्तुतता

ज्यावेळी वर्तनवादी राजकीय सिध्दांत प्रभावशाली होते त्यावेळी आदर्शवादी राजकीय विचार हे संपुष्टात आले आहे ते मृतावस्थेत आहे अशी भूमिका अनेक विचारवंतांनी मांडली, त्या काळात अमेरिकेतील राजकीय विचारवंतांनी अभिजात राजकीय सिध्दांताचा अभ्यास मानवी जीवनात महत्त्वाचा असून तो आजही लोकांचे जीवन घडवू शकतो, असे प्रतिपादन केले. त्यामध्ये प्रामुख्याने लिओ स्ट्राऊस हे महत्त्वाचे विचारवंत होय. आधुनिक काळातील राजकीय तत्त्वज्ञानाच्या अभ्यासकांमध्ये लिओ स्ट्राऊस मोठे योगदान दिले आहे. ज्यावेळी राज्यशास्त्रामध्ये प्रत्यक्षार्थवादाचा आणि वर्तनवादाचा प्रभाव वाटला होता त्यावेळी डेव्हिड ईस्टनने राजकीय सिध्दांत हे कालबाह्य व इतिहासवादी आहे असे म्हणून त्यास मोडीत काढले होते. पीटर लासलेटने तर राजकीय सिध्दांताचा मृत्यू झाल्याची घोषणा केली होती. त्यावेळी स्ट्रॉसने अभिजात राजकीय सिध्दांताचा अभ्यास कायम ठेवला व त्याबाबतीत स्वत:स अभिप्रेत असणारे विश्लेषण तो प्रस्थापितांना न जुमानता करीत राहिला. प्लेटोच्या राजकीय तत्त्वज्ञानाचा वेगळा

अर्थ लावण्याचा त्याचा प्रयत्न होता. त्याचा विद्यार्थी ॲलन ब्लूस याने प्लेटोच्या रिपब्लिकचे भाषांतर केले आणि या भाषांतरास जोडलेल्या दीर्घ विश्लेषणात्मक निबंधात स्ट्रॉसच्या विचाराची जास्त स्पष्टरितीने मांडणी केली. लिओ स्ट्रॉसने अनेक ग्रंथ लिहिले आहेत, त्यात प्रामुख्याने नॅचरल राईट ॲन्ड हिस्टरी, व्हॉट इज पोलिटिकल फिलॉसॉफी ॲड अदर एसेज, ऑन टिरनी व सिटी ॲन्ड मॅन इत्यादी अनेक ग्रंथांचा समावेश होतो. त्याने राजकीय विचारांचा इतिहास या पुस्तकाचे संयुक्तपणे लिखाण केले त्यात त्याने प्लेटोच्या तत्त्वज्ञानाचा नव्याने अर्थ लावण्याचा प्रयत्न केला, एकूणच लिओ स्ट्रॉसने अभिजात राजकीय सिध्दांताचे क्रांतीकारी समर्थन केले आणि ते करीत असताना स्ट्रॉसने अभिजात राजकीय तत्त्वज्ञानाचे महत्त्व आणि प्रस्तुतता सांगण्याचा प्रयत्न केला ती पुढीलप्रमाणे स्पष्ट करता येईल.

## १. इतिहासवाद

आधुनिक तत्त्वज्ञान व प्राचीन तत्त्वज्ञान याच्यातील भेद सांगत असताना स्ट्रॉसने असे मत व्यक्त केले की, आधुनिक तत्त्वज्ञान हे प्रत्यक्षार्थवादी असून त्यात वैज्ञानिक संशोधन पध्दती लादण्याचा प्रयत्न केला आहे. आधुनिक वर्तनवादी राजकीय सिध्दांत हे मूल्यनिरपेक्ष असू शकत नाहीत, कारण मूल्याधिष्ठीत हे त्याचे वैशिष्ट्य आहे. त्याच्या मते, आधुनिक राजकीय तत्त्वज्ञानावर इतिहासवादाचा नियम शोधण्याचा प्रयत्न केला जातो आणि या नियमांच्या आधारावर भविष्यात होणाऱ्या समाजाच्या वाटचालीचे विवेचन केले जाते. स्ट्रॉसच्या मते, या वाटचालीस स्वत:ला अनुकूल करणे आणि तिच्या यशस्वी प्रवासात साह्यभूत होणे हे व्यक्तीचे ध्येय असते. इतिहासवादात व्यक्तीची संकल्पशक्ती नष्ट होते. तिचे कृतिस्वातंत्र्य इतिहासाच्या पोलादी नियमांना जखडलेले असते. त्यामुळे स्ट्रॉसच्या मते, इतिहासवाद हे मानवी कृती स्वातंत्र्यात बाधा आणतात, म्हणून आधुनिक राजकीय सिध्दांतापेक्षा प्राचीन ग्रीकाचे अभिजात राजकीय सिध्दांत हे जास्त चांगले आहे, असे त्याचे मत होते.

## २. आदर्शवादी कल्पना

अभिजात राजकीय सिध्दांत हे आदर्शवादाची कल्पना सांगतात, परिपूर्ण जीवनात संघर्षाचे मार्गदर्शन करतात असे म्हणत असताना प्लेटोच्या तत्त्वज्ञानाचा अन्वयार्थ लावताना स्ट्रॉस असे मत व्यक्त करतो की, आदर्श राज्य स्थापन करण्यासाठी समाजातील सर्वसाधारण माणसांना मोठा त्याग करावा लागतो, त्यामुळे प्लेटोच्या कुटुंबाचा साम्यवाद, तत्वज्ञ राजाचे, उच्चशिक्षण पध्दती, उदात्त मिथकाची कल्पना गुहेचा दृष्टांत आणि इतर काही बाबींचा विचार केला तर असे स्पष्ट होते की, प्लेटोला आदर्श राज्य स्थापन करावयाचे नव्हते तर त्याला असे आदर्श राज्य स्थापन करणे कसे अशक्य व अप्रस्तुत आहे हेच दाखवायचे होते अशी भूमिका लिओ स्ट्रॉस यांनी मांडली आहे. स्ट्रॉस असे म्हणतो की, प्लेटो रिपब्लिक मध्ये असे मत प्रतिपादन करतो की, आदर्श राज्य स्थापन करता येणार नाही, पण आदर्श

तत्वज्ञ निर्माण करणे शक्य आहे. व्यक्तीगत पातळीवर तत्त्वज्ञानाची साधना करून अभ्यास करून आपणास तत्त्वज्ञ होता येईल, परंतु त्याच्या आधारावर आपणास आदर्श राज्य स्थापन करता येणार नाही, असे मत स्ट्रॉसने मांडले आहे.

## ३. ज्ञान

लिओ स्ट्रॉस हा अत्यंत सूक्ष्म अन्वयार्थ लावणारा व अन्वय पध्दतीने तत्त्वज्ञानाचा अभ्यास करणारा विचारवंत आहे. प्राचीन ग्रीक विचारवंताच्या महत्त्वपूर्ण ग्रंथाचा अभ्यास अल फराबी या अरब तत्त्वज्ञाने केला आहे. स्ट्रॉसच्या मते, प्लेटो व ॲरिस्टॉटलच्या महत्त्वाच्या ग्रंथात असे अनेक उल्लेख आहेत, त्याचा अर्थ विशिष्ट पध्दतीची अन्वय पध्दत वापरूनच आपणास समजू शकतो. प्लेटोच्या रिपब्लिकची मिमांसा स्ट्रॉसने याच पध्दतीने केली. ज्ञानासंबंधीची मांडणी करताना लिओ स्ट्रॉसने प्लेटोच्या गुहेसंदर्भातील विवेचन करताना असे म्हटले की, प्लेटोच्या मते, एक भूमिगत गुहा आहे, ज्यामुळे तो ज्ञानअज्ञानासंदर्भात गुहेचा दृष्टांत देऊन विश्लेषण करतो. प्लेटोला अभिप्रेत असणारी भूमिगत गुहा म्हणजे आपले जग आहे आणि त्यात बंद असणारे लोक म्हणजे रूढी, परंपरा, समज, श्रध्दा यांचा गुलाम असणारा सर्वसाधारण समाज आहे. आपणास सत्याचे ज्ञान झाले असे समजणारा सॉक्रेटिससारखा तत्वज्ञ ज्यावेळी लोकांना खरे ज्ञान सांगावयास जातो, त्यावेळी बहुसंख्य लोकांना ते आवडत नाही ते त्याला विरोध करतात. त्याला फाशी देतात किंवा त्याला क्रूसावर चढवतात! त्यामुळे लिओ स्ट्रॉस असे मत व्यक्त करतो की, सत्याचा शोध घेणे व ज्ञानाची साधना करणे हा ज्याच्या जीवनाचा उद्देश आहे, त्या माणसाला राजकीय पदाची प्राप्ती व ते पद सांभाळणे लाभदायक ठरत नाही.

## ४. प्रत्यक्षार्थवादाला विरोध

स्ट्रॉसच्या मते, राजकीय विचाराच्या आधुनिक काळामध्ये तीन लाटा आल्या. या परिवर्तनाच्या तीन लाटाची सुरुवात मॅकियाव्हेलीने केली. मॅकियाव्हेली आणि हॉब्ज यांनी नैसर्गिक अधिकारांच्या सिध्दांताला रजा दिली. दुसरी लाट रूसोच्या तत्त्वज्ञानातून अभिव्यक्त होते. आधुनिक राजकीय तत्त्वज्ञानाची प्रत्यक्षार्थवादी तत्त्वज्ञानाशी सांगड घातली असून तिचा उद्देश आधुनिकीकरणाचा प्रकल्प सुरू करणे हा आहे. या सर्वच लाटातून स्ट्रॉसच्या मते, व्यक्तीच्या स्वतंत्रपणे विचार करण्याच्या, आपले स्वत:चे तत्त्वज्ञान मांडण्याच्या अधिकाराचा संकोच झाला, कारण आधुनिकता व्यक्तीस्वातंत्र्याचा पुरस्कार करीत असली तरी तिचा आत्मा समष्टीवादी आहे, असे स्ट्रॉसचे निदान होते म्हणून तो या तिन्ही लाटातून अभिव्यक्त होणाऱ्या विचाराचा विरोधक होता. स्ट्रॉसच्या मते, आधुनिक तत्त्वज्ञानात प्रत्यक्षार्थवादाचा व विज्ञानाचा अतिरेक असून त्याचा प्रयत्न निसर्गाचे नियम मानवी व्यवहारावर लादल्याचा होता, यातूनच आमूलाग्र सामाजिक बदलाची कल्पना पुढे आली यास स्ट्रॉसचा विरोध होता.

## ५. वर्तनवादाला विरोध

स्ट्रॉसच्या मते, विज्ञानाचे नियम विज्ञानाला लागू होतात, वर्तनाचे नियम हे लोकांना लागू होतात. कारण मानवी वर्तनातून नियम ठरत असतात. हे दोन्हीही नियम स्वायत्त असतात. विज्ञानाचे नियम हे लोकांना लागू होणार नाहीत, कारण माणसाची कृती ही मूल्याधिष्ठीत आहे, त्यामुळे वर्तनवादी राजकीय विचारवंतानी मूल्यनिरपेक्षतेचा मुद्दा खोडला. अभिजात राजकीय सिध्दांतात मूल्यांना महत्त्वाचे स्थान आहे. विज्ञानाच्या पध्दती मानवी मूल्यांना लावणे चुकीचे आहे म्हणून वर्तनवादाचा स्ट्रॉसने विरोध केला आहे.

अशाप्रकारे लिओ स्ट्रॉसने अभिजात राजकीय सिध्दांताची नव्याने मांडणी करून त्याचे महत्त्व पटवून दिले आहे. म्हणून अभिजात राजकीय तत्त्वज्ञानाला आज ही प्रस्तूतता प्राप्त झाली आहे.

## ❑ अभिजात राजकीय सिद्धांताची मर्यादा

स्ट्रॉस व त्याच्या विद्यार्थ्यांनी अभिजात राजकीय सिध्दांताचे महत्त्व लोकांसमोर मांडले व या अभ्यासाला नव्याने चालना देण्याची प्रेरणा स्ट्रॉसने लोकांसमोर मांडली, त्यामुळे नवे शास्त्रज्ञ निर्माण झाले. त्यांनी ग्रीक तत्त्वज्ञानाचा अभ्यास सखोलपणे केला.

१. अभिजात राजकीय सिध्दांत हे काही महत्त्वाच्या नैतिक प्रश्नाबाबत मार्गदर्शन करतात, परंतु हे सिध्दांत अतिशय गुंतागुंतीचे व व्यापक आहेत. प्लेटोच्या काळातील राष्ट्र राज्याची कार्ये व आजची राष्ट्र राज्याची कार्ये आहेत, त्यात फरक आहे. त्यामुळे आजच्या राज्याच्या समस्यांची सोडवणूक करण्यासाठी अभिजात राजकीय सिध्दांत हे पुरेसे ठरणार नाही. अभिजात राजकीय सिध्दांत हे नव्या-नव्या राजकीय सिध्दांताची जागा घेऊ शकत नाही, परंतु अभिजात राजकीय सिध्दांताचा अभ्यास करण्यास हरकत नाही. राजकीय सिध्दांताला एक नैतिक आयाम व परिमाण आहे.

२. अभिजात राजकीय सिध्दांत हे कल्पनेवर आधारित आहे व वैज्ञानिक पध्दत न वापरता त्याची मांडणी झाली आहे. गेल्या ५०-६० वर्षांत राज्यशास्त्राने आधुनिक संशोधन शास्त्र वापरून अनेक बाबतीत विश्‍वासार्ह निष्कर्ष काढण्यात मजल मारली. या राज्यशास्त्रात अनेक मर्यादा आहेत. परंतु या मर्यादामुळे ५०-६० वर्षांचे तत्त्वज्ञान कुचकामी म्हणून चुकीचे ठरले असे म्हणता येणार नाही. कारण यातून नव्या शाखा निर्माण झाल्या. या शाखांनी नवे योगदान दिले, याकडे दुर्लक्ष करून चालणार नाही.

३. आज राज्यशास्त्राचा विकास व्यापक दृष्टीकोनातून झाला. गेल्या ३०-४० वर्षात आंतरराष्ट्रीय राजकारण तौलनिक राज्यशास्त्र असे नवे विषय निर्माण झाले. २१ व्या शतकात अनेक नवे विषय निर्माण होण्याची शक्यता आहे. कारण विकास प्रशासन, स्त्रियांचे प्रश्न, स्त्रीवाद, राजकीय संस्था असे विषय निर्माण झालेले आहेत. यातील अनेक विषय हे शास्त्रीय पध्दतीने निर्माण झाले, अभिजात राजकीय सिध्दांत नव्या वाढत जाणाऱ्या विषयांना सामावून घेऊ शकत नाही.

अशाप्रकारे अभिजात राजकीय सिध्दांत हे आजच्या काळात पूर्णपणे लागू पडत नसले तरी त्याचे महत्त्व मात्र कायम टिकून आहे. अभिजात राजकीय सिध्दांत नैतिक आणि आदर्शवादी विचारप्रणालीवर आधारलेला आहे, त्यामुळे नैतिक मूल्ये आजच्या राजकारणात असणे आवश्यक आहे. अभिजात राजकीय सिध्दांत हे महत्त्वाचे कार्य करते म्हणून त्याची प्रस्तुतता आजही आहे असेच म्हणावे लागेल कारण प्लेटोच्या रिपब्लिकमधील ९व्या प्रकरणात हुकूमशाहीचे जे वर्णन केले, ते आधुनिक काळातील हिटलर व मुसोलिनी यांना तंतोतंत लागू पडलेले दिसून येते, त्यामुळे अभिजात राजकीय सिध्दांताची प्रस्तुतता नाकारता येत नाही.

## १.२.४ राजकीय सिद्धांताचा ऱ्हास आणि पुर्नरुज्जीवन

विसाव्या शतकाच्या सुरुवातीस साम्राज्यवाद आणि वसाहतवाद प्रभावी होता. त्यातून पहिल्या महायुद्धाचा उदय झाला. यामध्ये जर्मनी, ऑस्ट्रिया व तुर्कस्थान यांनी इंग्लंड आणि फ्रान्सच्या सत्तेला आव्हान दिले. त्यात जर्मनीचा पराभव झाला. याच काळात रशियामध्ये १९१७ साली बोल्शेविक क्रांती झाली आणि लेनिनच्या नेतृत्वाखाली नव्या समाजवादी सोव्हिएत राज्याचा उदय झाला. त्यानंतर समाजवाद कशारीतीने स्थापन करावा याबाबत विचारमंथन सुरू झाले. त्यामध्ये प्रामुख्याने लेनिन स्टॅलिन ट्रॉटस्की याचा समावेश होतो. दुसरीकडे १९२३ साली फ्रॅंकफर्ट येथे 'फ्रॅंकफर्ट स्कूल ऑफ क्रिटीकल थेअरी'ची स्थापना झाली. १९३९-४५ या काळात दुसरे महायुद्ध झाले, त्यामध्ये जर्मनी, इटली व जपान यांचा पूर्ण पराभव झाला आणि इंग्लंड व अमेरिका यांनी हे युध्द जिंकले. या युद्धानंतर महासत्ता म्हणून इंग्लंडची जागा अमेरिकेने घेतली. राज्यशास्त्रात ही अमेरिकन राज्यशास्त्रज्ञानी पुढाकार घेतला आणि विकासाच्या राजकारणाचे निकष वापरून तौलनिक राजकारण ही अभ्यासाची नवी शाखा जन्मास घातली. कारण अमेरिकन व फ्रेंच राज्यक्रांत्या झाल्या, त्याकाळात राजकीय सिध्दांतांची भूमिका व हेतू पूर्णपणे बदलले होते. राजकीय विचारवंतांनी समाजात बदल करण्याचे व विकासाचे मार्ग सांगावेत ही भावना जनतेमध्ये दृढ झाली होती. एकूणच दुसऱ्या महायुध्दानंतर अमेरिकेमध्ये सर्व सामाजिक शास्त्रांपेक्षा राज्यशास्त्र, वैज्ञानिक पध्दती स्वीकारण्यात मागे आहे, तेथे अजून इतिहास, तत्त्वज्ञान व नीतीशास्त्र

यावर जास्त भर दिला जातो, त्यामुळे प्रत्यक्ष राजकारणाचा, राजकीय प्रक्रियेचा योग्य अभ्यास होत नाही असे आक्षेप घेण्यात आले. डेव्हीड ईस्टनने वर्तनवादी क्रांतीचा उद्‌घोष केला आणि आल्मंड आणि पावेल यांनी रचनात्मक कार्यवादाचा वापर करून राजकीय व्यवस्थेचे विकासवादी प्रतिमान मांडले. या सर्व कारणामुळे आदर्शवादी विचार हे सद्यस्थितीत उपयोगी नाहीत असा विचार अनेक विचारवंतानी मांडला. राजकीय सिध्दांताचे आता प्रयोजन उरलेले नाही, म्हणून अनेक विचारवंतानी राजकीय सिध्दांताचा ऱ्हास झाला आहे अशी घोषणा केली.

पीटर लास्लेट यानी 'फिलॉसॉफी, पॉलिटिक्स अँड सोसायटी' या संपादित ग्रंथाच्या पहिल्या आवृत्तीच्या प्रस्तावनेत राजकीय सिध्दांत आता मृत झाले आहे, राजकीय सिध्दांत चिरायू होवो अशी घोषणा करून टाकली. कारण प्लेटोपासून राजकीय सिध्दांताची मांडणी करण्यास सुरूवात झाली व ते मार्क्स, मिलनंतर संपले त्याचा शेवटचा प्रतिनिधी म्हणून हेरॉल्ड लास्की यांना मानले जाते. लास्कीच्या 'ग्रामर ऑफ पॉलिटिक्स'नंतर राज्यशास्त्राचे कोणतेच पुस्तक प्रकाशित झाले नव्हते. डेव्हीड ईस्टन आणि आलमंड कॉबन यानी राजकीय सिध्दांताचा ऱ्हास झाला आहे असे म्हटले तर लास्केट व रॉबर्ट डहाल यांनी राजकीय सिध्दांत मृत पावल्याची घोषणा केली. परंतु राजकीय सिध्दांत १९७०-७१ च्या दशकात पुनरुज्जीवीत झाले, त्यामुळे लास्लेट यांनी आपल्या पुस्तकाच्या तिसऱ्या आवृत्तीत त्याचे राजकीय सिध्दांत मृत पावल्याचे म्हणणे मागे घ्यावे लागले.

## ❑ राजकीय सिध्दांताच्या ऱ्हासाची कारणे

डेव्हिड इस्टनच्या मते, राजकीय सिध्दांताच्या ऱ्हासाची कारणे पुढीलप्रमाणे सांगता येतील.

### १. इतिहासवाद

डेव्हीड ईस्टनच्या मते, डनिंग, सेबाईन मॅक्सिवेन, लिंडसे आणि ऐलन या राजकीय विचारवंतानी भूतकाळातील राजकीय विचारांचा अभ्यास करण्यातच अधिक वेळ खर्ची घातला. त्यांनी नवे सिध्दांत मांडून त्याचे विश्लेषण करण्याऐवजी समकालीन आणि भूतकालीन मूल्याचा अर्थ, अंतर्गत सुसंगती व ऐतिहासिक विकासक्रम याबद्दलची माहिती गोळा करण्यातच धन्यता मानली. काही अभ्यासकानी संस्था आणि राजकीय विचाराचा ऐतिहासिक आढावा घेतला तर काहीनी त्याची वाटचाल कशी रितीने झाली, याचा अभ्यास केला. एकूणच सर्व अभ्यासकांनी ऐतिहासिक दृष्टीकोणानेच विचार केला. त्यात बार्कर आणि लास्की यांचे अपवाद सोडले तर सर्व राजकीय विचारवंत केवळ इतिहासकार झाले आहेत असे म्हटले जाऊ लागले, त्यामुळे इतिहासवाद हे राजकीय सिध्दांताचे ऱ्हास होण्यास कारणीभूत घडले.

## २. नैतिक सापेक्षतावाद

ह्युम वेबर मार्क्स इ. विचारवंतांनी तथ्ये व मूल्ये यांना एकमेकांपासून वेगळे करण्याचा प्रयत्न केला. मॅक्स वेबरने अनुभववादी संशोधनामध्ये मूल्यांना स्थान दिले नाही. त्यामुळे अनेक विचारवंतांनी मूल्यनिरपेक्षेतेचा आग्रह धरला. परंतु व्यक्तीच्या व समूहाच्या जीवनानुभवातून त्यांचे अग्रक्रम तयार होतात आणि त्या अग्रक्रमाचा आविष्कार म्हणजे त्यांची मूल्ये असतात. एका कालखंडातील मूल्ये दुसऱ्या कालखंडात लागू करता येत नाही, त्यामुळे तसे करणे व्यर्थ आहे. त्यामुळे विसाव्या शतकात नैतिक सापेक्षतावादी विचारवंतानी या जुन्या मूल्यांची चिकित्सकरीत्या अभ्यास करून नव्याने पुनर्बांधणी करण्याचा प्रयत्न केला नाही त्यामुळे नैतिक सापेक्षतावाद राजकीय सिध्दांताचा ऱ्हास होण्यास कारणीभूत ठरेल.

## ३. विज्ञान व सिध्दांत यातील विसंगतपणा

२०व्या शतकाच्या सुरूवातीपासून राज्यशास्त्रज्ञ हे विज्ञानाला सिध्दांत समजू लागले. सिध्दांत हा विज्ञानाच्या पलीकडे जाणारा असतो याचे त्यांना विस्मरण झाले, त्यामुळे पारंपारिक राजकीय सिध्दांत मागे पडले, कारण तथ्याचे संकलन करणे आणि त्या आधारावर राजकीय संस्था व प्रक्रिया सुधारण्याचे उपाय सुचवणे हे त्यांनी आपले कार्य मानले. हे कार्य शास्त्रीय असले तरी त्यातून आपोआप सिध्दांत हाती घेणे शक्यच नव्हते. संस्थांपेक्षा हेतू आणि प्रेरणा तपासणे महत्त्वाचे असले तरी सिध्दांत निर्मितीसाठी ते पुरेसे मात्र नाही, त्यामुळे विज्ञान आणि सिध्दांत याचे आकलन चुकीचे होते.

## ४. अतितथ्यता

सिध्दांताला अनुभववादाची जोड देण्याच्या हव्यासापोटी तथ्यसंकलनाला प्राधान्य देण्यात आले व सिध्दांताचे स्थान दुय्यम झाले आणि कालांतराने सिध्दांत मागे पडले. तथ्य संकलनाची कार्यक्षम तंत्रे शोधण्यात राज्यशास्त्रानी बरीच प्रगती केली. परंतु प्रत्यक्ष राजकारणाचा समग्र वेध घेण्याची साधने मात्र ते हरवून बसले. अशाप्रकारे सिध्दांताअभावी तथ्यसंकलन निरर्थक ठरले.

## ५. वास्तववादी मूल्ये आणि संकल्पनाचा अभाव

आल्फ्रेड कॉबन यांच्या मते, आधुनिक जगामध्ये राज्याच्या कार्यक्षेत्रात मोठ्या प्रमाणात वाढ झाल्यामुळे सर्वच क्षेत्रात नोकरशहाचे वर्चस्व निर्माण झाले. त्याचबरोबर जगात सामर्थ्यशाली लष्करी यंत्रणा उभ्या राहिल्या. ही परिस्थिती राजकीय चिंतनाला मारक ठरली. कारण पूर्वी होऊन गेलेल्या राजकीय विचारवंतांनी वास्तवाची जाणीव ठेवून प्रत्यक्ष राजकीय संस्थाचा पुरस्कार किंवा निषेध केला होता. परंतु आधुनिक राजकीय विचारवंतानी वास्तववादी परिस्थितीशी जुळणाऱ्या राजकीय मूल्याची

किंवा संकल्पनांची निर्मिती केली नाही. नैतिक तटस्थता आणि शास्त्रीय पध्दतीचे अनुकरण स्विकारल्यामुळे राजकीय सिध्दांताचे मूल्यांकन व परीक्षण करता आले नाही. कारण आधुनिक विचारवंत नैसर्गिक शास्त्राच्या अभ्यासपध्दती जशास तशा आपल्या विषयाला लागू करण्यातच धन्यता मानू लागले होते. त्यामुळे राजकीय सिध्दांताच्या ऱ्हासास वास्तववादी मूल्ये व संकल्पनेचा अभाव हे एक कारण ठरले.

### ६. विचारप्रणाली

दान्ते जर्मिनोसारखा अभ्यासक राजकीय सिध्दांताच्या ऱ्हासाला विचारप्रणाली जबाबदार मानतो. विचारनिर्मिती ही भौतिकवादी प्रक्रिया असून, सामाजिक व राजकीय सुधारणा घडवून आणणे हे विचारप्रणालीचे प्रमुख काम व ध्येय आहे. विचाराचे स्रोत विचारप्रणालीपुरते मर्यादित करण्याच्या प्रक्रियेमुळे विचारप्रणालीचा ऱ्हास घडून आला आणि त्यामुळे सिध्दांत निर्मितीची प्रक्रिया थांबली. त्याला जर्मिनो 'आयडिऑलॉजिकल रिडक्शनिझम' असे नाव देतो.

वरील कारणांमुळे राजकीय सिध्दांताचा ऱ्हास झाल्याचे दिसून येते. त्याचबरोबर जर्मिनो ट्रेसीच्या मते, विचारप्रणालीची निर्मिती ही राजकीय सिध्दांताच्या ऱ्हासास कारणीभूत ठरलेली आहे. ऑगस्ट कॉम्तचा प्रत्यक्षार्थवाद हे राजकीय सिध्दांताच्या ऱ्हासाचे कारण ठरले. ब्रेस्ट आणि डेव्हिड इस्टन यांच्या मते वेबरने तथ्य आणि मूल्याच्यामध्ये केलेल्या तफावतीमुळे राजकीय सिध्दांताचा ऱ्हास झाला, तर लिपसेट आणि पॅट्रिजच्या मते, जगातील सर्व प्रश्नाची उत्तरे औद्योगिक क्रांतीने देऊन टाकली आहेत त्यामुळे त्या प्रश्नाच्या भोवतीच उभे राहिलेले सर्व पारंपारिक राजकीय सिध्दांत आधुनिक काळात गैरलागू झाले, अशी अनेक विचारवंतानी राजकीय सिध्दांताच्या ऱ्हासाची कारणे सांगितली आहेत. परंतु राजकीय सिध्दांताचा ऱ्हास झाला आहे का? याचे उत्तर नाही असे द्यावे लागेल, कारण राजकीय सिध्दांत कधीच कालबाह्य होत नाहीत तर मानवी समाजाचे अस्तित्व असेपर्यंत त्याची गरज भासणार आहे, म्हणून राजकीय सिध्दांत हे मृत झाले नसून १९७० नंतरच्या काळात पुनरुज्जीवीत झाल्याचे दिसून येते.

## ❑ राजकीय सिध्दांताचे पुनरुज्जीवन

राजकीय सिध्दांताच्या अभ्यासाबद्दल काही प्रमाणात लोकांची रुची कमी झाली असली तरी त्याचा अभ्यास चालूच होता. नव्यापरिस्थितीच्या, नव्या आव्हानाच्या संदर्भात त्याची मांडणी अभ्यासक करीत होते. त्यामुळे काही विचारवंतांच्या मते, राजकीय सिध्दांतातील काही गोष्टी कालबाह्य झालेल्या आहेत परंतु त्याचा ऱ्हास झाला नाही. तर त्याच्यामते राजकीय सिध्दांत जीवित असून त्यामध्ये बदल झाला आहे आणि विकास झाला आहे. इसाय बर्लिनच्या मते, कोणताही काळ राजकीय सिध्दांताशिवाय गेला नाही किंवा जाऊ शकत नाही. त्यामुळेच पारंपारिक राजकीय विचारवंतांच्या मते, राजकीय सिध्दांत मृत

पावलेलाच नव्हता असे स्पष्टीकरण देण्यात आले. या काळातच राजकीय सिध्दांतामध्ये न्याय, स्वातंत्र्य, लोकशाही, अधिकार इत्यादी संकल्पनांच्यासंदर्भात पुर्नमांडणी करण्यात आली. एकूणच १९७० नंतरच्या काळात राजकीय सिध्दांत नव्या स्वरूपात मांडण्यात आले. त्याचबरोबर जागतिक पातळीवर अनेक घटना घडल्या. जी वर्तनवादाची लाट होती ती ओसरली होती, त्यामुळे पिटर लासलेट यांनी संपादित केलेल्या पुस्तकाच्या तिसऱ्या आवृत्तीत राजकीय सिध्दांताचे पुर्नरुज्जीवन झाले आहे असे घोषीत करण्यात आले.

## ❑ राजकीय सिध्दांताच्या पुनरूज्जीवनाची कारणे

राजकीय सिध्दांतात जे बदल होत होते, त्याचबरोबर जागतिक पातळीवरील युध्द, चळवळी झाल्या. काही नवे विचार विकसित झाले, त्यातून राजकीय सिध्दांताचे पुनरूज्जीवन झाले, त्याची कारणे पुढीलप्रमाणे सांगता येतील.

### १. नव्या राजकीय ग्रंथाची निर्मिती

१९७० च्या काळात न्याय, स्वातंत्र्य, अधिकार, लोकशाही इ. संकल्पनांवर अनेक मूलगामी विचार मांडणारे ग्रंथ लिहिले गेले. त्यामध्ये जॉन रॉल्स यांचा 'थिअरी ऑफ जस्टिस' (Theory of Justice), इसाया बर्लिन यांचा 'टू कन्सेप्टस ऑफ लिबर्टी (Two concepted Liberty)', रोनाल्ड डार्विन यांचा 'टेकिंग राईटस् सिरियसली (Taking Right Seriously', ब्रॉयन बॅरी यांचा 'पॉलिटिकल आरग्युमेंट (Political Argument) आणि सी.व्ही.मॅक्फर्सन यांचा 'थिअरी अाफ डेमॉक्रसी' हे महत्वाचे ग्रंथ होते. याच काळात ॲना आरेंट, निको स्ट्रॉस, नॉझिक, कार्ल पॉपर इत्यादी विचारवंत राजकीय सिध्दांतावर लिखाण करीतच होते. या सर्व बदलांची दखल घेऊन लासलेटने घोषित केले की, राजकीय सिध्दांताचे पुनरूज्जीवन झाले आहे.

### २. नवमार्क्सवादाचा उदय

कार्ल मार्क्सचे तत्त्वज्ञान हे नव्या युगातील एक महत्त्वाचे तत्त्वज्ञान आहे. १९१७ ला रशियन क्रांती व १९४९ ला चीनमध्ये क्रांती झाली, त्यामुळे लेनिन, स्टॅलिन व माओ-त्से तुंग यांनी मांडलेल्या विचारांभोवतीच जगभराच्या परिवर्तनवादी व क्रांतीकारी शक्ती उभ्या राहिल्या. या शक्ती भांडवलशाही आणि साम्राज्यशाही विरोधात उभ्या राहिल्या. या सर्व गोष्टीचा विचार करून युरोपातील कम्युनिस्ट पक्षाला जवळ असणाऱ्या काही बुध्दिवंतानी व विचारवंतानी मार्क्सच्या तत्त्वज्ञानाचा अभ्यास सुरू केला. मुख्य चळवळीशी विसंगत अशा प्रवृत्तीचे काही लोक होते. तेही त्यांना सामील झाले. या लोकानी नवमार्क्सवादाचे बीजारोपण केले. नवमार्क्सवाद्यांनी राजकीय सिध्दांतामध्ये मोठी भर घातली. त्यामध्ये

प्रामुख्याने फ्रॅंकफर्ट स्कूलच्या ॲडोर्लो, हार्कहायलेर, एरिक फ्रॉम, बेझांमिन हेबरमास इ. विचारवंतांचा समावेश होतो. त्याचबरोबर हर्बर्ट मार्क्यूस, तुकाच, कार्ल कोर्स गोल्डमन यांचेही योगदानही महत्त्वाचे होते.

### ३. व्हिएतनामचे युद्‌ध

शीतयुध्दाच्या काळात उत्तर व्हिएतनाम विरुध्द दक्षिण व्हिएतनाम (अमेरिका व इतर देशांचे समर्थन) मध्ये जे युद्ध झाले त्यास व्हिएतनामचे युध्द असे मानले जाते. हे युध्द साम्यवादी विचारांच्या देशाच्या गटातील उत्तर व्हिएतनाम व त्याच्या विरोधात दक्षिण व्हिएतनाम हा साम्यवादाला विरोध करणारा गट होता. या युध्दात अमेरिकेचा सहभाग वाढत होता. त्यामुळे सैन्य संख्या कमी पडत होती म्हणून अनेक विद्यार्थ्यानी आपला अभ्यास सोडून कॉलेज सोडून सैन्यात सामिल व्हावे लागले. त्यावेळी युद्धभूमीवर लढत असताना विद्यार्थ्यांना याची जाणीव झाली की, अमेरिका गरीब व्हिएतनामवर अन्याय करीत आहे. त्यामुळे हे विद्यार्थी कॉलेजापर्यंत आल्यानंतर व्हिएतनामच्या युद्धाबद्दल प्रश्न लागले आणि त्याच्यामध्ये अमेरिकेच्या धोरणाविरोधात बंडखोरीची भावना निर्माण झाली. यातून बऱ्याच लोकांचा अमेरिकेबाबत/भांडवलशाहीबाबत भ्रमनिरास झाला.

### ४. न्यू लेफ्ट मुव्हमेंट

१९६० च्या उत्तरार्धात युरोपमध्ये आक्रमक अशा विद्यार्थी चळवळी झाल्या, याची सुरुवात इंग्लंडमध्ये झाली. इंग्लंडमध्ये 'न्यू रीझनर' आणि 'युनिव्हर्सिटी आणि लेफ्ट रिव्ह्यू' या दोन मालिकांच्या संयोगातून 'न्यू लेफ्ट रिव्ह्यू' चा जन्म झाला. ही चळवळ वाढत गेली आणि १९६८ साली अमेरिका, इंग्लंड, फ्रान्स आणि प.जर्मनी येथे या विद्यार्थ्यांनी क्रांती करण्याचा प्रयत्न केला. 'न्यू लेफ्ट रिव्ह्यू'मध्ये अनेक तात्त्विक प्रश्नांची सखोल चर्चा करण्यात आली. मार्क्सवादाची फेरमांडणी करण्याचा त्याचा प्रयत्न होता. पेरी अँडरसन, रेजिसदेब्र, तारिक अली, थॉम्सन अशा पुढाऱ्यानी मूलगामी विचार मांडले. या चळवळीस मार्क्सच्या विचारांचा आधार होता. अशा न्यू लेफ्ट मुव्हमेंट विचारवंतानी सोव्हिएत शासन व्यवस्थेवर टीका करण्यास सुरवात केली, त्यांचा स्टॅलिनवादाला विरोध होता, त्यामुळे त्यानी लोकशाही, सत्तेचे विकेंद्रीकरण, केंद्रीकृत शासन यंत्रणा विसर्जन इत्यादी बाबींचा पुरस्कार केला.

### ५. तिसऱ्या जगातील नवा विचारप्रवाह

माओत्से तुंग च्या मते, तिन जग आहेत. पहिले जग अमेरिका व सोव्हिएत संघ या महासत्ताचे, दुसरे पूर्व व पश्चिम युरोपमधील देशांचे आणि आफ्रिका, आशिया आणि लॅटिन अमेरिकेतील देशाचे तिसरे जग. जगामधील खरा संघर्ष हा पहिल्या आणि तिसऱ्या जगामध्ये आहे. युरोप खंडातील देशांनी विज्ञान तंत्रज्ञानात प्रगती केली आणि सर्व जगावर ताबा मिळविला. त्यामुळे आशिया, आफ्रिका खंडातील

देश हे मागे पडले आणि परावलंबी बनले, त्यामुळे विकसित आणि अविकसित देशातील अंतर वाढत गेले. जे तत्त्वज्ञान अथवा सिध्दांत मांडले जात होते. ते सिध्दांत विकसित देशातूनच मांडले जात होते. परंतु १९७० नंतर तिसऱ्या जगातील विचारवंतांनी अर्थविकासाचे व परावलंबित्वाचे सिध्दांत मांडले. त्यात प्रामुख्याने सांतोस, कोर्डोसा, फुर्ताडो आणि आंद्रे गुदर फ्रँक या लॅटिन अमेरिकेतील विचारवंतांचा समावेश होतो, त्याशिवाय इमॅन्युंल वॉलेस्टिन यानी विश्वव्यवस्था सिध्दांत मांडले, तर समीर समीन यांनी अर्थ विकासाचा परावलंबित्वाचा सिध्दांत मांडला. आंद्रे गुंदर फ्रँक यांनी अर्थ व न्यून विकासाचा व परावलंबीत्वाचा सिध्दांत मांडले. तिसऱ्या जगातील विचारवंताचे विचार लोकांसमोर आला, त्यामुळे राजकीय सिध्दांतात भर पडली व राजकीय सिध्दांताचे पुनरूज्जीवन झाले.

**६. उत्तर वर्तनवाद**

डेव्हीड ईस्टन यांनी वर्तनवादाचा पाया घातला. त्याद्वारे राजकीय सिध्दांताचा ऱ्हास झाल्याची घोषणा केली. दशकानंतर डेव्हिड ईस्टनने या वर्तनवादी दृष्टीकोनाच्या फलश्रुतीची परखड चिकित्सा केली. प्रचंड पैसा, वेळ व शक्ती खर्च करूनसुध्दा फारसे काही हाती लागले नाही. तो असे म्हणतो की, या काळात जगापुढील सामाजिक, राजकीय व आर्थिक आव्हाने तीव्र होती, त्याचे भान वर्तनवादी अभ्यासकांना नव्हते. त्यामुळे वर्तनवादी दृष्टीकोनाच्या जमेच्या बाजू मान्य करून पुढे राज्यशास्त्राचे संशोधन अधिक प्रस्तुत व उपयुक्त कसे करता येईल, असा भविष्यकाळाच्या दृष्टीने वर्तनवादाचा विचार करणे गरजेचे होते. १८६९ साली अमेरिकन राज्यशास्त्र परिषदेच्या अध्यक्षीय भाषणात ईस्टनने उत्तर वर्तनवादाच्या काही सूत्रामध्ये आपणास बदल करावा लागेल. राज्यशास्त्राच्या संशोधनात मूल्य व प्रस्तूतता यांना महत्त्वाचे स्थान दिले पाहिजे आणि राज्यशास्त्रज्ञांनी लोकांचे प्रश्न आणि चळवळी यांचा प्रत्यक्ष जागी जाऊन अभ्यास केला पाहिजे, असे म्हटले.

अशाप्रकारे वरील सर्व कारणांमुळे राजकीय सिध्दांताचे पुनरूज्जीवन झाले आहे. म्हणून असे म्हणता येईल की, २०व्या शतकामध्ये राजकीय सिध्दांत मुख्यत: परंपरावादी राजकीय सिध्दांत व आधुनिक व्यवहारवादी राजकीय सिध्दांत या दोन विचारधारांमध्ये विकसित झाला आहे. कारण उत्तर वर्तनवादाच्या उदयामुळे या दोन्हीमधील दुही कमी झाली. अशाप्रकारे १९७०-७१ पासून राजकीय सिध्दांताच्या पुनरूज्जीवनास सुरूवात झाली आहे.

## १.३ सारांश

राजकीय सिध्दांत हे मानवी जीवनाच्या विकासासाठी, त्याचबरोबर समाजातील प्रश्नाची सोडवणूक करण्यासाठी आवश्यक आणि महत्त्वाचे आहेत, त्यामुळे राजकीय सिध्दांताचे स्वरूप, व्याप्ती, महत्त्व

याचे विवेचन करणे गरजेचे आहे. राजकीय सिध्दांत हे अनुभवावर आधारलेले असतात. समाजातील प्रश्नाची सोडवणूक करण्याचे प्रयत्न करतात. त्यामध्ये राजकीय व्यवस्थांचा, विचारप्रणालीचा आणि तत्त्वज्ञानाचा अभ्यास केला जातो. जेणेकरून राजकीय सिध्दांत हे मानवी जीवन आणि समाजाची वास्तव स्थिती जाणून घेण्याचे कार्य करतात तसेच भविष्यकालीन प्रश्नाच्या सोडवणूकीसाठी मार्गदर्शक ठरतात. त्यामुळे त्याचे महत्त्व आजही कायम आहे. त्याचबरोबर राजकीय सिध्दांतामध्ये विचारप्रणाली ही महत्त्वाची भूमिका पार पाडते. प्रत्येक राजकीय सिध्दांत हा कोणत्यातरी विचारसरणीचा पुरस्कार करतो. विचारसरणी ही केवळ बौध्दिक नसून व्यावहारिक असते. विचारप्रणालीमुळे विश्वाचे आकलन होते. अशाप्रकारे विचारप्रणाली राजकीय सिध्दांतात महत्त्वाची भूमिका पार पाडते.

अभिजात राजकीय सिध्दांत हे आजही समाज हितासाठी उपयोगाचे आहे, जेणे करून ते भविष्यकालीन प्रश्नाची उकल करताना दिसतात, परंतु वर्तनवादी प्रत्याक्षार्थवादी विचारवंतानी राजकीय सिध्दांताचा ऱ्हास झाला आहे अशी घोषणा केली. १९७० नंतर मात्र राजकीय सिध्दांतामध्ये नव्या ग्रंथाची निर्मिती झाली. नवमार्क्सवादाचा उदय, उत्तर वर्तनवादाची मांडणी, व्हिएतनामचे युध्द इत्यादी घटनामुळे राजकीय सिध्दांताचे पुनरूज्जीवन झाले अशी घोषणा करण्यास भाग पडले.

एकूणच राजकीय सिध्दांताचे स्वरूप, व्याप्ती, महत्त्व तसेच विचारप्रणालीची भूमिका, अभिजात राजकीय सिध्दांताची प्रस्तुतता व राजकीय सिध्दांताचा ऱ्हास व पुनरूज्जीवन इत्यादी घटकांची सखोल चर्चा प्रस्तुत प्रकरणात करण्यात आली आहे.

## १.४ पारिभाषिक शब्द

१. **सिद्धांत** : ज्ञानाची सुंगत रचना म्हणजे सिद्धांत होय.

२. **राजकारण** : 'सत्तेसाठी चाललेला अविरत संघर्ष म्हणजे राजकारण होय' किंवा 'अधिकाधिक चांगल्या जीवनाचा शोध घेणे म्हणजे राजकारण होय.

३. **अभिजात** : 'जे जुने आहे व ज्याचे महत्त्व आजही टिकून आहे त्यास अभिजात (Classical) म्हणतात.

४. **राज्य** : एकाच समान भूप्रदेशावर राहणाऱ्या सार्वभौम लोकांच्या समुदायात राज्य असे म्हणतात.

५. **राष्ट्र** : समान भूप्रदेशावर राहणाऱ्या नागरिकांच्या मनात 'आम्ही एक आहोत' असा भाव निर्माण झाल्यावर राज्याचे राष्ट्रात रूपांतर होते.

६. **विचारधारा** : श्रध्दा व मूल्यमिश्रित मतांचा संच.

## १.५ सरावासाठी स्वाध्याय

१. राजकीय सिध्दांत म्हणजे काय सांगून तिचे स्वरूप स्पष्ट करा.

२. राजकीय सिध्दांताची व्याप्ती स्पष्ट करा.

३. राजकीय सिध्दांताचे महत्त्व सांगा.

४. राजकीय सिध्दांतातील विचारप्रणालीची भूमिका स्पष्ट करा.

५. अभिजात राजकीय सिध्दांत म्हणजे काय ते सांगून महत्त्व विशद करा.

६. राजकीय सिध्दांताच्या ऱ्हासाची कारणमिमांसा करा.

७. राजकीय सिध्दांताच्या पुनरूज्जीवनावर भाष्य करा.

## १.६ अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ


१. **Gauba, O. P.** (2011) : *"An Introduction to Political Theory"*, MacMillan Publisher, New Delhi.

२. **Ramaswamy, Sushila** (2015) : *"Political Theory : Ideas and Concepts"*, PHi Learning Private Ltd., Delhi.

३. **चौसाळकर, अशोक** (२०१७) : *''आधुनिक राजकीय सिध्दांत''*, युनिक ॲकॅडमी, पुणे.

४. **डोळे, ना. य.** (२००९) : *''राजकीय विचारांचा इतिहास''*, कॉन्टीनेन्टल प्रकाशन, पुणे.

५. **पाठक, नवराज** (२००४) : *''पाश्चिमात्य राजनीतिक विचारक भाग-१''*, आवृत्ती दुसरी, प्रकाशन : विश्वभारती पब्लिकेशन्स, नवी दिल्ली.


❑ ❑ ❑

घटक–२

# राज्यासंबंधीचे दृष्टीकोन
# (Approaches of the State)

अनुक्रमणिका

२.० उद्दिष्ट्ये

२.१ प्रास्ताविक

२.२ विषय विवेचन

 २.२.१ राज्य आणि नागरी समाज

 २.२.२ राज्याचा उदारमतवादी दृष्टीकोन

 २.२.३ राज्याचा मार्क्सवादी दृष्टीकोन

२.३ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ

२.४ सारांश

२.५ सरावासाठी स्वाध्याय

२.६ अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ

## २.० उद्दिष्ट्ये

राज्यसंस्था ही जगातील महत्त्वाची आणि अत्यावश्यक संस्था आहे. कारण राजकीय सिध्दांत आणि राजकारणामध्ये राज्य ही मध्यवर्ती संस्था आहे. परंतु राज्याचे स्वरूप लक्षात येण्यासाठी त्यांच्या अंतर्गत घटकांचा अभ्यास करणे गरजेचे आहे. राज्याचे लोकसमुदाय, भूभाग, शासनसंस्था आणि सार्वभौमत्व हे चार घटक आहेत. त्याचबरोबर राज्याची निर्मिती कशी व केव्हा झाली आहे याचाही अभ्यास करणे आवश्यक आहे. राज्याच्या उदयाचे अनेक सिध्दांत मांडलेले असून त्यांचा ही अभ्यास करणे आवश्यक आहे. त्याचबरोबर राज्यसंस्था आणि नागरी समाज याच्यातील संबंध, राज्याचा उदारमतवादी दृष्टीकोन आणि राज्याचा मार्क्सवादी दृष्टीकोनाचा अभ्यास या प्रकरणात करण्यात आला आहे.

## २.१ प्रास्ताविक

राज्य (State) हे शब्द लॅटिन भाषेतील डींर्ींी या शब्दापासून तयार झाले आहे. राज्य ही संस्था पुरातन काळापासून अस्तित्त्वात असून ती वेगवेगळ्या अर्थाने वापरण्यात आली आहे. उदा. ग्रीक नगरराज्ये, रोमन साम्राज्य, टोळी राज्ये, राष्ट्र राज्ये इ. नावाने ओळखले जात असे. याचा तुलनात्मकदृष्ट्या विचार केला तर राज्य ही आधुनिक संकल्पना आहे. आधुनिक काळामध्ये राज्य ही संकल्पना मॅकीयाव्हेली यांनी वापरली आहे. त्यांच्या मते, 'राज्य ही मानवी जीवनाचे कल्याण करणारी सर्वश्रेष्ठ संस्था आहे.' ही मॅकीयाव्हेलीची भूमिका महत्त्वाची आहे. त्यानंतर राज्याचे महत्त्व विशद करताना गेटेल यांच्या मते, 'राज्यशास्त्र हे राज्याचे शास्त्र आहे' तर जे. डब्ल्यू. गार्नर यांच्या मते, 'राज्यशास्त्र हे राज्यासोबत सुरुवात होते आणि त्याच्यासोबतच संपते.'

राज्य ही प्राचीन काळामध्ये समाजापेक्षा मोठी होती, परंतु आज समाजाची व्याप्ती राज्यसंस्थेपेक्षा प्रचंड झाली आहे. मानवी समाजाच्या राजकीय गरजेतून राज्य निर्माण झाले आहे, असे विचार मांडण्यात आले आहे. परंतु राज्याच्या उदयाची कारणे कोणती याबाबत अनेक सिध्दांत विकसित झाले आहेत. त्यामध्ये दैवी सिध्दांत, शक्ती सिध्दांत, सामाजिक करार सिध्दांत इ. सिध्दांताचा समावेश होतो. परंतु राज्य आणि समाज यासंबंधी विचार करणे गरजेचे आहे. कारण प्राचीन काळामध्ये ॲरिस्टॉटलने राज्याची व्याख्या करताना राज्यसंस्था आणि समाज यांच्यात भेद केला नव्हता. परंतु समाज व राज्य या दोन्ही संघटनेचे स्वरूप भिन्न आहेत. राज्य ही समाजाच्या अनेक संस्थेपैकी एक संस्था आहे. त्यामुळे राज्याची व्याप्ती समाजापेक्षा कमी आहे. परंतु राज्याचे कार्यक्षेत्र कोणते आणि सामाजिक कार्यक्षेत्र कोणते याविषयी काटेकोर नियम सांगता येणार नाही, म्हणून राज्य आणि समाज याबाबत चर्चा करणे आवश्यक आहे.

## २.२ विषय विवेचन

समाजाची निर्मिती उत्स्फूर्त आणि नैसर्गिक असते आणि राज्य हेतूपूर्वक निर्माण केलेले असते. कारण राज्य या संकल्पनेत संपूर्ण समाजजीवनाचा अंतर्भाव होऊ शकत नाही, म्हणून राज्य समाजासाठीची पर्यायी संकल्पना होऊ शकत नाही, कारण राज्याला भौगोलिक मर्यादा असतात, परंतु समाजाला भौगोलिक मर्यादा नसते. त्यामुळे माणूस हा राज्याशिवाय जगू शकेल परंतु समाजाशिवाय जगू शकणार नाही आणि समाज हा अनेक कुटुंब मिळून निर्माण होतो. समाजामध्ये अनेक संस्था,संघटना, मंडळे आपापल्या हितसंबंधासाठी अस्तित्वात येतात त्यांना एकत्रित ठेवण्यासाठी केवळ सामाजिक संघटनेचे बंधन पुरेसे नसते. त्यासाठी राजकीय स्वरूपाची संघटना आवश्यक असते, म्हणून राज्याची निर्मिती झाली आहे. समाज आणि राज्य यांच्या परस्परसंबंधाबाबत विचार केला तर असे म्हणता येईल की, समाजाच्या

उपयोगासाठी राज्य निर्माण झालेली असते. राज्याच्या उपयोगासाठी समाज निर्माण झालेला नसतो. प्राचीन काळामध्ये राज्य ही संकल्पना समाज या संकल्पनेपासून वेगळी न करता एकाच अर्थाने वापरली जात होती. परंतु समाजाशिवाय राज्य अस्तित्वात येत नाही, म्हणून राज्याची निर्मिती ही मानवी समाजाच्या राजकीय गरजेतून निर्माण झालेली आहे, तरीही राज्य आणि समाज यांच्यातील फरक खालीलप्रमाणे सांगता येईल.

१) राज्याचे कार्य हे कायदा व सुव्यवस्थेवर आधारलेले असते तर समाजाचे कार्य हे एकमेकांच्या जीवनावर आधारलेले असते.

२) राज्य ही एक संस्था असते तर समाजात अनेक संस्था, संघटना असतात.

३) राज्य हे सक्तीने आणि बळजबरीने नियमन करते तर समाज स्वेच्छेने आणि कृतीद्वारे नियमन करते.

४) राज्याच्या कार्यक्षेत्रापेक्षा समाजाचे कार्यक्षेत्र मोठे असते.

५) राज्य हे समाजातून निर्माण झालेले असते.

अशा प्रकारे राज्य आणि समाज याचा परस्परसंबंध असतो, परंतु राज्य कार्य करीत असताना समजातील अनेक संघटना, संस्था मंडळे स्वहिताच्या दृष्टीकोनातून निर्माण झालेले असतात. त्या संस्था व संघटनांना नागरी समाज असे म्हटले जाते. राज्याचा व नागरी समाजाचा संबंध स्पष्ट करणे आवश्यक आहे.

## २.२.१ राज्य आणि नागरी समाज

प्राचीन काळामध्ये राज्य आणि नागरी समाज हे वेगळे न करता राज्यामध्येच नागरी समाज गृहीत धरला जात होता. नागरी समाज असा उल्लेख प्रथम सिसिरोने केला आणि हेगलने ही संकल्पना लोकप्रिय केली. खऱ्या अर्थाने त्याचा विकास २०व्या शतकात झाल्याचे दिसून येते, नागरी समाज म्हणजे असा समाज जो स्वतंत्र नागरिकांनी बनलेला असतो आणि नागरिकांना कायदेशीर अधिकार प्राप्त झालेला असतो. परंतु जशी विचारप्रणाली असेल त्याप्रमाणे नागरी समाजाचा आशय देखील बदलत जातो. म्हणून नागरी समाजाची कल्पना अलीकडे मोठया प्रमाणात विकसित होताना दिसते.

नागरी समाज ही कल्पना ग्रीक तत्त्वज्ञ ॲरिस्टॉटल यांनी मांडलेल्या राज्यासंबंधीच्या विचारामध्ये दिसते. कारण ॲरिस्टॉटल असे म्हणतो की, माणूस हा समाजशील तसेच राजकीय प्राणी आहे. माणूस एकटा राहू शकत नाही. तो समाजात राहूनच एकमेकांच्या सहकार्याने आपल्या जीवनाची पूर्ती करू

शकतो. त्याचबरोबर राज्यामध्ये मानवाच्या विविध गरजा पूर्ण करण्यासाठी निरनिराळे समुदाय अस्तित्वात येतात आणि आपले उद्देश साध्य करत असतात. हे सर्व समुदाय राज्यातच शक्य असतात. त्याशिवाय त्यांना आपला उद्देश पूर्ण करणे शक्य नसते. व्यक्तीच्या सर्वांगीण विकासाचे राज्य हे साधन असून मानवाचा सर्वांगीण विकास हे राज्याचे ध्येय असते. त्यामुळे राज्य ही एक सर्वश्रेष्ठ संस्था आहे. राज्य म्हणजे कुटुंब आणि खेडी यांचा समुदाय. या समुदायात सुखी व स्वयंपूर्ण जीवन जगता येते, अशी ॲरिस्टॉटलची भूमिका होती. म्हणून तो राज्याला प्रथम, तर व्यक्तीला दुय्यम महत्त्व देतो, परंतु तो जो राजकीय अधिकाराबद्दल सांगतो, त्यामध्ये फक्त पुरुषांना तो अभिप्रेत धरतो त्यामध्ये स्त्रिया व गुलाम यांना समावेश करत नाही. अशाप्रकारे नागरी समाजाचा विचार करता ॲरिस्टॉटलने मर्यादित स्वरूपात विवेचन केले आहे.

रोमन साम्राज्यामध्ये सिसेरो यांनी असे म्हटले की, राज्य ही जनतेची सामूहिक इच्छा आहे. जनता म्हणजे केवळ एकत्र राहणारा जमाव अथवा समुदाय नव्हे, तर परस्परांना साहाय्य करण्याच्या भावनेने आणि विधिनियम व परस्परांचे अधिकार यासंबंधी विशिष्ट संमती दर्शवून संघटित होणाऱ्या लोकांना जनता असे म्हटले पाहिजे, कारण जनता केवळ भितीमुळे किंवा दुर्बलतेमुळे संघटित होत नाही. समाजात राहतो हे मानवाची निसर्गप्रवृत्ती आहे. अशाप्रकारे नागरी समाजाचा प्रथम उल्लेख सिसेरोने केल्याचे दिसून येते. रोमन साम्राज्याच्या काळात ख्रिश्चन धर्माचा उदय झाला आणि राजसत्ता व धर्मसत्ता यात संघर्ष निर्माण झाले, त्यावेळी सेंट ऑगस्टीन यांनी 'सिटी ऑफ गॉड' आणि 'सिटी ऑफ मॅन' हे पुस्तक लिहून धर्मसत्ता आणि मानवी सत्ता यातील फरक स्पष्ट केला आहे. त्यामध्ये धर्मसत्ता श्रेष्ठ असल्याचे म्हटले आहे.

सेंट थॉमस ॲक्विनस याच्यावरती ॲरिस्टॉटलचा प्रभाव असल्यामुळे ॲरिस्टॉटलने मांडलेल्या 'सहकार्याच्या भावनेतून मानवी समाज निर्माण झाला' व 'मनुष्य हा राजकीय प्राणी आहे', या दोन्ही कल्पना त्यांना मान्य आहेत. निसर्गत: मनुष्याला समाजात एकत्र जगण्याची आवड आहे असे ॲक्वीनस म्हणतो. तर डांटे असे म्हणतो की, रोमन सम्राटाच्या राजकीय कारभारात पोपने हस्तक्षेप करता कामा नये परंतु कुटुंबातील लोक सुखी राहण्यासाठी वयोवृध्द कुटुंब प्रमुखाकडे आणि गावच्या विकासासाठी ग्राम प्रमुखाकडे आणि राज्याच्या विकासासाठी सम्राटाकडे सत्ता असली पाहिजे अशी भूमिका मांडतो. मार्सिलिओ पांडुआने ही ॲरिस्टॉटल प्रमाणेच राज्य ही सर्वश्रेष्ठ संस्था असून मानवाच्या गरजा पूर्ण करण्यासाठी तिचा उदय झाला आहे. समाजात अनेक संघटना असतात आणि त्या आपल्या हितसंबंधासाठी कार्य करतात अशी भूमिका मांडली आहे. अशाप्रकारे प्राचीन व मध्ययुगीन काळामध्ये राज्य आणि नागरी समाजाच्या परस्पर संबंधाबद्दल व त्याच्या अस्तित्त्वाबद्दल वेगवेगळ्या विचारवंतांनी मांडलेली भूमिका स्पष्ट केली आहे.

## ❑ सामाजिक करार आणि नागरी समाज

आधुनिक काळामध्ये नागरी समाजाची संकल्पना विकसित झाली आहे. राज्याच्या उदयासंबंधी सामाजिक कराराचा सिध्दांत मांडण्यात आला आहे. १७ व्या शतकाच्या सुरुवातीला हॉब्ज ने सामाजिक करार सिध्दांत मांडला. त्याच्या विचारांमध्ये नागरी समाज आणि राज्य असे विभाजन केले नसले तरी हॉब्ज स्वातंत्र्याबाबत विचार करताना प्रजाजनांचे स्वातंत्र्य आणि राज्याचे स्वातंत्र्य असे भेद करतो आणि व्यक्तीला राज्याला विरोध करण्याचा अधिकार देत नाही. हॉब्ज हा निरंकुश राजसत्तेचा पुरस्कर्ता असला तरी व्यक्तीला जीवन जगण्याचा अधिकार राहिल अशी भूमिका मांडली आहे.

जॉन लॉकने मनुष्य स्वभावाच्या निसर्गावस्थेच्या आधारावर नागरी समाजाची संकल्पना मांडली आहे. कारण त्याने असे स्पष्ट केले की, मनुष्याची निसर्गावस्था ही राज्यपूर्व गोष्ट आहे. माणूस हा नैतिक जीवन जगणारा विवेकी व सामाजिक प्राणी आहे, त्यामुळे नैसर्गिक कायदा जाणून त्यानुसार वर्तन करणे आपले कर्तव्य समजतो. लॉक असे मानतो की, निसर्गत: सर्व माणसे समान आणि जन्मत: स्वतंत्र आहेत, त्यामुळे ते निसर्गावस्थेत शांतता, सद्भाव, सहकार्य व संरक्षण या तत्त्वावर आदर्श जीवन जगत होते. परंतु समाजामध्ये नैसर्गिक कायदे अस्पष्ट होते. निसर्गनियमाचा अर्थ लावणारी अधिकृत सत्ता नव्हती आणि निसर्गनियमांना कार्यान्वित करणारी यंत्रणा नव्हती, म्हणून या अडचणी दूर करण्यासाठी बुध्दीवादी माणसांनी एकत्र येऊन एक करार केला आणि राज्यसंस्था निर्माण झाली. परंतु लॉकने नागरी समाजाला राजकीय समाजापासून वेगळे न करता ते एकच मानले आहे. अशा रितीने निसर्गावस्थेतील लोकांनी एकत्र येऊन नैसर्गिक अधिकार चालवण्याचा हक्क समाजाला दिले आहे आणि जीव, संपत्ती व स्वातंत्र्य रक्षणाचा हक्क राजकीय समाजाला दिला आहे असा विचार लॉकने मांडला म्हणून, नागरी समाजाची मांडणी केली आहे असे म्हणता येईल.

रूसोने सुध्दा नागरी समाज आणि राजकीय समाज एकच मानले आहे. त्याच्या मते, निसर्गावस्थेत माणूस सुखी व आनंदी जीवन जगत होता. बुध्दी, विचार आणि संस्कृती यांचा प्रभाव पडल्यामुळे मानवाचे सुखी जीवन नष्ट झाले. ते सुखी आणि सुरक्षित जीवन प्राप्त व्हावे म्हणून प्रत्येक व्यक्तीने दुसऱ्या व्यक्तीबरोबर समाज स्थापन करण्याबाबतचा करार केला आणि सुसंघटित नागरी समाज स्थापन करण्यास मदत केली.

अशाप्रकारे हॉब्ज, लॉक, रुसो या सामाजिक करारवादी विचारवंतानी समाज आणि राज्य यांच्या संबंधांबद्दल विचार मांडले आहेत आणि सामाजिक कराराच्या सिध्दांतामुळे नागरी समाजाची निर्मिती झाली आहे. मॉन्टेस्क्यू या विचारवंतानीसुध्दा सत्ता विभाजनाचा सिध्दांत मांडताना राज्याला राजकीय स्वतंत्र्य असते तर नागरिकांना नागरी स्वातंत्र्य असले पाहिजे, त्यांना गुलाम बनवू नये अशी भूमिका मांडली आहे.

## ❑ पारंपरिक राजकीय अर्थव्यवस्था आणि नागरी समाज

नागरी समाजाच्या संकल्पनेचा १८व्या शतकाच्या अखेरीस उदयास आलेल्या अर्थव्यवस्थेशी जवळचा संबंध आहे. औद्योगिक क्रांतीमुळे पश्चिम युरोप व अमेरिकेमध्ये भांडवलशाही अर्थव्यवस्थेने समाजजीवनावर प्रभाव निर्माण केला. अशा भांडवलशाही व्यवस्थेमध्ये खुल्या बाजारपेठा निर्माण झाल्या. डेव्हीड ह्यूम, ॲडम फर्ग्युसन आणि ॲडम स्मिथ यासारख्या विचारवंताने बदलत्या परिस्थितीचे चिंतन करून त्यावर नवे सिध्दांत मांडले.

डेव्हीड ह्युम यांनी राज्य आणि समाज याचा विचार करताना राज्याच्या उदयाचा दैवी सिध्दांत आणि सामाजिक करार सिद्धांत या दोन्ही सिध्दांताना अमान्य करून सरकारची निर्मिती लोकांच्या समर्थनाच्या आधारावर झाली पाहिजे. लोकांच्या समर्थनावर आधारलेला सरकार चांगले सरकार असू शकते, त्यामुळे त्याला स्थिरता प्राप्त होते. अशाप्रकारे राज्य आणि नागरी समाजाचा विचार केला तर समाजाला जास्त महत्त्व दिल्याचे दिसून येते. ॲडम स्मिथ यांनी असे प्रतिपादित केले की, अर्थव्यवस्थेचे स्वत:चे नियमन असावेत आणि राज्याच्या नियंत्रणापासून ती मुक्त असावी. त्यांनी राज्याचे कार्यक्षेत्र हे कायदा व सुव्यवस्था संरक्षण चलन आणि संसूचन एवढ्यापुरतेचे मर्यादित असावे असा विचार मांडला. वाणिज्य व व्यापार हे नागरी समाजाचे स्रोत आहेत, कारण ते व्यक्तीला बाजारपेठेशी जोडण्याचे कार्य करतात, दुसरीकडे राज्याचे कार्यक्षेत्र हे कायदा, सुव्यवस्था आणि संरक्षणापुरते मर्यादित झाले आहे. अशाप्रकारे भांडवलशाही अर्थव्यवस्थेतून नवा नागरी समाज निर्माण झाला.

नव्या नागरी समाज संकल्पनेत व्यक्तीला समाजात राहून आपले हित साधणारा घटक मानण्यात आले. तसेच व्यक्ती ही समाजशील आहे असा विचार उदयास आला. त्याचबरोबर जगामध्ये स्वातंत्र्य, समता आणि कायद्याचे राज्य या आधारावर राजसत्तेला आव्हान देण्यास सुरुवात झाली. त्यातून समाजामध्ये विविध खुल्या आणि भूमिगत चळवळी निर्माण झाल्या आहेत. संसूचनाची नवी माध्यमे तसेच वृत्तपत्रे आणि ग्रंथसाहित्याने जनमत तयार करण्यास हातभार लावला आणि या चळवळी राज्यसंस्थेविरुध्द असंतोष व्यक्त करू लागल्या. ह्या गोष्टींना नागरी समाजाची प्रथम अवस्था असे म्हणता येईल. याबाबत टॉकव्हिल या विचारवंतानी, 'डेमॉक्रेसी इन अमेरिका', या ग्रंथात असे नमूद केले की, अनेक सार्वजनिक संस्था आणि संघटनानी राज्याच्या जुलुमाविरुध्द आणि व्यक्तीच्या स्वातंत्र्यरक्षणासाठी भरीव कार्य केले आहे. त्यांच्या मते, लोकशाहीच्या विकासाबरोबर पारंपारिक समाजव्यवस्था नष्ट झाल्यामुळे राज्य शक्तीशाली तर व्यक्ती कमकुवत बनेल, त्यामुळे राज्याच्या शक्तिवर नियंत्रण ठेवण्यासाठी नवी यंत्रणा आवश्यक होती, हा विचार करून अनेक व्यक्तींनी पुढाकार घेवून अनेक संघटना स्थापन केल्या. टॉकव्हिलच्या मते, राजकीय पक्ष, चर्च, व्यावसायिक गट, वाङ्मय, विज्ञान मंडळे इ. संघटना व संस्था याची उदाहरणे म्हणून सांगता येतील. या संघटना राज्याच्या निरंकुश

सत्तेविरुध्द उभ्या राहिल्या, त्यामुळे राज्यसंस्था ही समाजाप्रती जबाबदार बनण्यास सहाय्य झाले. अशाप्रकारे राज्य आणि नागरी समाजाचे संबंध प्रस्थापित झाल्याचे आढळून येते.

## ❑ उदारमतवाद आणि नागरी समाज

आधुनिक काळामध्ये निर्माण झालेल्या व्यक्तीवादी विचार आणि राजकीय अर्थव्यवस्था याच्यातून उदारमतवादी विचार उदयास आले आहे. यामध्ये जॉन लॉक, अॅडम स्मिथ, हर्बर्ट स्पेन्सर, जे. एस. मिल इत्यादी विचारवंताचा समावेश होतो. नागरी समाज व राज्यसंस्था याच्यातील परस्पर संबंधाबाबत खालील मुद्दे मांडण्यात आले आहे. ते पुढीलप्रमाणे :-

१) व्यक्तीचे अधिकार हे महत्त्वाचे असून राज्यसंस्थेला व्यक्तीच्या अधिकाराचा संकोच करता येत नाही. राज्यसंस्थेची अधिसत्ता स्वतंत्र असला तरी व्यक्तीला जास्तीत जास्त अधिकार मिळाला पाहिजे, या तत्वाचा पुरस्कार उदारमतवादी विचारवंताने केले.

२) राज्यसंस्था आणि नागरी समाज यांच्यामध्ये जे संबंध आहेत त्यामध्ये राज्यसंस्थेने नागरी समाजाच्या व्यवहारामध्ये हस्तक्षेप करू नये. नागरी समाज हा स्वतंत्र असला पाहिजे त्यासाठी व्यक्तीला स्वातंत्र्य असले पाहिजे. व्यक्ती स्वातंत्र्यासाठी खाजगी मालमत्तेचा अधिकार असला पाहिजे.

३) राज्यसंस्था आणि नागरी समाज यांच्या व्यतिरिक्त आणखी एक संस्था महत्त्वाची असती ते म्हणजे बाजारपेठ. बाजारपेठेला आर्थिक व्यवहार नियंत्रित करण्याचा अधिकार आहे. बाजारपेठेमध्ये राज्यसंस्थेने हस्तक्षेप करू नये, कारण बाजारपेठा स्वतंत्र राहण्यावर नागरी समाजाचा विकास आधारलेला आहे.

४) उदारमतवाद्याच्या मते, राज्यसंस्थेने देशाचे परकीय आक्रमणापासून संरक्षण करणे, देशांतर्गत कायदा व सुव्यवस्था राखणे, समाजातील लोकांना आर्थिक संधी उपलब्ध करून देणे व त्याच्यातील अडथळे दूर करणे, याच्या पलीकडे राज्याने आर्थिक व्यवहारामध्ये हस्तक्षेप करू नये.

५) उदारमतवाद्याच्या मते, राज्यसंस्था आणि नागरी समाज यांच्यातील परस्पर संबंधामध्ये योग्य असा समतोल साधणे आवश्यक आहे. हा समतोल साधल्याशिवाय व्यक्तीच्या स्वातंत्र्याचे आपल्याला संरक्षण करता येत नाही, म्हणून राज्यघटनेतील तरतुदीच्या सहाय्याने व्यक्तीच्या स्वातंत्र्याचे रक्षण करावे.

अशाप्रकारे उदारमतवादी विचारवंतानी राज्यसंस्था व नागरी समाजामधील संबंधाचा विचार

करताना व्यक्ती स्वातंत्र्याचे रक्षण करणे आवश्यक आहे, त्यासाठी राज्यसंस्थेने व्यक्ति जिवनात हस्तक्षेप करू नये अशी भूमिका मांडली आहे.

## ❑ हेगेल आणि नागरी समाज

उदारमतवादी विचारानंतर निर्माण झालेल्या आदर्शवादी विचारांची मांडणी कान्ट, हेगेल आणि टी.एच.ग्रीन यांनी केली आहे. हेगेलने नागरी समाजाची कल्पना विस्ताराने मांडले आहे. एवढेच नव्हे तर ती लोकप्रिय केली आहे. हेगेलची नागरी समाजाची कल्पना उदारमतवादी विचारवंताच्याप्रमाणे व्यक्तीला स्वायत्त अस्तित्व आणि व्यक्तीचे हक्क व स्वातंत्र्याचा पुरस्कार करणारी नाही तर ती राज्याला सर्वोच्च मानणारी आहे. हेगेलने १९२१ साली 'द फिलॉसॉफी ऑफ राईट' या ग्रंथात नागरी समाजाची कल्पना मांडली आहे. हेगेलच्या मते, आधुनिक राज्य हे कुटुंब, नागरी समाज आणि राज्य या तीन संस्थामध्ये विभागलेले असून ते वेगवेगळ्या तत्त्वावर आधारलेले आहेत. कुटुंब हे प्रेमाच्या व सुखाच्या आधारावर असून हेगेल त्याला वाद म्हणतो. नागरी समाज म्हणजे कुटुंबाचा प्रतिवाद आहे. कुटुंबात त्यागाची भावना असते व समाजात स्पर्धा व संघर्ष असतो. समाजात प्रत्येक व्यक्ती आपला स्वार्थ पाहतो. त्यामुळे त्यातून संघर्ष निर्माण होतो म्हणून तो संघर्ष निवारण्यासाठी परस्पर प्रेमाची आवश्यकता वाटू लागते. या परस्पर प्रेमातून राज्याची निर्मिती होते. कुटुंब व समाज ह्याच्या समन्वयातून राज्याची निर्मिती झाली आहे. राज्याला हेगेलने सर्वोच्च मानले आहे.

हेगेलच्या मते, नागरी समाजाच्या, न्याय प्रशासन, पोलीस व सैन्यसंस्था या तीन अवस्था आहेत. यापैकी न्यायप्रशासन व पोलीस यांचा राज्याशी घनिष्ठ संबंध असतो. नागरी समाज राज्यावर आधारलेला असतो आणि राज्याशिवाय जिवंत राहू शकत नाही. कारण नागरी समाज म्हणजे राज्याचे असे स्वरूप आहे की, ज्यामध्ये समाजाला स्वतंत्र व्यक्तीचा समूह मानले जाते, त्यामुळे तेथे व्यक्तीला प्राप्त झालेले स्वातंत्र्य हे अपूर्ण आणि आंशिक असते. संपूर्ण स्वातंत्र्यासाठी समूहात एकता असणे आवश्यक आहे. नागरी समाजात व्यक्तीला मिळणारे स्वातंत्र्य केवळ औपचारिक आणि पोकळ आहे. हेगेलच्या मते, नागरी समाजात व्यक्तीला स्वातंत्र्य असून अन्य व्यक्तींच्या स्वातंत्र्याचा आदर करणे हीच त्याची मर्यादा आहे. नागरी समाजात निर्माण झालेल्या समस्येचे निराकरण करण्याचे कार्य राज्याचे आहे. हेगेलच्या मते, राज्यसंस्था सर्व प्रकारच्या आंतरविरोधाचे आणि समस्येचे निराकरण करते. राज्य सगळ्यांच्या हिताचे कार्य करते. म्हणून राज्यसंस्था खऱ्या अर्थाने ही ईश्वराची भूतलावरची वाटचाल आहे, असे म्हटले आहे.

हेगेलने मांडलेल्या नागरी समाजाचे स्वरूप खालीलप्रमाणे आहे.

१) नागरी समाज हा एक वैश्विक कुटुंब आहे, कारण प्रत्येक व्यक्तीचे स्वातंत्र्य इतर व्यक्तीच्या स्वातंत्र्यावर अवलंबून आहे.

२) नागरी समाजामध्ये जगण्याच्या गरजांवर आधारित संस्था निर्माण झालेल्या आहेत, ज्या गरजा पूर्ण करण्यासाठी कार्य करतात.

३) नागरी समाजात व्यक्ती स्वहितासाठी कार्य करत नसून राज्याच्या विकासासाठी कार्य करते.

अशा प्रकारे हेगेलनी नागरी समाजाला महत्त्व न देता राज्याला महत्त्व दिले आहे.

सेबाईनच्या शब्दात, हेगेलचे राज्य ही उपयुक्ततावादी संस्था नसून, सार्वजनिक सेवा देण्याची, कायद्याच्या अंमलबजावणीची आणि आर्थिक व औद्योगिक हितसंबंध जोपासण्याची कार्ये राज्यसंस्था पार पाडते. नागरी समाज निरीक्षण आणि नैतिकता ह्यासाठी राज्यावर अवलंबून राहतो. राज्य आपल्या नैतिक उद्देशाच्या पूर्तीच्या साधनासाठी नागरी समाजावर अवलंबून असते. राज्य व नागरी समाज एकमेकांवर अवलंबून असले तरी एक दुसऱ्यापासून ते भिन्नही आहेत. राज्य साधन नसून साध्य आहे. म्हणजे हेगेलच्या मांडणीनुसार नागरी समाजाची निर्मिती राज्याची उच्च नैतिक उद्दिष्ट्ये आणि ध्येय साध्य करण्यासाठी झालेली असते. उदारमतवादी विचारवंतानी नागरी समाजाला महत्त्व दिले तर हेगेलने राज्यसंस्थेला महत्त्वाचे मानले आहे.

## ❑ मार्क्स आणि नागरी समाज

हेगेलप्रमाणेच मार्क्सनेही राज्य आणि नागरी समाजाच्या संदर्भात मांडणी केली आहे, परंतु त्यांच्यातील परस्पर संबंधाचा विचार केलेला नाही. कारण मार्क्सच्या मते, राज्य हे नागरी समाजापेक्षा श्रेष्ठ असू शकत नाही. तसेच राज्य हे नागरी समाजातील हितसंबंधापासून तटस्थ वा स्वतंत्र राहू शकत नाही. कारण नागरी समाजातील अंर्तविरोध किंवा वर्गरचना हे राज्यसंस्थेवर प्रतिबिंबीत होतात. म्हणून राज्यसंस्था ही नागरी समाजात, वर्गात प्रतिबिंबीत आहे. मार्क्सच्या मते, भांडवलशाही समाजव्यवस्थेत राज्यसंस्था ही भांडवलदाराच्या हातातील बाहुले आहे. तर एगंल्सच्या मते, राज्य हे भांडवलदारांना प्राधान्य देऊन श्रमिकांचे योजनाबद्ध शोषण करत असते. राज्य म्हणजे एका वर्गाचे दुसऱ्या वर्गाद्वारे शोषण करणारे एक यंत्र असल्यामुळे नागरी समाजात विषमता निर्माण झाली आहे. त्यामुळे राज्यसंस्थेद्वारे आंतरविरोध दूर होतील आणि माणसाला आपलं स्वातंत्र्य प्राप्त करता येईल असे समजणे चुकीचे आहे. नागरी समाज आणि राज्यसंस्था यांच्यातील द्वैत नष्ट होण्यासाठी नागरी समाजाला बळ देऊन उपयोगाचे नाही, कारण त्यामधून वर्गीय विषमताच वाढेल. तसेच राज्यसंस्थेला बळ देऊन चालणार नाही, कारण राज्यसंस्थेची सत्ता जास्त तीव्र होईल म्हणून जोपर्यंत राज्यसंस्था राहील तोपर्यंत समाजामध्ये कधीही शांतता प्रस्थापित होणार नाही. व्यक्तीला स्वातंत्र्य मिळणार नाही. त्यामुळे समाजातील खाजगी हितसंबंध नष्ट केले पाहिजे. वर्गाचा नाश केला पाहिजे, तेव्हा राज्यसंस्था नावाच्या परोपजीवी संस्थेची आवश्यकता राहणार नाही आणि जर समाजात वर्ग नसतील आणि राज्यसंस्था नसेल तर खऱ्या अर्थाने नागरिकांना स्वातंत्र्य मिळेल.

## ❑ ग्रामसीचे नागरी समाजाविषयीचे विचार

२०व्या शतकामध्ये ॲंतिनियो ग्रामसीने नागरी समाजाच्या संकल्पनेला भरीव योगदान दिले. मार्क्सने राज्यसंस्था ही भांडवलदार वर्गाच्या हातातील हत्यार आहे आणि या हत्याराच्या साहाय्याने तो वर्ग समाजाचे शोषण करीत असतो असे मत मांडले तर ग्रामसीने नागरी समाज व राज्यसंस्था यांचे स्वरूप व परस्परसंबंध यांची मांडणी केली आहे. त्यात राज्यसंस्थेबरोबरच नागरी समाजाला महत्त्वाचे स्थान दिले. त्याच्या मते, समाजात वर्गीय संघर्ष हा एकमेव संघर्ष नसून भाषा, संस्कृती, राष्ट्र, लिंगभाव, श्रेष्ठत्व, शहर व ग्रामीण भाग इत्यादी घटकांच्या आधारावर संघर्ष निर्माण होतात. त्यात भांडवलदार वर्ग प्रभावी असतो, त्यामुळे भांडवलदार आणि इतर संघटना यांच्यामध्ये वर्चस्वासाठी संघर्ष चालू असतो. नागरी समाजात वेगवेगळे वर्ग, गट, संघटना यांच्यात परस्परसंबंध विषम स्वरूपाचे असतात. या संघटना राज्यसंस्थेच्या विरोधात संघर्ष करतात. ग्रामसीच्या मते, राज्यसंस्थेत शासन यंत्रणा, सेना, पोलीस, नोकरशाही, तुरुंग, न्यायालये या सर्व दमन करणाऱ्या यंत्रणांचा समावेश होतो. परंतु राज्यसंस्था त्याबरोबर भांडवली विकासास मदत करते आणि सत्ताधारी भांडवलशाही वर्ग हा शोषित बहुजन समाजाकडून आपल्या सत्तेला अधिमान्यता प्राप्त करवून घेण्याचा प्रयत्न करतो.

ग्रामसीने राजकारणामध्ये सुवश क्रांती, परिस्थितीचे युध्द व चळवळीचे युध्द या संकल्पना वापरल्या आहेत. सुवश क्रांती भांडवलशाहीच्या वर्चस्ववादी शक्तींना बळकट करते आणि त्याचा वापर करून भांडवलदार आपले वर्चस्व टिकविण्याचा प्रयत्न करतात. परिस्थितीचे युध्द याचा अर्थ क्रांतीकारक शक्तीनी आपल्या जागी राहून संघर्ष करणे व आपली शक्ती संघटीत करणे व वाढवणे. हा संघर्ष दीर्घकाळ चालणारा संघर्ष आहे. तर चळवळीचे युध्द हे त्वरित चढाई करून विजय मिळवण्यासाठीचा संघर्ष आहे. पश्चिम युरोपातील क्रांतीकारक बदल घडवून आणण्यासाठी आधी नागरी समाजात मूलभूत बदल घडवून आणावा लागला आणि भांडवलशाहीच्या बाजूने झुकलेल्या सामाजिक शक्तींना समाजाच्या बाजूने झुकवावे लागले. त्यासाठी साम्यवाद आणणे आवश्यक असून ग्रामसीने साम्यवादाकडे जाण्यासाठी क्रांतीकारक टप्पाचा विचार केला. प्रथम लोकशाही क्रांतीनंतर समाजवादी क्रांती आणि शेवटी साम्यवादी क्रांती असे टप्पे आहेत. या प्रक्रियेमध्ये राज्यसंस्था विरून जाईल. नागरी समाजात बदल होईल आणि आत्मानुशासनावर आधारलेला स्वयंशासित राज्यविहिन समाज निर्माण होईल. अशाप्रकारे नागरी समाज प्रस्थापित करण्याबाबतचे विवेचन ग्रामसीने केले आहे.

## ❑ नागरी समाजाचे सद्यकालीन महत्त्व

युरोपीय देशामध्ये नागरी समाजाच्या संकल्पनेचे पुनरुज्जीवन झाले आहे. त्याकरिता रॉबर्ट पुटनम या विचारवंताचे योगदान महत्त्वाचे आहे. त्याने आपल्या अभ्यासात असे म्हटले आहे की, एखाद्या

समाजात नागरी समाज सक्रिय असल्यास त्याचा, तेथील राजकीय जीवन आणि राजकीय संस्थाची कार्यक्षमता व दर्जा यांच्यावर निश्चित परिणाम होतो. पुटनमच्या मते, ज्या समाजात पुरेसे सामाजिक भांडवल आहे अशा समाजात नागरी मूल्ये व आदर्श आढळून येतात. नागरी समाज लोकप्रिय होण्याचे एक प्रमुख कारण म्हणजे राज्य लोकांच्या गरजा व आकांक्षा पूर्ण करू शकत नाही अशा भावना सर्वसामान्यामध्ये निर्माण होते आहे. ही राज्ये चांगला विकास दर गाठू शकली नाही, तसेच लोकशाही मूल्ये व्यवस्थेमध्ये रुजवू शकली नाही.

१९८०-९० च्या दशकामध्ये निर्माण झालेल्या नव्या सामाजिक चळवळीनी सध्या अस्तित्त्वात आलेल्या विकास नमुन्याला आव्हान दिले आहे. या चळवळी अशा अर्थाने नवीन आहेत की, त्यांनी पारंपारिक राजकीय पक्ष आणि दबाव गटापेक्षा स्वत:साठी वेगळे स्थान निर्माण केले आहे. आजकाल अनेक गैरशासकीय संघटना अनेक समस्या हाताळताना दिसून येतात. शिक्षण, आरोग्य, मानवाधिकार, पर्यावरण, लिंगभेद, विस्थापितांच्या समस्या, अल्पसंख्याकांचे अधिकार तसेच शासनाची पारदर्शकता इ. कितीतरी महत्त्वाच्या सामाजिक क्षेत्रामध्ये या संघटना कार्यरत असलेल्या आढळून येतात. या संघटना राजकीय पक्षापासून दूर राहतात, तसेच या संघटना प्रसारमाध्यमांचा उपयोग करतात. नागरी समाजाच्या संकल्पेनेचे पुनरुज्जीवन करण्याच्या दृष्टीने नवउदारमतवादी आर्थिक सिध्दांत महत्त्वाचा आहे. गेल्या काही दशकापासून आंतरराष्ट्रीय नाणेनिधी आणि जागतिक बँक या प्रभावशाली संस्था नागरी समाजाच्या समर्थनात कार्यरत आहेत, त्यामुळे राज्याची जी कार्ये आहेत ती आता नागरी समाजाच्या संस्थाकडून पूर्ण केली जावीत, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. त्यामुळे नागरी समाजाला महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले आहे.

नागरी समाजाच्या संघटना लोकशाहीमध्ये जास्त प्रमाणात निर्माण होतात. परंतु आज निरा चांढोकेंच्या शब्दात सांगायचे झाले तर अशा नागरी समाजाची आवश्यकता आहे की, जी दलित, गरीब मागास लोकांसाठी कार्य करेल या घटकांप्रती उत्तरदायित्त्व असणारी संघटना निर्माण झाली पाहिजे.

## २.२.२ राज्याचा उदारमतवादी दृष्टीकोन

उदारमतवाद ही आधुनिक काळातील एक महत्त्वाची विचारधारा आहे. या विचारधारेची सुरुवात इंग्लंडमध्ये १६८८ च्या रक्तविहीन क्रांतीपासून झाली असे समजले जाते. जेव्हा राज्यसंस्थेने धर्मसत्तेच्या विरोधात संघर्ष सुरू केला, त्यातून उदारमतवादाचा जन्म झाल्याचे दिसून येते. उदारमतवाद ही विचारप्रणाली व्यक्तीस्वातंत्र्यास सर्वोच्च मानून राज्याच्या, व्यक्तीच्या जीवनातील हस्तक्षेपाला विरोध करते. सामाजिक करार सिध्दांत मांडणाऱ्या हॉब्ज, लॉक व रुसो यांनी उदारमतवादी विचारसरणीची मुहूर्तमेढ रोवली. उदारमतवादी विचारसरणीमध्ये कालांतराने तीन प्रकार पडले आहेत. त्यात सुरवातीच्या

काळात हॉब्ज, लॉक, रुसो, बेथॅम, स्पेन्सर व अॅडम स्मिथ या विचारवंतानी अभिजात उदारमतवाद विकसित केला. यामध्ये काही प्रश्न निर्माण झाले त्याच्या निवारणासाठी सुधारणावादी उदारमतवादाचा उदय झाला आणि राज्याचा सकारात्मक हस्तक्षेप मान्य करून कल्याणकारी राज्याचा पुरस्कार केला. यामध्ये जे. एस. मिल, टी. एच. ग्रीन आणि जॉन किन्स इ. विचारवंताचा समावेश होतो. तिसरा नवउदारमतवाद, यामध्ये शासनाचा कमीत कमी हस्तक्षेप आणि व्यक्तीला जास्तीत जास्त स्वातंत्र्य हा विचार अभिप्रेत होता. त्यात खासगीकरण, उदारीकरण व जागतिकीकरण याच्यावर मुख्य भर देण्यात आला आहे. यामध्ये मिल्टन फ्रिडमन, नॉजिक, हायेक व डार्वीन इ. विचारवंताचा समावेश होतो यातून राज्याचा अतिभाराचा सिध्दांत मांडण्यात आला आहे.

उदारमतवाद १८व्या शतकापासून पाश्चिमात्त्य राजकीय विचारांना प्रभावित करणारा एक विचारप्रवाह आहे, तो आजही प्रभावी आहे. उदारमतवाद याला इंग्रजीमध्ये 'Liberalism' असे म्हणतात. 'Liberalism' हा शब्द लॅटीन भाषेतील 'Liber' या शब्दापासून तयार झाला आहे, त्याचा अर्थ स्वतंत्र असा आहे. म्हणून व्यक्तीस्वातंत्र्याचे समर्थन करणारा विचारप्रवाह म्हणजे उदारमतवाद होय, अशी उदारमतवादाची व्याख्या केली आहे. सर्वप्रथम स्पेनच्या लोकांनी उदारमतवादी धोरणाचा पुरस्कार केला. ही घटना उदारमतवादाच्या उदयास कारणीभूत ठरली आहे. कारण अठराव्या शतकाच्या अखेरीस मध्ययुगीन काळातील सरंजामशाही व्यवस्था मोडकळीस येऊ लागली आणि समाजात स्वातंत्र्याचे नवे वारे वाहू लागले. व्यक्तीच्या सर्वांगीण विकासासाठी व्यक्तीला स्वातंत्र्य मिळणे आवश्यक आहे असा विचार पुढे आला. त्या काळातील हर्बर्ट स्पेन्सर, बेथॅम जे. एस. मिल इ. विचारवंतांनी व्यक्ती स्वातंत्र्याचा विचार मांडला, त्यातूनच उदारमतवादाचा जन्म झाला. हॉबहाऊस यांनी आपल्या 'Liberalism' या ग्रंथामध्ये उदारमतवादाची खालील प्रमुख तत्त्वे सांगितली आहेत.

१. **नागरी स्वातंत्र्य :** यामध्ये शासन कारभार कोणत्याही व्यक्तीच्या किंवा व्यक्तीसमुदायाच्या मनमानीनुसार चालू नये तर तो कायद्यानुसारच चालावा असे उदारमतवादाला अभिप्रेत आहे. म्हणून उदारमतवाद राजतंत्राला व धर्मसत्तेला विरोध करतो.

२. **व्यक्ती स्वातंत्र्य :** यामध्ये व्यक्तीला विचार, भाषा, सभा, संघटन, प्रकाशन इ. स्वातंत्र्य असावे असे उदारमतवादाला अभिप्रेत आहे. त्यावर राजसत्तेने व धर्मसत्तेने कोणतेही बंध घालू नयेत.

३. **सामाजिक स्वातंत्र्य :** व्यक्ती स्वातंत्र्याबरोबर व्यक्तीला सामाजिक स्वातंत्र्य असले पाहिजे. कोणत्याही व्यक्तीनी रंग, लिंग, वंश, आर्थिक स्थिती इत्यादी बाबींच्या आधारावर व्यक्ती-व्यक्तीमध्ये भेदभाव करू नये. प्रत्येक व्यक्ती कायद्यासमोर समान आहेत, असा उदारमतवादाचा आग्रह आहे.

४. **आर्थिक स्वातंत्र्य :** उदारमतवाद मुक्त किंवा खुल्या आर्थिक स्पर्धेचा पुरस्कार करीत असून राज्यांनी आर्थिक क्षेत्रात हस्तक्षेप करू नये असे उदारमतवाद सांगतो. त्याचबरोबर तो भांडवलशाही आर्थिक व्यवस्थेचा पुरस्कार करतो.

५. **कौटुंबिक स्वातंत्र्य :** पुरुषसत्ताक कुटुंबव्यवस्थेला विरोध करून कौटुंबिक जीवनात स्त्री स्वातंत्र्याचा पुरस्कार केला आहे आणि स्त्री-पुरुषांना समान स्वातंत्र्य असावे असे उदारमतवादी विचारधारा प्रतिपादन करते.

६. **मानवतावादाचे स्वातंत्र्य :** उदारमतवादाने मानवतेच्या दृष्टीने व्यक्तीच्या प्रशासकीय, भौगोलिक आणि वांशिक क्षेत्रातील स्वातंत्र्याचा पुरस्कार केला आहे. हे स्वातंत्र्य राष्ट्रीय पातळीपर्यंत व्यक्तीला असले पाहिजे असा आग्रह उदारमतवाद धरतो.

७. **आंतरराष्ट्रीय स्वातंत्र्य :** उदारमतवादाला आंतरराष्ट्रीय शांतता, परस्पर सहकार्य व आंतरराष्ट्रीय संघटनेची निर्मिती किंवा आंतरराष्ट्रीय संघराज्य या संकल्पना मान्य आहेत.

८. **राजकीय स्वातंत्र्य :** राजकीय स्वातंत्र्य आणि जनतेच्या सार्वभौम सत्तेचा उदारमतवाद पुरस्कार करतो. प्रत्येकाला सारख्याच प्रमाणात अधिकार असावेत आणि उपभोगण्याची संधी असावी.

९. **धर्मनिरपेक्षता :** मध्ययुगीन काळात धर्मसंस्थेचा व्यक्ती जीवनावर फार मोठा प्रभाव पडला होता, परंतु उदारमतवादाने धर्मसंस्थेचा वाढता हस्तक्षेप अमान्य करून व्यक्तीने धर्मसंस्थेपासून मुक्त असावे असे मत मांडले.

१०. **राज्याचा कमीतकमी हस्तक्षेप :** राज्य हे व्यक्ती विकासाचे साधन आहे ते साध्य नाही. व्यक्तीला आपल्या व्यक्तीमत्त्वाचा विकास करून घेता येईल असे वातावरण राज्याने निर्माण करून द्यावे व व्यक्तीच्या जीवनात कमीतकमी हस्तक्षेप करावा असे उदारमतवादाचे प्रथम सूत्र आहे.

हॉबहाऊसने उदारमतवादाची वरील तत्त्वे स्पष्ट केली आहेत. राज्यविषयक सिध्दांताची मांडणी करताना खालील तीन गोष्टींचा अभ्यास करावा लागतो.

१) व्यक्तीचे अधिकार आणि राज्याची सत्ता याच्यातील परस्पर संबंधाचा विचार करणे.

२) राज्याच्या उगमस्थानाबद्दल चर्चा करणे.

३) राज्याच्या उद्दिष्टासंबंधी स्पष्टता असणे.

वरील तिनही गोष्टींचा विचार करता उदारमतवादाचे राज्यविषयक सिध्दांत अभ्यासणे आवश्यक आहे. उदारमतवाद तीन अवस्थांमध्ये विकसित झाला आहे. त्यामध्ये अभिजात उदारमतवाद, सुधारणावादी उदारमतवाद आणि नव उदारमतवाद या तीन अवस्थांचा समावेश होतो.

## २.२.२.१ राज्याचा अभिजात उदारमतवाद

अभिजात उदारमतवाद म्हणजे ज्यामध्ये मानवी विवेक विकासाला महत्त्वाचे स्थान देऊन व्यक्तीच्या जवळील क्षमतांचा जास्तीत जास्त विकास व्हावा. त्याचवेळी शासनाने आर्थिक क्षेत्रात हस्तक्षेप न करता व्यक्तीला आर्थिक स्वातंत्र्य द्यावे असा विचार अभिप्रेत आहे. उदारमतवादाचा उदय ही एक प्रगत संकल्पना म्हणून सरंजामशाहीच्या विरोधात उदयाला आली. कारण त्या समाजामध्ये व्यक्तीला स्वातंत्र्य नव्हते. धर्मसत्तेचा मोठा प्रभाव होता आणि राज्यसंस्थेवर धर्म व राजाची अनिर्बंध अशी सत्ता होती, यामुळे युरोपात धर्मसुधारणा चळवळ सुरू झाली आणि धर्मसत्तेला आव्हान देण्यात आले. मार्टिन ल्युथरने प्रोस्टेटंट पंथ स्थापन करून धर्मगुरूचे वर्चस्व नाकारले आणि व्यक्ती व ईश्वरामध्ये धर्मगुरूंचा हस्तक्षेप अमान्य केला. यामुळे धर्मसुधारणा आणि व्यक्ती अधिकाराबाबत समाजात जागृती होवून धर्मसंस्थेवर टीका करण्यात आली. त्याचबरोबर राज्यसंस्थेवरील धर्माचे वर्चस्व नाकारून राज्य हे दैवी सिध्दांतानुसार निर्माण झाले नसून ते सामाजिक करारातून निर्माण झाल्याचे थॉमस हॉब्ज, जॉन लॉक, रुसो या विचारवंतांनी मांडले आहे.

थॉमस हॉब्जने व्यक्ती स्वातंत्र्याचा पुरस्कार केला. त्याच्या विचारांचा विकास करत जॉन लॉक म्हणतो नैसर्गिक अधिकार आणि सामाजिक कराराच्या सिध्दांतावर व्यक्तीस्वातंत्र्य अवलंबून असते, तेव्हा जनतेला क्रांती करण्याचा अधिकार आहे. रुसोने व्यक्ती स्वातंत्र्याचा उद्घोष करून लोकशाहीचा पुरस्कार केला आहे. आर्थिक क्षेत्रात शासनाने कोणतेही निर्बंध घालणे त्याला मान्य नव्हते. शासनाची सत्ता जितकी कमी करता येईल तितकी इष्ट किंबहुना टपाल व टांकसाळीसुध्दा खाजगी मालकीच्या असाव्यात असे मत हर्बर्ट स्पेन्सरने मांडले आहे.

हर्बर्ट स्पेन्सरने डॉर्विनच्या उत्क्रांती तत्त्वाचा उपयोग करून व्यक्तीवादाचा पुरस्कार केला. स्पेन्सरने जीवशास्त्रीय तत्त्वाचा आधार घेवून सेंद्रिय सिध्दांत मांडला. त्याचबरोबर नैसर्गिक अधिकार, आर्थिक अधिकार व राज्याची तटस्थता ह्या गोष्टींना महत्त्व देऊन व्यक्तीवादाचा पुरस्कार केला आहे. बेथॅमने उपयुक्ततावादाचा पुरस्कार करीत असताना जास्तीत जास्त लोकांचे जास्तीत जास्त कल्याण हे उदारमतवादाचे उद्दिष्ट सांगितले आहे. १७७६ साली ॲडम स्थिम 'Wealth of Nations' या ग्रंथामध्ये मुक्त अर्थव्यवस्था व व्यक्ती स्वातंत्र्याचा पुरस्कार केला. राज्यसंस्थेने हस्तक्षेप न करता खाजगी उद्योगधंद्यांना प्रोत्साहन द्यावे. उद्योग व व्यापार क्षेत्रात व्यक्तीची फसवणूक न करता संरक्षण करावे.

व्यक्तीच्या जास्तीत जास्त सुखासाठी मुक्त व्यापार उपलब्ध करून द्यावा असा विचार मांडत ॲडम स्मिथने व्यक्ती स्वातंत्र्याचा पुरस्कार केल्याचे दिसून येते. अशाप्रकारे उदारमतवादी विचारवंतानी व्यक्ती स्वातंत्र्याचा पुरस्कार केला आहे.

अभिजात उदारमतवाद दोन भागात कार्य करतो. एका बाजूने तो व्यक्तीस्वातंत्र्याचा पुरस्कार करीत असताना दुसरीकडे तो राज्याच्या भूमिकेबद्दल अपेक्षा व्यक्त करतो. अभिजात उदारमतवादी राज्याबद्दल नकारात्मक नसून ते राज्याच्या मर्यादा निश्चित करतात. राज्याने कमीतकमी हस्तक्षेप करावा, राज्याने व्यक्तीच्या सर्वांगीण विकासासाठी येणारे अडथळे दूर करावे, राज्य हे शक्तीच्या किंवा दैवी सिद्धांतावर आधारलेले नसून ते सामाजिक करारातून निर्माण झालेले आहे. राज्य हे लोकांच्या इच्छेवर अवलंबून आहे असे अभिजात उदारमतवादाच्या विचारात प्रकर्षाने जाणवते. उदारमतवादाच्या विकासाला सामाजिक करार सिध्दांताचे महत्त्वाचे योगदान दिले आहे. कारण राज्य ही नैसर्गिक संस्था नसून ती लोकांनी केलेल्या करारातून निर्माण झाले आहे अशी भूमिका हॉब्ज, लॉक आणि रुसो यांनी मांडले आहेत. परंतु राज्याच्या स्वरूपासंबंधी या विचारवंतांनी वेगळी भूमिका मांडलेली आहे. हॉब्जने व्यक्तीस्वातंत्र्याबरोबर अनियंत्रित राजसत्तेचा पुरस्कार केला असून राज्याची इच्छा हाच कायदा असे तो मानतो. तर लॉकने नियंत्रित शासनसंस्थेचा पुरस्कार केला असून शासनसंस्था समाज आणि व्यक्तीच्या विकासासाठी अस्तित्त्वात आली आहे असे तो म्हणतो. जर शासनसंस्था सत्तेचा दुरुपयोग करत असेल तर व्यक्तीला राज्याला विरोध करण्याचा अधिकार देऊन व्यक्तीवादाला महत्त्व दिले आहे. रुसोनी मात्र प्रत्यक्ष लोकशाहीच्या शासन प्रकाराला उचित व श्रेष्ठ मानले आहे. त्याचबरोबर जनतेला, शासनास विरोध करण्याचा अधिकार दिला. अशाप्रकारे सामाजिक करार मांडणाऱ्या विचारंवतानी व्यक्तीस्वातंत्र्याबरोबर राज्याचे स्वरूप स्पष्ट केले आहे.

उपयुक्ततावादी विचारवंत जेरेमी बेथेम यांनी राज्याचा उदय लोकांच्या आज्ञापालनाच्या सवयीमधून होतो असे मत मांडले, तो म्हणतो जेव्हा एखादी सर्वश्रेष्ठ व्यक्ती इतरांना आज्ञा करते, मात्र स्वत: कोणत्याही सर्वश्रेष्ठाची आज्ञा पाळीत नाही, तेव्हा अशी सर्वश्रेष्ठ व्यक्ती किंवा असा सर्वश्रेष्ठ व्यक्तीसमूह हा सार्वभौम असतो आणि त्या संबंधातून राज्य ही संकल्पना उदयास येते. एकूणच राज्याच्या उदयाचा आणि अस्तित्त्वाचा विचार करताना बेथॅम उपयुक्तता या तत्त्वाखेरीज कशालाही प्राधान्य देत नाही. हर्बर्ट स्पेन्सर हा प्रख्यात ब्रिटिश विचारवंतानी राज्याने समाजामध्ये समान स्वतंत्रता प्रस्थापित करण्याचे कार्य करावे अशी भूमिका मांडली आहे. ॲडम स्मिथ या विचारवंताने उदारमतवादाचे संबंध मुक्त बाजारपेठेशी जोडले आहे. त्यासंबंधीचे मुद्दे पुढीलप्रमाणे आहेत.

१) मनुष्य हा विवेकशील प्राणी आहे, त्यामुळे त्याला स्वत:चे हित कळते. त्याच्या विवेकाच्या साहाय्याने तो स्वत:चे व इतर लोकांचेही जीवन समृध्द करतो.

२) मनुष्याला स्वहित साधण्याचा प्रयत्न बाजारपेठेत करता येतो. कारण बाजारपेठेत वस्तूंची किंमत त्याच्या गुणवत्तेनुसार ठरत असतो. स्पर्धेशिवाय वस्तूची किंमत ठरत नाही. बाजार मुक्त असेल तर वस्तूची योग्य किंमत ठरते.

३) अर्थव्यवस्था विकासाची जबाबदारी बाजारपेठेची असते, कारण बाजारपेठेच्या तत्त्वाप्रमाणे कामानुसार माणसाला नफा मिळतो. त्यातील काही भाग माणूस विकासासाठी ठेवतो. धंद्याच्या वाढीला त्याचा उपयोग होतो. बाजारपेठेत एकही पैसा वाया न जाता, नफा कसा होईल हे पाहिले जाते. ही वाढीची प्रेरणा बाजारपेठेत व्यक्तीच्या विकासास प्रेरणा देते.

४) बाजारपेठा न्याय आहेत कारण बाजारपेठा पूर्णत: स्पर्धात्मक असतील तर त्या प्रत्येकाला त्याच्या कुवतीप्रमाणे काम देतील. प्रत्येकाला त्याच्या क्षमतेप्रमाणे काम मिळेल. कौशल्याची किंमत बाजारात मिळते, त्यामुळे समाजात अन्याय होणार नाही.

अशाप्रकारे ॲडम स्मिथने व्यक्ती विकासासाठी मुक्त बाजारपेठांचा पुरस्कार केला आहे.

## राज्याच्या अभिजात उदारमतवादाची वैशिष्ठ्ये :-

१) अभिजात उदारमतवादाने व्यक्ती विकासाला व व्यक्तीस्वातंत्र्याला साध्य मानून राज्याला साधन मानले आहे. राज्याने व्यक्तीला स्वातंत्र्य देण्यासाठी कार्यक्षम असणे आवश्यक आहे. ही कार्यक्षमता आर्थिक घटकांशी संबंधित असते.

२) व्यक्ती स्वातंत्र्याचा उद्देश हा माणसाच्या क्षमतांचा जास्तीत जास्त विकास करणे हा होय. क्षमतांच्या जितका विकास होईल तितका समाजाचा विकास होईल, त्यासाठी राज्याने क्षमतांच्या विकासातील अडथळे दूर करणे महत्त्वाचे आहे, ते राज्याने केले पाहिजे.

३) राज्याने आर्थिक क्षेत्रात हस्तक्षेप करू नये. बाजारपेठा या मुक्त असल्या पाहिजेत, त्यामुळे व्यक्तीचा विकास होण्यासाठी बाजारपेठांमध्ये राज्यांनी हस्तक्षेप करू नये किंवा त्यावर नियंत्रण ठेवू नये.

४) राज्याने परकीय आक्रमणापासून देशाचे संरक्षण करावे. राज्याचे संरक्षण केल्याशिवाय व्यक्तीस्वातंत्र्य टिकू शकत नाही. तसेच राज्यात स्थैर्य, शांतता व सुरक्षितता असावी लागते. त्यामुळे राज्याने देशाचे संरक्षण करावे.

एकूणच अभिजात उदारमतवादाचे व्यक्तीस्वातंत्र्याला महत्त्व देवून राज्यानी त्यासाठी पोषक वातावरण निर्माण करून देण्याचे राज्याचे कर्तव्य आहे असे मांडले. यावरून उदारमतवादी लोकशाही व्यवस्थेचे पुरस्कर्ते आहेत असे स्पष्ट होते.

अभिजात उदारमतवाद्यांनी आपला संबंध मुक्त बाजारपेठेशी जोडला. त्यामुळे मोठ्या प्रमाणात गरीब जनतेकडून भांडवलदाराकडे बाजारपेठेच्या माध्यमातून मूल्यहस्तांतरण होऊ लागले. यातून भांडवलशाहीचा उदय झाला आणि त्याचबरोबर विषमता वाढली. कामगार वर्गावर होणारे अन्याय वाढले व भांडवलशाहीतून मक्तेदार भांडवलशाही निर्माण होऊन भ्रष्टाचार वाढला. या काळात चार्ल्स डिकन्स, यांनी 'डेव्हीड कॉपर फिल्ड' या पुस्तकाद्वारे इंग्लंडमधील कामगारांच्या शोषणाचे वर्णन केले आहे. या समस्येमुळे मुक्त बाजारपेठेवर आधारलेल्या उदारमतवादाबाबतची अस्वस्थता एकोणिसाव्या शतकातील उदारमतवाद्यांमध्ये निर्माण झाली. जे. एस. मिल, टी. एच. ग्रीन यांनी यात सुधारणा झाली पाहिजे. असेच मत मांडले. त्यांच्या या सुधारणावादी विचाराचा उल्लेख हॉब हाऊसने सुधारणावादी उदारमतवाद असा केला आहे.

## २.२.२.२ सुधारणावादी उदारमतवाद

सुधारणावादी उदारमतवाद म्हणजे आर्थिक क्षेत्रामध्ये राज्याने सकारात्मक हस्तक्षेप करून लोकांचा सर्वांगीण विकास करावा हा विचार आहे. सुधारणावादी उदारमतवाद हा व्यक्ती स्वातंत्र्याला महत्त्व न देता राज्यानी सकारात्मक हस्तक्षेप करण्याला प्राधान्य देतो. कारण अभिजात उदारमतवादामुळे समाजामध्ये जी भांडवलदाराची मक्तेदारी वाढली आहे. जी आर्थिक विषमता निर्माण झाली आहे, ते दूर करणे आवश्यक होते, त्याची कारणे पुढीलप्रमाणे सांगता येतील.

१) अभिजात उदारमतवादामध्ये मुक्त स्पर्धेस वाव होता. त्यातून मक्तेदारी भांडवलशाही निर्माण झाली. मक्तेदारी भांडवलदारीने आर्थिक विषमता निर्माण केली.

२) आर्थिक विषमता निर्माण झाल्यामुळे समाजात राजकीय अस्थैर्य निर्माण झाले. मक्तेदार भांडवलशाहीने गुन्हेगारी, राजकारणी, उद्योगपती इत्यादीची आघाडी तयार केली. आर्थिक विषमता अधिकच वाढली.

३) आर्थिक विषमता, राजकीय अस्थैर्य आणि महामंदी इत्यादी कारणामुळे अभिजात उदारमतवादी विचारसरणी उपयोगाची नाही असा समज लोकांमध्ये निर्माण झाला आणि आणि लोक कम्युनिस्टांच्याकडे आकर्षिले जाऊ लागले, त्यामुळे उदारमतवाद्यांपुढे प्रश्न निर्माण झाला. उदारमतवादी व्यवस्था टिकविण्यासाठी अभिजात उदारमतवादात सुधारणा करणे आवश्यक झाले.

या वरील कारणांमुळे सुधारणावादी उदारमतवादी विचार उदयास आले. सुधारणावादी उदारमतवादी विचार पुढीलप्रमाणे स्पष्ट करण्यात आले आहे.

जे. एस. मील यांनी बेथेमच्या उपयुक्ततावादात सुधारणा केली. जास्तीत जास्त लोकांचं जास्तीत

जास्त सुख हे तत्त्व मान्य केले. परंतु त्याने सुखदु:खाचं मूल्यमापन करताना संख्यात्मक व गुणात्मक या दोन्ही गोष्टींचा विचार केला आहे. दुसरी गोष्ट म्हणजे तो व्यक्ती स्वातंत्र्याचा कट्टर पुरस्कर्ता आहे. त्यांनी १८५९ साली, 'ऑन लिबर्टी' हा ग्रंथ लिहून त्यामध्ये स्वातंत्र्याचे दोन प्रकार सांगितले आहेत. स्वसंबंधी व परसंबंधी स्वातंत्र्य सांगितले आहे. व्यक्ती ही आपल्या स्वत:च्या संदर्भामध्ये पूर्णत: स्वतंत्र असते. जोपर्यंत हे स्वातंत्र्य इतरांच्या स्वातंत्र्याचा संकोच करत नाही, तोपर्यंत हे स्वातंत्र्य उपभोगण्याचा तिला अधिकार असतो. हे स्वसंबंधी स्वातंत्र्य आहे. व्यक्तीच्या ज्या कार्याचा प्रभाव इतरावर पडतो, त्या कार्याला परसंबंधी स्वातंत्र्य म्हणतात. प्रत्येक व्यक्ती स्वतंत्र आहे, परंतु दुसऱ्याच्या स्वातंत्र्यात हस्तक्षेप न केल्यानेच ती व्यक्ती स्वतंत्र राहू शकते, म्हणून आपल्या स्वातंत्र्यामुळे इतरांच्या स्वातंत्र्याला बाधा येईल असे कार्य व्यक्तीकडून होऊ नये. जर या स्वातंत्र्यामुळे समाजात अराजक किंवा अशांतता निर्माण झाली असेल तर ते नियंत्रित करण्यासाठी मिलने राज्याला हस्तक्षेप करण्याचा अधिकार मान्य करतो. त्याचबरोबर समाजहितासाठी अर्थकारणात राज्यसंस्थेने काही प्रमाणात हस्तक्षेप केला तरी चालेल असे म्हटले आहे. त्याचबरोबर प्रमाणशीर प्रतिनिधीत्व, प्रौढ मताधिकार व स्त्रियांना मताधिकार असला पाहिजे असे त्यांचे प्रतिपादन होते. अशाप्रकारे उदारमतवादामध्ये अनेक प्रकारच्या सुधारणा मिलने केल्या आहेत.

थॉमस हिल ग्रीनने ब्रिटीश संसदीय लोकशाही व नागरी अधिकार यांचा पुरस्कार केला. ग्रीनच्या मते, राज्यसंस्था बळामधून निर्माण झालेली नसून ती समाजातील व्यक्तीच्या इच्छेतून निर्माण झालेली आहे. म्हणून ग्रीनच्या मते, राज्यसंस्था मानवी जीवनात महत्त्वाची भूमिका बजावते. व्यक्तीला खरं स्वातंत्र्य उपभोगायचे असेल तर समाजात जे नियम कायदे असतात ते पाळले पाहिजेत. ही बंधने कोणी लादत नसून ती मी स्वखुशीने पाळतो अशी कल्पना ग्रीनने मांडली आहे. दुसरी गोष्ट ते कायदे हे जास्तीत जास्त स्वहितावर आधारित, लोकशाहीवर अधिष्ठित असावे. राज्यसंस्था ही सर्व व्यक्तीच्या इच्छेचा आविष्कार असल्यामुळे राज्याशिवाय व्यक्तीविकास व चांगले जीवन प्राप्त करू शकत नाही. ग्रीनच्या शब्दात मानवी जागृती, स्वातंत्र्याची मागणी करते. स्वातंत्र्यासाठी अधिकार गरजेचे असतात आणि अधिकाराच्या संरक्षणार्थ राज्याची आवश्यकता असते. म्हणून ग्रीनने ज्यावेळी आवश्यक वाटेल त्यावेळी राज्याने आर्थिक क्षेत्रात हस्तक्षेप करावा असे मत मांडले. राज्याच्या कार्याची दोन लक्षणे त्यांनी सांगितली आहेत. एक म्हणजे ग्रीनने केवळ संरक्षण राज्याचे समर्थन केले नाही तर त्याने व्यक्ती विकासाला साध्य मानून राज्याला साधन ठरविले आहे. परंतु समाजहित समोर ठेवून व्यक्तीच्या कार्यावर उचित निर्बंध मान्य केले आहेत. त्यामुळे तो कल्याणकारी राज्याचा समर्थक ठरतो.

अभिजात उदारमतवादी धोरणामुळे समाजामध्ये भांडवलवादाची मक्तेदारी वाढली होती. दुसरीकडे १९३२ साली आर्थिक महामंदी अमेरिकेत उदयास आली. त्यामुळे समाजजीवन धोक्यात आले होते. समाजात विषमता वाढली होती. सर्वत्र आर्थिक क्षेत्रात गोंधळ निर्माण झाला होता. याच महामंदीच्या

काळात जॉन केन्सने बेरोजगारी आणि बाजारपेठेच्या संदर्भात पुस्तके लिहिली. त्यामध्ये त्यांनी राज्याने आर्थिक क्षेत्रात सकारात्मक हस्तक्षेप करावा. हा हस्तक्षेप अर्थव्यवस्थेत सुधारणा करण्यासाठी करावा असा विचार मांडला. सरकारने सार्वजनिक उपक्रम राबवून रोजगार वाढीस उत्तेजन द्यावे, अशाप्रकारे जॉन केन्स याने मांडले. त्यामुळे राज्याने मोठ्या प्रमाणात हस्तक्षेप केला. पहिल्यांदा याची सुरुवात अमेरिकेचे अध्यक्ष फ्रॅंकलिन रूझवेल्ट यांनी, 'न्यू डील' योजनेत केली. टेनेसी व्हॅली ॲथॉरेटी सुरू करून या कार्यक्रमाने सार्वजनिक क्षेत्राची पायाभरणी केली. त्यामुळे जॉन केन्सचे विचार महत्त्वाचे ठरले.

हेरॉल्ड लास्की यांनी भांडवलशाहीमुळेच, बाजारपेठा शोधण्यासाठी, साम्राज्यवाद वसाहतवाद निर्माण होतो व त्यातून युध्दे होतात असे मत मांडले आहे. भांडवलदार आपल्या वर्गाच्या हितासाठी राज्याचे सरकारचे संरक्षण घेतात व सरकारला विनाकारण लढाईत उतरवतात त्यामुळे भांडवलशाहीमध्ये लोकशाही टिकू शकत नाही असे लास्कीचे मत आहे. त्याचबरोबर त्यांनी व्यक्तीला वैयक्तीक व राजकीय स्वातंत्र्य आणि आर्थिक स्वातंत्र्य दिले आहे. मिलने मांडलेली व्यक्तीगत स्वातंत्र्याची कल्पना लास्कीला मान्य नाही. समाजहितासाठी व्यक्तीगत हिताचे बलिदान म्हणजे स्वातंत्र्याचा निषेध नव्हे, समता म्हणजे एकरूपता नव्हे. प्रत्येकाला उन्नतीसाठी समान संधी मिळणे म्हणजे न्यूनतम आधारावर समानता असावी असे लास्की म्हणतो. तसेच लास्कीच्या मते, व्यक्ती विकासासाठी व्यक्तीला अधिकाराची अत्यंत आवश्यकता आहे आणि राज्याचे स्वरूप राज्याने व्यक्तीला दिलेल्या अधिकारावरून ठरते. जनकल्याणाच्या दृष्टीने अधिकार आवश्यक ठरतात. म्हणून व्यक्तीला अधिकार असणे आवश्यक आहे. त्यामध्ये काम करण्याचा अधिकार, उचित वेतन, शिक्षणाचा अधिकार, राजकीय अधिकार, भाषणाचा अधिकार इ. अधिकारांचा समावेश होतो. तसेच लास्की राज्याला विरोध करण्याचा अधिकार व्यक्तीला देतो. त्याच्यामते व्यक्तीच्या विकासासाठी आवश्यक ती बाह्य परिस्थिती निर्माण करणे हे राज्याचे कार्य आहे. राज्याने व्यक्तीला अधिकाराची खात्री दिल्याशिवाय व्यक्ती आपला जास्तीत जास्त विकास करून घेऊ शकत नाही. व्यक्ती विकासाला आवश्यक असलेले अधिकार राज्याकडून मिळत नसतील म्हणजेच राज्य जर त्यांना मान्यता देत नसेल तर व्यक्ती राज्याचा विरोध करू शकते. क्रांती करू शकते असे लास्की म्हणतो. राज्याने निर्माण केलेला कायदा व्यक्तीच्या विकासाच्या उद्देशपूर्तीसाठी असला पाहिजे, असे प्रतिपादन करतो. त्यासाठी लास्कीने व्यक्तीच्या हक्क संरक्षणासाठी व व्यक्ती प्रतिष्ठेसाठी तसेच आर्थिक बेकारीतून मुक्त करण्यासाठी राज्याने हस्तक्षेप करावा असे म्हटले आहे.

सुधारणावादी उदारमतवादाच्या विचारामध्ये २० व्या शतकातील तत्त्वज्ञ जॉन रॉल्स यांनी थिअरी ऑफ जस्टीस (Theory of Justice) हे पुस्तक लिहून भर टाकली आहे. त्यानी या पुस्तकामध्ये पुन्हा एकदा सामाजिक कराराची कल्पना मांडली आहे. रॉल्सने न्यायाच्या संकल्पनेवर आधारित नवा शोषणविरहीत समाज कसा स्थापन करता येईल, याबाबत विचार केला. त्याच्यामते, न्याय हा सामाजिक

संस्थांचा आधार आहे आणि वस्तूच्या वितरणात न्यायाचे महत्त्वाचे स्थान आहे. व्यक्तीच्या विकासास या वस्तू महत्त्वाच्या आहेत, त्यामुळे वस्तूचे वितरण करताना समान वितरणाचे तत्त्व स्विकारले पाहिजे. कारण प्रत्येकाला स्वातंत्र्याचा अधिकार आहे. या स्वातंत्र्याच्या वितरणाबरोबरच इतर वस्तूच्या वितरणाचे नियम केले जातील. त्या तत्त्वाप्रमाणे सामाजिक आणि आर्थिक विषमता अशा प्रकारे वितरित करता येतील की, ज्यामुळे समूहातील सर्वात कमजोर व्यक्तीचा जास्तीत जास्त लाभ होईल आणि सर्वांना समान संधी प्राप्त होईल. त्याबरोबर रॉल्स असेही म्हणतो की, समाजात न्याय प्रस्थापित करण्यासाठी वस्तू कधी-कधी विषम वाटप करावे जेणेकरून समाजातील कमजोर व्यक्तीला समान संधीचे तत्त्व प्राप्त होईल आणि साधनसामग्रीचे समाजात योग्य वितरण करणे ही सरकारची जबाबदारी आहे. पण त्या बदल्यात तो व्यक्तीची आत्मप्रतिष्ठा आणि स्वायत्तता यांना बळी द्यावयास तयार नाही. अशाप्रकारे जॉन रॉल्स यांनी सुधारणावादी उदारमतवादात आपला न्यायाचा सिध्दांत मांडून कल्याणकारी राज्याच्या कल्पनेला तात्त्विक आधार दिला. अशाप्रकारे सुधारणावादी उदारमतवाद्यांनी व्यक्तीच्या विकासासाठी राज्याने हस्तक्षेप करावा अशी भूमिका मांडली.

## ❑ सुधारणावादी उदारमतवाद्यांनी केलेला बदल

१) आर्थिक व्यवहारात राज्यसंस्थेने आवश्यकता वाटेल त्यावेळी सकारात्मक हस्तक्षेप करावा. न्यू डील पासून सुधारणावादी उदारमतवादाची सुरुवात झाली.

२) सुधारणावादी उदारमतवादामध्ये राज्याच्या कार्यक्षेत्रात मोठ्या प्रमाणात वाढ करण्यात आली, राज्याकडून अर्थव्यवस्थेतील तिन्ही म्हणजेच उत्पादनात्मक, वितरणात्मक व नियंत्रणात्मक कार्ये करण्यात यावी असा विचार निर्माण झाला.

३) सुधारणावादी उदारमतवादामध्ये कल्याणकारी राज्याचे धोरण अवलंबले जाईल अशी भुमिका मांडली. सुधारणावादी उदारमतवादी विचारवंतानी, कल्याणकारी योजना निर्माण करण्यासाठी राज्याने आर्थिक क्षेत्रात सार्वजनिक क्षेत्राची निर्मिती करावी असा विचार मांडला.

अमेरिकेमध्ये भांडवलदारांनी मक्तेदारी निर्माण करून कामगाराचे मोठ्या प्रमाणात शोषण केले होते, त्यामुळे त्या वर्गात मोठ्या प्रमाणात असंतोष होता, त्यासाठी राज्याने आर्थिक व्यवहारात हस्तक्षेप करून दुर्बल वर्गाचे हित जपले पाहिजे हा विचार पुढे आला. युरोप व अमेरिकेला १९२९-३० मध्ये महामंदीने ग्रासले आणि संपूर्ण जागतिक अर्थव्यवस्था महामंदीने डळमळू लागली, त्यात लक्षावधी लोकांचा रोजगार बुडाला. असंख्य लोक बेरोजगार झाले. या काळात थोर अर्थशास्त्रज्ञ जॉन केन्स यांनी आर्थिक व्यवहारात राज्याने हस्तक्षेप करावा असे सुचविले. राष्ट्रपती फ्रॅंकलीन डी. रूझवेल्ट यांचे, 'न्यू डील', चे धोरण याचाच परिपाक होता. याच काळात कम्युनिस्टाच्या राजवटी स्थापन झाल्या. कम्युनिस्ट

पक्षाचा युरोप आणि आशियातील वाढता प्रभाव रोखण्यासाठी सुधारणावादी उदारमतवादाने राज्याचा हस्तक्षेप मान्य केला, त्यामुळे कल्याणकारी राज्याची कल्पना पुढे मांडण्यात आली आणि या कल्पनेला प. युरोपातील सामाजिक लोकशाही व लोकशाही समाजवाद्यांनी पाठिंबा दिला आणि कल्याणकारी राज्याची धोरणे स्विकारण्यात आली. अशाप्रकारे सुधारणावादी उदारमतवाद्यांनी कल्याणकारी राज्याची संकल्पना स्विकारली.

## ❑ कल्याणकारी राज्य

कल्याणकारी राज्य म्हणजे राज्याने आर्थिक व्यवहारात हस्तक्षेप करून समाजात जी विषमता आहे, ती विषमता दूर करणे आणि अशा योजनांची अंमलबजावणी करणे की, ज्या योजनेद्वारे समाजाच्या खालच्या वर्गातील लोकांचे कल्याण होईल. कल्याणकारी राज्यामध्ये नागरिकांचे विशेषत: दुर्बल, दरिद्री, असहाय्य नागरिकांचे संगोपन आणि संरक्षण राज्याकडून केले जावे ही कल्पना महत्त्वाची आहे. कल्याणकारी राज्याची कल्पना ही इंग्लंडमध्ये स्विकारली गेली. इंग्लंडमधील कल्याणकारी राज्य हे राष्ट्रीय आरोग्य योजना, राष्ट्रीय विमा योजना, राष्ट्रीय मदत योजना आणि बालक सहाय्य योजना इ. योजनांवर आधारलेली होती. कारण स्पर्धात्मक बाजारपेठा व मुक्त स्वातंत्र्यवादी व्यक्तीवाद समाजात समता प्रस्थापित करू शकत नाही. त्या मक्तेदार भांडवलदाराचे बाहुले बनले आहे. त्यामुळे समता स्थापन करण्यासाठी आणि समाजातील वंचित वर्गांना किमान मूलभूत सुविधा व सेवा पुरविण्यासाठी राज्याने आर्थिक व्यवहारात सकारात्मक हस्तक्षेप करावा हा कल्याणकारी राज्याचा विचार इंग्लंडनंतर जगातील अनेक देशांनी घेतला, कारण कल्याणकारी राज्य मक्तेदारीला विरोध करून संपत्तीच्या केंद्रीकरणाचा धोका टाळते, भांडवल व मनुष्यबळ यांचा जास्तीत जास्त व परस्परपूरक वापर करून उत्पादनवाढ साध्य करते. पण तेवढ्यावरच न थांबता नफ्याची योग्य वाटणी करून जबाबदारी व संधी यांचा योग्य समन्वय ती घालते आणि यातून सामाजिक सुरक्षेचे वातावरण निर्माण करते. थोडक्यात अनिर्बंध भांडवलशाही.आणि सर्वंकष सत्तावादी साम्यवाद या दोन्हीमधील दोष कल्याणकारी राज्यात निवारण होईल असा आशावाद स्पष्ट केला आहे. काही विचारवंतानी कल्याणकारी राज्याची व्याख्या केली आहे ती पुढीलप्रमाणे :-

**जी. डी. एच. कोल** यांच्या मते, ''ज्या समाजात जीवनमानाचा किमान स्तर आणि संधी या गोष्टी प्रत्येक नागरिकांना उपलब्ध करून दिलेले असतात अशा समाजाला कल्याणकारी राज्य असे म्हणतात.''

**टी. डब्ल्यू. केंट** यांच्या मते, ''जे राज्य आपल्या नागरिकांना व्यापक प्रमाणात निरनिराळ्या सामाजिक सेवा उपलब्ध करून देते, ते राज्य म्हणजे कल्याणकारी राज्य होय.''

वरील व्याख्यांवरून कल्याणकारी राज्याचा अंतिम हेतू माणुसकीवर आधारित पुरोगामी समाजाची निर्मिती करणे हा असतो. रोजगार, उत्पन्न, शिक्षण, आरोग्य, सामाजिक सुरक्षा, निवारा या सोयीची एक किमान उपलब्धता प्रत्येक नागरिकांना करून देणे कल्याणकारी राज्यात अभिप्रेत असते. कल्याणकारी राज्याच्या सिध्दांताप्रमाणे राज्याने पुढील तीनही क्षेत्रात हस्तक्षेप करावा.

**१. उत्पादन क्षेत्र :** उत्पादन क्षेत्रातील काही महत्त्वाचे उद्योग सरकारी मालकीचे असतील व त्याचे व्यवस्थापन लोकनिगमाच्याद्वारे केले जाईल. सार्वजनिक उद्योगाचे उद्दिष्ट केवळ नफा मिळविणे हे असणार नाही, तर ते लोकांच्या कल्याणाचे कार्य करतील. सरकारने सार्वजनिक उद्योगधंदे सुरू करून लोकांचा विकास करावा. कारण सरकारी क्षेत्रावर जनतेचे नियंत्रण असते. सार्वजनिक क्षेत्रात वेगवेगळ्या घटकांना सेवा व सुविधा पुरवणे हे कार्य आहे. त्यातील नफा हा समाजहितासाठी वापरला जाईल, तो खाजगी भांडवलशाहीकडे जाणार नाही. त्यामुळे उत्पादन क्षेत्रामध्ये सार्वजनिक क्षेत्र हे खाजगी क्षेत्रापेक्षा अधिक महत्त्वाचे आहे.

**२. नियमन क्षेत्र :** नियमनाच्या क्षेत्रात मक्तेदारीवर नियंत्रण, किमान वेतन व बोनसचा कायदा, कामगार संरक्षण व पर्यावरण संरक्षक कायदे यांचा समावेश होतो. अमेरिकेत कामाचे तास, पेन्शन रविवारी सुट्टया, या कल्पना समाविष्ट करण्यात आल्या. समाजात राज्याने न्याय्य पध्दतीने नियमन करणे हे राज्याचे कार्य आहे, त्यामुळे नियम करणे महत्त्वाचे आहेत.

**३. वितरण क्षेत्र :** वितरणाच्या क्षेत्रात बेरोजगारांना भत्ते, किमान संपत्तीचे हस्तांतरण, समाजातील वंचित वर्गांना किफायतशीर दरामध्ये आवश्यक त्या सेवा-सुविधा पुरविणे सर्व लोकांसाठी सार्वजनिक विमा योजना व किफायतशीर वैद्यकीय सेवा इ. गोष्टींचा समावेश होईल. समाजातील संपत्ती एकाच घटकाकडे न राहता संपत्तीचे योग्य न्याय वितरण व्हावे अशी कल्पना ग्रीन व मिलने मांडली आहे. संपत्तीचे वितरण भांडवलशाही विकासासाठी आवश्यक असते. कारण ही जी संपत्ती आहे ती संपत्ती सर्व घटकांना सारखी वाटली नाही तर विकास होत नाही, त्यामुळे वितरणाचे क्षेत्र महत्त्वाचे आहे.

वरील तीनही कार्यात राज्याने हस्तक्षेप करून समाजाचे हितसंवर्धन केले पाहिजे. जनतेच्या भौतिक कल्याणाची जबाबदारी राज्याने स्विकारली पाहिजे. जनतेचे आरोग्य, आर्थिक सुरक्षा व कल्याण यातून साध्य होईल असे उपक्रम तिने स्वत:च्या पुढाकाराने हाती घेतले पाहिजेत. निरक्षरता दारिद्र्य व बेकारी यांचे निराकरण योजनाबद्ध कार्यक्रमाद्वारे केले पाहिजे. मानवी व्यक्तीमत्त्वाचे मूल्य मान्य करून प्रत्येक व्यक्तीला न्याय मिळेल याची खात्री द्यायला पाहिजे. गरीब व दुर्बल घटकांच्या विकासाकडे विशेष लक्ष द्यायला पाहिजे इत्यादी कार्ये राज्यांनी करावी अशी अपेक्षा कल्याणकारी राज्यात अभिप्रेत आहे.

## कल्याणकारी राज्याची वैशिष्ठ्ये :-

१) राज्याने उत्पादन, नियमन व वितरण या तीन्ही क्षेत्रामध्ये राज्याने हस्तक्षेप करून लोकांचे कल्याण साधणे हे कल्याणकारी राज्याचे महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे. राज्याने बाजारपेठेत हस्तक्षेप करून अर्थव्यवस्थेचे योग्य नियमन करावे, ही राज्यसंस्थेची जबाबदारी आहे. दुर्बल जनतेचा विकास साधण्यासाठी सर्व गोष्टी शासनाने पुरविल्या पाहिजे असे कल्याणकारी राज्य सांगते.

२) सार्वजनिक क्षेत्राचा प्रभाव अर्थव्यवस्थेवर असावा. सार्वजनिक क्षेत्रातून मिळणारा नफा लोकांना सेवा निधी पुरवणे व अर्थव्यवस्थेला निधी पुरवणे ह्या गोष्टी कल्याणकारी राज्यात महत्त्वाच्या आहेत. त्याचबरोबर काही खाजगी क्षेत्र असताना त्याच्यावर कर लादून ते पैसे गोळा करणे. काही सहकारी संस्थांच्या माध्यमातून विकास साधणे अशाप्रकारे कल्याणकारी राज्य मिश्र अर्थव्यवस्थेचा पुरस्कार करते.

३) शासनाने सार्वजनिक क्षेत्रावर खर्च मोठ्या प्रमाणात वाढवून समाजातील गरीब लोकांना सेवा सुविधा आरोग्य, शिक्षण, वाहतूक, पाणीपुरवठा या क्षेत्रात काम करून जास्तीत जास्त सेवा देऊन समाजात समता स्थापन करावी. समाजातील श्रीमंत गरीबातील विषमता दूर करण्याचे कार्य कल्याणकारी राज्य करते, त्याचबरोबर जनतेसाठी कल्याणकारी योजना राबविते, समाजातील दुर्बल घटकासाठी कल्याणकारी राज्य नेहमीच काही जादा सुविधा, संधी, स्वातंत्र्य उपलब्ध करून देऊन जनतेसाठी कल्याणकारी योजना राबविणे हे कल्याणकारी राज्याचे उद्दिष्ट असते.

४) कल्याणकारी राज्यामध्ये राज्याने सार्वजनिक क्षेत्रात उद्योगधंदे विकसित करणे, कारखाने संस्था, आरोग्य, शिक्षण, वाहतूक, बांधकाम, तंत्रज्ञान, शेती अशा सर्वच क्षेत्रात कल्याणकारी राज्य महत्त्वपूर्ण भूमिका बजावते. विकास प्रकल्प निर्माण करण्यात येतात. लोकांना नोकरी देऊन बेरोजगारी कमी केली जाते. अशाप्रकारे कल्याणकारी राज्यात सार्वजनिक उद्योगाची निर्मिती होते.

५) राज्याने राष्ट्रीय आरोग्य योजना, राष्ट्रीय विमा योजना अशा योजना सुरू केल्या आहेत. राष्ट्रीय आरोग्य योजनेच्या विधीनियमाप्रमाणे राज्यातील सर्व नागरिकांसाठी सर्व प्रकारच्या उपचारांची मोफत सोय केली जाते. राष्ट्रीय विमा योजनेनुसार बेकारीचा काळ, आजार, प्रसूतीकाळ, सेवा निवृत्तीनंतरचे दिवस इत्यादीसाठी खास आर्थिक मदत मिळण्याची व्यवस्था केली जाते. अशाप्रकारे कल्याणकारी राज्य, राष्ट्रीय विमा योजना, आरोग्य योजनाचाही पुरस्कार करते.

अशा पध्दतीने सुधारणावादी उदारमतवादी विचारवंतांनी सार्वजनिक क्षेत्राची निर्मिती करण्यास सांगून कल्याणकारी राज्याचा पुरस्कार केला, परंतु कालांतराने सार्वजनिक उद्योगधंदे डबघाईला आले. सरकारनी सर्वच क्षेत्रात हस्तक्षेप केल्याने त्याच्यावर कामाचा प्रचंड ताण पडला व आर्थिक नुकसानही झाले. रॉल्सच्या विचारातून कल्याणकारी राज्याचा अधिक विकास होईल असे वाटत होते, परंतु तसे झाले नाही, कारण साधनसामग्रीचे वाटप होत असतानाच या देशातील दारिद्र्यही तेवढेच वाढले. या सर्व कारणांमुळे कल्याणकारी राज्य हे अपयशी ठरले. राज्याच्या हस्तक्षेपामुळे व्यक्तीस्वातंत्र्यावर निर्बंध आले, त्यामुळे पूर्वीच्या अभिजात उदारमतवाद हा नवउदारमतवादाचे रूप घेवून पुढे आला, त्याने पुन्हा एकदा खुल्या अर्थव्यवस्थेचा पुरस्कार केला आणि हा नवउदारमतवाद जागतीकीकरण, खाजगीकरण व उदारीकरणावर या आधारांवर प्रस्थापित झाला, त्यांनी राज्याचा अतिभाराचा सिध्दांत मांडला आहे.

### ❑ राज्याचा अतिभाराचा सिध्दांत :-

कल्याणकारी राज्य संकल्पनेमुळे व्यक्ती व राज्याचा विकास झाला, परंतु विकासाच्या धोरणामुळे राज्यावर अतिभार झाला. त्यामुळे सार्वजनिक क्षेत्रे डबघाईस आली आणि राज्यावर ताण वाढला. राज्यातील मोठ्या प्रमाणात सरकारी क्षेत्रामध्ये सार्वजनिक उद्योगधंदे उभे राहिले. त्यामध्ये नफा मिळविणे शक्य झाले नाही, त्यामुळे ते तोट्यात जावू लागले. सार्वजनिक उद्योगात उत्पादनाच्या गुणवत्तेची जबाबदारी घेण्यास कोणताच घटक तयार नसतो, त्यामुळे या उद्योगाला तोटा सहन करावा लागतो आणि त्यांची भरपाई सरकारला राज्याला करावी लागते, त्यातून राज्यावर अतिभार झाला आहे.

#### ❀ अतिभार झाल्याची कारणे खालीलप्रमाणे :-

१) राज्याच्या कार्यक्षेत्रात प्रचंड वाढ होवून राज्याचा ताण वाढला आहे.

२) उद्योगधंदे तोट्यात जाऊन बंद पडल्यामुळे आर्थिक तोटा राज्याला सहन करणे शक्य झाले नाही.

३) राज्याकडून लोकांच्या अपेक्षा वाढल्या, परंतु ते शासनाला पुरविणे कठीण बनले होते.

४) महागाई वाढल्यामुळे सर्व उद्योगधंदे व योजना चालवणे राज्याला शक्य झाले नाही.

### २.२.२.३ नवउदारमतवाद

समकालीन उदारमतवाद म्हणजे नव्या आर्थिक धोरणाचा पुरस्कार करणारे तत्वज्ञान, ज्यामध्ये जागतिकीकरण, खाजगीकरण, उदारीकरण या तीन तत्त्वाचा पुरस्कार करण्यात आला. नवउदारमतवाद हा कल्याणकारी राज्याच्या विरोधी आहे. त्याच्यामते, कल्याणकारी राज्याच्या विविध धोरणावर केलेला

खर्च उत्पादक नसून त्याचा आर्थिक विकासास कोणताही फायदा होत नाही. उलट बहुमूल्य संशोधनाचा दुरुपयोग होतो. सार्वजनिक क्षेत्रात चालवले जाणारे कारखाने व उद्योगधंदे तोट्यात येतात, कारण त्यात प्रचंड नुकसान होते. संघटित औद्योगिक कामगारांवर नियंत्रण आणले जाते. राज्याने आर्थिक व्यवहारात हस्तक्षेप करू नये. कारण राज्याकडे आर्थिक व्यवहाराचा अनुभव असणारी यंत्रणा नसते. त्यामुळे राज्य संस्थेचे नियोजन हे बाजारपेठेच्या स्पर्धात्मक स्वरूपास पर्याय असू शकत नाही, कारण बाजारपेठेची काम करण्याची पध्दत अर्थव्यवस्थेत निर्माण झालेल्या नैसर्गिक शक्तीच्या व्यवहारावर आधारलेली आहे, म्हणून एकूण अर्थव्यवस्थेत राज्यसंस्थेने कमीतकमी हस्तक्षेप करावा हा विचार पुढे आल्याचे दिसते.

### नवउदारमतवादाच्या उदयाची कारणे :-

१) १९८० साली इंग्लंडमध्ये सत्ता परिवर्तन होऊन मार्गारेट थॅचर पंतप्रधान झाल्या व अमेरिकेमध्ये रोनाल्ड रेगन हे सत्तेवर आले, त्यांनी नव्या धोरणाला सुरुवात करून कल्याणकारी राज्य कल्पनेला आव्हान दिले.

२) १९९१ साली पूर्व युरोपातील कम्युनिस्ट राजवटी लयाला गेल्या, सोव्हिएत रशियाचे विघटन होऊन १५ गणराज्ये स्वतंत्र झाले.

३) १९७८ साली डॅग झियो पॅग यांनी चीनमध्ये नव्या आर्थिक धोरणाचा पुरस्कार केला.

### नवउदारमतवादी विचारवंतांची भूमिका पुढीलप्रमाणे :-

#### १. मिल्टन फ्रिडमन :-

या अर्थतज्ञाने राज्यांना अर्थव्यवस्था खुली करण्याचा सल्ला दिला आणि जागतिकीकरण, उदारीकरण व खाजगीकरण या तिन्ही तत्वाचा पुरस्कार केला. त्याने अर्थशास्त्रीय दृष्टीकोनातून नवउदारमतवादाचा पुरस्कार केला. तेव्हा इंग्लंडमध्ये सत्तेवर आलेल्या मार्गारेट थॅचर यांनी कल्याणकारी राज्याच्या योजनेला सुरुंग लावला. त्यातून जागतिकीकरणाची सुरुवात झाली आणि अनेक विचारवंतांनी नवउदारमतवादाचा पुरस्कार केला. यामध्ये प्रामुख्याने हायेक, डवॉर्किन आणि नॉजिक इत्यादी विचारवंतांचा समावेश होतो.

#### २. एफ. ए. हायेक :-

२०व्या शतकातील एक प्रमुख नवउदारमतवादी विचारवंत म्हणून एफ. ए. हायेक हा प्रसिध्द आहे. त्यांनी वेगवेगळ्या ग्रंथामधून व्यक्ती स्वातंत्र्याचा पुरस्कार केला आहे. त्यांच्या मते, व्यक्ती स्वातंत्र्याला खरे आव्हान सामाजिक न्यायाच्या पुरस्कर्त्यांनी केले आहे. कारण ते व्यक्तीस्वातंत्र्यापेक्षा

सामाजिक न्यायाला महत्त्व देतात. त्यामुळे व्यक्तीस्वातंत्र्यावर नियंत्रण येऊन व्यक्ती स्वातंत्र्याचा संकोच होतो, असा विचार आपल्याला गुलामगिरीकडे घेऊन जातो म्हणून हायेकने त्याच्या पुस्तकाचे नाव Road of Serfdom (भूदास्यत्वाकडे) असे दिले आहे. त्यांच्या मते, खरे स्वातंत्र्य म्हणजे आर्थिक स्वातंत्र्य होय. खऱ्या स्वातंत्र्यावर कोणत्याही प्रकारचे नियंत्रण अथवा बंधन असता कामा नये, त्यासाठी राज्याचे क्षेत्र मर्यादित करता येईल तितके आर्थिक स्वातंत्र्य व्यक्तीला उपभोगता येईल, असे हायकचे ठाम मत आहे. त्यासाठी त्यांनी मर्यादित राज्यसत्तेची कल्पना प्रकर्षाने मांडली आणि उदारमतवादातील कल्याणकारी राज्याची कल्पना पूर्णपणे नाकारली. कल्याणकारी राज्यामुळे शासनांनी विस्तृत कायदे तयार करून काटेकोर प्रशासन चालवले, त्यामुळे व्यक्ती स्वातंत्र्याची गळचेपी झाली असे हायेकला वाटते.

आर्थिक व्यक्तीस्वातंत्र्याच्या आधारावर मुक्त बाजारव्यवस्थेचे समर्थन हायेक करतो. तो म्हणतो की, खाजगी मालमत्तेचा हक्क हा नैसर्गिक असल्यामुळे त्यात ढवळाढवळ करण्याचा राज्याला अधिकार नाही, कारण व्यक्तीच्या स्वातंत्र्यात अधिक हस्तक्षेप केल्याने शासनच निरंकुशवादी बनते आणि व्यक्ती स्वातंत्र्याचा लोप होतो.

### ३. डवॉर्किन (Dworkin)

डवॉर्किन यांनी 'Taking Right Seriously' या पुस्तकात नवउदारमतवादाचे विचार मांडले. त्यांच्या मते, आजच्या काळातील लोकांनी अधिकाराचा विचार गांभीर्याने घेतला पाहिजे, कारण सर्वात महत्त्वाचे हक्क आहेत. अधिकार हे व्यक्तीच्या हातात दिलेले साधन आहे, ते हक्क व्यक्तीच्या विकासासाठी दिलेले आहेत. आपण आपले हक्क गांभीर्याने घेत नाही. अधिकार हे घटनेने दिले आहेत, कर्तव्यापेक्षा हक्क महत्वाचे आहेत, त्यामुळे हक्क हे गांभीर्याने घ्या. जे हक्क गांभीर्याने घेतात ते कर्तव्य ही गांभीर्याने घेतात असे डॉर्किनचे मत होते.

### ४. राबर्ट नॉजिक

हा नवउदारमतवादी विचारवंत म्हणून ओळखला जातो. अभिजात उदारमतवादात व्यक्तीस्वातंत्र्य ही संकल्पना महत्त्वाची समजली जाते, परंतु तीचा विचार नकारात्मक बाजूने केला जात होता. नवउदारमतवादी तिचा सकारात्मक बाजूने मांडणी करतात. व्यक्ती स्वातंत्र्य असून विवेकशील आहे. प्रत्येक व्यक्तीच्या इच्छेच्या परिपूर्तीसाठी व्यक्तीला स्वातंत्र्य असले पाहिजे, तरच सुसंघटित व सुव्यवस्थित समाज निर्माण होईल. या विचारात व्यक्तीच्या संपूर्ण स्वातंत्र्यावर भर दिल्याचे दिसते, जोपर्यंत माणसे राजकीय बंधनातून किंवा राजकीय हस्तक्षेपापासून मुक्त होऊ शकत नाहीत, तोपर्यंत ते आपल्या इच्छेनुसार प्रगती करू शकणार नाहीत, म्हणून नॉझिकने राज्याच्या कमीतकमी हस्तक्षेप

अपेक्षित करतो, त्यानुसार राज्याने आपले कार्य संरक्षण पुरतेच मर्यादित ठेवावे. संपूर्ण राज्याचे विसर्जन व्हावे ही कल्पना नॉझीकने मांडली नाही. त्याने न्यूनतम राज्यशक्ती या विचाराला महत्त्व दिले. व्यक्तीच्या संमतीच्या आधारावर राज्याच्या वैधानिक हस्तक्षेपाला मान्यता दिली आहे. अर्थात राज्य अधिक शक्तीशाली झाल्यास व्यक्तीस्वातंत्र्याची पायमल्ली होईल म्हणून नॉझिक अर्थराज्यवादीची संकल्पना मांडतो.

अशाप्रकारे नवउदारमतवादी लोकांनी राज्याचा हस्तक्षेप कमी करून व्यक्तीस्वातंत्र्य व मुक्त बाजारपेठेचा पुरस्कार करतात.

## ❑ नवउदारमतवाद्यांनी सुधारणावादी उदारमतवादी धोरणामध्ये केलेले बदल :-

१) नवउदारमतवाद्यांना कल्याणकारी राज्याच्या धोरणामुळे राज्यावर जो कामाचा अतिभार झाला आहे ते कमी करायचा आहे. त्याच्या मते, लोकांना आर्थिक क्षेत्रात स्वायत्तता मिळावी व राज्याने हस्तक्षेप करू नये, कारण ती लोकांच्या कल्याणासाठी कार्य करणारी यंत्रणा नाही तर कायद्याकडे पाहणारी यंत्रणा आहे.

२) अर्थव्यवस्थेचे नियमन बाजारपेठेने करावे, राज्यानी ते करू नये. नवउदारमतवादाच्या मते, बाजारपेठ निरपेक्ष असतात. बाजारपेठेत योग्य भाव ठरविला जातो, बाजारपेठेत क्षमतेप्रमाणे साधने गोळा केली जातात. बाजारपेठा या स्पर्धेवर आधारलेल्या असतात, बाजारपेठा खुल्या असाव्यात, राज्यांनी त्यात हस्तक्षेप करू नये.

३) नवउदारमतवादाच्या मते, अर्थव्यवस्था बळकट करायची आहे, त्यासाठी अर्थव्यवस्थेची वाटचाल ही बाजारपेठेच्या नियमांवर झाली पाहिजे.

नवउदारमतवादाच्या नव्या आर्थिक धोरणामुळे अमेरिका, इंग्लंड, चीन इत्यादी देशातील अर्थव्यवस्था सुधारली, प्रगत झाली त्यामुळे ही प्रगती पाहून नवउदारमतवादाला पाठिंबा मिळाला.

## नवउदारमतवादाची पाच तत्त्वे :-

१) जागतिक बाजारपेठ खुली असावी.

२) पूर्ण लोकशाही स्वातंत्र्याचा पुरस्कार करणे.

३) राज्यावरील कामाचा अतिभार कमी करणे.

४) बाजारपेठेने आर्थिक व्यवस्थेचे नियमन करणे.

५) व्यक्तीला जास्तीत जास्त स्वातंत्र्य मिळाले पाहिजे.

नवउदारमतवादाने खाजगीकरण उदारीकरण व जागतिकीकरणाचा स्विकार केला आहे. त्यासंदर्भातील विवेचन पुढीलप्रमाणे करता येईल.

**१. उदारीकरण :** उदारीकरणाचा अर्थ असा की, राज्यसंस्थेने अर्थव्यवस्थेचे नियमन करण्यासाठी जी परवाना पध्दत सुरू केला आहे ती बंद करणे. नियमाची आणि नियमनाची जी व्यापक यंत्रणा उभी केली आहे, ती कमी करणे आणि रद्द करणे, कारण हे नियमन मुक्त आर्थिक धोरणाला आणि व्यापाराला अडथळा निर्माण करतात, म्हणून शासनाचे आर्थिक व्यवहारातील नियंत्रण दूर करून मुक्त अर्थव्यवस्थेचे उदारीकरण करणे गरजेचे आहे.

**२. खाजगीकरण :** कल्याणकारी राज्यात राज्याने अनेक क्षेत्रात हस्तक्षेप केला आणि सार्वजनिक क्षेत्रात उद्योगधंद्याचे जाळं उभे केले, परंतु ती उद्योगधंदे तोट्यात चालतात, त्यामुळे नवउदारमतवादी असे प्रतिपादन करतात की, या सर्व सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगांचे खाजगीकरण केले पाहिजे आणि सरकारचा पैसा खुला झाला तर तो पैसा सरकार शिक्षण आरोग्य आणि इतर मूलभूत सुविधांच्या विकासासाठी वापरू शकेल, म्हणून सर्व क्षेत्रामध्ये खाजगीकरणाचा आग्रह धरून नवउदारमतवादी किमान शासनाच्या तत्त्वाचा पुरस्कार करतात.

**३. जागतिकीकरण :** नवउदारमतवादाच्या मते, प्रत्येक देशाने आपली अर्थव्यवस्था जागतिक व्यापारासाठी खुली केली पाहिजे व त्यामार्गात येणाऱ्या अडचणी दूर केल्या पाहिजेत. जागतिक बाजारपेठ सगळ्यांना खुली करून देणे आणि आवश्यक वस्तू परकीय बाजारपेठेत पाठवणे, यासाठी जागतिकीकरण महत्त्वाचे आहे. आज जागतिक बाजारपेठ सर्व देशांशी जोडली असून त्यापासून अलग राहणे शक्य नाही. कारण जागतिक आर्थिक संस्था व कंपन्यांचा प्रभाव वाढत आहे, त्यामुळे आपल्या अर्थव्यवस्थेचे जागतिकीकरण केले पाहिजे असे नवउदारमतवादाचे मत आहे.

अशाप्रकारे उदारीकरण जागतिकीकरण व खाजगीकरणाचे तत्त्व स्वीकारून राज्यावर जो अधिभार निर्माण झाला आहेत, तो कमी करता येतो आणि राज्याने जी आपली मूळ कामे आहेत ती करणे आवश्यक आहे असे मांडले गेले. त्यात प्रामुख्याने राज्याचे परकीय संरक्षण करणे, कायद्याचे राज्य निर्माण करणे आणि आर्थिक क्षेत्रातील ज्या काही अडचणी निर्माण होतील त्या दूर करणे इ. कार्याचा समावेश होतो.

## २.२.३ राज्याचा मार्क्सवादी दृष्टीकोन

राज्य ही मध्यवर्ती संकल्पना आहे. राज्यासंदर्भात अनेक दृष्टिकोन उदयास आले असून त्यामध्ये मार्क्सवादी दृष्टीकोन महत्त्वाचा आहे. कार्ल मार्क्सबरोबर एंजेल्स, लेनीन, माओ, ग्रामसी, मिलीबॅड,

पोलंझा आणि हेबरमास इत्यादी विचारवंतांनी राज्यासंबंधी विचार मांडले आहेत. कार्ल मार्क्सचे तत्त्वज्ञान प्रत्यक्षात सोव्हिएत रशियात समाजवादी क्रांती झाल्यावर आले. मार्क्सच्या काळात राज्यासंबंधी दोन विचारप्रवाह प्रचलित होते, त्यापैकी उपयुक्ततावादाच्या मते, समाजाची एक गरज म्हणून समाजाने राज्यसंस्था निर्माण केली आणि ती समाजाच्या दृष्टीने उपयुक्त असे कार्य करीत असते. हेगेलसारख्या विचारवंतांनी राज्य हे अपरिहार्य असून राज्यसंस्था ही सर्वश्रेष्ठ आणि सर्वकष मानवी संघटना असून राज्यसंस्थेचे निर्णय हे अंतिम असतात, त्यामुळे राज्याला अगर राज्यसंस्थेला विरोध करण्याचा हक्क कोणाही व्यक्तीला अगर संघटनेला असू शकत नाही असे प्रतिपादन केले होते. मार्क्सने ह्या दोन्ही विचारप्रवाहांना विरोध दर्शविला आणि आर्थिक शोषण करण्याचे एक उत्तम साधन असे राज्याचे स्वरूप असल्याचे मत स्पष्टपणे मांडले.

मार्क्सवादी विचार हा केवळ मार्क्सने मांडलेला विचार नसून मार्क्स व एंजेल्स यांच्या विचाराचा एकत्रित विचार आहे. परंतु राज्यसंस्थेसंबंधी एंजल्सने, 'कुटुंबसंस्था, खाजगी मालमत्ता आणि शासन संस्था यांचा उगम', हे पुस्तक लिहून राज्यसंस्थेच्या निर्मितीचा इतिहास स्पष्ट केला आहे, तर मार्क्सने साम्यवादाचा जाहीरनामा या ग्रंथात राज्यसंस्थेविषयीचे विचार मांडले आहेत. त्याचबरोबर त्यांचे कामगारवर्गाची हुकूमशाही आणि साम्यवादाच्या निर्मितीबाबतही विचार महत्त्वाचे आहेत.

## ❑ मार्क्स व एंजल्सचे राज्यसंस्थेविषयीचे विचार

अमेरिकन मानववंशशास्त्रज्ञ मॉर्गनच्या 'Ancient Society' या पुस्तकातील निष्कर्ष खालीलप्रमाणे आढळून येतात. ''प्राचीन काळात आदीम समाज होता, त्या समाजामध्ये साम्यवाद होता, परंतु अन्न-वस्त्र गोळा करीत असताना पशुपालनाची अवस्था आली. पुढे शेतीचा शोध लागल्यानंतर श्रमविभागणी झाली. त्यामुळे कुटुंबसंस्था अस्तित्वात आली. खाजगी संपत्ती निर्माण झाली, तसेच वर्ग निर्माण झाले, वर्ग संघर्ष कमी करण्यासाठी राज्यसंस्था अस्तित्त्वात आली, परंतु राज्यसंस्था वर्गसंघर्ष नियंत्रीत करताना श्रीमंत वर्गाची बाजू घेऊ लागली आणि राज्यसंस्थेची निर्मिती वर्गसंघर्षातून झाली आहे.''

निरनिराळ्या वर्गाचे हितसंबंध परस्परविरोधी असल्यामुळे आर्थिक सत्ता हाती असणारा वर्ग म्हणजे धनिकांचा आणि भांडवलदारांचा वर्ग राज्यसंस्थेच्या मदतीने बहुसंख्य अशा गरीब वर्गाला दडपून टाकून आपली सत्ता टिकवीत असतो. राज्याचे हे कार्य लक्षात घेतले म्हणजे राज्याचे स्वरूप निश्चितपणे ठरविता येते.

मार्क्स आणि एंजल्स यांच्या मते, राज्य ही नैसर्गिक संघटना नसून मानवानी निर्माण केलेली संघटना आहे. ॲरिस्टॉटलने राज्यसंस्थेला स्वाभाविक संस्था मानले आहेत. राज्याचा उद्देश जीवनावश्यक गरजांची पूर्तता करणे व आदर्श जीवनाची उपलब्धता करून देण्याचा असतो. व्यक्ती विकास व स्वतंत्र

अस्तित्त्व ठेवण्यासाठी व्यक्तीला राज्याची आवश्यकता असते असे ॲरिस्टॉटलचे मत होते. मार्क्सचे राज्यासंबंधीचे मत अगदी विपरीत होते. मार्क्सच्या मते, राज्य हे शासक वर्गाचे हित सुरक्षित ठेवण्यासाठी आणि शासकाना श्रमिक वर्गाचे शोषण करता येण्यासाठीचे साधन असते. मार्क्सच्या मते, शोषण करण्याच्या उद्देशपूर्तीसाठी भांडवलदार शासक वर्ग, कायद्याची निर्मिती करून त्याद्वारे त्याच्या संपत्तीचे संरक्षण व श्रमिकांची पिळवणूक करीत असतो आणि संपत्तीची वाढ करीत असतो, म्हणून राज्याला मार्क्सने भांडवलदाराची कार्यकारी समिती असे म्हटले आहे. एकूणच मार्क्सच्या मते, राज्याचा उद्देश शासक वर्गाचा हितसंबंधाचे रक्षण करणे आणि इतरांचे शोषण करण्याचा असतो, जनतेचे हित साध्य करण्याचा उद्देश नसतो, त्यामुळे राज्य म्हणजे एका वर्गाचे दुसऱ्या वर्गाकडून शोषण करणारे यंत्र आहे असे वाटते.

## ❀ मार्क्सवादी राज्यविषयक सिध्दांताची वैशिष्ट्ये :-

**१. बळ हे राज्याचे आधार :** राज्यसंस्था ही कृत्रिम व आपल्या स्वार्थी हेतूने धनिक वर्गाने श्रमिकांवर लादलेली संस्था आहे असे मार्क्सचे मत आहे. बळाच्या आधारावर निर्माण झालेले राज्य कायदा, पोलीस, सैन्य याचा वापर करून श्रमिक वर्गाचे शोषण करणे आणि भांडवलदाराचे रक्षण करणे म्हणून राज्य संस्था नष्ट करण्यासाठी मार्क्स क्रांती हाच पर्याय असल्याचे सांगतो.

**२. वर्गसंघर्षाचा संबंध :** मानवाचा इतिहास हा वर्गसंघर्षाचा इतिहास आहे असे मार्क्सचे मत आहे. वर्गव्यवस्थेची सुरुवात उत्पादन साधनांच्या बदलामुळे झाली. मालक-गुलाम, श्रीमंत-शेतमजूर व भांडवलदार-श्रमिक अशा वर्गात परिवर्तन होत गेले. आज मालक मजूर संघर्ष आहे.

**३. कामगाराचे शोषण :** कामगारांच्या शोषणासाठी भांडवलदारांच्या हातातील साधन म्हणजे राज्य होय. कामगार शोषणमुक्त होण्यासाठी राज्य लयास गेले पाहिजे असे मार्क्सचे मत आहे.

**४. राज्यसंस्थेचा लोप :** राज्यसंस्था कल्याणकारी राज्य नसल्यामुळे व श्रमिकाचे शोषण करणारी यंत्रणा असल्यामुळे राज्यविहिन समाजाची आवश्यकता मार्क्सने सांगितली आहे.

**५. संपत्तीचे केंद्रीकरण :** राज्य हे थोड्या लोकांच्या हातात संपत्तीचे केंद्रीकरण होऊन बहुसंख्य श्रमिकांचे जीवन कष्टमय करणारी यंत्रणा आहे. राज्य हे भांडवलदाराच्या संपत्तीचे रक्षण करते.

अशाप्रकारे राज्य हे श्रमिकांचे शोषण करणारी यंत्रणा आहे असे मार्क्सचे मत आहे. त्यासाठी राज्यविहीन समाज असणे गरजेचे आहे, असे सांगून त्यासाठी कामगार वर्गाची क्रांती झाली पाहिजे असे मार्क्सने म्हटले आहे.

## ❑ कामगार वर्गाची हुकूमशाही :-

भांडवलदारांकडून श्रमिकाचे शोषण होत असल्यामुळे त्याच्या दु:खात आणि दारिद्र्यात भर पडते. कामगार वर्गाचे दु:ख व शोषण, वर्ग संघर्ष वाढविण्यास कारणीभूत होतो आणि शेवटी कामगार वर्ग क्रांतीच्या मार्गाने भांडवलशाही अर्थव्यवस्था नष्ट करतो. क्रांती ही कामगाराच्या नेतृत्त्वाखाली केली जाईल. ही क्रांती सशस्त्र क्रांती असून हिंसेद्वारे कामगार क्रांती करतील. कामगारांनी क्रांती केल्याबरोबर राज्यसंस्था नष्ट करून वर्गविहीन समाजरचना स्थापन करणे हे उद्दिष्ट असले तरी ते होणार नाही, म्हणून मध्यंतरीच्या काळात कामगार वर्गाची हुकूमशाही स्थापन करणे आवश्यक आहे. कारण जोपर्यंत जुनी समाजव्यवस्था नष्ट होणार नाही व नवी समाजव्यवस्था अस्तित्त्वात येणार नाही, तोपर्यंत कामगारांची हुकूमशाही राहील असे मार्क्सचे मत होते. कामगार शासन खालील कामे करील.

१) भांडवलशाही शासन यंत्रणा पूर्णपणे नष्ट करेल.

२) उत्पादनाची सर्व साधने सामूहीक मालकीची करेल.

३) या व्यवस्थेला विरोध करणाऱ्या भांडवलदार विचाराच्या लोकांचा नाश केला जाईल.

४) वर्गविहीन समाजव्यवस्था स्थापन करेल.

संक्रमण काळामध्ये कामगार शासनाची कामे करील आणि कालांतराने भांडवलशाहीने प्रस्थापित केलेली समाज रचना, कायदे, शासनपध्दती इत्यादी नष्ट करून साम्यवादी अर्थव्यवस्था आणि वर्गविरहिन समाजरचना स्थापन केल्यानंतर अशा हुकूमशाहीची आणि राज्य संस्थेची गरज राहणार नाही. ते आपोआप विरून जाईल, कारण साम्यवादी रचनेत त्याची जरुरी भासणार नाही, असे मार्क्स आणि एंजल्सने प्रतिपादन केले. तर फ्रेडरिक एंजल्सने राज्यसंस्था योग्य ठिकाणी म्हणजे पुराण वस्तूसंग्रहालयात राहिल या ठिकाणी चरखा आणि क्रॉस धातूची कुऱ्हाड इत्यादी साधनाशेजारी राज्यसंस्था ही पडून राहिलेली आढळेल, असे म्हटले.

## ❑ लेनिनचे राज्यसंस्थेविषयीचे विचार

लेनिन हा मार्क्स व एंजल्स नंतरचा मार्क्सवादाच्या परंपरेतील विचारवंत आहे. मार्क्सवादाच्या मूलभूत तत्त्वांवर त्याचा पूर्ण विश्वास होता. साहजिकच लेनिनचे विचार मार्क्सवादाहून वेगळे नव्हते, परंतु मार्क्सच्या मृत्यूनंतर जागतिक राजकारणात बरेच परिवर्तन झाले होते. या परिस्थितीत मार्क्सवादाचा अन्वयार्थ लावण्याचे कार्य लेनिनने केले आहे. त्यांनी लिहिलेल्या 'स्टेट ॲण्ड रिव्होलशन', 'लेफ्ट विंग कम्युनिझम' इत्यादी ग्रंथाद्वारे मार्क्सवादाचे समर्थन केले आहे. लेनिनने क्रांतीविषयक विचार, साम्राज्यवादाबाबतचा विचार आणि कम्युनिस्ट पक्षासंबंधीचे विचार अभ्यासणे आवश्यक आहे.

## ❑ राज्यक्रांतीसंबंधीचे विचार

लेनीनने 'State and Revolution' या ग्रंथात राज्यक्रांतीचा विचार मांडला आहे. ऐतिहासिक भौतिकवाद, वर्ग संघर्ष, राज्यविषयक दृष्टिकोन आणि कामगाराची क्रांती हे मार्क्सचे सिध्दांत लेनिनला मान्य होते. किंबहुना मार्क्सवादाच्या सर्वच मुलभूत तत्त्वांवर त्याचा पूर्णपणे विश्वास होता. भांडवलशाही व्यवस्था नष्ट करण्यासाठी क्रांतीच करणे आवश्यक आहे. घटनात्मक मार्गांनी रशियामध्ये समाजवाद प्रस्थापित होऊच शकत नाही, असे लेनिनने स्पष्टपणे सांगितले आहे. लेनिनने रशियातील विशिष्ट परिस्थितीच्या संदर्भात कामगार क्रांती कशी घडवून आणता येईल, याचे मार्गदर्शन केले आहे. लेनिन हा क्रांतीचा पुरस्कर्ता असला तरी क्रांतीसाठी अनुकूल वेळ आणि परिस्थिती याची अचूक निवड करणे आवश्यक ठरते, असे त्याचे मत होते. कामगार क्रांतीसाठी शिस्तबध्द आणि ध्येयनिष्ठ राजकीय पक्षाच्या नेतृत्त्वाची आवश्यकता त्याने प्रतिपादन केली होती. तसेच या पक्षाने देशातील बहुसंख्य जनतेचे समर्थन प्राप्त केलेले असावे असेही त्यांनी सांगितले आहे.

लेनिनने जगातील क्रांतीचा सखोल अभ्यास करून क्रांती सफल होण्यासाठी काही आवश्यक गोष्टी सांगितल्या आहेत.

१) केवळ भावनेच्या भरात येवून क्रांती करू नये, तर पूर्ण विचारपूर्वक क्रांती करावी.

२) शत्रू संघटित होऊन क्रांती दडपणार नाही याची काळजी घ्यावी.

३) क्रांती अशावेळी करावी की, जुन्या शासकाच्या समर्थकांत मतभेद होऊन ते विभाजित झालेले असतील.

४) देशामध्ये आक्रमक आणि दृढ निश्चयाने काम करणारा क्रांतीकारकांचा एक पक्ष असायला पाहिजे, त्याला आपल्या ध्येयाची पूर्ण जाणीव पाहिजे.

५) हा पक्ष लहान असावा आणि त्याला सामान्य जनतेच्या असंतोषाचे समर्थन असले पाहिजे.

लेनिनच्या मते, कोणत्याही देशात सफल क्रांती होण्यासाठी वरील गोष्टी आवश्यक असतात.

## ❑ लेनिनचे साम्राज्यासंबंधी विचार

लेनिनने साम्राज्यशाहीला भांडवलशाहीची सर्वोच्च अवस्था मानले होते. त्यांच्या मते, आजच्या साम्राज्यशाहीच्या काळात भांडवलशाहीचे साम्राज्यशाहीमध्ये रूपांतर झाले आहे, म्हणून साम्राज्यशाही भांडवलशाहीचीच सर्वोच्च अवस्था आहे तर साम्राज्यशाहीचा अंत झाल्यानंतर समाजवादाचे युग येईल, अशी भूमिका लेनिनने मांडली. भांडवल काही लोकांच्या हातात केंद्रीत झाल्याने आणि साम्राज्यवादी

विरोधी प्रयत्नांमुळे भांडवलवादाचा आणि त्याबरोबरच साम्राज्यवादाचा अंत होईल. भांडवलशाहीप्रमाणे साम्राज्यशाहीत देखील निरनिराळ्या प्रकारचे अंतर्विरोध निर्माण झाले आहेत. त्याचा फायदा घेऊन क्रांती केली पाहिजे असे लेनिनचे मत आहे.

लेनिनने साम्राज्यवादाची पाच प्रमुख लक्षणे सांगितली आहेत.

१) साम्राज्यशाही मध्ये भांडवलशाहीतील उत्पादनाचे केंद्रीकरण होते आणि त्याला आर्थिक जीवनात महत्त्व प्राप्त होते.

२) बँकेचे भांडवल आणि औद्योगिक भांडवल याचे मिश्रण झाल्याने आर्थिक भांडवलवाद वाढते आणि भांडवलदाराचा प्रसार होतो.

३) प्रथम फक्त उत्पादित वस्तूची निर्यात होते, त्यानंतरच भांडवलाची निर्यात सुरू होते.

४) साम्राज्यशाहीचे स्वरूप आंतरराष्ट्रीय आहे, कारण भांडवलशाही व एकाधिकारशाही भांडवलदार आपल्या लाभासाठी जगाचे विभाजन करतात.

५) साम्राज्यशाहीमुळे काही ठिकाणी रोजगार निर्मिती होऊन समृध्दी निर्माण होते, तर दुसरीकडे मंदी, बेकारी वाढून लोकांचे शोषण होते.

लेनिनच्या साम्राज्यवादाच्या विश्लेषणामध्ये तीन प्रमुख अंतर्विरोध स्पष्टपणे दिसून येतात, त्यामध्ये श्रमिक व भांडवलामधील अंतर्विरोध, दुसरा म्हणजे विभिन्न साम्राज्यवादी औद्योगिक देशामध्ये आपल्या हितासाठी संघर्ष होतो. तिसरा विरोध म्हणजे साम्राज्यवादी शोषक व शोषित राष्ट्रे यांच्यात अंतर्विरोध निर्माण होतो. म्हणून लेनिन म्हणतो, या अंतर्विरोधामुळे साम्यवादी तेथे श्रमिक क्रांती करू शकतात.

## ❑ लेनिनचे कामगार वर्गाची हुकूमशाही व पक्ष यासंबंधीचे विचार

लेनिनच्या पूर्वी मार्क्स आणि एंजल्स यांनी कामगार वर्गाच्या हुकूमशाहीचा सिध्दांत मांडला होता, परंतु त्यामागे एका पक्षाची हुकूमशाही स्थापन करणे हा त्याचा उद्देश नव्हता. परंतु लेनिनने रशियात बोल्शेविक क्रांती करून कामगार वर्गाची हुकूमशाही स्थापन केली, परंतु ती कामगारांची राहिली नसून तीचे साम्यवादी पक्षाची हुकूमशाही प्रस्थापित झाली. लेनिनच्या मते, कामगारवर्गाची हुकूमशाही ही एका अर्थाने लोकशाही शासनव्यवस्थाच असते. कारण शासनसत्ता संपूर्णपणे कामगाराच्या हाती असते. कामगारांच्या हिताचे संरक्षण आणि संवर्धन करणे. कामगारवर्गाला त्यांचे हक्क प्राप्त करून देणे आणि साम्यवादी समाजरचनेची पार्श्वभूमी तयार करणे हे कामगाराच्या लोकशाहीचे ध्येय आहे. ते ध्येय सर्व कामगाराच्या कल्याणासाठी आहे, त्यासाठी भांडवलदाराने निर्माण केलेल्या यंत्रणा नष्ट करणे आवश्यक आहे. या शब्दात लेनीन कामगार वर्गाच्या लोकशाहीप्रधान हुकूमशाहीचे वर्णन करतो. म्हणजेच कामगार

वर्गाच्या हुकूमशाहीचे स्वरूप समाजातील बहुसंख्य जनतेसाठी लोकशाही तर अल्पसंख्य वरीष्ठ भांडवलदार वर्गासाठी हुकूमशाही असे दुहेरी असते.

मार्क्स, एंजल्स आणि लेनिन या तिघांनीही कामगार वर्गाच्या हुकूमशाहीला साम्यवाद आणि भांडवलवाद यांच्यातील संक्रमणकाळाची अवस्था मानले आहे. पूर्ण समाजवादात वर्ग व राज्य अस्तित्त्वात राहणार नाही. प्रत्येकाला त्याच्या योग्यतेनुसार आणि आवश्यकतेनुसार वस्तु मिळतील असे त्याचे मत होते. लेनिनने कामगार वर्गाच्या हुकूमशाहीची दोन स्वरूपे मान्य केली. एक क्रांतीच्या स्वरूपात, यामध्ये श्रमिक वर्गाची हुकूमशाहीने भांडवलदाराचे निर्मूलन होते. भविष्यकाळात या भांडवलदारानी बदला घेऊ नये म्हणून त्याचे पूर्णत: उच्चाटन करते आणि दुसरा म्हणजे संक्रमणकाळातील राज्यात कामगारानी शुध्द साम्यवादी समाजरचना निर्माण करण्याचे कार्य करावे. कारण पराजित झालेला भांडवलशाही वर्ग विदेशी सहाय्यता मिळवून आपली गेलेली सत्ता परत प्राप्त करण्यासाठी प्रयत्नशील असतो, म्हणून शासनयंत्रणा प्राप्त केल्यानंतर शुध्द साम्यवादाची स्थापना होईपर्यंतच्या संक्रमणकाळात भांडवलदारांची उरलेली शक्ती नष्ट करण्याचे कार्य कामगाराची हुकूमशाही करते.

लेनिनच्या मते, क्रांती करण्यासाठी सुसंघटित राजकीय पक्षाची आवश्यकता असते, तसे मार्क्सचेही मत होते, परंतु त्यांनी फारसा विचार केला नाही, लेनिनला कामगार क्रांतीचे प्रत्यक्ष नेतृत्व करावे लागले होते, त्यामुळे पक्षाच्या बाबतीत लेनिनचे विचार सैनिकवादी व अत्यंत कठोर असे होते. क्रांती सफल होण्यासाठी साम्यवादी पक्षाच्या भूमिकेला फार महत्त्व आहे. लेनिनच्या मते, पक्ष नेहमीच कामगार आंदोलनामध्ये सहभागी असतो, आंदोलनाचे नेतृत्त्व व मार्गदर्शन करतो. पक्ष क्रांतीच्या विचारांचा प्रसार करतो. क्रांतीच्या तंत्राचे तो शिक्षण देतो. लेनिन पक्षाला क्रांतीचे सेनाप्रमुख म्हणतो. कामगार वर्गाची सत्ता प्रस्थापित करताना पक्षाची स्थिती सैनिक संघटनासारखी असते. असे पक्ष म्हणजे कामगार वर्गाचे सर्वस्व आहे. कामगार वर्गासाठी त्याग करण्यात तो पुढे असतो.

लेनिनच्या मते, सदस्यांना पक्षावर टीका करण्याचा अधिकार नसावा. त्याच्या मते, साम्यवादी पक्ष श्रमिकवर्गाचा एक भाग किंवा अंग आहे. श्रमिक वर्गाच्या तो सर्वात अधिक प्रगतीशील, सर्वात अधिक जागृत आणि म्हणून सर्वात अधिक क्रांतीकारी भाग आहे. सर्वात चांगली बुध्दीमानी व स्वार्थत्यागी, सर्वात अधिक दूरदर्शी असे कार्यकर्ते निवडून साम्यवादी पक्षाची निर्मिती होते. साम्यवादी पक्ष अशी संघटीत राजकीय व्यवस्था होय की, ज्याच्याद्वारे कामगार वर्गाचा अधिक उन्नत भाग सर्व कामगारांना योग्य दिशेने मार्गदर्शन करतो. त्यामुळे त्यावर टीका करु नये किंवा तो अधिकार नसावा. या साम्यवादी पक्षाचा कार्यक्रम लेनिनने पुढीलप्रमाणे विहीत केला होता.

१) जमीनदार आणि भांडवलदारांना पूर्णपणे नष्ट करणे आणि ते लोक आपले डोके पुन्हा वर काढणार नाहीत अशीच खबरदारी घेणे.

२) समाजातील वर्गव्यवस्था नष्ट करणे.

३) क्रांतीकारी सैन्य संघटित करू पक्ष संघटना आणि पक्ष शिस्तीला महत्त्व देणे.

४) पक्षाने घेतलेला निर्णय प्रत्येकाने पाळलाच पाहिजे अशी सैनिकी व्यवस्था करणे.

अशाप्रकारे लेनिनच्या मते, पक्ष हा कामगारवर्गाचे राजकीय नेतृत्त्व करून कामगाराची हुकूमशाही प्रस्थापित केली पाहिजे.

कामगार चळवळीच्या आघाडीवर राहून कामगारांना अचूक राजकीय मार्गदर्शन करण्याची जबाबदारी पक्षालाच पार पाडावी लागते. म्हणून लेनिनने पक्षशिस्तीला अतिशय महत्त्व दिले होते. त्याची पक्षांतर्गत लोकशाहीला मान्यता होती. पक्षामध्ये कोणत्याही विषयावर मुक्त स्वातंत्र्याद्वारे चर्चा करण्यात यावी. चर्चेनंतर जे अंतिम निर्णय आहेत ते सहमतीने घेण्याचा प्रयत्न करावा आणि निर्णय हे सर्वमान्य असावे आणि पक्षाने एखादा निर्णय घेतल्यानंतर सर्व पक्ष सदस्यावर तो बंधनकारक असला पाहिजे. अशा प्रकारच्या कठोर शिस्तीच्या जोरावरच पक्षाची राजकीय उद्दिष्ट्ये साध्य होऊ शकतात. अशाप्रकारे कम्युनिस्ट पक्षाच्या लोकशाही केंद्रवादाचे तत्त्व लेनिनने मांडले होते.

## ❑ लेनीनचे राष्ट्रकाच्या स्वातंत्र्याबद्दलचे विचार :-

लेनीनच्या मते, राष्ट्रक म्हणजे समाज संघटनेचे मुळ केंद्र आहे. त्याच्या आधारावर समाजरचना करण्यात यावी, यालाच संघराज्याचे स्वरूप म्हणता येईल. या संघराज्यामध्ये घटक राज्य हे स्वायत्त आणि स्वयंशासीत संघ पाहिजे असे लेनीनचे मत होते. यालाच लेनीनने राष्ट्रकाची कल्पना म्हटले जाते. लेनीनची राष्ट्रकाची निर्मिती समान भाषा, सलग भूप्रदेश, समान संस्कृती आणि समाज आर्थिक हितसंबंध या चार घटकाच्या आधारावर होते असे स्पष्ट केले आहे. कारण समान भाषेमुळे एकत्र राहण्याची भावना वाढीस लागते आणि हे भाषेचे तत्त्व जगातील समानसूत्र आहे. सलग भू-प्रदेश असल्याशिवाय राष्ट्र निर्माण होत नाही, तर समान संस्कृतीमुळे लोक एकत्रित राहतात. संस्कृती भाषेमुळे बनते. एक समान संस्कृती, साहित्य, कला हे समान संस्कृतीचे रूप असून याद्वारे राष्ट्रक निर्मिती होते. राष्ट्राच्या विकासासाठी आर्थिक हितसंबंध निर्माण होणे आवश्यक असते, म्हणून लेनीनचे राष्ट्रकाच्या स्वातंत्र्याबाबतचे विचार मांडले आहेत ते पुढीलप्रमाणे :-

१) आर्थिक विकास होऊन चालत नाही तर त्याबरोबर कला-साहित्य संस्कृतीचा विकास व्हावा लागतो.

२) राष्ट्रकाला स्वयंम निर्णयाचा अधिकार असला पाहिजे.

३) राष्ट्रकाचा विकास होण्यासाठी राजकीय अधिकार असले पाहिजे.

४) संघराज्यातून फुटून निघण्याचा अधिकार राष्ट्रकाला असावा.

५) प्रत्येक राष्ट्रक हे सार्वभौम राष्ट्र, होण्याची गरज नाही तर त्याचा संपूर्ण विकास व संस्कृती विकास करण्याची गरज आहे.

अशाप्रकारे लेनीनने राष्ट्रक व राष्ट्राच्या संबंधामध्ये जे विचार मांडले ते अतिशय महत्त्वाचे आहे. अशाप्रकारे लेनीनने राज्यविषयक सिध्दांताची मांडली केली आहे.

## ❑ माओ त्से तुंग (१८९३-१९७६)

माओ हा चिनी मार्क्सवादी विचारवंत, चीनच्या क्रांतीचा नेता. त्यानी मार्क्सवाद चीनच्या विशिष्ट परिस्थितीत लागू करण्यासाठी जी भर घातली त्यास माओवाद म्हणून ओळखले जाते. माओ राज्यासंबंधी विचार केला असून खालील मुद्यांच्या आधारे ते स्पष्ट करता येतील. ते पुढीलप्रमाणे :-

### ❁ जनतेची लोकशाही आणि जनतेची लोकतंत्रात्मक हुकूमशाही

जनतेला सरकारच्या धोरणावर टीका करण्याचा आणि सूचना करण्याचा अधिकार आहे. जनतेला पक्षाच्या मोठ्यातील मोठ्या पुढाऱ्यांवर त्याने कितीही मोठी लोकसेवा केलेली असली तरी त्यावर टीका करण्याचा अधिकार आहे. माओची लोकशाही माणसावर उभी आहे. जनतेसाठी लोकशाही आणि जनतेच्या शत्रूसाठी किंवा प्रतिक्रांतिकारकांसाठी हुकूमशाही म्हणजेच लोकतंत्रात्मक हुकूमशाही होय. जनता स्वत:चे मत पोस्टरवर लिहून सार्वजनिक जागी चिकटवू शकते असा अधिकार जनतेला असतो.

माओच्या मते, विचारांची अंमलबजावणी करताना या विचारांचा विरोध करणारेच त्या विचाराचे पाठीराखे म्हणून आत घुसतात आणि पध्दतशीरपणे त्या विचाराचा आत्मा व्यवहारवादाच्या नावाखाली बदलून टाकतात, अशा विचाराला माओ लाल झेंड्याला विरोध करण्यासाठी लाल झेंडा फडकविणे म्हणतो. शत्रू चाल करून येत असेल तर माघार घ्या, शत्रू माघार घेत असेल तर चाल करून जा शत्रू विश्रांती घेत असेल तर छापे मारा असे माओने सांगितले.

वैचारिक स्वातंत्र्यास तात्त्विक मान्यता देण्यात आली. माओच्या मते, फार थोडे लोक जर विरोध करत असतील त्यांना करू द्यावा. अल्पसंख्यांकाना जबरदस्तीने मतपरिवर्तन करावयास लावू नये. त्यांचे मत पण कधी-कधी बरोबर असते आणि ते बरोबर नसले तरी स्वत:चे मत धारण करण्यास यांना परवानगी दिली पाहिजे. शंभर फुलाप्रमाणे निरनिराळ्या शंभर विचारप्रणाली अगर पंथ विकसित व्हावे असे म्हटले असून त्यामुळे मार्क्सवादी-लेनिनवादी विचारसरणी जुनी होणार नाही तर त्यात वाढ होईल.

## ❁ निरंतर क्रांती

माओच्या विचारातील एक संकल्पना नवा आदर्श साम्यवादी समाज पूर्णपणे प्रस्थापित होईपर्यंत कामगार क्रांती व कामगार वर्गाची हुकूमशाही चालूच राहिली पाहिजे असे माओचे म्हणणे होते. लोखंड तापलेले आहे, तोवरच त्याला आकार दिला पाहिजे म्हणजे कोणत्याही रुकावटीशिवाय एका अवस्थेतून दुसऱ्या अवस्थेत क्रांतीचा विकास होत जाईल. माओने आपल्या निरंतर क्रांतीच्या ट्रॉटस्कीच्या कायम क्रांतीशी गल्लत करू नये असा ईशाराही दिला होता, जर क्रांतीची प्रक्रिया चालू ठेवली नाही तर आत्मसंतुष्टता येण्याची शक्यता असते आणि भांडवलशाही प्रवृत्ती डोके वर काढण्याची शक्यता असते.

## ❁ सांस्कृतिक क्रांती

प्रथम लेनिनने व नंतर माओने ही संकल्पना मांडून मार्क्सवादी सिध्दांतात बदल होण्यास साध्य करणारी व अशा परिवर्तनाने स्वत:ही बदलणारी जाणीव वास्तव रूपात कशी असते, तिचे आदर्श रूप कसे असावे हे मांडले. कामगार वर्गाला मुक्त करण्यासाठी केवळ राजकीय परिवर्तन अपुरे असते. क्रांती होण्यासाठी वस्तुनिष्ठ परिस्थिती (भौतिक) आणि व्यक्तिनिष्ठ परिस्थिती (सामाजिक) ह्या दोहोमधील परिवर्तनाची गरज असते. योग्य व्यक्तिनिष्ठ परिस्थिती निर्माण होण्यासाठी भांडवलशाही संस्कृतीचे वळण मोडणे, त्यांच्या कला व कारागिरीला सुरुंग लावणे आवश्यक असते. हे काम सांस्कृतिक क्रांतीद्वारे शक्य होते. अशा रितीने जाणीव जागृतीला येथे महत्त्वाचे स्थान असते.

## ❁ माओ त्से तुंग यांचे क्रांती विषयाचे विचार

चीन हा प्रगत भांडवली देश नव्हता तर शेतीप्रधान होता, त्यामुळे क्रांती केवळ कामगार वर्गाकडून होत नाही तर त्याचबरोबर शेतकरीही असतील. क्रांती ही विकसित भांडवलशाहीमध्ये झाली पाहिजे असे नाही तर ती शेतीप्रधान संरजामशाहीत ही शेतकऱ्यांच्या नेतृत्त्वाखाली होईल. औद्योगिक विकास झाला पाहिजे, त्याचबरोबर शेती व अन्य गोष्टींच्या विकासावरही भर दिला पाहिजे. एकूण सर्वांगीण विकास झाला पाहिजे. साम्यवादी विचारसरणीने प्रेरीत झालेले लष्कर क्रांती करेल, त्याचबरोबर सातत्याने साम्यवादाचे रक्षण करण्यासाठी सातत्याने संघर्ष करतील. माओने २८ जानेवारी १९५८ मध्ये एका भाषणात असे म्हटले की, ज्यावेळेला वातावरण क्रांतीने तापलेले असते, तेव्हाच त्या क्रांतीनंतर दुसरी क्रांती केली पाहिजे. अशाप्रकारे सातत्यपूर्ण क्रांती केली पाहिजे. सामाजिक संबंध राजकीय रचना आणि वैचारिक जाणीव यांच्यामध्ये बदल झाला, तरच आर्थिक व भावनिक विरोध मोडून काढता येतो. त्यामुळे नव्या प्रकारची वैचारिक प्रारूप मोडले पाहिजे. क्रांती प्रस्थापित करण्यासाठी माओने निरंतर क्रांती आधी

सांगितले आहे, त्यात फक्त कामगार नसून त्याबरोबर शेतकरीही असेल अशी भूमिका माओने मांडली आहे.

## ❑ नवमार्क्सवादी राज्यविषयक दृष्टीकोन

मार्क्सवादी विचारांमध्ये समाजवादी लोकशाहीवादी विचार पाहणारे ट्रॉटस्कीसारखे विचारवंत लेनिनच्या काळात होते. त्यांनी मार्क्सवादाकडे एक वेगळ्या दृष्टीकोणातून पाहण्याचा प्रयत्न केला, त्याबरोबर १९२९-३० साली युरोप व अमेरिकेत जी महामंदी आली, त्यामुळे काही विचारवंतांनी मार्क्सवादाचे जरा वेगळे पण मूलग्राही विवेचन केले आणि मार्क्सवादी तत्त्वज्ञानात थोडा बदल करण्यात यावा असे म्हटले, त्यांना नवमार्क्सवादी म्हटले जाते. सोव्हिएत रशियात मार्क्सवादाचा जो व्यवहार चालू होता तो मार्क्सवादाच्या मूळ तत्त्वाशी विसंगत आहे, म्हणून मार्क्स व एंजल्सच्या विचाराचा नव्या दृष्टीकोनातून प्राप्त परिस्थितीच्या संदर्भात अभ्यास करावा असा विचार विकसित झाला, यालाच नवमार्क्सवाद असे म्हणतात. नवमार्क्सवादी विचारांवर ग्रामसी, लुकाच, हेबरमास, मिलीबॅड ईत्यादी विचारवंतांचा प्रभाव पडला. अंतोनिओ ग्रामसी हा मुख्य मार्क्सवादी विचारप्रवाहाचाच एक प्रतिनिधी होता पण त्याने मार्क्सच्या इतिहासाच्या तत्त्वज्ञानाचा जास्त सूक्ष्म अभ्यास केला आहे.

## ❑ मार्क्सवाद व नवमार्क्सवादातील भेद

१) मार्क्सवाद हा लेनिनवाद आहे. मार्क्सच्या तत्त्वज्ञानाचा अभ्यास लेनीन शिवाय करता येत नाही. नवमार्क्सवादी लेनिनचे महत्त्व मान्य करतात, परंतु लेनिनचे विचार हे रशियाच्या संदर्भात महत्त्वाचे आहे, ते इतरत्र मान्य होत नाहीत अशी भुमिका ते घेतात.

२) मार्क्सवादी हे रशियाच्या राज्यघटनेला आदर्श राज्यव्यवस्था मानतात. नवमार्क्सवादी रशियाची राज्यव्यवस्था रशियासाठी योग्य असून पाश्चिमात्य देशाच्या समस्या वेगळ्या आहेत, त्यामुळे विकसित पाश्चिमात्त्य देशामध्ये त्याची अंमलबजावणी होऊ शकत नाही, असे मानतात.

३) मार्क्सवादी, मार्क्सच्या प्रस्थापित ग्रंथाच्यासंदर्भात मांडणी करतात, त्यापलीकडे जाण्याची त्याची तयारी नसते. नवमार्क्सवादी मार्क्सच्या लिखाणाची मदत घेतात. मार्क्सच्या तरुणपणातील लिखाण प्रकाशित झाले नव्हते, त्याचे योग्य प्रकारे भाषांतर झाले नव्हते, परंतु आता हे लिखाण प्रकाशित झालेले आहेत. नवमार्क्सवादी विचार हा नंतरच्या लिखाणाच्या साहाय्याने मांडला गेला आहे.

४) मार्क्सवादी, कामगारांच्या हुकूमशाहीला, कम्युनिस्ट पक्षाच्या नेतृत्त्वाला महत्त्वाचे स्थान

देतात, परंतु नवमार्क्सवादामध्ये बदलत्या परिस्थितीमध्ये सुधारणा केली पाहिजे असे मानतात. नवमार्क्सवादी मार्क्सवादावर टिका करत नाहीत, परंतु त्याचं मत असं आहे की, नवविचार करता येतो. लोकशाहीच्या संदर्भात नवमार्क्सवाद मार्क्सपेक्षा जागरूक आहे, लोकांना त्याचे अधिकार दिले पाहिजेत, अशी त्याची भूमिका आहे. नवमार्क्सवाद व मार्क्सवादामध्ये अशा प्रकारचे काही भेद आहेत.

## नवमार्क्सवादाच्या उदयाची कारणे

ग्रामसी व लुकाच यांनी मांडलेला विचार १९६५-६६ नंतरच, लोकप्रिय झाले. मध्यंतरीच्या काळात अमेरिका व युरोपमध्ये प्रत्यक्षार्थवादावर आधारलेल्या विचाराची लाट आली होती. समाजशास्त्रात टॉलकॉट पार्सनचा रचनाकार्यवाद, वर्तनवाद आणि आधुनिकीकरणाचा सिध्दांत, तरुणांचा उत्साह वाढवणारा ठरला. व्हिएतनामच्या युध्दात हजारो तरुणांची होत असलेली कत्तल ही तरुणाच्या लक्षात आली. यातच क्युबातील फिडेल कॅस्ट्रो यानी केलेली क्रांती चीनमधील माओची सांस्कृतिक होती व तिसऱ्या जगातील नवोदित राष्ट्रे वेगाने स्वतंत्र होताना त्यांनी पाहिले.

सध्याची अमेरिकेची भांडवलशाही या परिस्थितीत उपयोगाची नाही आणि सोव्हिएत रशियातील समाजवादाचा पर्याय आकर्षक वाटत नव्हता, त्यामुळे तीसरा पर्याय शोधणे आवश्यक होते ते नवमार्क्सवादाच्या रूपात त्यांना मिळाले.

मार्क्सने ऐतिहासिक भौतिकवादाचे निसर्ग विज्ञानाच्या अनुषंगाने विश्लेषण केले होते. या सर्व सैध्दांतिक व व्यावहारिक बाबींचा विचार नवमार्क्सवादी विचारवंतानी केला, कारण या प्रश्नाची फेरमांडणी केल्यावरच मार्क्सला अभिप्रेत असणारा व नव्या सामाजिक वास्तवाला सुसंगत असा मार्क्सवाद आपणांस सांगता येईल असे या विचारवंताचे मत होते. नवमार्क्सवादी विचारामध्ये ग्रामसी, लुकाच, हेबरमास इत्यादी अनेक विचारवंतांचा समावेश होतो.

## ❑ अंतानिओ ग्रामसी

इटलीचा क्रांतीकारक कम्युनिस्ट नेता अंतानिओ ग्रामसी याने मार्क्सवादी तत्त्वज्ञानाला आणि क्रांतीकारक राजकारणाला मोठे योगदान दिले आहे, त्याचा मृत्यू जरी १९३७ साली झाला तरी १९६० च्या दशकात त्याचे विचार खऱ्या अर्थाने पर्यायी डाव्या राजकारणाचा शोध घेणाऱ्या डाव्या पक्षांना आणि गटांना प्रोत्साहित करणारे ठरले, कारण त्याने लेनिन व स्टॅलिन यांनी मांडलेल्या विचाराच्या पलीकडे जावून आपले विचार मांडले, त्यामुळे मार्क्सवादी चर्चा विश्वात मोठ्या प्रमाणात बदल झाला. ग्रामसीने कोणत्याच विषयावर सविस्तर अशी मांडणी केली नाही, परंतु त्यानी लिहिलेल्या टिपणातच

त्याचे विचार व्यक्त झालेले आहेत. पण ते विचार इतके नवे आणि क्रांतीकारक होते की, त्याला मार्क्सवादी परंपरेत लेनिननंतरचा मोठा भाष्यकार मानण्यात आले. ग्रामसीने ऐतिहासिक भौतिकवाद, वैचारिक प्रभुत्व आणि क्रांती व कम्युनिस्ट पक्षासंबंधी जे विचार मांडले आहेत, ते महत्त्वाचे असून पुढे विचार स्पष्ट केले आहेत.

## ❑ वैचारिक प्रभुत्वाचे तत्त्व

ग्रामसीचे असे मत होते की, एखादा वर्ग ज्यावेळी समाजावर आपले वर्चस्व एका विशिष्ट कालखंडासाठी स्थापन करतो, त्यावेळी ते वर्चस्व वा प्रभुत्व केवळ बळाच्या आधारावर स्थापन केले जात नाही, तर त्यामागे वैचारिक प्रभुत्व पण असते, जे वैचारिक इमल्याचं राजकारण, तत्त्वज्ञान, धर्म व संस्कृती या आधारे प्रस्थापित केले जाते, त्याला त्याने hegemony हा शब्द वापरला, त्याचा अर्थ प्रभुत्व किंवा धुरिणत्व असा करता येईल, हे धुरिणत्व वैचारिक असते, त्याचप्रमाणे ते बळावर आधारलेले असते. ग्रामसीने त्याची तुलना ग्रीक पुराणकथेतील सेंटौरशी केली आहे. सेंथर हा असा प्राणी आहे, याचे शिर माणासाचे आहे, पण शरीर घोड्याचे आहे. शिर विचारांचे तर अश्व बळाचे व शक्तीचे प्रतीक आहे. त्यांच्या मते, वैचारिक धुरिणत्व, बळ व विचारसरणीच्या आधारावर तयार केले जाते व विचारसरणी त्यावेळी प्रभावी ठरते, ज्यावेळी ती लोकांच्या मनाची पकड घेते, त्यात भविष्यकाळाची स्वप्ने असतात. विचारसरणीची व वैचारिक धुरिणत्वाची निर्मिती, तत्त्वज्ञान, कला, संस्कृती, नीतिशास्त्र, साहित्य आणि धर्म यांच्या आधारे केली जाते. वैचारिक धुरिणत्व तयार झाले नाही, तर बळाच्या जोरावर अधिक काळ राज्य करता येत नाही.

म्हणून कामगार वर्गास जर यशस्वी व्हायचे असेल तर त्यास आपले धुरिणत्व स्थापन करावे लागेल. विचारवंत दोन प्रकारचे असतात. पहिल्या प्रकारचे विचारवंत हे पारंपारिक विचारवंत असतात. हे विचारवंत परंपरेचे समर्थन करतात. दुसऱ्या प्रकारचा विचारवंत हा प्रतिबध्द वा ेसरपळल विचारवंत असतो. हा समाजाशी वा वर्गाशी जैविक पध्दतीने जोडलेला असतो, म्हणून त्यास अंतर्जात विचारवंत म्हणावयास हरकत नाही. भांडवलशाहीचे ज्याप्रमाणे अंतर्जात विचारवंत असतात, त्याप्रमाणे कामगार वर्गाचे पण अंतर्जात विचारवंत असतात. ते उत्पादन, नागरी समाज व राज्यसंस्था या तीनही क्षेत्रात काम करतात, या वैचारिक धुरिणत्वाच्या निर्मितीत विचारवंतांची भूमिका महत्त्वाची असते. कारण विचारवंत समाजाला वैचारिक नेतृत्त्व प्रदान करतात. समाजाला एकत्र ठेवण्यात, विशिष्ट उद्दिष्टांना प्राप्त करण्यासाठी त्यांना एकत्र आणण्यात ते महत्त्वाची कामगिरी करतात.

## ❑ ग्रामसीचे क्रांतीविषयक व कम्युनिस्ट पक्षाबद्दलचे विचार

अंतानिओ ग्रामसी हा क्रांतिकारक राजकारणी होता आणि क्रांतीचा मार्ग प्रत्येक समाजाने

आपापल्या अनुभवाच्या, इतिहासाच्या व प्रतिभेच्या आधारे निश्चित केला पाहिजे, तो कोणी कोणाला आधीच ठरवून देत नाही असे त्यांचे मत होते.

कम्युनिस्ट पक्ष हा 'मॉडर्न प्रिन्स', असून त्यास नवे समाजवादी राज्य स्थापन करावयाचे आहे. त्यासाठी पक्षाने खालील गोष्टी केल्या पाहिजेत, असे ग्रामसी म्हणतो.

१) पक्षाने राजकीय प्रक्रियेवर कामगार वर्गाचे धुरिणत्व स्थापन केले पाहिजे.

२) सर्वसाधारण जनता व पुरोगामी विचारवंत यांच्यातील दुवा म्हणून काम केले पाहिजे व पारंपारिक विचारवंतांना निष्प्रभ करून त्यांना नवा विचार पटवून दिला पाहिजे.

३) नवे एकात्म समाजवादी राज्य स्थापना करणे हे मुख्य कार्य आहे व पीरस्थितीप्रमाणे पक्ष 'यान' किंवा 'आसन' या धोरणाचा अवलंब करू शकतो.

४) भांडवलदार वर्गाने सुरू केलेल्या सुवश क्रांतीस विरोध करणे.

५) पक्षाने वेगवेगळ्या विषयावरचे राजकीय लढे लढवले पाहिजेत आणि कारभार वर्गाच्या पुढारपणाखाली लोकांचे लढे लढविले पाहिजेत.

६) जनचळवळीतून पक्षाने आपला पाया सतत रुंदावत ठेवला पाहिजे, त्यातून कामगार वर्गाच्या पक्षाचा प्रभाव वाढतो.

७) राजकीय पक्षाने नागरी समाजातील विविध संघटनांत लढाऊपणा आणून त्याद्वारा राज्यसंस्थेस घेरा घालण्याचे काम केले पाहिजे.

समाजवादाकडे व साम्यवादाकडे जाणारा हा प्रवास वेगवेगळ्या टप्प्यातून आपणास करावा लागेल, त्यामुळे त्याने तीन क्रांतीकारक टप्प्यांचा विचार केला. (१) लोकशाही क्रांती (२) समाजवादी क्रांती आणि (३) साम्यवादी क्रांती. लोकशाही क्रांतीच्या कार्यक्रमात मुख्य भर सरंजामी अवशेषांचा नाश करण्यावर असतो, त्यात शेती सुधारणा, लोकशाही संस्थांची स्थापना व जनतेची सरंजामी संस्कृतीतून सुटका करणे महत्त्वाचे असते. कामगार वर्गाने शेतकरी व मध्यमवर्गाच्या मदतीने हे काम पूर्ण करावयाचे आहे. समाजवादी क्रांती हा दुसरा टप्पा ज्यामध्ये सत्ता, साम्यवादी पक्षाच्या हातात आहे व सर्व उत्पादन साधनांचे राष्ट्रीकरण करून प्रत्येकाला त्यांच्या कुवतीप्रमाणे व कामाप्रमाणे दाम देण्यात आहे. एकदा उत्पादनशक्तीच्या क्षमतेमध्ये वाढ झाल्यानंतर मग कम्युनिस्ट वा साम्यवादी टप्प्याकडे वाटचाल करता येईल, जेथे प्रत्येकास त्यांच्या गरजेप्रमाणे वस्तू प्राप्त होतील. हा परस्पर सहकार्य व सर्वांचे कल्याण यावर आधारलेला समाज असेल. या प्रक्रियेत राज्यसंस्थेची दमनशक्ती आणि बळ ज्या संघटनात व राज्यघटकांत सामावली आहे त्या विरून जातील. त्यांच्याप्रमाणे नागरी समाजात व त्यांच्या खाजगी

मालकीच्या आधारात मोठा बदल होईल, कुटुंबापासून सर्व संस्था यातून बदलतील आणि आत्मानुशासनावर आधारलेला स्वयंशासित राज्यविहीन समाज निर्माण होईल.

## ❑ राज्याचा साधनवादी सिध्दांत : रॉल्फ मिलिबॅण्ड

राल्फ मिलिबॅण्ड हा इंग्लंडमधल्या ऑक्सफर्ड विद्यापीठातील राज्यशास्त्राचा प्राध्यापक आहे. मार्क्सच्या दृष्टीकोनातून राज्यसंस्थांच्या स्वरूपाचा अभ्यास करण्याचा प्रयत्न मिलिबॅण्डने केला. अमेरिका व इंग्लंडमध्ये लोकशाही व्यवस्था आहे. ती व्यवस्था चांगली आहे, ते बदलायचे नाही अशी भूमिका अनेक पाश्चिमात्त्य राजकीय विचारवंतानी मांडली, त्याला किंवा त्या विचाराला विरोध करताना मिलिबॅण्डने 'कॅपीटॅलीस्ट डेमॉक्रसी इन ब्रिटेन' (ब्रिटनमधील भांडवली लोकशाही) व 'मार्क्सीइजम अॅन्ड पॉलिटिक्स' (मार्क्सवाद आणि राजकारण) ही दोन पुस्तके लिहिली.

या दोन्ही पुस्तकामध्ये मिलिबॅण्डने नवमार्क्सवादाचा सिध्दांत मांडला. लेनिन व एंजल्स यांनी राज्य हे प्रस्थापित सत्ताधारी वर्गाच्या हातातील शोषणाचे साधन आहे. राज्यसंस्था ही भांडवलशाहीच्या हातातील हत्यार आहे, असे विचार लेनिन आणि एंजल्सने मांडले, परंतु राज्य हे शोषणाचे साधन कशाप्रकारे आहे याची मांडणी व्यवस्थितरित्या एंजल्स आणि लेनिनने केली नाही, त्याला आवश्यक असणारे किंवा त्याला आधार म्हणून काही पुरावे लागतात ते पुरावे या विचारवंतानी मांडले नाहीत. मिलीबँडने ही उणिव भरून काढली.

मिलिबॅण्डच्या साधनवादी सिध्दांताचे वैशिष्ट्य असे आहे की, तो पहिल्यांदाच भांडवलशाही राज्यव्यवस्था ही शोषणाचं कशाप्रकारे साधन आहे, याचा विचार मांडताना पुराव्याचा आधार देवून विवेचन करतो. त्यासाठी त्याने सखोल असं संशोधन करून आकडेवारीसह माहिती गोळा केली, त्याच्या आधारे ही गोष्ट सिध्द करण्याचा प्रयत्न केला की, ''राज्यसंस्था ही भांडवलदाराच्या हातातील शोषणाचं साधन आहे.''

भांडवलशाही व्यवस्थेचे पुरस्कार करणारे जे विचारवंत आहेत त्या विचारवंतांच्या मते, इंग्लंडमध्ये न्यायालयाला स्वातंत्र्य, खुल्या निवडणूका, राजकीय पक्षांना स्वातंत्र्य व संसद इ. लोकशाहीप्रमाणे आहेत, त्यामुळे लोकशाहीमध्ये लोकांच्या इच्छेप्रमाणे निर्णय होतात, त्यामुळे संसदीय लोकशाही व्यवस्था ही आदर्श व्यवस्था आहे. प्रत्येकाच्या इच्छेप्रमाणे व कुवतीप्रमाणे निर्णय घेता येतो व संपत्ती मिळविता येते. परंतु या विचाराला नकार देण्यासाठी राल्फ मिलीबॅन्डने पुढील चार महत्त्वाचे मुद्दे मांडले आहेत.

१) मिलीबॅन्डच्या मते, भांडवलशाहीत लोकशाही व्यवस्था ही आदर्श व्यवस्था नाही. ही व्यवस्था आकाशात किंवा समाजाला सोडून कार्य करत नाही तर ही व्यवस्था समाजामध्येच कार्यरत असते. जी भांडवलव्यवस्था आहे, त्याचा परिणाम वर्गसंस्थेवर होत असतो.

कोणतीही राज्यसंस्था असे म्हणू शकत नाही की, वर्गसंस्थेशी आमचा काहीही संबंध नाही. त्यामुळे भांडवलशाही लोकशाही व्यवस्था ही आदर्श व्यवस्था नाही.

२) राल्फ मिलिबॅन्डच्या मते, भांडवलशाही व्यवस्थेमध्ये लोकांना जरी मतदानाचा अधिकार दिला असला व मतदान, निवडणूका मुक्त असल्या तसेच निवडणुकीत अन्याय होत नसला तरी भांडवलशाही रचना अशी असते की, भांडवलदार वर्गाला जास्त फायदा होणाऱ्या गोष्टीच घडतात. निवडणुका मुक्त असल्या तरी भांडवलदारांच्या पक्षाजवळ पैसा जास्त असतो, त्यामानाने मजूरपक्ष पैसा खर्च करू शकत नाही. कामगार वर्गाच्या पक्षाला अनेक अडचणींना तोंड द्यावे लागते असे अडचणी भांडवलदारांना द्यावं लागत नाही. आपल्याला हव्या तशा बातम्या भांडवलशाही लोक छापून आणतात. मात्र कामगार पक्षाना ते परवडू शकत नाही. कामगार पक्षांना सभेसाठी छोटी जागा मिळते एकूणच कामगार पक्षाला तोटेच (Disadvantages) सहन करावे लागतात.

३) या भांडवली लोकशाहीत निवडणूकीनंतर जे निवडून आलेले लोक असतात. ते अप्रत्यक्ष सरकारी असतात. ते एकदा निवडून आल्यानंतर हे लोकांपासून वेगळे होतात व ते भांडवलदारांचे हस्तक बनून राहतात. ही व्यवस्था आमदार-खासदारांना भ्रष्ट करते, त्यामुळे लोकशाहीत राज्यसंस्थेच्या संसदीय व्यवस्थेला मुळातच कीड लागलेली आहे ही कीड भांडवलदारांनी लावली आहे.

४) लोकशाहीत न्यायालय स्वतंत्र आहे. परंतु मिलीबॅन्डच्या मते, न्यायालयाने दिलेले निर्णय भांडवलदारांना अनुकूल असतात. न्यायालयामध्ये जाणं सर्वसाधारण माणसाला परवडत नाही. गरीबीमुळे न्यायालयात जाता येत नाही. ''शहाण्याने कोर्टाची पायरी कधीही चढू नये'' असे सगळे लोक म्हणतात. ही न्यायव्यवस्था भांडवलशाही व्यवस्थेच्या रचनेचा भाग आहेत. न्यायाधिशांच्या निर्णयावर आरोपीचा सामाजिक व राजकीय प्रभाव पडतो. अशाप्रकारे वकील-न्यायाधिश वगैरे भ्रष्ट बनतात व त्याचप्रमाणे वकीलामुळे न्यायव्यवस्था भ्रष्ट होते.

या चार मुद्यांवरून राल्फ मिलीबॅण्डने संसदीय लोकशाही ही स्वतंत्र व आदर्श व्यवस्था नाही तर संसदीय व्यवस्था ही भांडवलशाहीचा व्यवस्थेचा भाग आहे असे मत मांडले.

आदर्श व्यवस्थेला प्रत्यक्षामध्ये खालील सहा आधार आहे. (१) ब्रिटीश संसद (२) ब्रिटीश कार्यकारी मंडळ (३) नोकरशाही (४) ब्रिटीश न्यायमंडळ (५) प्रसारमाध्यमे (६) नागरी समाज व शैक्षणिक संस्था.

या सहा क्षेत्रामुळे ब्रिटीशाची लोकशाही व्यवस्था ही आदर्श व्यवस्था मानली जाते. या क्षेत्राचं

कामकाज कशा प्रकारे चालते. याचं सर्वेक्षण मिलीबॅडने आधुनिक संशोधनाच्या साहाय्याने केले. प्रत्यक्षामध्ये कामकाज कशा प्रकारे चालते, याचा ही अभ्यास राल्फ मिलीबॅन्डने केला. न्यायाधिश कोण आहे. कोणत्या वर्गातील आहेत. नोकरशाही कशी आहे, याची आकडेवारी राल्फ मिलीबॅन्डने गोळा केली. या सर्व अभ्यासातून त्यांनी खालील मुद्दे मांडले.

१) ब्रिटीश समाज हा विषम समाज आहे आणि इंग्लंडमधील ८८% लोक हे सर्वसामान्य जीवन जगतात. १.५% लोकांकडे सर्व संपत्ती एकवटली आहे. ९८.५% लोक मालमत्ता नसलेले तर १.५% लोकांच्या आधारावर जीवन जगतात. त्यामुळे येथे संसदीय लोकशाही नसून भांडवली लोकशाही आहे.

२) दुसरी गोष्ट म्हणजे येथील प्रसारमाध्यमे ही सर्व भांडवलदाराच्या हातातील आहेत. प्रसारमाध्यम वर्तमानपत्र, रेडिओ, दूरदर्शन हे सर्व जाहीरातीवर चालत असतात. भांडवलदार वर्गाच्या जाहिराती मिळविण्यातच गुंतलेले असतात. मिलीबॅन्डच्या मते, वर्तमानपत्रे हे भांडवलादारांच्या मालकीची असतात. टेलिव्हीजन चॅनेल्स हे जाहीरातीवर चालत असल्यामुळे प्रसारमाध्यम बड्या लोकांच्या हातातील हत्यार बनले आहेत.

३) नागरी समाजामधील शिक्षण संघटना, उच्च शिक्षण संस्था, विद्यापीठ, संशोधन संस्था ही उच्च शिक्षण देणारी साधने, शाळा, हायस्कूल, प्राथमिक. या सर्व शैक्षणिक संस्था ह्या भांडवलदारांच्या हातात असतात. खाजगी शिक्षण संस्थामधून भांडवलदार वर्गाच्या हिताचेच रक्षण केले जाते. विद्यापीठामध्ये ज्या संस्था असतात त्यांची निती निर्धारण साधनेसुध्दा बड्या लोकांच्या हातातील हत्यार असतात. भारतीय विद्यापीठ भांडवलदारांच्या हातातील हत्यार नाहीत. मात्र इंग्लंड अमेरिकेमध्ये भांडवलदारांच्या वर्चस्वाखाली श्रीमंत वर्गाच्या हितसंबंधाचं समर्थन करण्यासाठी शिक्षण संस्था स्थापन करून भांडवलदार मोठे शोषण करतात, त्यामुळे राज्यसंस्था व नागरी समाज या दोन्हीमध्ये वर्चस्वशाली वर्गाचं प्रभुत्व असतं आणि राज्याचा वापर हे वर्ग स्वत:च्या स्वार्थासाठी करतात.

१९६८ साली मिलीबॅण्डने एक पुस्तक प्रकाशित केले, त्यामुळे मिलीबॅन्डला खूप प्रसिध्दी मिळाली त्याच्यावर टीका ही झाली. मिलीबॅन्ड राज्यसंस्थेवर काम करत होता. तेथेच निकोस पोलंझा हा ही होता, त्यांनी मिलीबॅन्डवर टीका करणारा निबंध लिहिला. या दोघांमध्ये वाद झाला, त्यांच्यावर टीका करताना पोलंझाने महत्त्वाचे तीन मुद्दे मांडले.

१) मिलीबॅन्डची विशिष्ट वैचारिक चौकट नसल्यामुळे त्याचं संशोधन एक प्रकारचे जुजबी जंत्री झाली आहे.

२) कोणत्याही संस्थेचं वर्गीय चारित्र्य त्या संस्थेमध्ये काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या जातीवरून आणि वर्गावरून ठरत नाही. एखाद्या संस्थेत काम करणारे ९०% लोक हे विशिष्ट गटाचे असतील तर ती संस्था त्याच्या हिताचे काम करते असे म्हणणे योग्य ठरत नाही. प्रत्येक संस्था ही स्वत:ची उद्दिष्ट्ये ठेवून ती साध्य करण्यासाठी कर्मचाऱ्याना काम करावे लागते, त्याला स्वतंत्र अस्तित्त्व असत नाही.

३) प्रत्येक रचनेचं स्वतंत्र असं तर्कशास्त्र/उद्दिष्ट असतं. 'डेसळल `ष र्डीीलींीीश' रचनेचं तर्कशास्त्र महत्त्वाचं असते, तर ते रचनेमध्ये काम करणारे कर्मचारी कोणत्या जातीचे, धर्माचे आहेत याला महत्त्व नाही. रचनेमध्ये रचना ज्यासाठी निर्माण केली आहे, त्यासाठी काम करते. त्या रचनेमध्ये काम करणाऱ्या लोकांना त्या रचनेप्रमाणे काम करावे लागते. भांडवलशाही चौकट असेल तर ती रचना भांडवलशाहीसाठी काम करते.

पोलांझाने जी टीका केली, त्याला मिलीबॅन्ड ने उत्तर दिलं. रचनेचं तर्कशास्त्र महत्त्वाचं आहे. रचनेचा अभ्यास करताना, त्या देशातील विचार करूनच मांडणी केली पाहिजे. मिलीबॅन्डने आपल्या 'Marxism and Politics' मध्ये तीन महत्त्वाचे मुद्दे मांडले.

१) आधुनिक लोकशाही चळवळीच्याद्वारा कामगारांची ओळख वाढवूनच आपल्याला यश मिळू शकतो.

२) रशियाने क्रांती केली. राज्यसंस्थेची ताकद फार वाढविली आहे. राज्यव्यवस्थेची शासन करण्याची ताकद फार मोठ्या प्रमाणात वाढलेली आहे, त्यामुळे लोकशाही मार्गाने चळवळी, बळाचा वापर केल्यास ही चळवळी यशस्वी होण्याची शक्यता फार आहे.

३) जागतिक स्तरावर साम्राज्यशाही भूमिका होणे महत्त्वाचे आहे. १६६६ साली मजूर पक्षाने इंग्लंडमध्ये सुधारणा केला. साम्राज्यवादाचा मजूर पक्षाचे परराष्ट्रमंत्री झाले तरी हा ब्रिटीश बदलले नाही. शितयुध्दाचा मार्ग साम्राज्यशाहीकडे होता.

अशाप्रकारे राल्फ मिलीबँड ने स्वरूपात पोलांझाच्या टिकेला उत्तर दिले.

## ❑ राज्याचा संरचनावादी सिध्दांत : निकोस पोलंझा

फ्रेंच तत्त्वज्ञ निकोस पोलंझाने राज्याचा संरचनावादी सिध्दांत मांडला. निकोस पोलंझा यांनी फ्रान्समध्ये राहून मार्क्सवादाचे अनुयायीत्व स्विकारले आणि राज्यसंस्थेविषयी, आधुनिक काळामध्ये राज्यसंस्था कशाप्रकारे काम करते याचा अभ्यास केला व त्यांनी 'पॉलिटिकल पावर ॲन्ड सोशियल

क्लासेस आणि स्टेट पॉवर अॅन्ड सोशिअॅलिझम' ही दोन पुस्तके लिहिली. पोलंझाचा संरचनावादाचा सिध्दांत हा फ्रेंच मार्क्सवादात लुई अल्थुजरच्या विचारावर आधारित आहे. अल्थुजरने फॉर मार्क्स आणि लेनीन अॅन्ड फिलॉसॉफी अॅन्ड ऑदर एसेज ही दोन पुस्तके लिहिली. त्यामध्ये अल्थुजरनी संरचनावादाचा सिध्दांत मांडला आहे.

अॅल्थुजरच्या या संरचनावादाच्या आधारावरच पोलंझाने राज्याचा संरचनावादी सिध्दांत मांडला आहे. अॅल्थुजरचे चार मुद्दे पुढील प्रमाणे आहेत.

१) अॅल्थुजरचे हे मार्क्सवादाला तत्त्वज्ञान न समजता विज्ञान समजतात, कारण स्वत: मार्क्स व एंजल्सने आपले शास्त्रीय तत्त्वज्ञान म्हटले आहे. मार्क्सची शास्त्रीयता द्वंद्वात्मक भौतिकवादाच्या स्वरूपात प्रकट झाली आहे.

२) आज जगात मार्क्सवादाला आव्हान हे प्रत्यक्षार्थवादाचे आहेत. प्रत्यक्षार्थाद्यांनी विज्ञानाच्या सहाय्याने सर्वच क्षेत्रात स्वत:चा प्रभाव प्रस्थापित केला आहे, परंतु प्रत्यक्षार्थ तत्त्वज्ञानातून मांडले जाणारे तत्वज्ञान खोटे तत्त्वज्ञान आहे, त्याने तुम्हाला सामाजिक व आर्थिक परिस्थितीचे खरे ज्ञान होणार नाही, म्हणून अल्थुजरच्या मते, प्रत्यक्षार्थवादाच्या अनुभववादाचा पूर्णपणे त्याग करावा. प्रत्यक्षार्थवादातून येणारे विज्ञान खोटे तर मार्क्सवादातून येणारे विज्ञान प्रत्यक्ष विज्ञान आहे.

३) अॅल्थुजरच्या मते, मार्क्सवादाची चर्चा करताना मार्क्सवादावर आर्थिक नियंत्रणाचा आरोप होतो. आर्थिक संरचना ही अधिसंरचनेवर प्रभाव टाकते असे म्हटले जाते. त्याच्या मते, हा आरोप खोटा आहे. मूळ संरचना व अधिसंरचनेत कोणताही बदल होत नाही आणि संरचना व अधिसंरचना, उपसंरचना यांच्यातील संबंध गुंतागुंतीचे आहेत. कधीकधी उपसंरचना सुध्दा महत्त्वाची भूमिका पार पाडू शकते. राजकीय, सामाजिक, शैक्षणिक, वैचारिक, आर्थिक ह्या वेगवेगळ्या पातळ्या एकमेकांशी संबंध ठेवतात व त्याच्या गुंतागुंतीच्या परस्पर आंतरक्रियेतून सामाजिक बदल घडतात. या पातळ्या स्वतंत्र व स्वायत्त असतात, परंतु अंतिमत: आर्थिक पातळी प्रभावी ठरते.

४) अॅल्थुजरच्या मते, भांडवलदाराचा उद्देश भांडवली उत्पादन संबधाचे पुर्नउत्पादन करणे असते. म्हणजेच भांडवलशाहीच्या विकासाला योग्य वातावरण तयार करते. कारखान्यातील नफा कारखान्यातच गुंतविला जातो. या पुर्नत्पादनात अॅथ्युजरच्या मते, शिक्षण व्यवस्था महत्त्वाची भूमिका पार पाडते.

अॅल्थुजरच्या संरचनावादाच्या विचाराचे विकास करण्याचे कार्य निकोस पोलंझाने केले. पोलझाच्या

विचारावर दोन विचारवंताचा प्रभाव पडला, त्यामध्ये ॲंतिनिओ ग्रामसीचा राज्यविषयक विचाराचा प्रभाव, आणि १९८० च्या दशकातील मार्क्सवादी मीमांसा प्रभावी होती. अनेक समाजशास्त्रज्ञ या विचारांच्या प्रभावाखाली होते. पोलांझा ने आपले राजकीय विचार नव्या परिस्थितीत मांडले. राज्यविषयक विचार मांडताना पोलंझा ने पुढील तीन प्रश्न उभे केले.

१) लेनिननंतर युरोपमधील भांडवलशाहीचे स्वरूप मोठ्या प्रमाणात बदलेले आहे, ज्यावेळी तो लिहित होता, त्यापेक्षा आजच्या युरोप व अमेरिकेच्या भांडवलशाहीत मोठ्या प्रमाणात बदल झाला होता.

२) कम्युनिस्ट राज्याचे वैशिष्ट्य म्हणजे सार्वजनिक क्षेत्रात वाढ करून सरकारी मालकीचे उद्योग स्थापन करणे म्हणजे उत्पादनाच्या क्षेत्रातसुध्दा आता राज्यसंस्थेने पदार्पण केले आहे.

३) आधुनिक भांडवलशाही व्यवस्थेच्या जागी जर समाजवादी समाज व्यवस्था स्थापावयाची असेल तर कोणते मार्ग उपलब्ध आहेत. रशियाच्या मार्गाचा (लेनिनचा) स्विकार करणे योग्य नाही, त्यामुळे युरोप व अमेरिकेतल्या समाजव्यवस्थेसंबंधी आपले विचार पोलंझाने मांडले. त्याच्या मते, संपूर्ण भांडवलशाही व्यवस्था मोठ्या प्रमाणात स्वत:चे पुर्नउत्पादन करते. या बरोबरच आधुनिक काळात राज्यसंस्था व शासनाचा विस्तार झाला. भांडवलशाहीने दोन गोष्टी केल्या.

   (अ) कामगार म्हणून ओळख न ठेवता व्यक्ती ही ओळख निर्माण केली. व्यक्तीच्या एकाकीपणावर भर दिला. एकाकीपण व्यक्तीवादाला पोषक ठरले.

   (ब) व्यक्तीची ओळख 'लोक' अशी दिली. व्यवसायाच्या आधारे ओळख राहिली नाही, त्याचा मूळ चेहरा हिरावून घेण्याचा प्रयत्न झाला.

भांडवलशाही राज्यव्यवस्थेला समाजाचे एकीकरण करायचे असते. ही नवी ओळख देण्याचे कार्य प्रसार माध्यमे करतात, ही नवी ओळख म्हणजेच राष्ट्र होय. पोलांझाने त्यासंबंधी पुढील भूमिका मांडली.

१) पोलंझाच्या मते, वैचारिक पातळीवर राज्यसंस्थेचे प्रभुत्व स्थापन करण्यासाठी या प्रकारचा प्रचार व प्रसार केला जातो. याचा मुख्य उद्देश भांडवलशाहीचे पुनरुथ्थापन कायम रहावे हा आहे, श्रमिकांमधील वर्गिय जाणिवा बोथट करण्याचा प्रयत्न राज्य संस्था करते. हा वर्ग संघटित होऊ नये व जर झाला तर त्याला विघटित करण्याचे कार्य राज्यसंस्था करते.

२) पोलंझाच्या मते, जुन्या काळात राज्यसंस्था ही एक त्रयस्थ संस्था होती. राज्य ही पंचाची भूमिका पार पाडते, असा एक सिध्दांत होता. कामगार व मालक यांच्यात वाद झाला, तर

त्रयस्थ संस्था म्हणून राज्यसंस्था कार्य करत असे, परंतु आता सार्वजनिक क्षेत्राचा विकास झाला. राज्यसंस्था व्यक्तिचे कामगार म्हणून असणारी अस्मिता रद्द करून व्यक्तीचे एकाकीकरण करते आणि व्यक्तिला लोक आणि राष्ट्र म्हणून नवी ओळख देण्याचा प्रयत्न करते.

३) आधुनिक काळातील कल्याणकारी व्यवस्थेत राज्यसंस्था, उत्पादन व व्यवसाय क्षेत्रात भाग घेते, त्यामुळे ती तटस्थ न राहता वर्गसंघर्षाचा भाग बनली आहे.

४) पोलंझाच्या मते, राज्यसंस्था ही आपले वर्चस्व टिकविण्यासाठी विचारसरणीचा प्रभाव पाडते, त्यामुळे विचारसरणी सुध्दा एक वर्गसंघर्षाचा भाग बनला आहे. प्रथम वर्गसंघर्ष हे वैचारिक पातळीवर लढविले जातात. प्रसारमाध्यमाच्या मार्गाने वैचारिक संघर्ष करण्याचे कार्य राज्यसंस्था करते.

कोणत्याही व्यवस्थेत आर्थिक संरचना महत्त्वाची असते. मात्र क्रांती करताना आर्थिक संरचनेद्वारे करता येत नाही. ती राजकीय पातळीत करावी लागते म्हणून अर्थकारणाबरोबर राजकारण महत्त्वाचे असते. तर्कशास्त्र अर्थकारण ठरविते, परंतु हे तर्कशास्त्र अंमलात आणण्याचे काम राजकीय व्यवस्था करते, त्यामुळे क्रांती राजकीय स्तरावर व्हावी लागते, त्याची दोन कारणे आहेत.

१) राज्यसंस्था ही सर्व रचनांना, पातळ्यांना एकत्र ठेवण्याची काम करते, तसेच एकात्मतेचे रूप देण्याचे कार्य केल्यामुळे राज्यसंस्था ही सर्वत्र बदल करू शकते.

२) राज्यसंस्था सर्व बदलांचे, रचनाचे वैचारिक समर्थन (Rational Justification) करते, म्हणून राजकीय क्रांती करायची असेल तर अंतिमत: ही क्रांती राज्याच्या स्तरावर करावी लागते. राजकीय क्रांती पूर्ण झाल्याशिवाय कोणतीही क्रांती पूर्ण समजली जात नाही.

## ❑ राज्याच्या अधिमान्यतेच्या पेचप्रसंगाचा सिध्दांत : हेबरमास

१९२३ मध्ये जर्मनीच्या फ्रॅकफर्ट शहरात 'Frankfort School of Critical Theory' या संस्थेची स्थापना झाली. कोणत्याही गोष्टीची चिकित्सा केल्याशिवाय त्या गोष्टीचा स्विकार करू नये हे या संस्थेचं वैशिष्ट्य आहे. या संस्थेमध्ये ॲडोर्नो, मार्क्युस, विटफोगेल, कार्ल कोर्श, एरिक फ्रॉम, हेबरमास इ. विचारवंत होते. हे सर्व विचारवंत जास्तीत जास्त ज्यू होते. फ्रॅकफर्टचे हे विचारवंत मार्क्सवादी होते. नवमार्क्सवादातसुध्दा त्याची महत्त्वाची कामगिरी आहे. हेबरमासने सुरुवातीस मार्क्सवादी विचार मांडले. १९८० नंतर मार्क्सवादाच्या चौकटीतून बाहेर जाऊन त्याने विचार मांडल्या, त्यामुळे तो अर्धमार्क्सवादी व अर्धउदारमतवादी विचारवंत म्हणून ओळखला जातो, त्याने मुख्यत: तीन विचार मांडले.

**१. व्यक्तिवाद व भौतिकवाद :** भांडवलशाहीमध्ये व्यक्ती एकाकी बनत चालला आहे. सार्वजनिक व्यवहार हळूहळू संकोच पावत चालला आहे व त्याजागी व्यक्तीवाद व भौतिकवाद वाढत आहे.

**२. माणसामाणसातील संवाद :** व्यक्ती-व्यक्तीमध्ये संवाद असणे महत्त्वाचे असते, परंतु आज माणसामाणसांतील संवाद थांबला आहे, त्या ऐवजी एकाकीपणा न बोलणे या गोष्टी वाढत आहे.

**३. अधिमान्यतेच्या पेचप्रसंगाचा सिध्दांत :** आधुनिक काळात भांडवलशाही व्यवस्था अधिमान्यतेच्या पेचप्रसंगाला बळी पडत आहे. तो पेचप्रसंग कशा प्रकारचा आहे, याची चर्चा हेबरमास याने केली आहे.

हेबरमासने मांडलेल्या अधिमान्यतेच्या पेचप्रसंगाच्या सिध्दांताचे विवेचन खालील मुद्यांच्या आधारे स्पष्ट करता येते.

## १. भांडवलशाहीचे नफा व त्याचा उपयोग :-

हेबरमासच्या मते, आपल्या जीवनातील सार्वजनिक जागेत मोठ्या प्रमाणामध्ये भांडवलशाही पसरत आहे. भांडवलशाही क्षेत्रात मक्तेदार व भांडवलदार प्रभावी ठरले आहेत तर कल्याणाकारी क्षेत्रात सार्वजनिक उद्योग प्रभावी ठरले, परंतु राज्यसंस्थेने भांडवलशाही अर्थव्यवस्थेला अधिमान्यता देण्याचे काम केले. भांडवलशाहीतील भांडवलदारानी उत्पादन हे सामाजिक स्तरासाठी करतात, पण त्याचा नफा मात्र खाजगी कामासाठी उपयोगात आणतात. या वेळेस राज्यसंस्था तटस्थतेची भूमिका घेते, परंतु आधुनिक काळात विज्ञान व तंत्रज्ञानाचे महत्त्व वाढत असल्याने विज्ञान व तंत्रज्ञान आमचे प्रश्न सोडवेल अशा प्रकारची भावना व्यवस्थेत केली जाते.

## २. अधिमान्यतेसाठी विज्ञान व तंत्रज्ञानावर भर :-

विज्ञान व तंत्रज्ञानाद्वारे अधिमान्यता प्रस्थापित केली जाते. हेबरमासच्या मते जनतेचे अधिकार काढून घेण्यासाठी विज्ञान व तंत्रज्ञानाचा बागुलबुवा केला जातो. त्याच्यावर भर देऊन त्याला प्रतिष्ठा दिली जाते. याद्वारे राजकीय निर्णय पुढे ढकलले जातात, विज्ञान व तंत्रज्ञान हे अधिमान्यतेसाठी वापरले जातात.

## ३. राज्यसंस्था मूळसंरचनेचा भाग :-

हेबरमासच्या मते, आधुनिक काळात राज्यसंस्था ही केवळ इमारतीच्या संरचनेचा भाग राहिली नाही. तर ती राज्यसंस्था आता मूळ संरचनेचा भाग बनली आहे, त्याची तीन कारणे पुढीलप्रमाणे :-

१) राज्यसंस्था स्वत: उत्पादन क्षेत्रात उतरली आहे व स्वत:चे उद्योगधंदे सुरू केले.

२) अनेक महत्त्वाचे निर्णय हे सरकारचे कर्मचारी, तंत्रज्ञ, नोकरशाही वर्गच घेतात. त्याना तसे निर्णय घेण्याचे अधिकार दिले आहेत.

३) आधुनिक काळात विज्ञान व तंत्रज्ञान याचा विकास राज्याने करायचे व त्याचा उपभोग उद्योगधंद्यांनी घ्यायचा असे घडत आहे, त्यामुळे आता राज्यसंस्था उपसंरचनेचा भाग राहिली नाही तर ती मूळ संरचनेचा भाग बनली आहे.

## ४. आधुनिक भांडवलशाहीचे क्षेत्र :-

दोन विभागात विभागले आहे.

१. **सार्वजनिक क्षेत्र :** हेबरमासच्या मते, सार्वजनिक उद्योगधंद्याचा मुख्य उद्देश भांडवलशाही व्यवस्थेला आधार देणे हा आहे. प्रस्थापित व्यवस्थेला आधार देण्याचे कार्य सार्वजनिक क्षेत्र करते.

२. **खाजगी क्षेत्र :** त्याचे दोन प्रकार पडतात.

*(अ) **विखुरलेले :*** या क्षेत्रामध्ये विखुरलेल्या अशा खाजगी उद्योगधंद्याचा समावेश होतो की, ज्यांचा विकास व आर्थिक व्यवहार बाजारपेठेच्या आधारे होतो.

*(ब) **मक्तेदार भांडवलदार :*** मक्तेदार भांडवलशाहीमध्ये एकाच अशा उद्योगधंद्याचे बाजारपेठेवर वर्चस्व असते. ते इतर उद्योगधंद्यांना कोणत्याच प्रकारच्या स्पर्धेस वाव देत नाही, त्यामध्ये मोठ्या प्रमाणात भांडवल संचय झालेला दिसतो.

## ५. पेचप्रसंग निर्माण होण्याची कारणे :-

आधुनिक भांडवलशाही व्यवस्थेत राज्यसंस्थेच्या अधिमान्यतेचा पेचप्रसंग का निर्माण होतो. हेबरमासच्या मते, आधुनिक भांडवलशाही व्यवस्था ही व्यापक अशा आर्थिक हितसंबंधावर आधारलेली व्यवस्था आहे. या व्यवस्थेत स्थिरता आणण्यासाठी राज्यसंस्था आर्थिक व्यवहारात हस्तक्षेप करते. आधुनिक काळात राज्यसंस्थेकडे प्रचंड पैसा आहे. भांडवलशाही अर्थव्यवस्थेच्या मते, राज्याने तो पैसा अर्थव्यवस्थेत गुंतवावा. अशाप्रकारे राज्यसंस्थाच्या आर्थिक पाठिंब्याशिवाय संपत्तीच्या संचयनाची प्रक्रिया भांडवलशाहीला चालू ठेवता येत नाही. तर दुसरीकडे सामाजिक स्तरावर शांतता टिकविण्यासाठी लोकांचा पाठिंबा हवा असतो, त्यामुळे लोकांसाठी कल्याणकारी योजना राबवाव्या लागतात. कारण लोकांच्या पाठिंब्याच्या जोरावर मिळू शकत नाही, म्हणून त्याच्यासाठी राज्यसंस्थेला मोठा खर्च करावा लागतो. हेबरमासच्या मते, प्रत्येक माणसापुढे अर्थव्यवस्थेचे संकट उभे राहते. नवनवीन प्रकारच्या आर्थिक संकटांना तोंड द्यावे लागते.

## ६. पेचप्रसंगाचे प्रकार :-

हेबरमासच्या मते, तीन प्रकारचे पेचप्रसंग असतात, त्यामध्ये विवेकनिष्ठ पेचप्रसंग, प्रगतीच्या आकांक्षाबद्दलचा पेचप्रसंग व राज्याच्या अधिमान्यतेचा पेचप्रसंग याचा समावेश होतो. हेबरमासच्या मते, विवेकनिष्ठ पेचप्रसंग समाजाच्या पातळीवर निर्माण झाला. भांडवलशाही व्यवस्थेमध्ये कोणत्याही गोष्टीचा अभ्यास मानसिक स्तरावर समग्रतेने केला जाऊ शकत नाही. नैतिकतेचे प्रश्न विश्वासातून पाहिले जाऊ शकत नाही. त्यामुळे विवेकनिष्ठतेबद्दल समाजाचा विश्वास नष्ट झाला आहे. प्रगतीचा वेग मंदावला आहे. लोकांच्या मनात काम करण्याची प्रेरणा राहिली नाही. लोकांच्या मनात सर्व बाबतीत निराशा निर्माण झाली आहे, त्यासाठी खालील मुद्दे हेबरमासने मांडले.

१. **सत्तेसाठी राजकारणात तीव्र स्पर्धा :** राजकारणामध्ये सत्तेसाठी वेगवेगळे पक्ष स्पर्धात्मक बनले आहेत, परंतु त्यात वेगळा निर्णय होत नाही, कारण ती स्पर्धा समाजातील विरोधावर मर्यादित केली जाते.

२. **भांडवलशाही अर्थव्यवस्थेतील आंतरविरोध :** भांडवलशाही अर्थव्यवस्थेमध्ये आर्थिक क्षेत्रात मोठा आंतरर्विरोध आहे म्हणजे भांडवलशाहीत समाजाच्या स्तरावर निर्माण केलेला सार्वजनिक उद्योगधंद्यातील नफा भांडवलदाराकडे जातो, याबद्दल समाजामध्ये आंतर्विरोध निर्माण झाला, परंतु राज्य व्यवस्थेत धोका निर्माण झाला नाही, कारण जॉन किन्सच्या मते, अर्थशास्त्राप्रमाणे कल्याणकारी राज्यावर मोठा खर्च केला, त्यामुळे आर्थिकवाद निर्माण झाला व त्यामुळे आंतर्विरोध कमी झाला.

३. **अर्थव्यवस्थेतील अस्थिरपणा :** ही अर्थव्यवस्था अस्थिर असते कारण ती नेहमीच तेजी व मंदीत अडकलेली असते, त्यामुळे मोठे संघर्ष टळले, तरी लहान संघर्ष होतच असतात.

४. **राज्यसंस्थेच्या विरोधात आर्थिक पेचप्रसंग :** अशा परिस्थितीत राज्यसंस्था अर्थव्यवस्थेत हस्तक्षेप करून हे प्रश्न सोडविते. राज्यसंस्था स्वत: धोक्यात येऊ नये म्हणून समाजातील महतत्वाच्या गटांना आर्थिक मदत करते, तेच जर राज्यसंस्थेच्या विरोधात गेले तर आर्थिक पेचप्रसंग निर्माण होतो.

५. **कल्याणकारी राज्याच्या दृष्टीने नवा खर्च :** राज्यसंस्थेवर नव्या जबाबदाऱ्या सोपविल्यामुळे कल्याणकारी राज्याच्या दृष्टीने नवा खर्च राज्यावर लादला जातो.

६. **राज्याच्या जबाबदारीत वाढ :** राज्याच्या जबाबदारीत वाढ झाल्यामुळे ती जबाबदारी पार पाडणे राज्याला शक्य होत नाही व सर्वच बाबतीत खर्च वाढतो, त्यामुळे राज्यापुढे नवे प्रश्न निर्माण होतात.

७. **सार्वजनिक वित्ताबद्दल समस्या :** सार्वजनिक वित्त कसे वापरावे याबद्दल समस्या निर्माण होते. त्यामुळे राज्यसंस्था वादाच्या भोवऱ्यात सापडते.

८. **समाजवादी क्रांतीची आवश्यकता :** हेबरमासच्या मते, अशावेळी समाजवादी क्रांती करावी पण ती लेनिनच्या पध्दतीने नाही. नव्या समाजाच्या वाटचालीसाठी अर्थव्यवस्थेत व समाजव्यवस्थेत बदल होण्याची शक्यता असते. हेबरमासच्या मते, भांडवलशाही अर्थव्यवस्था व राज्यसंस्था स्वत:चे पुनरुत्पादन करतात. ही पुनरुत्पादन गमविल्यास समाजवादी व्यवस्थेकडे वाटचाल करणे सोपे जाते. समाजामध्ये हळूहळू बदल होईल व स्वत:च्या आंतरर्विरोधामुळे भांडवलशाही नष्ट होईल असे हेबरमासने म्हटले आहे. अशाप्रकारे हेबरमासने राज्याचा अधिमान्यतेचा पेचप्रसंगाचा सिध्दांत मांडला.

## २.५ अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ


१. **Chandoke Neera** *(1995)* : *"State and Civil Society : Explorations in Political Theory"*, Sage Publication, New Delhi.

२. **Gauba O. P.** *(2011)* : *"An Introduction to Political Theory"*, Macmillan Publisher, New Delhi.

३. **Kolakowski, L.** *(1976)* : *"Main Currents in Marxism"*, Vol. I & II, Oxford University Press, New Delhi.

४. **Ramaswamy Sushila** *(2015)* : *"Political Theory : Ideas and Concepts"*, pHi Learning Private Ltd., Delhi.

५. **Ray & Bhattacharya** *(1976)* : *"Political Theory, Ideas and Institutions"*, The World Press Pvt. Ltd., Calcutta.

६. **Verma S. P.** *(1975)* : *"Modern Political Theory"*, Vikas Publishing, New Delhi.

७. **चौसाळकर अशोक** *(२०१७) : ''आधुनिक राजकीय सिध्दांत''*, युनिक ॲकॅडमी, पुणे.

८. **डोळे ना. य.** *(२००९) : ''राजकीय विचारांचा इतिहास''*, कॉन्टीनेंटल प्रकाशन, पुणे.

९. **पाठक नवराज** *(२००४) :''पाश्चीमात्य राजनीतिक विचारक भाग-१'*, आवृत्ती दुसरी, प्रकाशक : विश्वभारती पब्लिकेशन्स, नवी दिल्ली.


❑ ❑ ❑

**घटक–३**

# मूलभूत संकल्पना–१

## (Key Concepts - I)

अनुक्रमणिका

३.० उद्दिष्ट्ये

३.१ प्रास्ताविक

३.२ विषय विवेचन

 ३.२.१ सत्ता आणि अधिसत्ता

 ३.२.२ प्रभुत्व आणि अधिमान्यता

 ३.२.३ स्वातंत्र्य, समता आणि बंधुता

 ३.२.४ जॉन रॉल्स यांचा न्यायाचा सिद्धांत

३.३ सारांश

३.४ पारिभाषिक शब्द

३.५ स्वयंअध्ययन प्रश्न व उत्तरे

३.६ सरावासाठी स्वाध्याय

३.७ अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ

## ३.० उद्दिष्ट्ये

सदर अभ्यासघटकाच्या अध्ययनाची अध्ययनकर्त्यासमोर उद्दिष्ट्ये खालीलप्रमाणे :-

१. आधुनिक राजकीय संकल्पना समजून घेणे.

२. सत्ता, अधिमान्यता आणि अधिसत्ता यांचा सहसंबंध अभ्यासणे.

३. स्वातंत्र्य, समता आणि बंधूता यांचे सैद्धांतिक व व्यावहारिक स्वरूप समजून घेणे.

४. जॉन रॉल्स यांचा न्यायाचा सिद्धांत समजून घेणे.

## ३.१ प्रास्ताविक

सत्ता, अधिसत्ता, अधिमान्यता इत्यादी संकल्पना आपण राज्यशास्त्रातील मुलभूत संकल्पना म्हणून अभ्यासणार आहोत. समाज व्यवस्था जेव्हापासून अस्तित्वात आली तेव्हापासून सत्ता या राजकीय संकल्पनेचा आपण शोध घेवू शकतो. राज्यशास्त्रातील महनीय राज्यशास्त्रज्ञ प्रभूतींनी सत्तेबद्दल आपले विचार आपल्या मौलिक ग्रंथ लेखनात स्पष्ट करून सांगितले आहेत. उदा. प्लेटो ने 'रिपब्लिक', हॉब्ज ने 'लेविएथान', कार्ल मार्क्स ने 'कम्युनिस्ट मॅनिफेस्टो', रूसो ने 'सामाजिक करार', ॲरिस्टॉटल ने मेटाफिजिक्स इ. ग्रंथात प्राचीन व मध्ययुगीन कालखंडात सत्तेविषयक विचार मांडणेत आले आहेत. आधुनिक कालखंडात सत्तेविषयक विचार मांडण्यात आले. आधुनिक राज्यशास्त्राचा जनक मॅकियाव्हेली ने 'प्रिन्स', लास्की ने 'Grammer of Politics', जे. एस. मिल ने 'Representative Government' इत्यादी ग्रंथात सत्तेविषयक विचार मांडलेले आपणास निदर्शनास येते. याचा अर्थ मानवी जीवनाचा कोणताही कालखंड प्राचीन, मध्ययुगीन आणि आधुनिक कालखंड असो वा आशिया, आफ्रिका, युरोप असा कोणताही प्रांत असो, सत्ता ही मानवी जीवनाच्या केंद्रस्थानी होती, आहे व राहिल. सत्ता ही सार्वकालिक व सर्वश्रेत्रीय आहे. प्लेटो, हॉब्ज, मार्क्स आदी प्रभूतींनी साकलिक (Macro) पातळीवर सत्तेचा विचार केला तर मेरियम, कप्लान, लॉस्वेल व कॅटलिन इ. प्रभूतींनी सौक्ष्मीक (Micro) पातळीवर सत्तेचा विचार केला आहे.

राजकारण हे आपल्या जीवनातील एक असे क्षेत्र आहे जिथे सर्वांसाठी नियम बनविले जातात. सर्वांसाठी निर्णय घेतले जातात; सर्वांचे हक्क, कर्तव्ये आणि जबाबदाऱ्या निश्चित केल्या जातात. या सर्व निर्णयांना मूर्त रूप देण्यासाठी सत्ता, अधिसत्ता आणि अधिमान्यतेची आवश्यकता असते. राजकारणात कोणत्याही निर्णयाची अंमलबजावणी करण्यासाठी सत्तेचा वापर आवश्यक ठरतो; परंतु सत्तेचा वापर तिथेच प्रभावी ठरतो जिथे सत्ता केवळ बलप्रयोगाचे साधन न राहता अधिमान्यता प्राप्त करून अधिसत्तेचे रूप धारण करते. रूसो ने 'द सोशल कॉन्ट्रॅक्ट' (सामाजिक करार-१७६२) या आपल्या ग्रंथात लिहिले आहे; ''सर्वाधिक बलशाली असलेला मनुष्यदेखील कायमस्वरूपी सत्ताधिश बनून राहू शकत नाही, जोवर तो आपल्या सत्तेला 'अधिकारांचे' रूप देत नाही आणि आज्ञापालनाला 'कर्तव्या'चे रूप देत नाही'' म्हणजेच सत्ता स्थायी स्वरूपाची बनण्यासाठी अधिमान्यतेची आवश्यकता असते. थोडक्यात, अधिसत्ता हा एखाद्या व्यक्तिचा, संस्थेचा, नियमाचा वा आदेशाचा असा गुण अथवा क्षमता आहे, ज्यामुळे त्याला योग्य अथवा प्रामाणिक मानून स्वेच्छेने त्याच्या निर्देशांचे पालन केले जाते. अधिसत्तेच्या वापरामुळे बंधनकारक धोरणे, नियम आणि निर्णय समाजात स्विकारले जातात आणि प्रभावीपणे लागू केले जातात. अधिसत्तेचे दोन मुख्य घटक सत्ता आणि अधिमान्यता हे आहेत. एखादा निर्णय अथवा नियमाला अधिमान्यता तेव्हा प्राप्त होते, जेव्हा लोक त्या निर्णयाला वा नियमाला स्वत:साठी आणि सर्व

समाजासाठी उपयुक्त व कल्याणकारी समजतात, त्यामुळे त्यांचा मनापासून स्विकार करून त्यांचे पालन करण्यास तयार असतात.

उदारमतवादी लोकशाहीच्या प्रस्थापनेने मानवी जीवनाला स्वातंत्र्य, समता आणि बंधूता आदी मानवी मूल्ये बहाल केली आहेत. फ्रेंच राज्यक्रांतीने या मूल्यांना अधिष्ठान मिळवून दिले. उदारमतवाद हा लोकशाहीचा पाया असतो. या अर्थाने स्वातंत्र्य (Liberty), समता (Equality) आणि बंधुता (Fraternity) हा लोकशाहीचा पाया आहे. राज्यशास्त्राच्या अभ्यासकांस या मानवी मूल्यांचा गर्भित अर्थ समजून घेणे सदर अभ्यासघटकात अभिप्रेत आहे.

## ३.२ विषय विवेचन

'राजकीय व्यवस्था' समजून घ्यावयाची असेल तर सत्ता, अधिसत्ता आणि आधिमान्यता यांचा सहसंबंध राज्यशास्त्रीय परिभाषेत (Terminology) समजून घेणे अभ्यासकांस इष्ट ठरेल. दुसऱ्या महायुद्धानंतर नवस्वतंत्र झालेल्या राष्ट्रांनी लोकशाही हा शासन प्रकार स्विकारला. मानवी जीवनाच्या उत्क्रांतीच्या प्रवासात स्वातंत्र्य, समता आणि बंधूता या मानवी मूल्यांना अनन्यसाधारण असे महत्त्व आहे. शासनाचा मग कोणताही प्रकार असो, राजेशाही, हुकूमशाही, साम्यवाद इत्यादी शासन प्रकारात 'राजकीय व्यवस्था' असते व जिथे राजकीय व्यवस्था आकाराला येते तिथे सत्ता, अधिसत्ता आणि अधिमान्यता यांचा अन्योन्य संबंध असतो. हीच बाब मानवी मूल्यांच्या बाबतीत आहे. स्वातंत्र्य, समता आणि बंधूता ही जरी लोकशाही मूल्ये असली तरी जगात अशा काही राजेशाह्या होवून गेल्या की तिथे ही मानवी मूल्ये व्यवहारित होती. उदा. भारतात असलेल्या छत्रपती शिवरायांच्या राजेशाही राजवटीमध्ये स्वातंत्र्य, समता आणि बंधूता ही मानवी मूल्ये सार्वजनिक जीवनात व्यवहारित होती. प्रस्तुत अध्ययन घटकात अध्ययन चौकटीच्या मर्यादेत राहून आपण आधुनिक राजकीय संकल्पना अभ्यासणे उचित ठरेल.

### ३.२.१ सत्ता आणि अधिसत्ता

प्रभाव $\rightarrow$ सत्ता + अधिमान्यता = अधिसत्ता.

Influence $\rightarrow$ Power + Legitimacy = Authority.

उपरोक्त विवेचनात विशद केल्याप्रमाणे सत्ता, अधिमान्यता आणि अधिसत्ता यांचा अन्योन्य असा सहसंबंध असतो. कोणतीही राजकीय व्यवस्था आणि शासनव्यवस्था आकाराला येण्यासाठी हे तीन घटक खूप महत्त्वाचे असतात. आपण येथे अध्ययन सोयीने सत्ता आणि अधिसत्ता समजून घेणार आहोत.

## सत्ता (Power)

❑ **व्याख्या :-**

१. ''व्यक्तीच्या ठिकाणी असणारी इतरांच्या संबंधात धोरणांवर प्रभाव टाकण्याची क्षमता म्हणजे सत्ता होय.''

***- चार्लस् मेरियम***

२. ''जेव्हा एखादी व्यक्ती किंवा गट आपल्या इच्छेनुसार इतर व्यक्तींच्या कृती निर्धारित करतो, तेव्हा त्यांच्यात जो संबंध निर्माण होतो त्यास 'सत्ता' असे संबोधिले जाते.''

***- डेव्हीड इस्टन***

३. ''लोकांवर नियंत्रण प्रस्थापित करण्यासाठी आणि ते सातत्याने चालू ठेवण्याची जी क्षमता आवश्यक असते तिला 'सत्ता' असे म्हणतात.''

***- मॉर्गेन्था***

४. ''लोकांनी दिलेल्या आश्वासनांची पूर्ती करण्यासाठी, समाजातील साधनसामग्रीचे संघटन करण्यासाठी लागणारी क्षमता म्हणजे 'सत्ता' होय.''

***- टालकॉट पार्सन्स***

उपरोक्त व्याख्यांचा परामर्श घेतल्यास सत्तेचा अन्वयार्थ ध्वनीत होतो. इतरांचे वर्तन आपल्या म्हणण्यानुसार घडवून आणणे हे ज्या व्यक्तीला वा व्यक्ती समूहाला शक्य होते, तो व्यक्ती वा व्यक्ती समूह सत्ताधारी बनतो. उदा. एखाद्या प्रशासकीय अधिकाऱ्याने प्रशासकीय कर्मचाऱ्यांस एखादा आदेश दिला तर ते संबंधित कर्मचारी त्या आदेशांचे नियमाबरहुकूम पालन करतात तेव्हा त्या प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या अधिकारात 'सत्ता' वास करते हे स्पष्ट होते. किंवा, एखाद्या राजकीय नेत्याने आपल्या कार्यकर्त्यांस दिलेल्या आव्हानानुसार ते जनआंदोलनात सहभागी होतात, तेव्हा त्या राजकीय नेत्याच्या ठिकाणी 'सत्ता' वास करत असते. आपले म्हणणे इतरांच्यावर लादणे यापेक्षा आपले म्हणणे इतरांना पटवून देण्यातून समोरच्या व्यक्तीचे वा व्यक्तिसमूहाचे वर्तन बदलते तेव्हा ते सत्तेचे सकारात्मक अन् विधायक स्वरूप असते. सत्ता ही दोन चलांवर (variable) साकारत असते. ती दोन चले म्हणजे सत्ताग्राहक व सत्ताधारक होत. यातील एक जरी चल अनुपस्थित असेल तर सत्ता आकारात येत नाही. उदा. एखादा शासकीय नियम राज्यात सरकार लागू करते, त्यावेळी राज्य शासन हे सत्ताधारक असते; पण तो नियम राज्यातील नागरिकांनी न पाळता त्याला विरोध केला तर नागरिक सत्ता ग्राहक राहत नाहीत. अशावेळी सत्ताधारक राज्यशासनाच्या सत्तेचे मूल्य हे शून्य असते. शासनाला नियम, कायदा रद्द

करावा लागतो. यावरून हे स्पष्ट होते की सत्ता ही सत्ताधारक व सत्ताग्राहक या दोन चलांवर अवलंबून असते.

साधनसामुग्रीच्या असमान वाटपातून सत्ताग्राहक व सत्ताधारक हे दोन वर्ग निर्माण होत असतात. साधनसामुग्रीच्या असमान वाटपातून अभिजन व बहुजन वर्ग निर्माण होतात. अभिजन अल्पसंख्य तर बहुजन बहुसंख्य असतात. बहुसंख्य नेहमीच साधनसामुग्रीसाठी अल्पसंख्यवर अवलंबून असतात. 'परावलंबित्व असणे' ही स्थिती नेहमीच बहुसंख्याकांस अभिजनांकडून 'गरजांची पूर्तता' होण्याची अभिलाषा बाळगत असते. जसे की, नागरिक नेहमीच सुखसोयींसाठी सरकारवर अवलंबून असतात. उदा. पिण्याच्या पाण्याची सोय, मोफत प्राथमिक शिक्षण, माफक दरात आरोग्य सेवा इत्यादीसाठी नागरिक सरकारी योजनांवर भिस्त ठेवून असतात. 'गरजांची पूर्तता' करणारे नेहमीच अल्पसंख्य तर 'गरजांची आवश्यकता' असणारे नेहमीच बहुसंख्य असतात.

सत्तेच्या या सर्वसाधारण उपयोगामुळे ती राजकीय जीवनाचा केंद्रबिंदू ठरते. पण तिला गुप्त परिमाणक्षमता येण्याचे कारण ती एक वर्धिष्णू ''क्रयवस्तू'' म्हणून वर्तनलक्षी अभ्यासकांनी मांडली. स्टॅलिनची सत्तेची तुलना रूझवेल्टच्या सत्तेशी करून स्टॅलिन अधिक मोठा सत्ताधारक होता असे आपण म्हणतो किंवा व्यक्तिंचे त्यांच्या सत्तेनुसार अग्रक्रम निर्धारित करतो त्याअर्थी सत्ता ही परिमाणक्षम संकल्पना आहे असे त्यांनी गृहीत धरले. ''एकदा का क्रमदेय पद्धतीने संकल्पना तयार करून सत्तेच्या श्रेणीनुसार मांडणी केली की मग परिगणनाची परिमाण व पद्धती विशिष्ट प्रश्नाच्या गरजेनुसार तयार करता येऊ शकतील.'' अशा शब्दात लास्वेल-कप्लान यांनी आशावाद व्यक्त केला आहे. एवढेच नव्हे तर विविध पातळ्यांवरील व्यक्तींनी राबविलेल्या सत्तेचे नेमके मापन जर केले गेले तर आपोआप राजकारणाचे गतिशास्त्र आपण काटेकोरपणे वर्णन करू शकू असाही त्यांचा दावा होता. त्यांनी तसेच रॉबर्ट डहाल यांनी १९५० नंतरच्या दशकात तसा प्रयत्नही केला.

सत्तेची वैशिष्ट्ये अभ्यासणे क्रमप्राप्त ठरेल, ती पुढीलप्रमाणे :-

### १. संबंधात्मक व वर्तनात्मक :-

सत्ता ही संबंधात्मक आणि वर्तनात्मक असते. एखाद्या व्यक्तीकडे गडगंज संपत्ती असते; पण लोक त्याच्या म्हणण्याप्रमाणे आपल्या वर्तनात बदल करत नाहीत, याउलट एखाद्याकडे गडगंज संपत्ती नसूनही लोक त्याच्या म्हणण्यानुसार आपले वर्तन बदलतात. हे 'सत्ताग्राहक व सत्ताधारी' या दोहोंच्या संबंधावर अवलंबून असते. खूप वर्षे सत्तेत असणाऱ्या एखाद्या राजकीय पक्षाला जनता निवडणूकीत पराभूत करते. पार्सन्सच्या म्हणण्यानुसार लोकांना दिलेल्या आश्वासनांच्या पूर्तीसाठी शासन कटिबद्ध राहते. त्यावेळी लोक संबंधित राजकीय समूहास राजकीय सत्ता सर्वानुमते बहाल करतात.

## २. प्रसंगविशिष्ट :-

एखाद्या व्यक्तीच्या राजकीय सत्तेचे मोजमाप आपण त्या व्यक्तीने वेगवेगळ्या प्रसंगात दाखवलेल्या प्रसंगावधानातून तपासू शकतो. उदा. छत्रपती शिवरायांनी अफजलखान वधावेळी दाखविलेले प्रसंगावधान, भारताच्या माजी पंतप्रधान इंदिरा गांधीनी बांगला देश निर्मितीत दाखविलेले प्रसंगावधान, महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांनी संयुक्त महाराष्ट्र निर्मितीत आणि भारत-चीन युद्धात दाखविलेले प्रसंगावधान, मा. शरद पवार यांनी खिल्लारी भूकंपावेळी दाखवलेले प्रसंगावधान आदी प्रसंगांवरून संबंधित राजकीय नेत्यांच्या राजकीय सत्तेचे आपण मोजमाप करू शकतो. यावरून हे स्पष्ट होते की, सत्ता ही प्रसंगविशिष्ट असते.

## ३. मर्यादित :-

कोणतीही राजकीय सत्ता ही मर्यादित असते. कोणतीही व्यक्ती वा व्यक्तिसमूह मर्यादेपलीकडे सत्ता वापरू शकत नाही, कारण असे केल्याने राजकीय सत्ता गमाविण्याची शक्यता असते. उदा. भारताच्या माजी प्रधानमंत्री इंदिरा गांधी यांनी देशात आणिबाणी लागू केली, त्यावेळी देशात अभिव्यक्ती स्वातंत्र्याची खूप गळचेपी झाली. याचा परिणाम म्हणून जनतेने निवडणूकीत मतदानाच्या माध्यमातून काँग्रेस व स्वत: प्रधानमंत्री इंदिरा गांधी यांना पराभूत केले होते. नागरिकांच्या सहनशक्तीपलीकडे राजकीय सत्तेचा अंमल करता येत नाही. त्या राजकीय सत्तेला मर्यादा पडतात.

थोडक्यात, सत्ता ही सत्ताग्राहक व सत्ताधारी यांच्या सहसंबंधातून आकारात येत असते. सत्तेचे राजकीय सत्ता, सामाजिक सत्ता, आर्थिक सत्ता आणि सांस्कृतिक सत्ता असे विविध प्रकार आहेत. सत्तेला जेव्हा कायद्याची मान्यता मिळते, तेव्हा तिचे अधिसत्तेत रूपांतर होते. आता आपण अधिसत्ता ही संकल्पना समजून घेणे इष्ट ठरेल.

# अधिसत्ता (Authority)

## ❑ अर्थ :-

अधिसत्ता या मराठी राज्यशास्त्रीय पारिभाषिक शब्दास इंग्रजीत 'Authority' असा शब्द आहे. या शब्दाची उत्पत्ती Auctor किंवा Auctoritos या रोमन शब्दापासून झाली आहे, याचा अर्थ सल्ला किंवा मसलत असा होतो. रोमन राज्यव्यवस्थेच्या जनसभा आणि वरिष्ठ सभा अशा दोन सभा होत्या. जनसभेने घेतलेल्या निर्णयांना वरिष्ठ सभेची मान्यता आवश्यक असायची. वरिष्ठ सभेला जनसभेने घेतलेल्या निर्णयांना स्विकृती-अस्विकृती देण्याचा अधिकार होता. वरिष्ठ सभा जनसभेने घेतेलल्या निर्णयांची तपासणी धर्म, परंपरा व निती या निकषावर करत असे. वरिष्ठ सभेने मान्यता दिली, तरच त्या निर्णयाला Auctoritos म्हणजे अधिकृत निर्णयाचा दर्जा मिळत असे.

## ❑ व्याख्या :–

१. ''अधिसत्ता म्हणजे ऐच्छिकरित्या आदेशांचे, आज्ञांचे पालन ज्यामुळे होते अशी समर्थनीय राजकीय सत्ता होय.'' **– *कट राईट मिल्स***

२. ''राजकीय अधिसत्ता म्हणजे शासनाच्या, राज्यकारभाराच्या हक्कांना मान्यता असणे होय.''

**– *डेव्हीड आणि लेव्हीस***

३. ''अधिसत्ता म्हणजे अशा प्रकारचा कार्यात्मक संबंध की, ज्यामुळे अधिसत्तेला कायदेशीर मान्यता प्राप्त होते.''

**– *प्रा. लास्की***

४. ''आज्ञापालन करावयास लावणारी सत्ता म्हणजे अधिसत्ता होय.''

**– *मॅक आयव्हर***

थोडक्यात, अधिसत्ता ही विवेकाचे संनिवेशन (Embodiment of Reason) असून तिच्या ठायी 'बुद्धीसंगत सांगोपांग मांडणी (Reasoned Elaboration) करण्याची क्षमता असणे अभिप्रेत असते. सत्ताधारकापाशी ही क्षमता असली म्हणजे मग त्याच्या आज्ञांचे 'आपोआप पालन' (Automatic Obedience) होते. मिल्स च्या म्हणण्याप्रमाणे शासनाच्या आदेशांचे पालन हे जनतेकडून स्वइच्छेने झाले पाहिजे. येथे जनतेचा सहभाग अभिप्रेत आहे. शासन जनतेवर आदेश लादू शकत नाही. तसे झाले तर जनता अधिसत्तेविरुध्द बंड करून उभी राहते. उदा. शासनाने आकारलेले कर जनतेने मान्य केले पाहिजे. कर अवाजवी असतील तर जनता कर भरत नाही. अशा आकारलेल्या कराला जनता विरोध करते. लेव्हिस म्हणतो त्याप्रमाणे, शासनाच्या हक्कांना, अधिकारांना जनतेची सहमती असणे आवश्यक असते. आपण यावरून असे म्हणू शकतो की, शासनाच्या उचित कृतीला जनतेचा योग्य सकारात्मक असा प्रतिसाद मिळतो, तेव्हा शासकीय सत्तेचे अधिसत्तेत रूपांतर होते.

पारंपारिक राज्यशास्त्रात सत्ता आणि अधिसत्ता या दोन्ही राजकीय संकल्पना एकाच अर्थाने वापरल्या जात असत, कारण प्राचीन काळात आजच्या इतकी शासनव्यवस्था जनताभिमुख (Public oriented) नव्हती. आधुनिक कालखंडात शासन हे जनताभिमुख आहे. शासन नवीन कायद्यांची निर्मिती करत असताना जनमताचा विचार करूनच कायद्याची निर्मिती करते. जनमताचा विचार करून निर्माण केलेल्या कायद्यांना साहजकिच जनतेची मान्यता मिळते. शासनाच्या प्रत्येक कृतीला जनतेचा पाठिंबा मिळतोच असे नाही. काही शासनाच्या कृती एखाद्या व्यक्तिसमूहास बाधक असू शकतात. पण 'सामाजिक न्याया'च्या भूमिकेतून त्या कृती सार्वजनिक हिताच्या असतात. अशावेळी त्या कृती

बलप्रयोगाने, नियमाबरहुकूम शासनाकडून अंमलबजावणीत आणल्या जातात. उदा. भारतीय संविधानाने दलित, आदिवासी, ओबीसी आणि महिला वर्गास दिलेले आरक्षणाचे लाभ.

आता आपण अधिसत्तेची वैशिष्ट्ये अभ्यासणे इष्ट ठरेल.

## १. कमीखर्चिक व सोयीस्कर :-

अधिसत्ता कमीखर्चिक व सोयीस्कर असते. सामाजिक नियंत्रण करत असताना अधिसत्तेला साधनसामग्रीचा वापर करावा लागतो. सत्तेसाठी जी नकारात्मक व सकारात्मक अधिबलने लागतात, ती खर्चाची असतात. विशेषत: सकारात्मक अधिबलनांसाठी तर अधिकच खर्च येतो. उदा. आधुनिक कालखंडात जनकल्याणाचे कार्यक्रम राबवत असताना अधिसत्तेस अधिकाधिक साधनसामग्री खर्च करावी लागते. अधिसत्तेला बहुधा अधिबलने वापरावीच लागत नसल्यामुळे साधनसामग्रीचा बराच अपव्यय टळतो आणि नियंत्रणाचे काम कमखर्चिक बनते.

## २. प्रतिके :-

अधिसत्तेची काही प्रतीके असतात. 'राजा मृत आहे, राजा चिरायू आहे' हे विधान अधिसत्तेच्या प्रतिकाबद्दल स्पष्टपणे निदर्शन करते. राज पदावर बसणारी व्यक्ति काही काळानंतर पदावरून पायउतार होते म्हणजे राजा मृत आहे. राजा ज्या गादीवर बसतो त्या गादीची विशिष्ट सत्ता असते, अधिकार असतात. ते चिरकाल टिकतात, म्हणजे राजा चिरायू आहे. व्यक्ती मृत असतो पद चिरायू असते. असा याचा येथे अर्थ अभिप्रेत आहे. काही रूढी, प्रथा, परंपरा ह्या अधिसत्तेची प्रतिके असतात. उदा. विधिमंडळात प्रश्न मांडत असताना विधिमंडळ सदस्य 'सभापती महोदय' वा 'अध्यक्ष महोदय' असे म्हणून प्रश्न मांडतो. हा विधिमंडळ कामकाजाचा रिवाज असतो.

## ३. आज्ञार्थी :-

अधिसत्ता नेहमी आज्ञार्थीच बोलते. अधिसत्तेची भाषा नेहमी ठाम आणि आज्ञार्थीच असते. राजा प्रजेशी युक्तिवाद करीत नसतो वा वाटाघाटी करीत नसतो, तो आज्ञा करीत असतो. लोकशाहीतील कायद्यांची भाषाही आज्ञार्थीच असते. उदा. सरकारने निर्माण केलेल्या कायद्यांचे पालन करण्याची आज्ञा जनतेला कायदा लागू झाला तेव्हापासून प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे मिळत असते. अधिसत्ता आज्ञा करते एवढेच नव्हे तर आज्ञा करण्याचा तसेच त्या आज्ञांचे जनतेकडून पालन करवून घेण्याचाही अधिकार आपल्याला असल्याचे वारंवार जाणवून देत असते.

## ४. संघटना :-

अधिसत्तेसाठी संघटना आवश्यक असते. अधिसत्ता ही व्यक्ती-व्यक्तींमधील सुसंवाद कायम व

कार्यक्षम राखणारी यंत्रणा असते. संघटनात्मक संरचनेवाचून हा सुसंवाद अधिसत्तेला राखताच येत नाही. राज्याचा आकार, लोकवस्ती, सामाजिक परंपरा, गरजा आणि अपेक्षा यांच्यानुसार अधिसत्तेची संरचना वेगवेगळ्या स्वरूपाची असू शकते. पण दोन वैशिष्ट्ये या संरचनेत कायम असावीच लागतात. तळापासून वरपर्यंत दुमार्गी संपर्काची कार्यक्षम व्यवस्था असणे, आणि संरचनेचे स्वरूप समाजातील बहूलतेचे प्रातिनिधीक असणे, ही दोन वैशिष्ट्ये असली तरच अधिसत्ता प्रभावीपणे काम करू शकते.

जेव्हा सत्तेला अधिमान्यता मिळते, तेव्हा सत्तेचे रूपांतर अधिसत्तेत होते. ही अधिसत्ता मिळण्याचे तीन स्रोत आहेत. मॅक्स वेबरच्या म्हणण्यानुसार (१) दिव्यवलय (२) परंपरा आणि (३) विवेक-विधिव्यवस्था हे ते तीन मूलस्रोत आहेत. या मूलस्रोतावरून अधिसत्तेचे तीन प्रकार पडतात. येथे त्या तीन प्रकारांचा अभ्यास करणे क्रमप्राप्त ठरेल.

## १. दिव्यवलयी अधिसत्ता :-

दिव्यवलयी (Charismatic personality) नेतृत्त्वाला राजकारणात भरभरून यश मिळते. हे यश त्या व्यक्ती जनमतावर प्रचंड छाप असते त्यामुळे मिळते. अशा दिव्यवलयी नेतृत्त्वाची जनतेला सवय होते. दिव्य वलयी नेतृत्त्वाला पाठिंबा दणे हा जनतेचा परिपाठ होऊन बसतो. या अवस्थेचे वर्णन वेबरने 'दिव्य वलयांचे परिपाठीकरण' (Rutinazation of Charisma) असे केले आहे. उदा. भारतीय राजकारणात जवाहरलाल नेहरू, इंदिरा गांधी, अटलबिहारी वाजपेयी आणि नरेंद्र मोदी इत्यादी दिव्यवलयी नेतृत्व.लाभले.

## २. पारंपारिक अधिसत्ता :-

दिव्यवलयी अधिसत्तेपेक्षा पारंपारिक अधिसत्ता अधिक स्थिर स्वरूपाची असते. येथे जनतेच्या निष्ठा कायमस्वरूपी एखाद्या नेतृत्त्वाच्या पाठीशी ठामपणे उभ्या असतात. राज्यकर्त्यांच्या सत्तेला जनतेकडून मिळणारी मान्यता जेव्हा पिढ्यान्‌पिढ्या मिळते, तेव्हा त्यातून निर्माण होणाऱ्या अधिसत्तेला वेबरच्या वर्गीकरणात पारंपारिक अधिसत्ता असे म्हटले जाते. उदा. भारतीय राजकारणात गांधी घराणे, ठाकरे घराणे, पवार घराणे इत्यादींच्या पाठीमागे जनता वर्षानुवर्षे ठामपणे उभी आहे. अशा प्रकारच्या अधिसत्तेस पारंपारिक अधिसत्ता असे म्हणतात.

## ३. विवेकी-विधिजन्य अधिसत्ता :-

अन्य कोणत्याही अधिसत्ता-प्रकारापेक्षा विवेकी-विधिजन्य अधिसत्ता सुस्थिर असते. राज्यकर्ते जेव्हा बुद्धीला पटणाऱ्या शौर्य, कार्यक्षमता, गुणवत्ता या निकषावर नियमानुसार निवडलेले असतात आणि त्यांच्या सत्तेला घटनात्मक अधिष्ठान असते तेव्हा त्यातून विवेकी-विधिजन्य अधिसत्ता निर्माण होत

असते. पदावरील व्यक्तींच्या व्यक्तिमत्त्वाशी तिचा संबंध नसतो. प्रत्येक पदाचे अधिकार व कर्तव्ये बुद्धिपुरस्सर तयार केलेल्या नियमांच्या आधारे निर्धारित केलेले असतात. उदा. भारतीय शासनव्यवस्थेत राष्ट्रपती, प्रधानमंत्री, राज्यपाल इत्यादी पदांना संविधानानुसार पदाचे अधिकार निर्धारित केलेले असतात.

मॅक्स वेबरने वर्णन केलेले अधिसत्तेचे प्रकार म्हणजे अधिसत्ता संबंधाची तीन आदर्श प्रारुपे आहेत.

## ३.२.२ प्रभुत्व आणि अधिमान्यता

### प्रभाव

''प्रभाव म्हणजे व्यक्तिची इतरांच्या धोरणांना हेतुतः परिणामित करण्याची क्षमता होय.''

उपरोक्त विधानावरून हे स्पष्ट होते की, एक म्हणजे प्रभावात दोन चले (variables) आवश्यक असतात. प्रभावधारक आणि प्रभावग्राहक. दूसरे म्हणजे, प्रभाव टाकण्याचे कारण स्पष्ट असणे. कारण प्रभाव हा विशिष्ट हेतू ठेवूनच टाकला जाऊ शकतो. राजकीय प्रक्रियेत प्रभावास अनन्यसाधारण असे महत्त्व असते. प्रभावाचे अनेक आधार आहेत, ती आधारस्थाने अभ्यासणे गरजेचे आहे.

### १. साधनसामग्री :-

साधनसामग्री प्रभावाचे प्रमुख असे आधारस्थान आहे. समाजातील साधनसामग्री मर्यादित असते आणि ती मिळविण्याच्या व्यक्तीच्या क्षमतांमध्ये प्रचंड तफावत असते. ही दोन सामाजिक तथ्ये सर्वच वर्चस्व-संबंधाच्या मूळाशी असतात. इथे 'साधनसामग्रीचा' अर्थ केवळ भौतिक साधनांपुरता मर्यादित नाही. एक व्यक्ती दुसऱ्या व्यक्तीचे वर्तन प्रभावित करण्यासाठी ज्या-ज्या गोष्टींचा साधन म्हणून उपयोग करू शकते. त्या सर्व गोष्टींचा समोवश साधनसामग्रीत होतो. उदा. पैसा, बुद्धी, प्रतिष्ठा आदी.

### २. कौशल्य :-

केवळ साधनसामग्री असून चालत नाही तर योग्यवेळी, योग्य तऱ्हेने तिच्या उपयोजनाचे कौशल्य ही असणे तितकेच गरजेचे असते. हे कौशल्य तिला संगोपन, प्रशिक्षण संधी, प्रोत्साहन इत्यादींमधून लाभत असते. उदा. श्रीमंत सावकाराकडे असणाऱ्या पैशाचे त्याला योग्य विनियोजन करण्याचे कौशल्य असेल तर त्याचा प्रभाव त्याच्या इतकीच संपत्ती असणाऱ्या दुसऱ्या इसमांपेक्षा अधिकचा असतो.

### ३. तार्किक युक्तिवाद :-

पैसा, बुद्धि, प्रतिष्ठा आणि कौशल्य याचा, संबंधित धारण व्यक्ती कसा उपयोग करते, त्यावर

प्रभावाचा दर्जा ठरत असतो. दंडेलशाही, धाकदपटशा यापेक्षा युक्तिवाद व पाठपुरावा यावर त्याची भिस्त असते. प्रभाव पाडणारी व्यक्ती तार्किक युक्तीवाद, नैतिक मुद्दे, फायदे-तोटे सांगून अन्य व्यक्तिंचा निर्णय प्रभावित करत असते. उदा. अंधश्रध्दा निर्मूलनाचे काम करणाऱ्या डॉ. नरेंद्र दाभोळकरांनी तार्किक युक्तीवादाने अनेकांवर प्रभाव पाडला.

## ४. प्रतिष्ठा :-

प्रभावाची अनेक आधारस्थाने आहेत. त्यापैकी एक म्हणजे प्रतिष्ठा होय. समान साधनसामग्री धारण करणाऱ्या दोन व्यक्तींची समाजातील प्रतिष्ठा भिन्न तऱ्हेची असते. या दोहोंपैकी अधिक प्रतिष्ठीत व्यक्तींच्या संदेशांना संसूचन (Communication) माध्यमांमध्ये प्राथम्य व प्राधान्य मिळते आणि ती अधिक प्रभावशाली ठरते. उदा. रतन टाटा या उद्योजकाने अनेक समाजोपयोगी कार्यक्रम राबवून भारतात प्रतिष्ठा मिळविली आहे. सामाजिक उत्तरदायित्वाची (Social Accountability) जाणीव प्रतिष्ठा मिळवून देत असते.

## ५. आबंधन :-

आपण समाजाचे वा सहकाऱ्यांचे काही देणे लागतो, असा भाव साधनसामग्री धारण करणाऱ्या व्यक्तीच्या ठायी निर्माण होतो व तो आपल्या साधानसामग्रीचा काही भाग इतरांना देऊ इच्छितो, यास आबंधन म्हणतात. यासाठी ऋणाचा भाव ठायी असणे अत्यंत गरजेचे असते. असा भाव ठायी असणे व त्याची जपणूक करणे व्यावहारिक असते. उदा. एखादा राजकीय नेता आपल्या राजकीय सत्तेने आपल्या कार्यकर्त्यांना विविध पदे देवून वाटप करतो. त्यावेळी त्याचा राजकीय प्रभाव वाढतो.

प्रभावधारक व्यक्ती प्रभावग्राहक व्यक्तिच्या कृतीत व निर्णयात किती प्रमाणात बदल घडवून आणते, यावरून प्रभावाचे मोजमाप करता येऊ शकते. लास्वेल आणि कप्लान यांनी त्यांच्या 'Power and Society' या ग्रंथात प्रभावाचे मोजमाप करत असताना वजन, क्षेत्र आणि व्याप्ती विचारात घेतली आहे.

## अ) वजन :-

प्रभावधारक व्यक्ती व प्रभावग्राहक व्यक्ति कोण यावरून प्रभावाचे मोजमाप होऊ शकते. प्रभावावाचून होणारा बदल व प्रभाव टाकून होणारा बदल यांची तुलना करूनच प्रभावाचे वजन मोजणे योग्य ठरते. उदा. महात्मा गांधी यांचा स्वातंत्र्य चळवळीवर प्रचंड प्रभाव होता. म. गांधी यांनी स्वातंत्र्यचळवळीत मिठाचा सत्याग्रह, करो या मरो, यासारख्या घोषणांद्वारे भारतीय जनतेला प्रभावित केले आणि भारतीय जनतेने म. गांधीच्या या घोषणांना सकारात्मक प्रतिसाद दिला. यावरून हे स्पष्ट होते की, प्रभावाला अनन्यसाधारण असे महत्त्व आहे.

**ब) क्षेत्र :-**

प्रभावाचे क्षेत्र प्रभावधारक व्यक्तीच्या प्रभावाखाली येणाऱ्या व्यक्तींच्या संख्येवरून ठरते. प्रभावाचे मूल्यमापन संख्येवर अवलंबून असते. उदा. परीक्षा गृहात (Exam Hall) एक पर्यवेक्षक (Supervisor) किती परिक्षार्थींवर नियंत्रण ठेवू शकतो, तितकेच त्याचे प्रभावक्षेत्र असते.

**क) व्याप्ती :-**

केवळ प्रभाव क्षेत्र प्रभावाचे मोजमाप करताना लक्षात घेऊन चालत नाही. प्रभाव क्षेत्राबरोबर त्याच्या प्रभावाची व्याप्तीही लक्षात घेणे गरजेचे असते. उदा. एखाद्या राजकीय नेत्याचा प्रभाव निवडणूकीत मते मिळवण्यासाठी सिमीत असतो. तर काही राजकीय नेतृत्व सार्वजनिक क्षेत्राच्या प्रत्येक अंगावर प्रभाव टाकते. जसे की, महाराष्ट्राचे शिल्पकार मा. यशवंतराव चव्हाण यांचा समाजकारण, राजकारण, साहित्य, कला, संस्कृती, विज्ञान आदी क्षेत्रांवर प्रभाव होता.

## अधिमान्यता

**❑ अर्थ व व्याख्या :-**

**❀ अर्थ :-**

अधिमान्यता (Legitimacy) हा शब्द Legitimus या लॅटिन शब्दापासून निर्माण झालेला आहे. रोमन राजकीय विचारवंत सिसेरो याने वैधानिक व न्याय सत्ता यासाठी Legitimus हा शब्द वापरला होता. प्राचीन परंपरा, रूढी, प्रथा यानुसार करण्यात येणारे कायदेविषयक घटनात्मक नियम या अर्थाने हा शब्द त्याने वापरला होता.

**❀ व्याख्या :-**

१. ''स्वीकृत मूल्यांच्या संदर्भात जिचे समर्थन करता येईल अशी राजकीय सत्ता म्हणजे अधिमान्यता होय.''

**- सेल्झनिक**

२. ''अधिमान्यता म्हणजे अशी राजकीय व्यवस्था जी सर्वार्थाने समाजहिताच्या दृष्टीने योग्य आहे, असा विश्वास जनतेत निर्माण करण्याची व टिकवून धरण्याची त्या व्यवस्थेची क्षमता होय.''

**- लिप्सेट**

३. ''राजकीय व्यवस्थेतील संरचना, कार्यपद्धती, कृती, निर्णय, धोरणे, शासकीय अधिकारी व

राजकीय नेते यांच्याजवळ अचूकपणा, यथायोग्यता, औचित्य, चांगुलपणा, रास्तपणा इत्यादी गुण असल्यामुळे त्यांचा स्विकार केला पाहिजे असा विश्वास लोकांत निर्माण होणे यास अधिमान्यता असे म्हणतात.''

**– रॉबर्ट डाल**

४. ''राजकीय व्यवस्था प्रचलित समाजासाठी योग्य असून ती पवित्र, मौल्यवान आणि आदरणीय आहे म्हणून तिच्या आज्ञांचे पालन विनाविलंब करणे असा दृढ विश्वास लोकांमध्ये निर्माण करण्याची क्षमता म्हणजे अधिमान्यता होय.''

**– प्लॅनो आणि रिग्ज**

उपरोक्त नमूद व्याख्यांवरून आधिमान्यतेच्या संकल्पनेविषयी स्पष्टता अभ्यासकास होते. दंडशक्तीद्वारे सरकार जनतेस आज्ञापालन करावयास भाग पाडते. पण नेहमीच आज्ञापालन दंडशक्तीच्या जोरावर होत नसते. सरकारने घेतलेले निर्णय व निर्माण केलेले कायदे समाजहिताचे आहेत असा दृढ विश्वास लोकांत निर्माण झाल्यास लोक स्वयंस्फूर्तीने आज्ञांचे पालन करतात त्यास अधिमान्यता असे म्हणतात. लिप्सेट या अमेरिकन राज्यशास्त्रज्ञाने त्याच्या 'Political Man' या ग्रंथात अधिमान्यतेची संकल्पना अधिक स्पष्ट करून सांगितली आहे. त्याच्या मते, राजकीय व्यवस्थेत व्यक्तीने एखादे पद धारण केले असता ते पद तिला अधिमान्यतेच्या तत्त्वानुसार प्राप्त झालेले असते. लोकांना त्या व्यक्तीच्या अधिकारपदाविषयी विश्वास वाटतो. सत्ताधारी व्यक्ती आपल्या अधिकारपदाचा वापर समाजहितासाठी करेल अशी दृढ भावना लोकांच्या मनात निर्माण झालेली असते. सत्तारूढ व्यक्तीच्या पदाविषयी जनतेत रास्तपणाची व औचित्याची भावना निर्माण होते. थोडक्यात लोकांना राजकीय सत्तेविषयी औचित्याची, चांगुलपणाची भावना असणे म्हणजे अधिमान्यता होय. 'अधिसत्ता म्हणजे अधिमान्यता प्राप्त झालेली सत्ता' असे अधिसत्तेचे वर्णन केले जाते. सत्ताधारकांना ती मिळविण्यासाठी बरेच प्रयत्न करावे लागतात. त्यासाठी अनेक मार्ग सत्ताधारक अवलंबत असतात. या मार्गांचा ही येथे विचार करणे इष्ट ठरेल.

## १. विचारप्रणालीतून अधिमान्यता :–

विचारप्रणाली भावनात्मक असते. जनतेच्या इच्छा, आकांक्षा, श्रद्धा या भावनात्मक विचारप्रणालीत असतात. विचारप्रणाली म्हणजे मूल्यांची संदर्भ चौकट असते. ही मूल्ये लोकांना भावणारी असतात. समाजहित साधणारी मूल्यांची संदर्भ चौकट विचारप्रणालीत अंतर्भूत असते. या विचारप्रणालीसाठी सत्ताधारी बांधिल असल्याचे लोकांच्या मनावर बिंबवले जाते. विशिष्ट विचारप्रणालीद्वारे लोकांना संघटित (Mobilize) करणे हे सत्ताधाऱ्यांचे ध्येय असते व त्याद्वारे सत्ता संपादित केली जाते व संपादित केलेली सत्ता टिकविली जाते. लोक विचारप्रणालीशी इतके बांधिल असतात की प्रसंगी ते आपल्या

प्राणांची आहुती द्यावयास ही मागे-पुढे पाहत नाहीत. उदा. कम्युनिस्ट विचारधारेचे लोक या विचारधारेशी शेवटच्या श्वासापर्यंत बांधिल राहण्याचा कसोशीने प्रयत्न करतात. कितीही प्रलोभने आली तरी ते आपल्या विचारांची कास कधीच सोडत नाहीत.

## २. विश्वास साधनांच्या आधारे अधिमान्यता :-

अधिसत्ता गाजवणाऱ्या व्यक्तिवर लोकांचा विश्वास आणि श्रध्दा असते आणि तिच अधिसत्तेच्या कृतींना व निर्णयांना अधिमान्यता मिळवून देत असते. मेरियमने या विश्वस्त व श्रध्देच्या मुळाशी जी कारणे असतात त्या सर्वांना मिळून 'Credenda' असे म्हटले आहे की, ज्याचा अर्थ श्रध्दा असा आहे. हा शब्द 'Credence' या शब्दावरून घेतला आहे. मॅक्सवेबरने अधिसत्तेचे तीन प्रकार पाडले होते. दिव्यवलयांकित अधिसत्ता, परंपरागत अधिसत्ता आणि विवेकाधिष्ठित अधिसत्ता इत्यादी या तिन्ही अधिसत्तेत वेगवेगळी विश्वास साधने असतात की जी अधिमान्यता मिळवून देत असतात. दिव्यवलयांकित अधिसत्तेत लोकांचा राजकीय नेतृत्वावर विश्वास असतो, परंपरागत अधिसत्तेत लोकांचा रूढी, प्रथा, परंपरा यावर विश्वास असतो आणि विवेकाधिष्ठित अधिसत्तेत लोकांचा विश्वास संविधानात्मक पदावर असतो.

# ◆ अधिमान्यतेची वैशिष्ट्ये :-

## १. सारलक्षी अधिमान्यता :-

राज्यकर्त्यांच्या वृतींच्या व निर्णयांच्या गुणवत्तेच्या आधारे जेव्हा त्याच्या सत्तेची अधिमान्यता निर्धारित केली जाते, तेव्हा त्यास सारलक्षी अधिमान्यता म्हणतात. सारलक्ष्मी अधिमान्यतेत 'सार्वजनिक हित' हे लक्ष असते. राज्यकर्ता ज्यावेळी 'सार्वजनिक हिता'ऐवजी स्वहितासाठी सत्ता वापरतो, त्यावेळी लोक त्याच्या अधिमान्यतेचा पाठिंबा काढून घेतात. सार्वजनिक हित स्वयंसिद्ध मूल्य असते. उदा. प्लेटोची आदर्श राज्य व न्याय कल्पना, जोपर्यंत समाजहितासाठी सत्ता वापरली तोपर्यंतच अधिमान्यता टिकून राहते असे म्हणणाऱ्या लॉक, कायदा व सुव्यवस्था समाजहितासाठी अबाधित ठेवणारा सत्ताधारक वर्ग हा अधिमान्यता मिळवतो असे सांगणारा हॉब्ज इ.विचारात सारलक्षी अधिमान्यता आपणांस दिसून येते.

## २. अधिमान्यता परंपराजन्य असते :-

अधिमान्यता ही परंपराजन्य असणे स्वाभाविक असते. व्यक्तिचे सामाजीकीकरण (Socialization) हे समाजात होत असते. व्यक्तीच्या जडणघडणीत दैनंदिन जीवनातील प्रथा, परंपरा, रूढी यांचा प्रभाव पडतो. वरिष्ठांचे आज्ञापालन कनिष्ठांनी केले पाहिजे असा रिवाज समाजात असतो. कनिष्ठांनी वरिष्ठांचे

आज्ञापालन केलेच पाहिजे असे प्रतिपादन राज्यशास्त्रीय विचारात दीर्घकाळ केले जात होते. अधिमान्यतेची सर्व वैचारिक अधिष्ठाने परंपराजन्य आहेत. परंपरेत विशिष्ट परिस्थितीतून ती निर्माण होतात आणि सामाजिकीकरणाच्या प्रक्रियेतून माणसे ती शिकतात.

### ३. अधिमान्यता वरून खाली आणि खालून वर :-

प्राचीन कालखंडात लोकांनी अधिसत्तेस ईश्वरसत्तेचे अधिष्ठान प्राप्त करून दिल्यामुळे ते ईश्वरी सत्तेची आज्ञा मोडणे पाप समजत असत, त्यासमयी अधिमान्यता वरून खाली म्हणजे ईश्वराकडून जनतेला अशी संक्रमित होत होती. आधुनिक कालखंडात नवस्वतंत्र राष्ट्रांनी लोकशाही शासनप्रकार निवडला आहे. या शासनप्रकारात अधिमान्यता खालून-वर म्हणजे जनतेकडून सरकारला अशी संक्रमित होत असते.

### ४. अधिमान्यता आणि सामाजिकीकरण :-

वरती नमूद केल्याप्रमाणे व्यक्तीचे वर्तन हे सामाजिकीकरणावर अवलंबून असते. दिव्यवलयांकित अधिसत्तेत व्यक्तिपरत्त्वे अधिमान्यता मिळते. परंपरागत अधिसत्तेत परंपरेने, रूढीने झालेल्या संस्कारातून अधिमान्यता प्रकट केली जाते. तर विवेकाधिष्ठित अधिसत्तेत राजकीय सामाजिकीकरणाद्वारे (Political Socialization) अधिमान्यता राजकीय वर्गास प्राप्त होत असते. व्यक्ती अधिसत्तेला शरण जातात, जबाबदार मानतात की तिच्यात स्वत: सहभागी होतात हे या सामाजिकीकरणावर अवलंबून असते.

अधिमान्यतेला मान्यता देण्याची प्रवृत्ती जन्मसिद्ध नसते, तर ती सामाजिकीकरणाच्या (Socialization) प्रक्रियेतून व्यक्ती शिकतात. पण प्रत्येक प्रकारच्या अधिसत्तेबद्दल ही शिकण्याची प्रक्रिया निरनिराळ्या प्रकारे घडून येते. दिव्यवलयी अधिसत्तेला दिली जाणारी अधिमान्यता व्यक्तिगणिक वेगळ्या कारणांतून असल्यामुळे त्याबद्दल सर्वसाधारण विधाने करणे अशक्य आहे. पारंपारिक अधिसत्तेविषयीची अधिमान्यता एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे हस्तांतरित होते. दीर्घकालीन परंपरेतून अधिसत्तेचे संस्थीकरण घडते. वर्षानुवर्षे व पिढ्यान्‌पिढ्या चालत आलेली अधिसत्ता लोक सवयीने प्रमाण मानून तिचे निर्णय मान्य करतात. अधिसत्तेविषयीच्या त्यांच्या श्रद्‌धा व भावना यांना ते आकार देते.

## ३.२.३ स्वातंत्र्य, समता आणि बंधुता

### स्वातंत्र्य

### ❁ अर्थ :-

स्वातंत्र्य या शब्दाला इंग्रजीत Liberty हा पर्यायी शब्द आहे. 'Liberty' हा इंग्रजी शब्द, लॅटीन शब्द Liber यापासून बनला आहे. 'Liber' म्हणजे बंधनाचा अभाव असा अर्थ होतो.

## ❋ व्याख्या :–

१. ''ज्यामध्ये बाह्य अडथळ्यांशिवाय व्यक्तिला आपल्या व्यक्तिमत्त्वाचे प्रकटीकरण करता येते त्यास स्वातंत्र्य असे म्हणतात.'' **– कोल**

२. ''स्वातंत्र्य म्हणजे करण्यास योग्य असे कार्य आणि उपभोगण्यास योग्य असा आनंद प्राप्त करून देणारी भावनात्मक शक्ती होय.'' **– टी. एच. ग्रीन**

३. ''स्वातंत्र्य म्हणजे सर्व प्रकारच्या बंधनाचा अभाव नाही, तर अनुचित बंधनाऐवजी उचित बंधनाची व्यवस्था होय.'' **– मॅकेनी**

उपरोक्त नमूद व्याख्यांवरून आपणास स्वातंत्र्य संकल्पनेचे आकलन होते. स्वातंत्र्याची संकल्पना ही उदारमतवादाच्या केंद्रस्थानी आहे. एक मूलभूत सामाजिक मूल्य (Fundamental Social Value) म्हणून उदारमतवाद स्वातंत्र्याकडे पाहते. आधुनिक कालखंडात लोकशाहीच्या प्रसाराबरोबर स्वातंत्र्याच्या संकल्पनेचा प्रसार झाला. व्यक्तिविकासासाठी स्वातंत्र्य आवश्यक असते. स्वातंत्र्य उपभोगत असताना इतरांच्या हक्कावर आणि स्वातंत्र्यावर गदा येणार नाही याची उपभोगकर्त्याने खबरदारी घ्यावयाची असते. स्वातंत्र्याचे स्वरूप सकारात्मक व नकारात्मक असे आहे.

## १. नकारात्मक स्वातंत्र्य :–

१८ व १९ व्या शतकात उदारमतवादाच्या सुरुवातीच्या पुरस्कर्त्यांनी नकारात्मक स्वातंत्र्याची संकल्पना मांडली. लॉक, ह्यूम, स्मिथ, थॉमस पेन, स्पेन्सर, बेन्थम, जे. एस. मिल या उदारमतवादी विचारवंतांनी नकारात्मक स्वातंत्र्याचा पुरस्कार केला. नकारात्मक स्वातंत्र्याची संकल्पना व्यक्तीच्या स्वायत्ततेवर आधारलेली आहे. स्वातंत्र्य म्हणजे निर्बंधाचा अभाव (Absense of Restrication) असे नकारात्मक स्वातंत्र्याचा पुरस्कार करणारे मानतात. व्यक्तीचे मूलभूत अधिकार काढून घेण्याचा अधिकार राज्याला नाही. राज्य केवळ कायद्याच्या आधारे स्वातंत्र्याला नियंत्रित करण्याचा प्रयत्न करू शकते, असे या पुरस्कर्त्यांचे म्हणणे आहे. नकारात्मक स्वातंत्र्याची संकल्पना ही समानता आणि न्यायाच्या मूल्यांच्या विरोधात जाणारी आहे.

## २. सकारात्मक स्वातंत्र्य :–

सकारात्मक स्वातंत्र्याच्या संकल्पनेचा विकास १९व्या शतकाच्या उत्तरार्धात उदारमतवादी विचारांमध्ये झालेल्या आत्मपरीक्षणातून व मार्क्सवादाच्या प्रभावातून विकसित झाला. ग्रीन, हॉवेहाऊस, लिंडसे, लास्की, बार्कर, मॅकफर्सन, मॅकआयव्हर, बोसांक्यूट आदी प्रभूतींनी सकारात्मक स्वातंत्र्याचा पुरस्कार केला. सामूहिक कल्याणासाठी राज्याचा व्यक्तिस्वातंत्र्यातील हस्तक्षेप महत्त्वाचा आहे. सकारात्मक

स्वातंत्र्य बंधनयुक्त स्वातंत्र्याचा पुरस्कार करते. सार्वजनिक हितासाठी उचित बंधने (Reasonable Restrication) येथे अभिप्रेत आहेत. स्वयंविकास साधत असताना सार्वजनिक हिताला बाधा पोहचता कामा नये. स्वातंत्र्य म्हणजे निर्बंधाचा अभाव नाही. स्वातंत्र्यावर समाजहिताला गृहित धरून काही निर्बंध आवश्यक असतात. सकारात्मक स्वातंत्र्याची संकल्पना समतेला आणि न्यायाला पूरक संकल्पना आहे.

## ❁ स्वातंत्र्याचे प्रकार :-

### १. नैसर्गिक स्वातंत्र्य :-

सामाजिक कराराच्या सिद्धांतकर्त्यांनी, हॉब्ज, लॉक, रूसो यांनी नैसर्गिक स्वातंत्र्याचा पुरस्कार केला. त्यांच्या मते, मनुष्य प्राणी स्वभावत:च स्वातंत्र्यप्रिय आहे. राज्य आणि समाज आकाराला येण्याअगोदर व्यक्तिवर कोणत्याही प्रकारचे बंधन नव्हते. तो स्वच्छंदी होता. नैसर्गिक स्वातंत्र्य नकारात्मक स्वातंत्र्याचा पुरस्कार करते. सकारात्मक स्वातंत्र्याची संकल्पना विकसित झाल्यावर नैसर्गिक स्वातंत्र्याची संकल्पना मागे पडली.

### २. व्यक्तिगत स्वातंत्र्य :-

जे. एन. मिलने त्याच्या 'on Liberty' या ग्रंथात व्यक्तिगत स्वातंत्र्याचा पुरस्कार केला आहे. त्याच्या मते, व्यक्तिगत स्वातंत्र्य म्हणजे असे स्वातंत्र्य की, ज्या व्यक्ती इतरांच्या स्वातंत्र्य उपभोगण्याच्या मार्गात अडथळा न आणता उपभोगत असतात. व्यक्तिगत स्वातंत्र्याचे मिल ने दोन प्रकारात विभागणी केली आहे. पहिला प्रकार म्हणजे स्वत:संबंधी (Self Regarding) आणि दुसरा प्रकार म्हणजे इतरांसंबंधी (Other Regarding).

### ३. राष्ट्रीय स्वातंत्र्य :-

बाह्य नियंत्रणापासून जे राष्ट्र मुक्त असते ते राष्ट्र सार्वभौम राष्ट्र असते. सार्वभौम राष्ट्र हे स्वतंत्र राष्ट्र असते. स्वतंत्र आणि सार्वभौम राष्ट्राचा दर्जा मिळविणे हे प्रत्येक राष्ट्राचे राष्ट्रीय ध्येय असते. विसाव्या शतकात आशिया-आफ्रिका खंडातील अनेक वसाहतींमधील स्वातंत्र्यासाठी आंदोलने आणि चळवळी झाल्या. भारतातही अशा स्वरूपाची स्वातंत्र्याची चळवळ झाली व १५ ऑगस्ट, १९४७ रोजी भारताला स्वातंत्र्य मिळाले.

### ४. घटनात्मक स्वातंत्र्य :-

प्रत्येक स्वतंत्र देशाला राज्यघटना असते. प्रत्येक राज्यघटनेत नागरिकांना स्वातंत्र्याचे अधिकार बहाल केलेले असतात, ज्यायोगे नागरिक आपल्या व्यक्तिमत्त्वाचा विकास करून घेतात. उदा. भारतीय राज्यघटनेत प्रकरण तीनमध्ये कलम १२ ते ३५ मध्ये मूलभूत अधिकार समाविष्ट करण्यात आलेले आहेत.

## ५. नागरी स्वातंत्र्य :-

सार्वजनिक जीवनात वावरत असताना नागरिकांना स्वातंत्र्य आवश्यक असते; त्याला नागरी स्वातंत्र्य म्हणतात. फिरण्याचे, वास्तव्य करण्याचे, लिहिण्याचे, बोलण्याचे, व्यवसाय करण्याचे, संघटना स्थापन करण्याचे नागरी स्वातंत्र्य व्यक्तिविकासाला पोषक असते. नागरी स्वातंत्र्यामुळे व्यक्तिचे शारिरीक आणि नैतिक दंडापासून संरक्षण होते आणि व्यक्तिला समृद्ध जीवन जगता येते.

## ६. राजकीय स्वातंत्र्य :-

लोकशाहीच्या यशस्वीततेसाठी नागरिकांना राजकीय स्वातंत्र्य असणे गरजेचे असते. राजकीय पक्ष स्थापन करणे, राजकीय पक्षाचे कार्यकर्ते होणे, राजकीय पक्षाचा प्रचार व प्रसार करणे, मतदार करणे आदी राजकीय स्वातंत्र्यामुळे नागरिकांचा राजकीय सहभाग वाढून लोकशाही विकसित व यशस्वी करता येते.

## ७. आर्थिक स्वातंत्र्य :-

'Finance is the blood of State' या हेतूने जशी राज्यसंस्थेला पैशाची आर्थिक गरज असते तशी ती कुटुंबसंस्थेलाही असते. उदरनिर्वाह व प्रमाणित जीवन (Standard Life) यासाठी नागरिकांना आर्थिक स्वातंत्र्य असणे अत्यंत गरजेचे असते. आर्थिक स्वातंत्र्याअभावी व्यक्तीची अवस्था एखाद्या गुलामाप्रमाणे असते. जीवनातील आर्थिक परिस्थितीबाबत निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य व्यक्तीला असावे. उदारमतवादाच्या सुरुवातीच्या पुरस्कर्त्यांनी आर्थिक स्वातंत्र्यावर भर दिला.

# समता

## ❀ व्याख्या :-

१. ''प्रत्येक व्यक्तीला आपल्या मूलभूत गरजांचे समान समाधान करण्याचा अधिकार आणि आपल्या क्षमतांचा विकास आणि वापर करण्याच्या समान संधी म्हणजे समता होय.''

**– राफेल**

२. ''समता ही मूलत: समतलन प्रक्रिया (Levelling Process) आहे.''

**– लास्की**

उपरोक्त नमूद व्याख्यांवरून आपणांस समता या संकल्पेचे आकलन होते. व्यक्तिच्या ज्या मूलभूत गरजा असतात त्या गरजांची पूर्तता करण्यासाठी समान संधी (Equal Opportunity) उपलब्ध करून दिल्या जातात. यात ऐकरेषीय समाज निर्मितीची संकल्पना अनुस्यूत असते. लास्कीच्या मते, ''जोपर्यंत

समाजात व्यक्तीला विशेष अधिकार मिळत राहतील, तोपर्यंत समता प्रस्थापित होणार नाही. तेव्हा जन्म, जात, धर्म, भाषा, वंश, संपत्ती, वर्ण यांच्या आधारे समाजातील व्यक्तीला जे विशेषाधिकार दिले जातात ते विशेषाधिकार नष्ट करणे आवश्यक असते.'' लास्कीच्या या मताच्या संदर्भात भारताच्या बाबतीत विचार करावयाचा झाल्यास भारतात जे आरक्षणाचे अधिकार दिले आहेत त्यावरून वरवर पाहता समता प्रस्थापित होईल का? असा प्रश्न पडणे साहजिक आहे. पण आरक्षणाची तरतूद ही 'सकारात्मक भेदाभेद' (Positive Discrimination) या अर्थाने समजून घेणे इष्ट ठरेल. जो समाजाचा दलित, आदिवासी, महिला, अल्पसंख्य आहे तो समाज विकासाच्या मुख्य प्रवाहापासून वर्षानुवर्षे वंचित आहे. त्याला काही विशेषाधिकार (आरक्षण) देवून समाजाच्या विकासाच्या मुख्य प्रवाहात आणणे हा अंतिम हेतू आहे. राज्यशास्त्रातील विविध विचारवंतांकडून समतेचे वेगवेगळे प्रकार सांगितले आहेत. आपण येथे अभ्यासाच्या मर्यादित चौकटीत लॉर्ड ब्राइसने सांगितलेल्या समतेच्या चार प्रकारांचा विचार करणार आहोत.

## १. कायदेशीर समता :-

कायद्याचे राज्य (Rule of Law) आणि कायद्याची समानता (Equality of Law) या दोन अर्थाने कायदेशीर समता अपेक्षित आहे. समाजात कायदा आणि सुव्यवस्था (Law and order) प्रस्थापित करणे हे कायद्याच्या राज्यात गर्भित आहे; प्रत्येकास समान स्वातंत्र्य व स्वातंत्र्याची हमी कायद्यापुढे समानता यामध्ये अपेक्षित आहे. कायद्याच्या समानतेत दोन गोष्टी अंतर्भुत आहेत. एक म्हणजे कायद्यापुढे समानता (Equality Before Law), आणि दुसरे म्हणजे कायद्याचे समान संरक्षण (Equal protection of Law). कोणत्याही नागरिकास त्याचा धर्म, जात, प्रांत, भाषा, वंश इ.वरून या दोन्हीपासून वंचित ठेवता येत नाही..

## २. राजकीय समता :-

आधुनिक लोकशाहीच्या प्रस्थापनेने नागरिकांना राजकीय अधिकार बहाल केले आहेत. 'एक व्यक्ती एक मूल्य/मत' (one person, one vote) हे आधुनिक लोकशाहीत सर्व राष्ट्रांनी स्विकारलेले तत्त्व आहे. मतदानाचा अधिकार, निवडणूकीस उभा राहण्याचा अधिकार, राजकीय पक्ष स्थापन करून त्याचा प्रचार आणि प्रसार करण्याचा अधिकार, आदी राजकीय अधिकारांमुळे राजकीय समता निर्माण होत असते.

## ३. आर्थिक समता :-

रूसो च्या म्हणण्याप्रमाणे, ''राज्यातील कोणताही नागरिक इतका श्रीमंत नको की, तो इतरांना

विकत घेईल आणि कोणताही नागरिक इतका गरिब नको की, त्याला स्वत:ला विकणे भाग पडेल.'' परिणामी, संपत्तीचे वितरण करताना हे दोन्हीही अतिरेक टाळले जातील याची खबरदारी राज्याने घ्यावी. प्रत्येक व्यक्तीला आपल्या आर्थिक गरजा भागवता येतील. या प्रमाणात संपत्तीचे, उत्पादन साधनांचे वितरण व्हायला हवे. आर्थिक समता हा लोकशाहीचा महत्त्वाचा आधार आहे. आर्थिक समता नसेल तर राजकीय आणि नागरी समतेला महत्त्व राहत नाही.

### ४. सामाजिक समता :-

राजकीय लोकशाही बरोबर राज्यात सामाजिक लोकशाही प्रस्थापित झाली पाहिजे असे मत डॉ. बाबासाहेब आंबडेकर यांचे होते. समाजातील कोणाही व्यक्तीस त्याच्या जात, धर्म, प्रांत, भाषा, वंश इत्यादीवरून सार्वजनिक जीवनाचे कोणतेही अधिकार व समान संधी नाकारण्यात येवू नये. भारतीय राज्यघटनेतील अस्पृश्यता निवारणाची तरतूद, सामाजिक समता प्रस्थापित करण्याच्या दिशेने पडलेले एक महत्त्वाचे पाऊल आहे. भारतात आज अस्पृश्यता पाळणे हा कायद्याने गुन्हा आहे.

## बंधुता

''सहकार्यातून सामाईक मागण्यांचा पाठपुरवठा करून सामाईक सामग्री मिळवण्यासाठी माणसे जे एकमेकांशी सहकार्य करतात त्यास बंधुभाव असे म्हणतात.''

उपरोक्त विधान सुरुवातीसच लिहिण्याचे प्रयोजन म्हणजे 'बंधुता'ची शास्त्रशुद्ध अशी व्याख्या आपण करू शकत नाही. कारण ते स्वातंत्र्य, समता, न्याय आदी तत्त्वांसारखे तत्त्व नाही. तो एक भाव आहे. बंधुता या मराठी शब्दास इंग्रजीत 'Fraternity' असा शब्द आहे. सामाजिक गरजांची पुर्तता करण्यासाठी सामाईकपणे एकत्रित येऊन, स्वत:च धर्म, जात, प्रांत, भाषा, वर्ण, वंश आदी भेद विसरून पूर्तता करण्यासाठी हरएकाच्या हृदयी बंधुभावाची भावना असणे अत्यंत गरजेचे असते. या भावनेतून सामाजिक सलोखा (Communal Harmony) वाढण्यास मदत होते. 'एकमेका साह्य करू, अवघे धरू सुपंथ' हा संतभाव बाळगणे इष्ट ठरते. भारतातील महान राष्ट्रीय संत तुकडोजी महाराज त्यांच्या 'ग्रामगिता' या ग्रंथात बंधुभावाबद्दल म्हणतात, ''या भारतात बंधुभाव नित्य वसू दे, दे वरची असा दे, हे सर्व पंथ संप्रदाय एक दिसू दे, मतभेद नसू दे.'' भारतात विविध जाती, धर्म, पंथ, प्रांत, भाषा, वंशाचे लोक राहतात, त्यांच्यात भाईचाऱ्याचे नाते निर्माण होणे गरजेचे आहे. हा बंधुभाव आचरणातूनच अवतरू शकतो. बंधुभाव ही राजकीय विचारप्रणाली नाही तर तो एक भाव आहे. बंधुभावाची गरज लक्षात घेऊन भारताचे पहिले प्रधानमंत्री जवाहरलाल नेहरू यांनी लाल किल्ल्यावरून भारतीय जनतेला उद्देशून 'नियतीशी करार' शिर्षकाचे भाषण केले, त्यात त्यांनी 'विविधतेत एकता' (Unity in Diversity) हा शब्दप्रयोग वापरला. मूलत: भावनात्मक पातळीवर आपण बंधूतेचे दोन पैलू लक्षात घेऊ.

### अ) मानसिक पैलू :-

जाती-धर्माबद्दलची कोणतीही अढी निर्माण होणार नाही याची प्रत्येकाने, समाजाचा जबाबदार घटक म्हणून खबरदारी घेतली पाहिजे. मनां-मनांत जर भेद असेल तर सामाजिक वातावरण कमालीचे अस्थिर बनते. व्यक्तीने धार्मिक असणे व इतर धर्माचा आदर राखणे दोन्हीही सकारात्मक अर्थाने अभिप्रेत असते.

### ब) राजकीय पैलू :-

सामाजिक एकजूट आणि सहकार्य हा बंधुतेचा राजकीय पैलू आहे. व्यक्ति ज्या गटात, राज्यात, राष्ट्रात राहते, त्यांच्याविषयी तिला आत्मीयता वाटते. एका समान हेतूसाठी अनेक व्यक्ति एकत्र येवून झटतात, तेव्हा त्यांच्या ठिकाणी एकजुटीची भावना (Solidarity) निर्माण होते. बंधुभाव, राष्ट्रभावना व देशभक्ती या तिन्ही संज्ञा राजकीय क्षेत्रांत वारंवार वापरल्या जातात. त्यापैकी बंधुभाव ही संज्ञा सर्वाधिक व्यापक व समावेशक आहे.

## ३.२.४ जॉन रॉल्स यांचा न्यायाचा सिद्धांत

रॉल्स हा अमेरिकन राज्यशास्त्रज्ञ होय. तो उदारमतवादी विचारपरंपरेतील राजकीय विचारवंत होता. त्याने सन १९७१ ला 'A Theory of Justice' हे पुस्तक लिहिले, त्यात त्याने न्यायासंबंधी 'Justice as fairness' हे सारतत्त्व (essence) मांडून न्यायाचा सिद्धांत प्रतिपादन केला आहे. त्याच्या न्यायाची तीन प्रमुख तत्त्वे आहेत. ती येथे अभ्यासाच्या मर्यादित चौकटीत अभ्यासणे क्रमप्राप्त ठरेल.

समकालीन उदारमतवादी चिंतनांतर्गत 'विकास विरुद्ध न्याय' (Progress Vs Justice) या विवादामध्ये हायेकने विकासाची बाजू घेऊन न्यायाची अवहेलना केली. याउलट, जॉन रॉल्स ने 'A Theory of Justice' (१९७१) अंतर्गत हा विचार मांडला की, चांगल्या समाजामध्ये अनेक सद्‌गुण असतात; त्यांच्यामध्ये न्यायाचे स्थान अग्रभागी आहे. न्याय चांगल्या समाजाची अत्यावश्यक अट आहे. परंतु पर्यायी बाब नाही. एखाद्या समाजामध्ये न्यायाशिवाय इतर नैतिक गुणांची प्राथमिकता असू शकते; परंतु अन्यायपूर्ण समाज विशेषरूपाने टीकेस पात्र असेल. जे विचारवंत सामाजिक उन्नतीच्या कार्यक्रमांमध्ये न्यायाच्या विचारांचा अडथळा येऊ देता कामा नये असे मानतात; ते समाजाला नैतिक ऱ्हासाकडे घेऊन जाण्याचा धोका पत्करत असतात.

जॉन रॉल्स हा वितरणात्मक न्यायाच्या (Distributive Justice) कल्पनेचा आधुनिक पुरस्कर्ता आहे. त्याने वितरणात्मक न्यायाचा उदारमतवादी सिद्‌धांत मांडला. तो विविध सामाजिक मूल्यांमध्ये न्याय या मूल्याला सर्वाधिक प्राधान्य देतो. रॉलसच्या मते, व्यक्तिंच्यामध्ये गुणवत्तेच्या बाबतीत निसर्गदत्त आणि

जन्मापासूनच आलेल्या पात्रता या भिन्न असतात आणि त्याबाबत व्यक्तिव्यक्तिंमध्ये विषमता असते मात्र अशा विषमतेचे नैतिकदृष्ट्या समर्थन करणे हे चूक ठरेल. ज्यांना निसर्गाने श्रेष्ठ आणि भरपूर क्षमता दिली आहे, त्यानांच सर्व गोष्टी भरपूर प्रमाणात मिळणे आणि ज्यांना अशा पात्रता कमी आहेत, त्यांना कमी मिळणे हे न्यायाचे वाटत असले तरी ते स्वेच्छाचारीपणाचे (Arbitrary) कृत्य ठरेल. ज्यांना निसर्गत:च कमी मिळाले त्यांना जास्त देऊन त्यांची उणिव भरून काढणे हे न्यायसंगत ठरेल. दुर्बलांचे निसर्गदत्त दौर्बल्य भरून काढण्याची ही प्रक्रिया आहे. रॉल्सच्या मते, न्याय म्हणजे 'बक्षिसांचे नीतिशास्त्र' नसून 'न्यूनपूर्तीचे न्यायशास्त्र' आहे. रॉल्सने त्याचा विचार केवळ संकल्पनात्मक स्तरालाच ठेवलेला नसून त्याची कार्यात्मक स्तरालाही मांडणी केली आहे. न्यायाचे वितरण म्हणजे केवळ न्यायालयांच्या द्वारे नसून वस्तूंच्या, सेवांच्या वितरणांशी संबंधित आहे. अधिकार, स्वातंत्र्य, सत्ता आणि संधी यांचे तर या न्यायाच्या दृष्टिकोणातून वितरण व्हायला हवे परंतु समाजातील संपत्ती आणि उत्पादन, वस्तू आणि विविध सेवा इतकेच नव्हे तर आत्मसन्मानाची साधने यांचेही वितरण रॉल्स त्यात अंतर्भूत करतो. उपयोगितावाद्यांचे 'अधिकतमांचे अधिकतम सुख' ही कल्पनाही त्याला सदोष वाटते, करण तिच्यात केवळ काल्पनिक सुखाच्याच वितरणाचा संदर्भ आहे. समाजातील वंचितांच्या इच्छा तशाच राहतात, म्हणून कोणाच्या इच्छा न्याय्य आहेत हे न्यायाच्या निकषावर ठरवायला हवे. श्रीमंत-गरीब, स्त्री-पुरुष तसेच विविध भिन्न वर्ग, जाति-धर्म इ. लोक त्यांच्यात त्या आधारे भेदभाव करून वस्तू, सेवा, संपत्ती, अधिकार, स्वातंत्र्य यांचे वाटप न होता ज्याला कमी आहे त्यालाच योग्य वाटा मिळावा. वितरणात सुधारणा करून त्याद्वारे समाजात न्याय निर्माण करणाऱ्यांच्या दृष्टीने रॉल्स तीन तत्त्वे मांडतो.

**१. समान स्वातंत्र्य** (Equal Liberty) **:** सर्वांना समान स्वातंत्र्य देणे आणि ते उपभोगण्यात अडथळे येणार नाहीत याची काळजी घेणे. रॉल्स, न्यायाचा सिद्धांत मांडत असताना समान स्वातंत्र्य (Equal Liberty) हे तत्त्व स्पष्ट करून सांगतो. समान स्वातंत्र्यात, समान राजकीय स्वातंत्र्य अभिप्रेत आहे. त्याच्या मते, प्रत्येक नागरिकांस समान राजकीय स्वातंत्र्य मिळाले पाहिजे. उदा. प्रत्येकास मतदानाचा व निवडणूक लढविण्याचा समान राजकीय हक्क असला पाहिजे. कोणासही हा हक्क नाकारता येणार नाही.

**२. योग्य समता** (Fair Equality) : अधिकारपदे व प्रतिष्ठा प्राप्त करण्याची सर्वांना योग्य आणि समान संधी प्राप्त करून देणे. रॉल्सच्या मते, समता ही सकारात्मक असली पाहिजे, म्हणजे योग्य बाबतीतच समता प्रस्थापित झाली पाहिजे असे अभिप्रेत आहे. जे योग्य आहे ते सत्य असते व जे सत्य असते ते न्यायी असते.

**३. वितरणात्मक न्याय** (Distributive Justice) **:** प्राथमिक स्रोतांचे न्याय्य वाटप म्हणजे वितरणात्मक न्याय होय. Equal distribution of the primary goods' असे वर्णन रॉल्स ने

वितरणात्मक न्यायाचे, त्याच्या न्यायाच्या सिद्धांतात केले आहे. वंचितांना जास्त लाभ मिळू शकेल अशी न्यायाची तत्त्वे स्वीकारणे रॉल्स ला अभिप्रेत आहे. वितरणात्मक न्याय तेव्हाच निर्माण करता येईल. जेव्हा स्पर्धात्मक बाजार व्यवस्था कायम ठेवली जाईल आणि शासन यंत्रणा कार्यक्षमपणे कार्य करून कायद्याची उत्तम रितीने अंमलबजावणी करू शकेल. समाजात उपलब्ध असलेल्या संसाधनांचा महत्तम उपयोग करून उत्पादित संपत्ती, वस्तू आणि सेवा यांचे सार्वजनिक हिताच्या दृष्टिकोणातून व्यापक प्रमाणात वितरण होईल तेव्हाच वितरणात्मक न्याय निर्माण होईल.

रॉल्सच्या वरील सिद्धांतातला महत्त्वाचा मुद्दा म्हणजे 'निसर्गाने जन्मसिद्ध क्षमता व योग्यता देण्यात त्यांच्या बाबतीत न्यूनता ठेवली आहे, त्यांना झुकते माप देणे न्यायसंगत ठरते' हा होय.

## ३.३ सारांश

राजकीय प्रक्रियेच्या अध्ययनात प्रभुत्व, सत्ता, अधिसत्ता आणि अधिमान्यता यांना महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले. यांचे आंतरसंबधात्मक संबंध असतात. राजकीय व्यवहाराच्या पातळीवर प्रभाव, सत्ता, अधिसत्ता आणि अधिमान्यता अभ्यासल्या जातात. स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि न्याय ही मौलिक मानवी मूल्ये आहेत. फ्रेंच राज्यक्रांतीच्या यशातून ही मूल्ये निर्माण झाली व मानवी मूल्ये म्हणून विकसित होत आहेत. आधुनिक लोकशाहीत या मानवी मूल्यांना महत्त्वाचे स्थान आहे.

## ३.४ पारिभाषिक शब्द

१. **प्रभाव** : इतरांच्या वर्तनात आपल्या म्हणण्यानुसार बदल घडवून आणण्याची क्षमता म्हणजे प्रभाव होय.

२. **सत्ता** : इतरांच्या धोरणावर प्रभाव टाकण्याची क्षमता म्हणजे सत्ता होय.

३. **अधिसत्ता** : आज्ञापालन करावयास लावणारी सत्ता म्हणजे अधिसत्ता होय.

४. **अधिमान्यता** : लोक स्वयंस्फूर्तीने आज्ञांचे पालन करतात तेव्हा त्यास अधिमान्यता म्हणतात.

५. **स्वातंत्र्य** : उचित बंधनांची व्यवस्था.

६. **समता** : गरजांच्या परिपूर्तीसाठी समान संधी म्हणजे समता होय.

७. **बंधूता** : भाईचाऱ्याची भावना.

८. **समता** : सार्वजनिक हिताच्या दृष्टीने जे योग्य आहे त्यास न्याय म्हणतात.

## ३.५ स्वयंअध्ययन प्रश्न व उत्तरे

### प्रश्न : रिकाम्या जागा भरा.

१. ''व्यक्तीच्या ठिकाणी असणारी इतरांच्या संबंधात धोरणावर प्रभाव टाकण्याची क्षमता म्हणजे ............ होय.''

२. थॉमस पेन याने ............. स्वातंत्र्याचा पुरस्कार केला.

३. डळलशींीू हा शब्द ............. या लॅटिन शब्दापासून निर्माण झाला आहे.

४. जॉन रॉल्स ने ............. या पुस्तकात न्यायाचा सिद्धांत मांडला.

५. लास्की च्या मते, समता ही मूलतः ............. ही प्रक्रिया आहे.

**उत्तरे :** (१) सत्ता, (२) नकारात्मक, (३) Liber, (४) A Theory of Justices, (५) समतलन.

## ३.६ अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ

१. **प्रा. भा. ल. भोळे :** *''राजकीय सिद्धांत आणि विश्लेषण''*, प्रथम आवृत्ती, १९८८, प्रकाशक-श्री. पिंपळापुरे प्रकाशन, नागपूर.

२. **प्रा. राम मुठाळ :** *''राजकीय सिद्धांत आणि राजकीय विचार''*, दुसरी आवृत्ती, १९९९, प्रकाशक-अंशुल प्रकाशन, नागपूर.

३. **प्रा. प. सि. काणे :** *''राजकीय सिद्धांत : आधारभूत संकल्पना''*, दुसरी आवृत्ती, २००३, प्रकाशक-पिंपळापुरे प्रकाशन, नागपूर.

४. **प्रा. भा. ल. भोळे :** *''राजकीय सिद्धांत''*, सातवी आवृत्ती, २०१०, प्रकाशक-पिंपळापुरे प्रकाशन, नागपूर.

५. *''राज्यशास्त्रातील मूलभूत संकल्पना''*, प्रकाशक : विद्या बुक्स पब्लिशर्स, २०१०, नागपूर.

६. **O. P. Gauba:** *"An Introduction to Political Theory"*, MacMillan Publication, Delhi, 4th Edition, 2005.

७. *"Concise Dictionary of Politics"*, Oxford Publication, 2005.

❑ ❑ ❑

घटक-४

# मूलभूत संकल्पना-२
# (Key Concepts - II)

अनुक्रमणिका

४.० उद्दिष्ट्ये

४.१ प्रास्ताविक

४.२ विषय विवेचन

 ४.२.१ राजकीय बंधन व प्रतिकार

 ४.२.२ समुदायवाद

 ४.२.३ बहुसंस्कृतीवाद

 ४.२.४ अनुदारवाद/स्थितीवाद

४.३ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ

४.४ सारांश

४.५ सरावासाठी स्वाध्याय

४.६ अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ

## ४.० उद्दिष्ट्ये

राज्यशास्त्रामध्ये दिवसेंदिवस अनेक संकल्पनांचा उदय होत आहे, त्यामध्ये सुरवातीच्या काळात सत्ता अधिसत्ता, अधिमान्यता स्वातंत्र्य, समता, बंधुता, न्याय इत्यादी संकल्पना होत्या. विसाव्या शतकामध्ये समुदायवाद, बहुसंस्कृतीवाद, अनुदारवाद इत्यादी संकल्पना प्रकर्षाने चर्चेत आल्याचे दिसून येते. या सर्व संकल्पनांचा अभ्यास करून त्या अभ्यासणे आज गरजेचे आहे. कारण या संकल्पना प्रामुख्याने समाजामधील वास्तवजीवनाचे आकलन करून देणाऱ्या आहेत, त्यामुळे त्या अभ्यासणे आवश्यक आहे.

## ४.१ प्रास्ताविक

आधुनिक राजकीय सिध्दांतात बदल होत आहेत, त्यात जे नवे विचार मांडले जात आहेत, त्यांचा अभ्यास करणे गरजेचे आहे. कारण १९९०-९१ नंतर उदारीकरण आणि जागतिकीकरण यांचा प्रभाव वाढला. विश्वव्यापार संघटनेची स्थापना होऊन जागतिक बाजारपेठ महत्त्वाची बनल्याचे दिसून येते. आज प्रत्येक देश एकमेकांच्या फार जवळ आले आहेत. सोव्हिएत युनियनचे विघटन होऊन पाश्चिमात्त्य उदारमतवादी विचाराच्या वर्तुळात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

राज्यांनी निर्माण केलेले नियम-कायदे यांचे पालन करणे बंधनकारक असते. परंतु काही ठिकाणी राज्याला विरोध केला जात आहे. यालाच राजकीय प्रतिकार म्हटले जाते. अनेक देशांमध्ये राजकीय बंधन आणि राजकीय प्रतिकार या दोन्ही संकल्पनाच्या आधारावर राजकीय क्षेत्रात कार्य करणाऱ्या संघटना दिसून येतात. त्याचबरोबर समुदायवाद, बहुसंस्कृतीवाद व अनुदारवाद या संकल्पना विसाव्या शतकात महत्त्वाच्या संकल्पना म्हणून उदयाला आल्या आहेत. कारण उदारमतवादाच्या स्वरूपात मूलभूत बदल होत आहे. विज्ञान, विवेक, धर्मनिरपेक्षता आणि स्वातंत्र्य, समता आणि बंधुता या मूल्यावर आधारित एकात्म मानवी समाज निर्माण करणे हे उदारमतवादाची उद्दिष्ट्ये होती, परंतु उदारमतवादामध्ये फक्त व्यक्ती स्वातंत्र्यावर जास्त भर दिला गेला. व्यक्ती ज्या समाजात वावरते, त्या समाजाला महत्व दिले नाहीत, त्यामुळे काही विचारवंतांनी समुदायाला विचारांच्या केंद्रस्थानी ठेवून भूमिका मांडली आहे, त्याचबरोबर संस्कृती आणि समाज यांचा विचार करता ऐतिहासिक काळापासून आजपर्यंत समाजामध्ये विविधता निर्माण झाली असून अनेक संस्कृतीचे आदान-प्रदान झाले आहे. या दृष्टीकोणातून बहुसंस्कृतीवादाचा उदय झाला आहे. तर उदारमतवादाला विरोध म्हणून यथास्थितीवाद किंवा अनुदारवाद मांडण्यात आला आहे, कारण समाजामध्ये परंपरा हया तशाच असाव्यात त्यात बदल करू नये, असे विचार यथास्थितीवाद मांडतो. अशाप्रकारे अलिकडच्या काळात समुदायवाद, बहुसंस्कृतीवाद व अनुदारवाद इत्यादी संकल्पना उदयास आल्याचे दिसते.

या सगळ्या संकल्पनांची सविस्तर चर्चा या प्रकरणात करण्यात येणार आहे. त्यामध्ये प्रामुख्याने राजकीय बंधन आणि राजकीय प्रतिकार, समुदायवाद, बहुसंस्कृतीवाद आणि यथास्थितीवाद या संकल्पना महत्त्वाच्या आहेत, ते अभ्यासणे गरजेचे आहे.

## ४.२ विषय विवेचन

### ४.२.१ राजकीय बंधन व राजकीय प्रतिकार

समाजातील प्रत्येक व्यक्ती काही बंधनामध्ये राहते. ही बंधने नागरी आणि राजकीय असतात.

ज्यावेळी आपण एखाद्या सामाजिक किंवा राजकीय संस्थेचे सभासद बनतो, त्यावेळी त्या संस्थेनी तयार केलेल्या नियमाचे बंधन आपणास पाळावे लागतात. राज्याचा नागरिक म्हणून प्रत्येकास त्या राज्याने केलेले कायदे व नियम पाळणे बंधनकारक असते. अशा प्रकारच्या कायद्याचे पालन करणे त्या नागरिकांच्या कर्तव्याचा भाग असतो. कोणत्याही समाजात नागरी जीवन यशस्वी करण्यासाठी अशा नियमांची आवश्यकता असते. व्यक्ती या कायद्याप्रमाणे आपली कर्तव्ये पारत पाडते.

राजकीय बंधनात राहणे, व्यक्ती स्वखुशीने मान्य करते, कारण सर्व प्रकारच्या अधिमान्यता प्राप्त झालेल्या अधिसतेच्या आज्ञांची बीनबोभाट पालन करण्याची नागरिकांची तयारी असते. कारण त्या अधिसत्तेचा अधिकार हा कायदेशीर व न्याय आहे, अशी त्यांची खात्री असते. म्हणून अधिसत्ता, अधिमान्यता व राजकीय बंधन या तीन संकल्पनांचे फार जवळचे संबंध आहेत. कारण एखाद्या राजकीय व्यवस्थेची अधिसत्ता किंवा अधिमान्यता धोक्यात आली, राजकीय बंधनाचे आधारही डळमळीत झाले, व्यक्तीची कर्तव्य पालनाबाबतची निष्ठा कमी झाली की, राजकीय बंधने ढिली पडावयास सुरवात होते. त्यातून राजकीय प्रतिकाराचा जन्म होतो.

## ❑ राजकीय बंधन म्हणजे काय?

राजकीय बंधन हे शब्द Political Obligation या इंग्रजी शब्दाचा मराठीतील अर्थ आहे. Obligation ही संज्ञा रोमन कायद्यातून आलेली असून त्याचा अर्थ आज्ञापालन किंवा आज्ञा पालनाची जबाबदारी असे मराठीमध्ये पर्यायी शब्द वापरला जातो. परंतु ते अर्थपूर्ण होत नसल्यामुळे बंधन किंवा आबंधन हे शब्द वापरले जाते. राजकीय बंधन म्हणजे राज्यव्यवस्थेनी समाज व्यवस्थेवर टाकलेली बंधने होय. जेव्हा व्यक्तीवर राज्याच्या बांधिलकीची जबाबदारी येऊन पडते. तेव्हा राज्यासंबंधीच्या कर्तव्याचा प्रश्न निर्माण होतो. तेव्हा ती कर्तव्ये पार पाडण्याबाबत व्यक्तीवर येणाऱ्या बंधनाला राजकीय बंधन असे म्हणतात.

राज्य व व्यक्ती यांच्यातील संबंधातून राजकीय बंधनाचा विचार पुढे आला आहे. हा विचार सॉक्रेटिसच्या विचारात आढळून येतो. प्रत्येक व्यक्ती राज्याची एक जबाबदार घटक असतो. त्याचबरोबर व्यक्ती राज्यामध्ये वास्तव्य करीत असते, त्यामुळे राजकीय बंधनात राहण्यास लोक स्वखुशीने मान्यता देतात. बंधने ही मुख्यत: वैचारिक आधारावर उभी असतात. बळाचा भाग त्यात कमी असतो. ज्यावेळी विचारापेक्षा बळाचा अंश वाढतो, त्यावेळी नागरिकांच्या कर्तव्य पालनात बळजबरीचा भाग वाढतो.

## ❑ सॉक्रेटीसचे राजकीय बंधनाविषयीचे विचार

प्राचीन ग्रीसमध्ये सॉक्रटिस हा अथेन्सचा नागरीक होता, तसेच तो एक विचारवंतही होता. तो

काही दिवस कायदेमंडळाचा सदस्य होता. सॉक्रेटिसने आपले विचार मांडण्यासाठी वाद-विवाद पध्दतीचा वापर करीत होता, त्यामुळे या पध्दतीला सॉक्रेटीक मेथड असे म्हणतात. सॉक्रेटिसच्या मते, ज्ञान हाच सद्गुण आहे. त्याद्वारे लोकाच्या मनातील शंका निरसन करून त्याना सत्य दाखविणे हा त्याचा हेतू होता. परंतु ग्रीक लोकशाहीवर टिका केल्यामुळे व देवतांवर न ठेवलेल्या विश्वासामुळे सॉक्रेटिसवर तरुणांना बिघडविणारा व पाखंडी असे दोन आरोप ठेवून त्याला दोषी ठरविले आणि देहदंडाची शिक्षा दिली.

प्लेटो आठ वर्षे सॉक्रेटिसच्या सहवासात राहिला व त्याने सॉक्रेटिसला आपला गुरू मानले. जेव्हा सॉक्रेटिसला मृत्यूदंडाची शिक्षा दिली. या कृत्याला प्लेटो, अथेन्सच्या सत्ताधिकाऱ्याने सत्तेच्या स्वार्थापायी केलेला खून असे म्हटले आहे. प्लेटोने आपल्या गुरुबद्दलच्या गोष्टी 'The Apology of Socrates' या ग्रंथामध्ये लिहिल्या आहेत. सॉक्रेटिसने राजकीय बंधनाबद्दलचे विचार स्पष्ट करताना प्रत्येक नागरिकाने आपल्या राज्याच्या कायद्याचे पालन केले पाहिजे असे मत मांडले. कारण तो कायद्याला पवित्र मानत असे. कायदा पालन हे प्रत्येकचे नैतिक कर्तव्य ठरते अशी भूमिका सॉक्रेटिसची होती. म्हणून.सॉक्रेटिसच्या मते, राज्याचे अन्यायी कायदे  व आज्ञा लोकांनी पाळणे आवश्यक नाही, पण आज्ञाभंग वा आज्ञापालन करीत असताना आपल्या कृतीचे नैतिक परिणाम काय होणार आहेत, यांचा व्यक्तीने वा नागरिकाने विचार करावा. राज्यसंस्था नागरिकांच्या जीवनात त्यांच्या प्रगतीसाठी अपरिहार्य आहे असे सॉक्रेटिसचे मत होते. त्यामुळे त्यांनी राजकीय बंधन पाळण्यासंदर्भातील खालील पाच तत्त्वे स्पष्ट केले आहे.

१. राजकीय बंधन पाळणे, प्रत्येक माणसाचे कर्तव्य आहे. कारण जन्मल्यापासून मृत्यूपर्यंत व्यक्तीच्या जीवनामध्ये राज्यसंस्था आणि प्रशासन महत्त्वाची भूमिका बजावत असते. ज्या राज्यात आपण जन्मतो, राहतो, आपली प्रगती करण्यासाठी प्रयत्न करतो, त्या राज्याची बंधने पाळणे महत्त्वाची आहे.

२. राजकीय बंधन पाळत असताना त्याचा फायदा की तोटा याचा विचार करू नये. कारण राजकीय बंधने हे सार्वत्रिक असतात. त्यामुळे राजकीय बंधन पाळल्यामुळे समाजहीत होत असेल तर बंधन पाळणे आवश्यक आहे.

३. राज्याकडून नागरिकांवर अन्याय होत असेल तर त्याचा प्रतिकार करा. परंतु त्याचा नैतिक परिणाम काय होणार आहे. याचा विचार करा. प्रतिकार करताना दुसऱ्याच्या हातातील हत्यार बनू नका.

४. आपण ज्या आज्ञा पाळणे कबूल करतो, ती पाळली पाहिजे, कारण ज्या वेळेस राज्यामध्ये आपण राहतो. त्या राज्याचे नागरीकत्व स्विकारतो, तेव्हा त्या राज्याचे नियम-कायदे न मोडण्याचे तत्त्व मान्य केलेले असते, त्यामुळे राजकीय बंधने पाळली पाहिजेत.

५. राजकीय बंधन पाळताना जगण्या-मरण्याची भिती असू नये. कारण जेव्हा आपण केलेले कृत्य हे राज्याच्या कायद्यानुसार चुकीचे असेल तर राज्यानी दिलेली शिक्षा स्विकारली पाहिजे, त्यावेळी मृत्यूदंडाची शिक्षा दिली तरी स्विकारावी जगण्या-मरण्याची भिती ठेवू नये.

अशाप्रकारे सॉक्रेटिसने राजकीय बंधनाविषयीचे विचार मांडले आहेत. जेव्हा सॉक्रेटिसला तरुणांना बिघडविणारा व पाखंडी म्हणून दोषी ठरविले आणि स्वहस्ते विषप्राशन करण्याची मृत्यूदंडाची शिक्षा दिली तेव्हा त्याच्या हितचिंतकांनी त्यांना पळून जाण्याची योजना तयार केली होती. त्यावेळी सॉक्रेटिसने असे स्पष्ट केले की, 'मी जर दरोडेखोराप्रमाणे तुरुंगातून पळून गेलो तर लोक मला म्हणतील? मी असे केल्याने समाजावर काय परिणाम होईल? जर मी पळून गेलो, तर मला पोलीस जाऊ देतील का? या सगळ्या प्रश्नांचा विचार केला असून मी राज्यानी दिलेल्या शिक्षेचा आदर करतो. माझा मृत्यू हा सत्याचा महिमा वाढवणारा आहे. ज्या माणसाचं जीवन संपलेलं आहे, त्यांनी पळून जाऊ नये. अशा प्रकारे परागंदा आयुष्य जगण्याचे मला मान्य नाही.' असे सांगून मोठ्या धैर्याने तो मृत्यूशी सामोरा झाला, परमेश्वराने मला बोलविले आहे, अशी त्याची श्रद्धा असल्यामुळे तो मृत्यू टाळू इच्छित नव्हता.

## ❑ थॉमस हील ग्रीन यांचे राजकीय बंधनाविषयीचे विचार

टी. एच. ग्रीनचा जन्म इंग्लंडमध्ये १८३६ साली झाला. ऑक्सफर्ड विश्वविद्यालयात त्याने चोवीस वर्षे अध्यापनाचे कार्य केले. त्याव्यतिरिक्त तो सार्वजनिक व राजकीय कार्यातही सहभागी झाला. तो ऑक्सफर्ड टाऊन कौन्सिलचा सदस्य होता. त्याने मद्यपान विरोधी आंदोलनात सक्रिय सहभाग घेतला होता. वयाच्या अवघ्या ४६व्या वर्षी १८८२ ला त्याचे निधन झाले.

ग्रीनने स्वतंत्र असे कोणतेही पुस्तक लिहिले नाही. परंतु त्यांनी वेळोवेळी दिलेल्या भाषणाचे संकलन म्हणजेच त्याची ग्रंथसंपदा होय. त्यापैकी 'Principles of Political Obligation' हा ग्रंथ महत्त्वाचा आहे. या ग्रंथामध्ये राजकीय बंधनाविषयी विवेचन केले आहे. ग्रीनच्या मते, लोकांची इच्छा हे राज्यसंस्थेचे अधिष्ठान आहे. राज्याची निर्मिती ही करारातून झाली ती मानवी सदिच्छेतून निर्माण झालेली आहे असे तो सांगतो. परंतु राज्यसंस्था आणि व्यक्ती यांच्यामध्ये संघर्ष निर्माण होऊ शकतो. दोघांची वेगवेगळी मते असू शकतात. त्यामुळे ग्रीनने राजकीय बंधन पाळण्यासंबंधी खालील पाच मुद्दे सांगितले आहेत.

१. कोणत्याही प्रकारचा कायदा तोडण्यापूर्वी आपण उपलब्ध असलेल्या कायदा बदलण्याच्या घटनात्मक मार्गाचा अवलंब केला आहे की नाही हे पहावे. ते सर्व मार्ग अवलंबल्यानंतर कायदा भंग करण्याचा विचार करावा.

२. एखादा कायदा भंग करण्याची गरज निर्माण होते, त्यावेळी आपण आपल्या मनाला विचारले पाहिजे की खरंच हा कायदा वाईट आहे का? असे आपल्या सद्सदविवेकबुद्धीला आव्हान केले पाहिजे. कायदा खरंच वाईट आहे असे वाटले तर कायदा भंग करावा.

३. कायदा भंग करत असताना जे कायदेभंग चळवळीमध्ये भाग घेणारे आहेत त्याचा वैयक्तिक हितसंबंध गुंतलेला नाही हे पाहिले पाहिजे. अनेक वेळा आपले हितसंबंध असणारे चळवळीत असू शकतात, अशा लोकांना चळवळीत सामील होऊ देऊ नका, कारण त्याचे हितसंबंधात वैयक्तिक स्वार्थ दडलेला असतो. ग्रीनच्या मते, राजकीय बंधनाचे उल्लंघन करताना याची काळजी घेतली पाहिजे.

४. कायदेभंग चळवळीमध्ये भाग घेणाऱ्यांमध्ये नैतिक प्रतिष्ठा असलेले लोक असावेत. उदा. गांधी, आंबेडकर, विनोबा इ. जर चळवळ करणाऱ्या व्यक्तींना नैतिक अधिष्ठान नसेल तर ती चळवळ अयशस्वी ठरते. म्हणून सत्याग्रह, चळवळ करणाऱ्या व्यक्तीचे चारित्र्य स्वच्छ असावे. त्याच्यामध्ये कोणत्याही प्रकारचे नैतिक दोष असता कामा नये.

५. ज्यावेळी कायदेभंग चळवळ केली जाते त्यावेळी त्याचे परिणाम काय होतील याचा विचार केला पाहिजे. तुमच्या कायदेमंडळामुळे परिस्थितीत सुधारणा होणार असेल तर कायदेभंग करा. जर परिस्थितीवर परिणाम होत नसेल तर तुम्ही कायदेभंग करू नये.

अशाप्रकारे टी. एच. ग्रीन यांनी राजकीय बंधन हे नैतिक अधिष्ठानाच्या आधारे स्पष्ट केले आहे.

## ❑ राजकीय बंधनाचे आधार :–

व्यक्तीने राज्याची बंधने का पाळावयाची याची राज्यशास्त्रात विस्ताराने चर्चा करण्यात आली आहे, म्हणूनच बंधने पाळण्याच्या कारणांची मीमांसा करणे आवश्यक आहे. राजकीय बंधनाचे खालील चार आधार सांगता येतील.

१) राजाच्या दैवी अधिकाराचा सिध्दांत.

२) सामाजिक कराराच्या सिध्दांत.

३) चिरभोगी स्वाभित्वाचा सिध्दांत.

४) शक्ती सिध्दांत.

## १. राज्याच्या दैवी अधिकाराचा सिध्दांत :–

आपण राजाच्या आज्ञा पाळल्या पाहिजेत, कारण राजाच्या अधिकाराचे स्वरूप दैवी आहे असे

मत सर्वच संस्कृतीमध्ये आणि देशामध्ये मांडण्यात आले. इजिप्तमध्ये राजाला देव समजले जाई. चीनमध्ये तो देवपुत्र होता, तर मुघलांच्या मते, तो ईश्वराची सावली होती. भारतात त्यास विष्णूचा अवतार मानला जाई. महाभारतात राज्याची उत्पत्ती ईश्वराने केली आहे, असे मत मांडण्यात आले.

मध्ययुगीन युरोपात राजाचा राज्य करण्याचा अधिकार त्यास ईश्वराकडून प्राप्त झालेला आहे असे मत मांडण्यात आले. सोळाव्या शतकानंतर राजाचा राज्य करण्याचा अधिकार हा दैवी अधिकार आहे, असा विचार युरोपात पुढे यावयास सुरुवात झाली, म्हणून त्याने दिलेल्या आज्ञा पाळणे व राजकीय बंधने पाळणे आवश्यक आहे असे मानले गेले.

## २. सामाजिक कराराचा सिध्दांत :-

प्राचीन काळापासून राजा व नागरिक यांच्यामधील कराराची कल्पना मांडण्यात आली आहे. प्राचीन ग्रीसमध्ये व भारतामध्येही सर्व कायदे मनुष्यनिर्मित सामाजिक कराराची निर्मिती असते आणि सामूहिकरित्या नागरिक हे कायदे पाळीत असतात. राज्यसंस्था लोकांचे संरक्षण करते आणि संरक्षणाच्या बदल्यात लोक राजाला कर देतात म्हणून राजाची बंधने लोक पाळतील असा विचार महाभारतात मांडला आहे.

सतराव्या व अठराव्या शतकात युरोपात हॉब्ज, लॉक व रूसो यांनी सामाजिक कराराचा सिध्दांत मांडला. राजकीय अधिसत्ता, नागरिकांच्या इच्छेचा आविष्कार असतो असे मत मांडले. हॉब्जच्या मते, निसर्गावस्थेतून आत्मसंरक्षण करण्यासाठी माणसांनी आपल्या अधिकाराचा त्याग केला आणि त्यातून निर्माण झालेल्या राज्यसंस्थेच्या बंधनाचे त्याने पालन करावयास सुरुवात केली. लॉकच्या मते, लोकांनी आपला नैसर्गिक कायद्याचा अर्थ लावण्याचा अधिकार राज्यसंस्थेस दिला आणि राज्यसंस्थेने लावलेला अर्थ मान्य करून राज्यसंस्थेच्या बंधनास मान्यता दिली. रूसोने सामाजिक संस्थाच्या निर्मितीमागे सामूहिक ईहा कशी काम करीत असते हे स्पष्ट केले. जनतेची सामूहिक इच्छा राज्याच्या कायद्यातून व्यक्त होते. ज्यावेळी एखादी व्यक्ती सामूहिक इच्छेवर आधारित संस्थांच्या आज्ञांचे पालन करते, त्यावेळी ती स्वत:च्याच आज्ञांचे व नियमांचे पालन करीत असते, कारण ते नियम बनविण्यात तिचा स्वत:चा सहभाग असतो. अशाप्रकारे सामाजिक कराराचा सिध्दांत हा राजकीय बंधनाचा एक आधार बनतो.

आधुनिक राज्यव्यवस्था राज्यघटनेवर आधारित आहे आणि या घटनेमध्ये राज्याचे कायदे व नियम ग्रहित करण्यात आले आहेत. ही राज्यघटना हा एक प्रकारचा करार असतो, आणि त्या करारावर आधारित राज्याची रचना, उद्दिष्ट्ये व्यक्तीचे अधिकार यांचे विवेचन करण्यात आलेले असते. अशा प्रकारच्या घटनात्मक राज्यघटनेची बंधने पाळणे व्यक्तीसाठी आवश्यक असते. कारण त्या

राज्यघटनेत समाविष्ट करण्यात आलेल्या ध्येयाशी, उद्दिष्टांशी आणि हक्काशी त्या व्यक्तींची बांधिलकी असते.

## ३. चिरभोगी स्वामित्वाचा सिध्दांत :-

या सिध्दांताची मांडणी प्रथम फ्रान्समध्ये करण्यात आली. राजाचा राज्य करण्याचा अधिकार ही त्यांची सत्तेवर जी मालकी आहे, त्या मालकीवर आधारलेला अधिकार असतो. राजाची राज्याची मालकी त्यांच्या स्वामित्वावर आधारलेली आहे. राज्याचे स्वामित्व राजाकडे आहे, आणि हा स्वामित्वाचा अधिकार तो अनेक वर्षे वंश परंपरेने भोगत आहे. म्हणून त्यास राज्य करण्याचा अधिकार आहे. या राजाने निर्माण केलेल्या कायद्याचे व नियमांचे पालन करणे सर्वांना बंधनकारक आहे. हा सिध्दांत राजेशाहीच्या काळात लोकप्रिय होता.

## ४. शक्ती सिध्दांत :-

काही विचारवंत असे मत व्यक्त करतात की, राज्याच्या हातामध्ये दंड शक्तीचा अधिकार असतो याचा अर्थ 'बळी तो कानपिळी' किंवा 'जिसकी लाठी उसकी भैस' या म्हणीमधून जो आशय व्यक्त होतो, तो शक्ती सिध्दांताचा पाया आहे. ज्याच्याकडे बळ आहे. त्याच्या जोरावर राज्याची सुत्रे एकवटली जातात. दुर्बल लोक सबळाची सत्ता मान्य करून आपल्या संरक्षणाची हमी मिळवितात. राज्याचा विस्तार हा त्या व्यक्तीकडे असलेल्या सामर्थ्यावर होतो, कारण राज्याच्या आज्ञा जर पाळल्या नाहीत तर आपणास शिक्षा होईल किंवा आपले नुकसान होईल अशी भिती वाटल्यामुळे लोक राजकीय बंधने पाळतात. इतिहासात आपण अनेक उदाहरणे पाहिली आहेत की, बळाच्या जोरावर राज्य संपादन करणारे राजे नंतर लोकांना आपल्या आज्ञा पाळावयास भाग पाडतात.

अशाप्रकारे राजकीय बंधनाचे विविध आधार आहेत हे स्पष्ट होते.

आधुनिक काळात आपण लोकशाही राज्यात राहतो. सध्याची लोकशाही ही प्रतिनिधीक लोकशाही आहे. आपण निवडून दिलेले प्रतिनिधी आपल्यावर आपल्यातर्फे राज्य करतात, त्यांना एका मुदतीनंतर बदलण्याचा आपणास अधिकार असतो. राज्याची अधिसत्ता व अधिमान्यता लोकशाही व्यवस्थेत अनुस्यूत असते. ती लोकांच्या संमत्तीवर वा मान्यतेवर आधारलेली असते, त्यामुळे लोकशाही व्यवस्थेत निर्माण केलेल्या कायद्याचे व नियमांचे बंधन लोकांनी पाळले पाहिजे. कारण लोक स्वत:च्या प्रतिनिधीनी निर्माण केलेल्या कायद्याचेच त्यादवारे पालन करतात. लोकशाही व्यवस्था त्या सामाजिक प्रक्रियेचा भाग असते. ज्यामध्ये स्वातंत्र्य, समता व न्याय यांच्या काही निश्चित कल्पना मांडण्यात आलेल्या असतात आणि लोकशाही व्यवस्था या कल्पनांना मूर्तरूप देते किंवा त्यांची अंमलबजावणी करण्याचा प्रयत्न करते. तोपर्यंत ती बंधने पाळावयास लोक राजी असतात.

## ❑ राजकीय बंधनाची मर्यादा :-

राज्याच्या बंधनात राहणे सर्व लोकांना आवश्यक असते, कारण ती बंधने राज्यघटनेने निर्माण केलेल्या संस्थांनी सर्वांच्या हितासाठी निर्माण केलेली असतात. पण अनेकवेळा राज्याचे कायदे किंवा कृती लोकांना अन्यायाच्या वाटतात, त्याविरुध्द प्रतिकार करावयास लोक सिध्द होतात. नैसर्गिक कायद्याचा पुरस्कार करणाऱ्यांनी विचारवंतांच्या मते, जे कायदे नैसर्गिक कायद्याच्या विरुध्द असतात त्याचा प्रतिकार करावा. टी. एच. ग्रीन या विचारवंताने असे मत मांडले की, अन्याय्य वाटणारे कायदे लोकांनी प्रस्थापित घटनात्मक किंवा कायद्याच्या चौकटीत बसवून बदलण्याचा प्रयत्न करावा, पण तो जर बदलता आला नाही तर त्यांनी कायदेभंग करावा, पण हे करीत असताना कायदेमभंगाचा उद्देश, राजकीय डावपेचाचा भाग नसून तो शुध्द आहे हे लक्षात घेतले पाहिजे. त्याचबरोबर या कायदेभंगाचा परिणाम काय होणार आहे याचाही त्यांनी विचार केला पाहिजे. त्याचे परिणाम जास्त वाईट होणार असतील तर अशी चळवळ करणे धोक्याचे बनते. ग्रीनच्या मते, राज्यकर्ते अन्यायी असतील, अकार्यक्षम असतील किंवा रूढी परंपरेच्या विरोधात कायदा केला असेल तर लोक त्याला विरोध करतात.

राजकीय बंधन पाळणे सर्वच नागरिकांसाठी आवश्यक असले तरी त्यास काही मर्यादा असतात. ज्या बंधनाना व नियमांना समाजाची व्यापक मान्यता नसते, ती बंधने फारशी पाळली जात नाहीत. त्यामुळे ही बंधने न्यायावर आणि व्यापक सामाजिक सहमतीवर आधारलेली असने, आवश्यक असते, त्याद्वारा राज्यसंस्था समाजासाठीची जास्त व्यापक उद्दिष्ट्ये साध्य करू शकते.

# ४.२.२ राजकीय प्रतिकार

राजकीय बंधनाच्या किंवा दायित्वाच्या अनुषंगाने समाजातील आणखी एक महत्त्वाचा प्रश्न म्हणजे राजकीय प्रतिकार होय. राजकीय प्रतिकार हे राज्याच्या विरोधात वापरावयाचे साधन आहे. राज्याच्या आज्ञांचे पालन करणे व्यक्तीवर बंधनकारक असते, परंतु राज्याने जर हुकूमी पध्दतीने वागण्याचा प्रयत्न केला तर त्याला विरोध करण्याचा व्यक्तींना नैसर्गिक अधिकार असायला पाहिजे हा विचार राजकीय प्रतिकार या संकल्पनेत अभिप्रेत आहे.

## ❑ राजकीय प्रतिकार याचा अर्थ :-

राजकीय प्रतिकार यांचा अर्थ राज्याच्या कायद्याला विरोध करण्याचा किंवा राज्याच्या आज्ञा पालन करण्यास नकार देण्याचा व्यक्तीला असलेला अधिकार होय. परंतु हा अधिकार असतो का असा प्रश्न अनेक वेळा विचारला जातो. अपवादात्मक परिस्थितीत राज्याला विरोध करण्याचा अधिकार व्यक्तीला असला पाहिजे. अनेक राजकीय विचारवंतांनी व्यक्तीला राजकीय प्रतिकार करण्याचा अधिकार दिलेला

नाही. त्यांच्या मते, राज्य ही एक महत्त्वपूर्ण संस्था आहे. राज्याला अनेक महत्त्वाची कार्ये पार पाडावी लागतात, तेव्हा त्यास कार्ये योग्य प्रकारे पाडता यावीत म्हणून व्यक्तीला राज्याला विरोध करण्याचा अधिकार देऊ नये. हॉब्ज, रुसो, हेगेल यासारख्या अनेक राजकीय विचारवंतांनी व्यक्तींना राजकीय प्रतिकाराचा अधिकार दिला नाही. त्याचबरोबर राजकीय प्रतिकाराचा अधिकार कायदेशीर दृष्टीकोनातून कोणतेही राज्य आपल्या नागरिकांना कायद्यास विरोधकरण्याचा अधिकार देवू शकत नाही. तर नैतिकदृष्ट्या राजकीय प्रतिकाराचा अधिकार देऊ शकत नाही. असे म्हणून राजकीय प्रतिकाराचा अधिकार देण्यास विरोध केला जातो. ब्रिटनमध्ये १६८८ मध्ये काही लोकांनी राज्याच्या अन्यायाविरुध्द बंड केले तेव्हापासून इंग्लंडमध्ये राजकीय प्रतिकाराचा हक्क लोकांना मिळाला आहे. त्यानंतर अनेक देशामध्ये क्रांती होऊन स्वातंत्र्याचा पुरस्कार करण्यात आला. पाश्चात्य राजकीय विचारवंतामध्ये राजकीय प्रतिकाराबाबत जॉन लॉक, टी. एच. ग्रीन व हेन्री डेव्हीड थोरो या तीन विचारवंतानी मांडले आहेत.

## ❑ जॉन लॉक यांचा राजकीय प्रतिकारांचा सिद्धांत :-

जॉन लॉक हा सामाजिक कराराचा सिध्दांत मांडणारा महत्त्वाचा विचारवंत आहे. त्याच्या विचारामध्ये राजकीय प्रतिकाराचा सिध्दांताचे विवेचन केले आहे. लॉकने व्यक्तीला केंद्रबिंदू मानून राज्याच्या सत्तेवर मर्यादा घातली आणि विशिष्ट परिस्थितीत राज्याला विरोध करण्याचा व्यक्तीस अधिकार दिला. लॉकच्या मते, प्रत्येकाला राजकीय प्रतिकार करण्याचा अधिकार आहे. कारण, ज्या कराराच्या माध्यमातून राज्यसंस्थेची निर्मिती झाली आहे, तो करारच राज्यसंस्था भंग करत असेल तर त्याविरुध्द प्रतिकार करण्याचा अधिकार लोकांना असला पाहिजे. लॉकच्या मते, लोकांनी अन्याय सहन करू नये, ज्यावेळी अन्याय होईल त्यावेळी प्रतिकार करावा आणि त्या प्रतिकारास बहुसंख्य लोकांचा पाठिंबा असावा तरच मोठ्या प्रमाणात प्रतिकार होतो. म्हणून लॉकने राज्याला विरोध करण्याचा अधिकार विशिष्ट परिस्थितीत असल्याचे सांगतो, ते पुढीलप्रमाणे :-

१) राजा हा जर त्याची जबाबदारी पूर्ण करण्यास असमर्थ ठरला असेल किंवा त्याने दुर्लक्ष केले असेल तेव्हा जनता आपल्या संरक्षणासाठी राजा आणि विधीमंडळात बदल घडवून आणू शकतील.

२) शासन संस्था विश्वस्ताची भूमिका पार न पाडता संपत्ती हिरावून घेण्याचा प्रयत्न करीत असेल तर जनतेला असलेला विद्रोह करण्याचा अधिकार न्यायपूर्ण ठरतो.

३) शासन संस्थेचे कार्य समाजाचे कल्याण करणे असते, परंतु ज्यावेळी अंतर्गत अस्थैर्य, बंड व जुलमी स्थिती निर्माण होते, त्यावेळी लोकांचे जीवित धोक्यात आल्यास क्रांती होऊ शकते.

४) शासनकर्ता जर जुलमी वर्तन करत असेल. युध्दखोर वागत असेल, तर राज्यास विरोध करता येतो.

५) जेव्हा कायद्याचे राज्य रहात नाही. कायद्याचा वापर दुसऱ्यांना त्रास देण्यासाठी केला जातो, तेव्हा क्रांती न्यायसंगत असते.

अशाप्रकारे राज्यानी निर्माण केलेले अन्यायी कायदे मोडून काढण्यासाठी लोकांना राजकीय प्रतिकार करण्याचा अधिकार लॉकने दिला आहे.

## ❑ टी. एच. ग्रीनचा राजकीय प्रतिकाराचा सिध्दांत :-

टी. एच. ग्रीन यांनी 'Principle of Political Obligation' या ग्रंथामध्ये राजकीय प्रतिकाराच्या सिध्दांताचे विवेचन केले आहे. ग्रीनच्या मते, राजकीय प्रतिकार त्यावेळी करावा ज्यावेळेस सर्वांचेच असे मत होईल की, हा कायदा सर्वांच्या हितसंबंधाविरोधी आहे व तो नैतिक विरोधी आहे.

राज्य ही एक नैतिक संस्था असून ती व्यक्ती जीवनाच्या विकासाचे ते साधन आहे, त्यामुळे राज्यातच आदर्श जीवन प्राप्त होईल, म्हणून राज्याचे आज्ञा पालन करावे. परंतु जर राज्य आपल्या उद्देशापासून विचलीत होत असेल आणि त्यामुळे सामाजिक हिताची पूर्तता होण्यात अडचणी निर्माण होत असतील तर राज्याच्या कायद्याला विरोध करण्याचा नैतिक अधिकार ग्रीन ने दिला आहे; परंतु तो अधिकार वैयक्तिक हितासाठी वापर करू नये, ही अट त्याने घातली आहे. जर सामाजिक बाजूचा विचार करून सामान्य हितासाठी त्याचा वापर करण्यात यावा. राज्य हे नैतिक आदर्श जीवन देणारी संस्था असली तरी रक्षकच भक्षक ठरणयाची शक्यता असते, तेव्हा व्यक्तीनी राज्याचे बंधन पाळू नये आणि जुलमी कायद्याविरोधी आवाज उठविणे हा जनतेचा अधिकार असतो. त्यांनी सांगितलेल्या अटी पुढीलप्रमाणे :-

१) स्वार्थासाठी विरोध नसावा.

२) विरोध केल्यामुळे अराजक निर्माण होणार नाही.

३) शासनाच्या धोरणात संविधानात्मक मार्गाने परिवर्तन करणे शक्य आहे का? ते शहानिशा करणे.

४) क्रांतीकारक मार्गामुळे बदल घडविणे शक्य असल्याची खात्री असावी.

५) अपेक्षित समाजहितात बदल घडून पूर्वीपेक्षा चांगलं व्यवस्थापन निर्माण करणे शक्य असल्यास, आपल्या अधिकारांचा जपून वापर करावा.

६) समाजाचा लाभ व हानी यांचा तुलनात्मक विचार करून राज्याला विरोध करावा.

अशा अनेक अटी ग्रीनने घातल्या आहेत. अशाप्रकारे एकीकडे प्रतिकार करण्याचा अधिकार ग्रीनने दिला आहे तर दुसरीकडे अटी टाकून त्याला मर्यादित केल्याचे दिसून येते.

## ❑ हेन्री डेव्हिड थोरो यांचा राजकीय प्रतिकाराचा सिद्धांत :-

हेन्री डेव्हिड थोरो यांनी 'Civil Disobedence' या ग्रंथात राजकीय प्रतिकाराविषयीचे विचार मांडले आहेत. थोरोच्या मते, अन्यायाच्या विरोधात शांततेच्या मार्गाने प्रतिकार करण्याचा प्रत्येक नागरिकाला अधिकार आहे. शासनाचे कायदे नेहमी न्यायावर आणि नीतीवर आधारलेले असले पाहिजे. एखादा कायदा नितीमूल्याशी विसंगत असेल तर शांततेच्या मार्गाने त्याचा प्रतिकार केला पाहिजे, जे राज्य अन्यायाने लोकांना शासन करते त्या राज्यात प्रत्येक नीतीमान माणसाची खरी जागा तुरुंगातच असते, असे मत थोरोने व्यक्त केले आहे. राज्यामध्ये जर अन्यायी कायदे अस्तित्वात असतील तर बहुमताने ते दुरुस्त होईपर्यंत त्याविरुध्द प्रतिकार केला पाहिजे असे थोरोचे मत होते.

थोरोच्या मते, राज्याला जो अधिकार प्राप्त झालेला असतो, तो तेथील लोकांनीच त्या राज्यसंस्थेला दिलेला असतो, त्यामुळे राज्यसंस्थेने माणसाच्या उच्च व्यक्तीमत्त्व, त्याची बौद्धिक आणि नैतिक भूमिका याला महत्त्व द्यावे आणि व्यक्तीशी न्याय असे वर्तन करावे. जर व्यक्तीच्या विवेकबुद्धी व आत्मविकासाची प्रेरणा यांची पायमल्ली झाली तर समाज रसातळाला गेल्याशिवाय राहणार नाही, अशी थोरो यांची भूमिका होती. म्हणून थोरो यांनी अन्यायी राज्यसंस्थेविरुध्द राजकीय प्रतिकार करण्याचा अधिकार दिला आहे.

## ❑ इतर विचारवंतांचे राजकीय प्रतिकारासंबंधी विचार

प्रो. लास्की यांनी राजकीय प्रतिकाराच्या हक्काचे समर्थन केले आहे, ते असे म्हणतात की, जर राज्य नागरिकांच्या सामान्य हिताचे रक्षण करण्याची जबाबदारी पार पाडत नसेल किंवा व्यक्ती विकासासाठी आवश्यक असलेल्या हक्कांना मान्यता देत नसेल किंवा व्यक्ती विकासाला बाधा पोहोचविणारे कायदे राज्याकडून केले जात असतील तर अशा परिस्थितीत राज्याला विरोध करण्याचा हक्क व्यक्तीला पोहोचतो.

महात्मा गांधी यांनीही राजकीय प्रतिकाराच्या हक्काचे समर्थन केले आहे. त्यांनी असे म्हटले आहे की, राज्याच्या अन्याय व जुलमी कृतीना विरोध करणे हा व्यक्तीचा हक्क आहे, त्याबरोबर ते कर्तव्य आहे. मात्र गांधीजीनी या प्रश्नांचा विचार नैतिक दृष्टीकोनातून केला आहे. त्यामुळे त्यांनी नि:शस्त्र प्रतिकाराच्या मार्गाला मान्यता दिली आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी राजकीय प्रतिकाराचा अवलंब करून अनेक आंदोलने, चळवळी उभ्या केल्या आहेत, त्यांनी राजकीय प्रतिकार करताना नि:शस्त्र प्रतिकाराबरोबर हिंसेचाही वापर करावा असे मत मांडले, परंतु प्रत्यक्षात त्यांनी अहिंसेद्वारेच आंदोलने, चळवळी उभ्या करून संघर्ष केल्याचे दिसून येते.

अशा प्रकारे वरील विवेचनावरून असे दिसून येते की, राजकीय प्रतिकाराच्या संदर्भात राजकीय विचारवंतांमध्ये मतभेद दिसून येतात. असाधारण परिस्थितीतच राजकीय प्रतिकाराचा वापर करावा किंवा राज्याला विरोध करण्याचा अधिकार व्यक्तींना असावा अशी भुमिका मांडली. परंतु सगळ्या गोष्टींचा विचार करताना राज्याला विरोध कशा पध्दतीने केला पाहिजे, याचा विचार फारसा केला नाही. हे विशद करताना हिंसा, अहिंसा नि:शस्त्र व सशस्त्र अशा घटकांच्या आधारावर राजकीय प्रतिकाराचे प्रकार पाडता येतात. राज्याला विरोध करताना मार्ग कोणते नि:शस्त्र आणि सशस्त्र मार्ग कोणते याचा विचार करणे गरजेचे आहे.

## ❑ राजकीय प्रतिकाराचे प्रकार :-

राजकीय प्रतिकाराचे दोन प्रकार पडतात. नि:शस्त्र प्रतिकार व सशस्त्र प्रतिकार.

१. **नि:शस्त्र प्रतिकार :** यामध्ये अर्ज लिहिणे, विनंती करणे, वर्तमानपत्रात लिहिणे, सभा घेणे, सह्या गोळा करणे, मोर्चा काढणे, धरणे धरणे, निदर्शन करणे, घेराव घालणे, उपोषण करणे, काम बंद करणे, लेखणी बंद करणे, साखळी उपोषण करणे, आमरण उपोषण करणे, असहकार करणे, आज्ञा मोडणे, कर न देणे, असहकार करणे इत्यादी मार्गाने निशस्त्र प्रतिकार करता येतो.

२. **सशस्त्र प्रतिकार :** हिंसक निदर्शन करणे, दंगे करणे, विरोधकाचे हत्या करणे, मोठ्या प्रमाणात राजकीय हत्या करणे, (नक्षलवादी) घातपातीच्या कारवाया करणे, गोळीबार करणे, रेल्वे पेटविणे, बस उडवणे, बेमुदत संप करणे, कारखाने बंद पाडणे, आगी लावणे, सशस्त्र गुप्त मंडळी गट स्थापन करणे, दशहतवादी गट स्थापन करणे, व्यापक प्रमाणात सशस्त्र दल तयार करून लष्करी चढाई करणे, लष्करी चढाई करून राज्यसंस्थेवर ताबा मिळविणे इत्यादी गोष्टींचा समावेश होतो. उदा. क्युबाची क्रांती (१९६१), चीनची क्रांती (१९४९) इ.

जागतिक पातळीवर विचार केला असता अनेक देशांमध्ये नि:शस्त्र आणि सशस्त्र प्रतिकाराद्वारे अनेक राज्ये स्वतंत्र झाल्याचा इतिहास आहे. त्यामध्ये रशियन राज्यक्रांती, फ्रेंच राज्यक्रांती, अमेरिकन राज्यक्रांती, भारतीय स्वातंत्र्य चळवळ, माओची सांस्कृतिक क्रांती इत्यादी अनेक उदाहरणे देता येतील.

## ४.२.२ समुदायवाद

समुदायवाद हा असा विचारप्रवाह आहे की, त्यामध्ये फक्त समुदायाच्या हिताचा विचार केला जातो. विसाव्या शतकात विज्ञान, विवेक, धर्मनिरपेक्षता आणि स्वातंत्र्य, समता, बंधुता या मूल्यावर आधारलेला एकात्म मानव समाज स्थापन करणे ही उदारमतवादाची उद्दिष्ट्ये होती. परंतु कालांतराने उदारमतवादाने व्यक्तीस्वातंत्र्यावर इतका भर दिला की, समाजाचा विचार केला नाही. मानवी जीवनातील विविधता नष्ट झाली. अनेक सांस्कृतिक परंपरा संपुष्टात आल्या. उदारमतवादाच्या विचारांना विरोध केला पाहिजे, असा विचारप्रवाह त्यातून निर्माण झाला.

फ्रेंच राज्यक्रांतीने स्वातंत्र्य, समता, बंधुता या तत्वाचा पुरस्कार केला व उदारमतवादी विचारवंतांनी व्यक्ती स्वातंत्र्याच्या अनुषंगाने क्रांतीचे विश्लेषण केले. त्याच काळात निर्माण झालेल्या फॅसिस्टवाद, नाझीवाद, धार्मिक मूलतत्त्ववाद यामुळे व्यक्ती व समाज यांच्यामध्ये दुही निर्माण करून व्यक्ती व तिच्या स्वायत्ततेला जास्त महत्त्व देण्यात आले आणि समाजाला दुय्यम स्थान देण्यात आले. त्यांच्या मते, व्यक्ती ही स्वतंत्र, विवेकशील आणि आत्मनिर्णय करण्यासाठी सक्षम आहे, तिला आपल्या हिताची जाणीव असते. तीच्यामध्ये एवढी क्षमता आहे की, वर्तमान सामाजिक व्यवस्थेमध्ये ती भाग घेऊ शकेल, असा विचार उदारमतवादाने मांडले आहे. उदारमतवादाच्या मते, लोकांकडे राज्याच्या पूर्वीपासून नैसर्गिक अधिकार आणि स्वातंत्र्यता होती. राज्य हे नैसर्गिक नसून ती कृत्रिम संस्था आहे. कारण स्वातंत्र्य हा व्यक्तीचे नैसर्गिक अधिकार आहे आणि व्यक्ती स्वातंत्र्याचे संरक्षण करणे राज्याचे महत्त्वाचे काम आहे. व्यक्ती स्वातंत्र्यामध्ये राज्याने हस्तक्षेप करू नये असा विचार उदारमतवादाचा आहे, त्यामुळे व्यक्तीवादाला हा उदारमतवादी राजकीय सिध्दांतामध्ये महत्त्वाचे मानले आहे, परंतु समुदायवाद उदारमतवादातील व्यक्तीवादाला विरोध करणारा विचारप्रवाह आहे.

उदारमतवाद्यांनी दुसऱ्या महायुध्दानंतर कल्याणकारी राज्याचा पुरस्कार केला, त्याचकाळात अनेक देश हे साम्राज्यवादातून स्वतंत्र झाले. १९७० च्या दशकामध्ये उदारमतवादी विचारांच्या संदर्भात पुर्नमांडणी करण्यात आली. त्यामध्ये जॉन रॉल्सने १९७१ साली 'Theory of Justice' या ग्रंथात न्यायाच्या सिध्दांताची कल्पना मांडली. उदारमतवादाचा विकास केला. उदारमतवादाला नव्या पायावर उभे केले. रोनॉल्ड डॉर्विन यांनी अधिकाराच्या कल्पनेचा अभ्यास करून ते गंभीरपणे का घेतले पाहिजे हे सांगितले. मार्क्सवादात समाजाला स्थान होते, परंतु त्यांचा आधार वर्ग होता. या सर्व कारणामुळे समाजाला कोणतेही स्थान नव्हते, त्यामुळे समुदायवादी विचारवंतांनी व्यक्तीवादाला विरोध करून समाजाला महत्त्व प्राप्त करून देण्याचे कार्य केले आहे.

## ❑ समुदायवादाचा विकास

समुदायवाद हा शब्द १८४१ पर्यंत वापरात नव्हता. प्रथम गुडवेन बारम्बी (Goodwyn Barmby) यांनी वैश्विक समुदायवादी संघटनेची स्थापना केली. परंतु समुदायवादाची प्रारंभिक बीजे प्राचीन ग्रीक तत्त्वज्ञ ॲरिस्टॉटलच्या विचारात दिसून येतात. आधुनिक काळात जीन जॅक रुसो, हेगेल आणि टी. एच. ग्रीन यांनी समुदायवादाच्या विकासात योगदान दिले आहे. ॲरिस्टॉटलच्या मते, मनुष्य हा समाजशील प्राणी आहे. तो समाजात राहूनच एकमेकांच्या साहाय्याने आपल्या जीवनाची पूर्ती करू शकतो. रूसोच्या मते, माणूस विवेकाद्वारे समाजात राहूनच संपूर्ण विकास करू शकतो. समुदायवादाचे एक अग्रणी प्रवक्ते टी. एच. ग्रीन यांनी आपल्या लेक्चर्स ऑन द प्रिन्सिपल्स ऑफ पॉलीटिकल ऑब्लिगेशन (१८८२) यामध्ये समुदायवादाबद्दल विचार मांडले आहेत. ग्रीनच्या मते, मनुष्य सामान्य हिताची पारख करू शकतो. सामान्य हितामध्ये केवळ समुदायातील सर्वांचे हित समाविष्ट असते असे नाही तर त्यासंबंधी सर्वांची धारणा देखील एकच असते. या सामान्य हिताची निर्मिती करण्यासाठी राज्यसंस्थेची निर्मिती झाली आहे. सामान्य हिताचा विचार हाच राजकीय आबंधनाचा मुख्य आधार आहे. म्हणजेच जोपर्यंत राज्यसंस्था सामान्य हिताचा विचार करते तोपर्यंत लोक त्याचे कायदे मान्य करतात जर राज्यसंस्थेचे कायदे सामान्य हिताच्या विरुध्द असतील तर लोक त्याचे पालन करणार नाहीत. अशाप्रकारे ग्रीनने समुदायवादासंबंधीचे विचार व्यक्त केले. उदारमतवादी विचारवंतांनी व्यक्तीवादाचा पुरस्कार करून समाज किंवा समुदाय आणि संस्कृती यांच्या मूल्यापासून व्यक्तीला वेगळे केले होते. त्याच काळात जॉन रॉल्सच्या न्यायाच्या सिध्दांताची चर्चा जगभर होत होती. त्यामुळे समुदायवादी विचारवंत मायकल सॅडल यांनी 'लिबरॅलिझम इन द लिमिट्स ऑफ जस्टिस' या पुस्तकामधून जॉन रॉल्सवर टिका केली आहे. समुदायवादाच्या विकासामध्ये मॅकिंटायर, मायकल सॅडल, मायकल वाल्झर, चार्ल टेलर, विल किल्मिका इत्यादी विचारवंतांनी योगदान दिले आहे. समुदायवादाच्या विकासामध्ये उदारमतवादाला मोठे आव्हान देण्यात आले आहे. कारण समुदायवाद्यांनी उदारमतवादावर काही आक्षेप घेतले आहेत ते पुढीलप्रमाणे सांगता येतील.

१. **व्यक्तीवादाला महत्त्व :** समुदायवादाचा उदारमतवादावर पहिला आक्षेप हा आहे की, उदारमतवादी व्यक्तीवादाला महत्त्व देऊन समाजाला व्यक्तीपासून दूर ठेवले आहे, त्यांना समाजापेक्षा व्यक्ती महत्त्वाची वाटते, ते समाजातील विविध परंपरा समाजातील वेगवेगळ्या घटकामध्ये झालेले करार, त्या घटकांचे असलेले स्वतंत्र अधिकार व नैतिक भूमिका यांच्याकडे दुर्लक्ष करून व्यक्तीला महत्त्व देतात, त्यामुळे उदारमतवाद्यांना समाजापुढील प्रश्न समजून येत नाही.

समुदायवाद्याच्या मते, व्यक्ती एकलकोंडे जीवन जगू शकत नाही. त्याला समुदायात/ समाजात राहावे लागते. कारण समाज व्यक्तीला घडवित असतो. व्यक्तीला जी काही मूल्ये

प्राप्त झाली आहेत, ती समाजाचे वरदान आहे. व्यक्तीच्या सर्वांगीण विकासासाठी आणि चांगले जीवन जगण्यासाठी समुदायवाद हे मौलिक तत्त्व आहे. व्यक्तीचे जीवन हे समाजाच्या बाहेरचे आहे अशी कल्पना करणेसुद्धा अशक्य आहे. प्रत्येक व्यक्तीला कोणत्या तरी समाजाचे सदस्यत्व स्विकारावे लागते.

२. **व्यक्तीच्या स्वयंनिर्णयाला व अधिकाराला महत्त्व :** समुदायवाद्याचा दुसरे आक्षेप असा आहे की, उदारमतवादी हे व्यक्तीच्या स्वयंनिर्णय आणि अधिकार यावर भर देतात. परंतु हे अधिकार संघटित समाजात राहूनच प्राप्त होतात. समाजाच्या बाहेर हक्क उपभोगता येत नाह. व्यक्ती स्वातंत्र्याइतकेच सार्वजनिक कल्याणपण महत्त्वाचे आहे, कारण व्यक्तीचे स्वातंत्र्य आणि समाजाचे हित यांच्यामध्ये समन्वय साधता येतो. प्रत्येक व्यक्तीला स्वयंनिर्णयाचा अधिकार आहे. यामध्ये कोणी हस्तक्षेप करू नये असे उदारमतवाद्याचे मत आहे, परंतु समुदायवाद्याच्या मते, व्यक्तीला स्वयंनिर्णयाचा अधिकार हा समाजामध्ये राहूनच मिळतो तसेच व्यक्तीला त्या समाजातील परंपरा, जीवन जगण्याचा सामूहिक अनुभवाच्या संबंधाने रहावे लागते. म्हणून व्यक्तीच्या स्वयंनिर्णयाच्या अधिकाराला समाजामध्ये राहिल्याने महत्त्व प्राप्त होते.

समुदायवादाच्या मते, व्यक्तीची सामाजिक ओळख ही समाजापासून वेगळी होत नाही. त्याचबरोबर व्यक्तीला स्वयंनिर्णयाचा व अधिकराचा वापर समाजात राहूनच करता येतो. जोपर्यंत ती समाजाचा किंवा समुदायाचे नागरिकत्व स्वीकारत नाही तोपर्यंत तिला काही अधिकार प्राप्त होत नाहीत.

३. **राज्यसंस्थेची तटस्थता :** समुदायवादाचा तिसरा आक्षेप असा आहे की, उदारमतवादाच्या मते, व्यक्तीच्या स्वयंनिर्णयाच्या क्षमतेचा विकास, राज्यसंस्था त्यांच्या व्यवहारात हस्तक्षेप न करता तटस्थ राहिल्याने होते. व्यक्तीने स्वयंनिर्णयाचा अधिकार वापरल्यामुळे समाजात सार्वजनिक कल्याण साध्य होते; परंतु राज्याच्या तटस्थतेच्या कल्पनेला सॅडल आणि टेलरने मान्य केले नाही. त्यांच्या मते, प्रत्येक व्यक्तीने निवडलेल्या स्वयंनिर्णयाच्या अधिकारामुळे कोणतीही गोष्ट साध्य होत नाही किंवा समाजाचे हितही होत नाही. व्यक्ती ज्यावेळी आपला स्वयंनिर्णयाचा अधिकार हा जगण्याच्या पद्धती आणि त्यांच्या आशाआकांक्षा यांच्याशी जोडून घेतो, त्यावेळी सार्वजनिक कल्याण साधू शकतो. म्हणून सामुदायवाद्याच्या मते, व्यक्तीचे अस्तित्त्व त्यांचे कौशल्य किंवा निर्णय क्षमता या समाजामध्ये विकसित होतात, त्यामुळे समाजाचा विचार करणे आवश्यक आहे. राज्यसंस्था ही समाजाच्या सार्वजनिक हिताचे संवर्धन करणारी आहे.

समुदायवादाच्या मते, सार्वजनिक हित हे एक उत्तम जीवन जगण्यासाठीचे मूल्य निर्माण करते. समुदायवादाच्या दृष्टीकोनातून न्यायावर आधारलेले राज्य हे समुदायाच्या कल्याणासाठीच असते. आदर्श राज्य म्हणजे जे राज्य आपली शक्ती व सत्ता, हे सामान्य हित/सार्वजनिक हिताच्या निर्धारणासाठी व परंपरा व मूल्य जतन करण्यासाठी करते ते राज्य होय. समुदायवादी अशा सकारात्मक राज्याच्या बाजूने आहे की, जे राज्य सार्वजनिक हिताला प्रोत्साहन देण्याचे कार्य करेल.

४. **स्वत्वला महत्त्व :** समुदायवादाचा चौथा आक्षेप असा आहे की, उदारमतवादाच्या मते, स्वत्व महत्त्वाचे आहे, व्यक्ती स्वातंत्र्य हा स्वयंनिर्णयाचा गाभा आहे, परंतु सामुदायवादाच्या मते, स्वत्व पोकळ आहे. ते स्वत:च्या उपलब्ध जाणिवांच्या विरोधात आहे. प्रत्येक व्यक्ती समाजाच्या सामूहिक व्यवहाराशी जोडली गेलेली असते. त्यामुळे समुदायवाद्यांनी स्वत्वाला ऐतिहासिक असामाजिक म्हणून त्याचा विरोध केला आहे. समुदायवादाच्या मते, समाजाबाहेर व्यक्तीचे स्वत्व शिल्लक राहू शकत नाही. लोक समाजात कसे राहतात, त्यांच्यातील परस्परसंबंध कसे प्रस्थापित करतात याचा विचार करून त्यांच्याबरोबर जीवन जगणे महत्त्वाचे आहे. त्यामुळे स्वत्वापेक्षा समाज महत्त्वाचा आहे. कारण समाजामध्ये आपुलकीची भावना असते. थोडक्यात व्यक्ती हा समाजाचा एक भाग असून त्याचे स्वत्व घडविण्यात सामाजिक उद्दिष्ट्ये व मूल्य ठरविण्यात समाज महत्त्वाची भूमिका बजावते.

समुदायवादावर वरील आक्षेप घेऊन अनेक विचारवंतांनी समुदायवादाच्या विकासामध्ये योगदान दिले आहेत. त्यामध्ये अल्सडायर मॅक्लनटायर (अफ्टर व्हर्च्यु), मायकल सॅडल (लिबरॅलिझम अॅड द लिमिट्स ऑफ जस्टिस), मायकल वाल्झर (स्पेअर्स ऑफ जस्टिस), चार्ल्स टेलर (सोर्सेस ऑफ द सेल्फ) आणि विल किम्लिका इत्यादी विचारवंताचा समावेश होतो.

## ❑ चार्ल्स टेलर

हा कॅनॅडियन विचारवंत असून सध्या ते मॅकगिल विद्यापीठामध्ये इमेरीटस प्रोफेसर म्हणून कार्यरत आहे. २००७ साली टेलर यांनी बाऊचार्ड यांच्याबरोबर क्युबेक राज्यातील सांस्कृतिक विविधतेला सामावून घेण्यासंदर्भातील आयोगाचे काम केले आहे. १९८९ साली टेलरने, 'सोर्सेस ऑफ द सेल्फ' या पुस्तकामध्ये समुदायवादाबद्दलचे विचार मांडले आहेत.

समुदायवादाचा एक हुशार प्रवक्ता म्हणून चार्ल्स टेलरला ओळखले जाते. तो व्यक्ती स्वायत्ततेच्या संकल्पनेला नाकारतो आणि मानवी व्यक्तीमत्वातील गुंतागुंतीच्या बाजूने अधिक प्रकाश टाकतो. टेलरच्या मते, मानवी व्यक्तीमत्त्वाचा खरा विकास करावयाचा असेल तर त्यानी एक गोष्ट मुळातून

लक्षात घेतली पाहिजे ती म्हणजे व्यक्ती मूलत: समाजामध्ये रहात असतात. काही स्त्रावादी लेखक आणि धार्मिक विचारवंतानी जवळपास हे निश्चित मानले आहे की, समूह हे एकूणच प्रौढ मुक्त निवडीशिवाय निर्माण होऊ शकत नाही. चार्ल्स टेलरने समुदायवादाचा विचार मांडताना प्रामुख्याने उदारमतवाद्यांवर टिका केली आहे. त्यांच्यामते, आपण जे निर्णय घेतो ते समाजातील परिस्थितीवर अवलंबून असते, ती आपल्या जीवनाचे उद्दिष्ट ठरवते. आपल्या विवेकबुध्दीला आकार देणे, आपल्याला सर्जनशील उर्जेला मुक्त हे समाजामुळे शक्य होते. त्यामुळे टेलर समुदायाला व्यक्तीपेक्षा श्रेष्ठ मानतात.

## ❑ विल किम्लिका

सध्या ते कॅनडातील क्वीन्स विद्यापीठात तत्त्वज्ञानाचे प्राध्यापक म्हणून कार्यरत आहेत. त्यांनी अनेक पुस्तके लिहिली आहेत. त्यांच्या पुस्तकांमध्ये बहुविध समाजातील नागरिकत्वाचा प्रश्न, राष्ट्रवाद यांची बहुसंस्कृतीवादाशी कशी सांगड घालायची याबाबत सखोल अशी चिकित्सा केली आहे. किम्लिकाने २००० साली, 'कन्टेम्परर‍ी पॉलिटिकल फिलॉसॉफी' हे पुस्तक लिहिले. त्यामध्ये स्वातंत्र्य, उदारमतवाद, स्त्रीवाद, मार्क्सवाद, नागरिकत्व, समुदायवाद इत्यादी संकल्पनांची चर्चा केली आहे.

किम्लिका यांनी समुदायवादाबद्दल काही प्रश्न उपस्थित केले आहेत ते पुढीलप्रमाणे :-

१. समुदायवादांची मते ही, यथास्थितीवादाच्या मतांशी जुळणारी आहेत, कारण समुदायवाद्यांनाही समाजात बदल आणायचा नाही.

२. वांशिक व धार्मिक गटाचे आचार महत्त्वाचे आहेत, यावर अस्मितेचे राजकारण घडते, परंतु परस्परांचे औचित्य व मूल्य कोण तपासणार, त्यास केव्हा मान्यता देणार? हा प्रश्न आहे.

३. उदारमतवादी विविधतेत एकता साधण्याचा विचार आहे. मात्र समुदायवादी, समाजातील अस्मितांना, गटांना, बळकट करणे, योग्य मानतात. या दोन्हीमध्ये मेळ कसा बसवायचा हा प्रश्न आहे.

वरील प्रश्न उपस्थित करून किम्लिकाने उदारमतवाद आणि समुदायवादाच्या परस्पर संबंधाबद्दल विचार करण्यासाठी प्रवृत्त केले आहे. किम्लिकाच्या मते, समुदायवादामध्ये प्रतिगामी व पुरोगामी असे दोन गट आहेत. प्रतिगामी हे सांस्कृतिक परंपरा टिकवून ठेवण्यावर भर देतात तर पुरोगामी स्त्रियांचे व अल्पसंख्यांकाचे अधिकार मान्य करतात. विविधतेचे संरक्षण करणारा बहुसंस्कृतीवाद त्यांना मान्य आहे. त्यांच्या मते, नैतिक तत्त्वज्ञान व राजकीय तत्त्वज्ञान यांचा जवळचा संबंध आहे. किल्मिका यांनी या सर्व तत्त्वप्रणालींचा नव्या संदर्भात अभ्यास केला असून त्यांचे समकालीन औचित्य तपासले आहे. त्यांच्या मते, उजव्या व डाव्या विचारातील परिदृढ द्वैत, त्यात असणाऱ्या वेगवेगळ्या विचारांची व शक्यतांची

पडताळणी करू देत नाही, म्हणून त्याच्या बाहेर जाऊन आपण नैतिक प्रश्नांची चर्चा केली पाहिजे. किम्लिकाच्या मते, समुदायवादाचा पहिला आक्षेप, अल्पसंख्य गटाची स्वायत्तता त्यांचा स्वयंनिर्णयाचा हक्क आणि कल्पना याबाबत होता. त्यांच्या मते, व्यक्तीच्या अधिकाराप्रमाणेच, गटांचे अधिकार पण महत्त्वाचे असतात. धर्म, संस्कृती, वंश, वर्ग, प्रदेश व भाषा या आधारावर ही ओळख पिढ्यानपिढ्या टिकवायची असते. म्हणून व्यक्तीपेक्षा समुदायाला महत्त्व प्राप्त आहे.

## ❑ मायकल सॅंडल

हा अमेरिकन राजकीय विचारवंत असून सध्या तो हार्वर्ड विद्यापीठात प्राध्यापक म्हणून कार्यरत आहे. त्यांनी समुदायवादी विचारवंत चार्ल्स टेलरच्या मार्गदर्शनाखाली ऑक्सफर्ड विद्यापीठामधून पीएच्.डी.ची पदवी मिळविली आहे. सॅंडल यांनी १९८२ साली, 'लिबरॅलिझम ॲन्ड द लिमिट्स ऑफ जस्टिस' हे पुस्तक लिहिले. या पुस्तकामध्ये रॉल्सने लिहिलेल्या थेअरी ऑफ जस्टिस या ग्रंथावर हल्ला चढविला आहे. त्यांच्या मते रॉल्स यांचा न्यायाचा सिध्दांत उदारमतवादाच्या दृष्टिकोनाचे प्रातिनिधीक स्वरूप असून, ते प्रत्यक्ष समाजातील कृती, विचार, कार्यक्रम, इच्छा, भूमिका आणि व्यवसाय इत्यादी मानवी वैशिष्ट्ये स्वतंत्रपणे समजून घेण्याचा प्रयत्न करतात. सॅंडल यावर असे निरक्षण नोंदवतात की, जर ही सर्व वैशिष्ट्ये मानवी जीवनातून वजा केली तर समजून घेण्यासाठी त्या व्यक्तीमध्ये काहीच शिल्लक राहत नाही. म्हणून तो असे ठामपणे म्हणतो की, व्यक्तीला त्याच्यात अंतर्भूत असणाऱ्या विशिष्ट काळ, स्थान आणि संस्कृतीच्या संदर्भात समजून घ्यावे लागेल. व्यक्तीला, समाजापासून व संस्कृतीपासून वेगळे करता येत नाही तर त्याचा विकास समाजात होतो. कारण सॅंडलच्यामते, आपले स्वत्व आपल्या उद्दिष्टापासून अलग नाही उलट ते त्या उद्दिष्टानीच घडवले आहे. ही उद्दिष्ट्ये आपण निवडताना ते सामाजिक परिस्थितीतून प्राप्त होत असतात. अशाप्रकारे रॉल्सच्या न्यायाच्या सिध्दांतातील वितरणात्मक न्यायावर टिका करून सॅंडलने राज्यशास्त्रीय सिध्दांतामध्ये समुदायवादी दृष्टिकोनाचा विकास केला आहे.

## ❑ अल्सडायर मॅक्लनटायर

मॅक्लनटायर हा स्कॉटिश तत्वज्ञानी विचारवंत आहे. त्यांनी 'अफ्टर व्हर्च्यू' हे १९८१ साली पुस्तक लिहिले. त्यामध्ये त्यानी समुदायवादासंबंधीचे विचार मांडले आहेत. मॅक्लनटायरच्या मते, मनुष्य हा राजकीय समाजामध्येच चांगला राहू शकतो. कारण त्या व्यक्तीची किंवा मनुष्याची भूमिका तेथील सामाजिक धोरणावर व कायद्यावर आधारलेली असते. त्यामुळे व्यक्तीचे व्यक्तीमत्त्व आणि त्याचा आत्माविष्कार सामाजिक व सामुदायिक बंधामध्येच खऱ्या अर्थाने सार्थकी होतो. मॅक्लनटायरच्या मते, व्यक्तीचे व्यक्तिमत्व हे त्याच्या आवडीनुसार किंवा आपल्या तत्त्वानुसार निर्माण होत नसून ते एका संघटित समुदायामध्ये आकाराला येत असते. एकूणच समुदायवादी विचारवंत अशी मांडणी करतात की,

व्यक्तीने समुदायांर्तगतच आपल्या जीवनमूल्याचा शोध घ्यावा आणि सामान्य हित साधावे. तसेच संपूर्ण समाजाच्या हिताला केंद्रिभूत मानून स्वहिताला व्यापक हिताचाच एक भाग मानावा.

## ❑ मिखाईल वॉल्झर

हा अमेरिकन राजकीय विचारवंत आहे. सध्या ते प्रिन्सटन विद्यापीठात इन्स्टिट्यूशन फॉर ॲडव्हान्स स्टडी (IAS) येथे इमिरीटस प्रोफेसर म्हणून कार्यरत आहेत. १९८३ साली वाल्झरने, 'स्फीअर्स ऑफ जस्टिस', हे पुस्तक लिहिले. त्यामध्ये त्यांनी न्यायविषयक कोणताच 'वैश्विक नियम' असू शकत नाही हा विचार मांडला. वाल्झरने साधी समानता आणि जटील किंवा गुंतागुंतीची समानता यात भेद केला आहे. त्यांच्या मते, सद्यकालीन समाजात न्यायाची हमी देण्यासाठी जटिल समतेच्या सिध्दांताचा स्विकार करावा लागेल. कारण सध्या समतेमध्ये समाजातील वस्तूंचे, लोकामध्ये सम-समान वितरण करण्याची मागणी असून हा नियम आदिम समाजासाठी उपयुक्त ठरतो. परंतु आज हे समसमान वितरणाचे नियम राज्याने स्विकारले तर ते जुलमी ठरेल, त्यामुळे वर्तमान स्थितीमध्ये गुंतागुंतीचे व जटिल समतेचे तत्त्वच उपयुक्त ठरेल. जटील समतेच्या सिध्दांतात वॉल्झर असे गृहीत धरतो की, भिन्न भिन्न सामाजिक वस्तूचे समाज जीवनाच्या भिन्न भिन्न क्षेत्रात वितरण करणे हा मुख्य प्रश्न असतो. हा वितरणाचा तर्कसुसंगत आधार शोधणे हे न्यायाचे प्रमुख कार्य आहे, म्हणून राज्यव्यवस्था अर्थव्यवस्था, कुटुंब, कामाचे ठिकाण आणि सैनिकी संख्या इत्यादीच्या वितरणासाठी अशा प्रत्येक क्षेत्रात कोणकोणत्या सामाजिक वस्तूचे वितरण उपयुक्त आहे, याचा विचार करावा लागेल. त्यामुळे वाल्झरचा न्यायाचा सिध्दांत हा प्रत्येक जीवन क्षेत्राची अखंडता कायम ठेवण्याची मागणी करतो. उदा. पैशाचे वितरण बाजार यंत्रणेपुरते मर्यादित असावे कारण बाजारपेठेतील व्यवहार पैशावर चालतो. परंतु पैशाचा वापर करून राज्यव्यवस्था, शिक्षण, कुटुंब भ्रष्ट करता कामा नये. शासकीय कामात घराणेशाहीला चालना न देता ते नियमांवर चालले पाहिजे किंवा कुटुंबातील नातेसंबंध आर्थिक नफा-तोट्यावर असू नये, असे जर घडले तर ते अन्यायी ठरेल. लष्करामध्ये पुरुषाचे वर्चस्व असेल परंतु ते कुटुंबात असू नये अशा अनेक उदाहरणाद्वारे वाल्झरने समाजजीवनाच्या विभिन्न क्षेत्रात न्याय प्रस्थापित करण्यासाठी उपयुक्त नैतिक निकष अधोरेखित केले आहे. हे निकश व्यक्तीच्या समाजविषयक बांधिलकीची सर्वोच्च अभिव्यक्ती अधोरेखित करतात. हाच वाल्झरचा विचार समुदायवादाच्या दृष्टीने महत्त्वाचा आहे.

समुदायवादासंदर्भात काही महत्त्वाच्या मुद्यांची चर्चा करणे गरजेचे आहे. ती पुढीलप्रमाणे करता येईल.

## १. समुदायवाद आणि धर्म सहिष्णुता :-

समाजामध्ये अनेक धर्म आणि त्यांच्या संस्कृती विकसित झालेल्या आहेत. त्या संस्कृतींना

वांशिक ओळख असते. ही वांशिक ओळख पिढ्यान्‌पिढ्या टिकवायची असते. कारण काळाच्या प्रवाहात संस्कृती नष्ट होईल अशी त्यांना भिती वाटते. म्हणून हे वेगवेगळे गट अथवा संस्कृती, आपले वेगळे अस्तित्त्व टिकविण्याचा प्रयत्न करतात, त्यांनी आपल्या समाजाचे नियमन करण्यासाठी काही सामाजिक व सांस्कृतिक नियम केलेले असतात आणि त्या आधारावर आपल्या समाजाचे नियमन करू इच्छितात. समाजामध्ये अल्पसंख्यांक गट किंवा समूह असतात ते बहुसंख्यांक गटाकडून संपुष्टात येऊ नये, त्याचेही अस्तित्व ओळख, त्याचे विचार, आचार, धर्म, भाषा यांच्याबद्दल सहिष्णूतेने राहणे आवश्यक आहे. कारण सार्वजनिक हिताच्या, समूदायाच्या विकासाच्या नावाखाली अल्पसंख्यांकाचे अस्तित्व नष्ट होऊ शकते, त्यामुळे समुदायवाद्याच्या मते प्रत्येक गटाला, समूदायाला स्वत:ची ओळख असली पाहिजे, त्याच्याबरोबर सहिष्णूतेची वागणूक असली पाहिजे, अशी भूमिका समुदायवादाची आहे. किम्लिकानी धर्मसहिष्णुतेबद्दल ऑटोमन तुर्क साम्राज्याचे उदाहरण दिले आहे. कारण ऑटोमन साम्राज्य विस्ताराने मोठे होते, त्यामध्ये तुर्कस्तान, पूर्व युरोप, पॅलेस्टाईन, मध्य युरोप व उत्तर आफ्रिका इतका मोठा प्रदेश समाविष्ठ होता. त्याचबरोबर या राज्यामध्ये अनेक धर्म व धर्मपंथाचे लोक रहात होते. ऑटोमन राजाचा धर्म इस्लाम होता, परंतु ऑटोमन साम्राज्याने तो इतरांवर लादण्याचा प्रयत्न केला नाही आणि त्यांना धर्मस्वातंत्र्य दिले नाही.

## २. समुदायवाद व राजकीय उदारमतवाद :-

जॉन रॉल्सने समुदायवादाचे आक्षेप लक्षात घेऊन आपल्या राजकीय भूमिकेत बदल केला आणि त्याला राजकीय उदारमतवाद असे संबोधले. त्यामध्ये प्रामुख्याने प्रत्येक व्यक्तीला स्वविवेकाने वागण्याचा अधिकार आहे, त्याला धर्मास नकार देण्याचा, त्याग करण्याचा अधिकार आहे, इतर धार्मिक गटांच्या अधिकाराबाबत ती सहिष्णू राहू शकते, प्रत्येक समाजातील गटास सार्वजनिक हिताबाबत.कल्पना करण्याचा, त्यात सुधारणा करण्याचा व तो उद्देश अंमलात आणण्यासाठी प्रयत्न करण्याचा अधिकार, विविध अल्पसंख्य धार्मिक व वांशिक गटाच्या अधिकाऱ्यांना संरक्षण देणे इत्यादी गोष्टींचा समावेश केला. रॉल्सने राजकीय उदारमतवादात अधिकाराची विभागणी राजकीय अधिकार व आर्थिक अधिकार या दोन अधिकारात केली. सार्वत्रिक ठिकाणी राजकीय अधिकार तर वैयक्तिक जीवनात व्यक्ती धार्मिक अधिकाराचा उपभोग घेऊ शकतील, परंतु धार्मिक बाबतीत निर्णय घेताना त्या गटाची संमत्ती आवश्यक असेल. असे रॉल्सने म्हटले किम्लिकाच्या मते, वांशिक वा धार्मिक अल्पसंख्यांक गट आपल्या सदस्याची मुस्कटदाबी करू शकतात. त्यांना शिक्षा करू शकतात किंवा त्याच्यावर बहिष्कार टाकू शकतात. अशावेळी नागरिकाच्या हक्काचे संरक्षण करणे ही राज्याची जबाबदारी असते, कारण व्यक्ती ही एकाच वेळी राज्याची आणि समाजाची सदस्य असते, त्यामुळे संघर्ष निर्माण होतो. म्हणून किम्लिका असे म्हणतो की, रॉल्सचा उदारमतवाद वेगवेगळ्या वांशिक व धार्मिक समुदायवादी गटाना समाजात

समाविष्ट करू शकत नाही. त्यामुळे समुदायवादाच्या मते, काही सामुदायिक उद्दिष्टे साध्य करण्यासाठी व्यक्तीवर काही बंधने घालणे योग्य वाटते.

## ३. समुदायवाद व नवा राष्ट्रवाद :-

आज राष्ट्रवादाने एक नवा राजकीय समुदाय निर्माण केला आहे. एका विशिष्ट भूप्रदेशावर राहणाऱ्या समाजात भाषा, संस्कृती, अर्थव्यवस्था व लोकशाही राज्यव्यवस्था यांच्या साहाय्याने एक वेगळी व धर्मनिरपेक्ष-ऐच्छिक अस्मिता प्रदान करण्यात राष्ट्रवादाला यश मिळाले आहे. यात भाषेने महत्त्वाची भूमिका बजावली. भाषेच्या आधारावर अनेक देशाचे विभाजन होऊन नवी राज्ये स्थापन झाली आहेत. राष्ट्रात संख्येने बहुसंख्य असलेले धार्मिक किंवा वांशिक गट आपले विचार राष्ट्रीय आहेत, सर्वांच्या हिताचे आहेत म्हणून सर्व समाजावर लादण्याचा प्रयत्न करतात, यातून संघर्ष निर्माण होतो आणि अल्पसंख्यात्मक गटामध्ये अलगतेची भावना निर्माण होऊन धार्मिक व वांशिक आस्मितेच्या आधारावर सशस्त्र आंदोलने उभी राहतात. त्यामुळे समुदायवादाच्या मते, आजच्या नव्या राष्ट्रवादाला अस्मितेचा व सामाजिक ऐक्याचा प्रश्न समाधानकारक सोडविणे शक्य झाले नाही. परंतु उदारमतवादाच्या मते, धर्मनिरपेक्ष ऐहिक आधारावर नागरिकांत राष्ट्रीयत्वाची भावना निर्माण होईल आणि हा संघर्ष संपेल. परंतु भारत-चीन-पाकिस्तान-श्रीलंका इत्यादी देशांमध्ये वांशिक, सांस्कृतिक, भाषिक आधारावर नव्या राष्ट्रवादाची मागणी होत असल्याचे दिसून येते. त्या मागणीसाठी बऱ्याच वेळा सशस्त्र क्रांती करून दहशत निर्माण करणारे गट किंवा समूह निर्माण झालेले आहेत, त्यामुळे समुदायवाद व नवा राष्ट्रवाद याचा परस्पर संबंध असल्याचे दिसून येते.

## ❑ समुदायवादाचे महत्त्व :-

समुदायवादाचे, सद्यकालीन परिस्थितीची समीक्षा करून, व्यक्ती आणि समुदाय यांच्या परस्पर संबंधाना एका नव्या परिप्रेक्षामध्ये पाहण्याचा प्रयत्न केला, कारण उदारमतवाद्यांनी व्यक्तीचे अस्तित्व आणि तिच्या क्षमता ही निसर्गाची देणगी आहे, म्हणून तीला आपल्या मर्जीप्रमाणे वागण्याचे स्वातंत्र्य आहे. म्हणजेच व्यक्ती आपले उद्दिष्ट निर्धारित करताना, समाजाला जबाबदार असणार नाही. या तत्त्वाला विरोध करून व्यक्तीचे अस्तित्व हे सामाजिक परिस्थितीवर आधारलेले आहे आणि ती समाजाची देणगी आहे, असे समुदायवादाने मांडले आहे. एकूणच समुदायवाद समाजाच्या सर्वसामान्य अस्मितेबरोबरच अशा काही सामाजिक मूल्यांना महत्त्व देतो की, ज्याप्रती समाजाची आस्था असेल.

सार्वजनिक हिताची समुदायवादी धारणा, व्यक्तीमधील स्पर्धेच्या जागी परस्पर सहकार्यावर भर देते, आणि सामाजिक एकसंघतेला चालना देते. तसेच समुदायवाद सद्‌भावनापूर्ण संबंध प्रस्थापित करण्याची प्रेरणा देतो आणि भावनिक सुरक्षितता मिळवून देण्याचा मार्ग दर्शवतो.

किम्लिकाच्या मते, समुदायवाद्यांनी उदारमतवादाच्या मर्यादा स्पष्ट केल्या आहेत. उदारमतवादी संकल्पना पोकळ अवकाशात मांडल्या जाऊ नयेत, त्याचा प्रत्यक्ष सामाजिक परिस्थितीशी संबंध असावा असे स्पष्ट केले आहे. शेवटी समुदायवाद्यांनी अस्मितेच्या राजकारणाच्या मर्यादा लक्षात घ्याव्यात व प्रतिगामी राजकारणाचे साधन बनू नये असेही स्पष्ट केले आहे.

## ४.२.३ बहुसंस्कृतीवाद

प्रत्येक समाज हा बहुसांस्कृतिक असतो. प्राचीन काळापासून ते आतापर्यंत मानवी इतिहासामध्ये जेवढ्या समाज व्यवस्था निर्माण झाल्या, त्या निश्चितच विविध संस्कृतीनी, उपसंस्कृतीनी बनलेल्या होत्या. आज ही जगात अनेक देशात वेगवेगळे धर्म मानणारे आणि स्वत:ची वेगळी संस्कृती असणारे लोक आहेत. म्हणून संस्कृतीचा अभ्यास करताना बहुसंस्कृतीवादाचे स्वरूप समजावून घेणे महत्त्वाचे आहे, कारण उदारमतवादी, व्यक्तीवाद, व्यक्तीच्या अधिकारांना, स्वायत्ततेला व स्वयंनिर्णयाला जास्त महत्त्व देऊन समाजातील संस्कृतीकडे अस्मितेकडे दुर्लक्ष करतो.

ज्या समाजामध्ये व संस्कृतीमध्ये व्यक्तीची जडणघडण झालेली असते, त्या समाजाला व संस्कृतीला महत्व दिले जात नाही त्यामुळे उदारमतवादावर बहुसंस्कृतीवाद्यांनी टिका केली आहे. म्हणून सांस्कृतिक समूह व वांशिक समूहामध्ये अस्मितेसाठी संघर्ष निर्माण होतात. त्यातून बहुसंस्कृतीवाद या संकल्पनेचा जन्म झाला आहे. कारण समाजामध्ये भिन्न-भिन्न संस्कृती असतात. या संस्कृतीचा विकास होणे क्रमप्राप्त आहे. त्यामुळे सांस्कृतिक संघर्ष कमी करून अल्पसंख्यांक समूहांना भेदभाव न करता सामावून घेणे आवश्यक असते. त्याच्या संस्कृतीला नष्ट न करता, त्याचा विकास करणे आवश्यक आहे. या दृष्टीकोनातून बहुसंस्कृतीवादाचा उदय झाला असून त्यामध्ये विल किम्लिका, चार्ल्स टेलर व भिखू पारेख या विचारवंतानी योगदान दिले आहे.

जागतिकीकरणामुळे स्थलांतराचे प्रमाणात वाढ झाल्याचे दिसते, कारण विकसित देशामध्ये अर्थव्यवस्था बळकट आहे, त्यामुळे तेथे काम करण्याऱ्या लोकांच्या संख्येत वाढ होते. विकसित देशात लोकसंख्येमध्ये मोठी वाढ होत नसल्यामुळे आशिया खंडातील अनेक लोक मोठ्या प्रमाणात स्थलांतरीत झाले आहेत, त्यामुळे तेथे स्थलांतरित लोकांची संख्या वाढते. तसेच त्याची संस्कृतीही विकसित होत असते, यामुळे पश्चिम युरोपातील एकजिनसी समाज हा बहुजिनसी बनल्याचे दिसून येते, आणि या संस्कृतीमुळे त्या समूहाना एक ओळख मिळते. ती ओळख हळुहळु अस्मिता निर्माण करते आणि भिन्नतेमुळे सांस्कृतिक संघर्ष निर्माण होतो. म्हणजे माणसाच्या वर्तनानुसार धर्म संस्कृती माणसामाणसांना जोडते व तोडते म्हणून स्थलांतरित मानव समूहाना जोडण्यासाठी, धर्मसंस्कृतींना एकत्र करण्यासाठी बहुसंस्कृतीवाद ही कल्पना उदयास आली आहे. त्याची कारणे पुढीलप्रमाणे :-

१) प्रत्येक समाजामध्ये वेगवेगळे विचार मांडणारे आणि स्वत:च्या संस्कृतीचा पुरस्कार करणारे अनेक गट, समूह असतात. तसेच एका धर्मात अनेक जाती, पंथ, संप्रदाय निर्माण होतात.

२) व्यवसाय, नोकरी, शिक्षण इत्यादी कारणामुळे लोकांचे स्थलांतर होते. त्याचबरोबर पूर्वीच्या काळातील आक्रमक राज्यकर्ते व साम्राज्यवादी वसाहतीवादामुळे मोठ्या प्रमाणात स्थलांतर झाल्याचे दिसून येते.

३) प्रत्येक समाजात भाषिक, धार्मिक व वांशिक अल्पसंख्यांक गट असतात, त्यांना त्यांची पृथगात्म अस्मिता प्रिय असते, कारण त्याची ओळख असते आणि ते स्वत:च्या परंपरा व रुढींचे काटेकोर पालन करतात.

४) समाजातील स्त्रिया, अपंग, स्त्री आणि पुरुष समलिंगी गट आणि तृतीयपंथी लोक यांच्या अधिकाराची जाणीव झाली असून त्यांना स्वतंत्र गट म्हणून मान्यता मिळाली पाहिजे असा विचार निर्माण झाला, कारण त्यांना वेगळे असल्याचे समजले जाते.

थोडक्यात, वरील कारणावरून असे दिसते की, एकजिनसी समाज हा बहुसंस्कृतीवादीच असतो. कारण प्रत्येक समाजामध्ये बहुसांस्कृतिक जाणीव वैचारिक आणि सांस्कृतिक कारणांमुळे निर्माण होताना दिसते. त्यामुळे समाजातील विविध समाज घटकांना न्यायाच्या आणि समतेच्या आधारावर समान अधिकार देणे आणि ते पूर्णपणे उपभोगण्याची संधी देणे महत्त्वाचे आहे, कारण त्यामुळेच खऱ्या अर्थाने समाजातील सर्व घटकांना सांस्कृतिक जीवन जगणे शक्य होईल.

## ❑ बहुसंस्कृतीवाद म्हणजे काय?

बहुसंस्कृतीवाद ही राजकीय सिध्दांतामधील महत्त्वाची संकल्पना आहे. ती समाजातील विविध संस्कृती व उपसंस्कृतीना बहुविध मार्गाने समजून घेण्याचा मार्ग दाखविते. प्रत्येक राज्य हे ऐतिहासिक काळापासून भाषेच्या आणि संस्कृतीच्या आधारावर निर्माण झाले होते. परंतु व्यवसाय, उद्योग, कामासाठी लोक विकसित देशाकडे स्थलांतरित झाले आहेत. त्याचबरोबर त्यांची संस्कृती ही घेऊन जात आहेत, त्यामुळे जगातील प्रत्येक राज्य हे बहुसांस्कृतिक बनले आहे. अशा राज्यामध्ये जीवन जगत असताना त्यांच्या स्वत:ची ओळख व राजकीय जीवन महत्त्वाचे असते. काहीवेळा बहुसंस्कृतीवाद हा शब्द ऐतिहासिकदृष्ट्या मागास समूहातील वादग्रस्त गोष्टी विशेषरूपाने दर्शविण्यासाठी वापरला जातो. तर अनेकदा राष्ट्रीय अल्पसंख्यांक आणि वांशिक समूहाच्या राष्ट्र जाणिवेसाठी बहुसंस्कृतीवाद हा शब्द वापरला जातो. राष्ट्रीय अल्पसंख्यांकांचा संपूर्ण राष्ट्रामध्ये स्वखुशीने अथवा नापसंतीने अंतर्भाव होतो.

परंतु वांशिक समूह हे व्यक्तीगत किंवा वेगवेगळ्या देशातून स्थलांतर झालेली कुटुंब असतात. धार्मिक, वांशिक व संस्कृतीमुळे मानवी समूहाची वेगळी ओळख निर्माण होते आणि ती ओळख सांस्कृतिक संघर्षाच्या उदयास कारणीभूत ठरते. हे संघर्ष कमी करून प्रत्येक संस्कृतीचा विकास करणे हा बहुसंस्कृतीवादाचा प्रमुख उद्देश आहे. थोडक्यात बहुसंस्कृतीवाद म्हणजे एखाद्या समाजात विविध संस्कृतीचे सहअस्तित्व व सहजीवन मान्य करणे होय आणि राज्यघटनेच्या व कायद्याच्या विशिष्ट मर्यादित वेगवेगळ्या संस्कृतीचा अंगीकार करणाऱ्या समाजघटकांना त्यांच्या सांस्कृतिक परंपरा आणि आचार यांचे पालन करण्याची मुभा देणे होय.

पश्चिमेकडील देशामध्ये बहुसंस्कृतीवाद ही संज्ञा १९६० च्या दशकात सुरू झाली आणि १९७० च्या दशकापासून अधिक वापरली जाऊ लागली, त्याआधी १९३८ च्या सुमारास 'कल्चरल मोझॅक' असा शब्द जॉन गिबन यांनी आपल्या कॅनेडियन मोझॅक या पुस्तकात मांडला होता. १९६५ मध्ये जॉन पीटर यांनी व्हर्टिकल मोझॅक हा शब्दप्रयोग केला. बहुसंस्कृतीवादी धोरणाचा स्वीकार सर्वप्रथम कॅनडामध्ये १९७१ मध्ये केला गेला. कारण कॅनडात ब्रिटीश व फ्रेंच नागरिकांनी स्थलांतर केले होते. क्युबेक प्रांतामध्ये फ्रेंच नागरिकांच्या वसाहती होत्या, त्याच्यासह कॅनडातील इतर स्थानिक गटाच्या अस्मिता, अस्तित्व (आयडेंटिटी) जपण्यासाठी बहुसंस्कृतीकवादाला मान्यता देण्यात आली. अशाप्रकारे कॅनडामध्ये राजकीय गरजेपोटी ही संकल्पना निर्माण झाली. भांडवलशाही किंवा साम्यवाद याप्रमाणे विशिष्ट कार्यक्रम राबविणारी ती एक राजकीय विचारधारा नाही किंवा तत्त्वज्ञानही नाही तर ती मानवी जीवनातील व्यवहाराकडे पाहण्याचा बहुसंस्कृतीवाद हा एक व्यापक असा दृष्टिकोन आहे. यामध्ये तीन गोष्टी अपेक्षित आहेत.

१. कोणत्याही व्यक्तीचा जन्म एका धर्मसंस्कृतीमध्ये झालेला असतो. त्याच धर्मसंस्कृतीच्या प्रभावाखाली व्यक्तीची सामाजिक जडणघडण होते. त्यामुळे त्याना त्या धर्मसंस्कृती बाहेर पडण्याची आवश्यकता वाटत नाही.

२. प्रत्येक धर्मसंस्कृतीची एक वेगळी ओळख असली तरी अंतरंगात ती विविधांगी असायला हवी. धर्मसंस्कृतीच्या ज्या काही रूढी-परंपरा आहेत त्यात परिस्थितीनुसार बदल व्हावेत आणि ते बदल चर्चेनुसार समाजाने स्विकारावेत.

३. धर्मसंस्कृतीमध्ये उदारमतवाद असायला पाहिजे कारण त्याद्वारे इतर धर्मातील काही नवे ज्ञान मिळविता आले पाहिजे.

अशाप्रकारे बहुसंस्कृतीवाद हा मानवी जीवनातला व्यवहार अधिक सकसतेने पाहण्याकडे वाटचाल करताना दिसतो.

## ❀ बहुसंस्कृतीवादाचा विकास :-

ज्यावेळी युरोपमध्ये राष्ट्रीयत्वाच्या कल्पनेचा उदय झाला त्यावेळी एक संस्कृती, एक भाषा, एक धर्म इत्यादी तत्वे या कल्पनेचे मुख्य आधार होते. त्यानुसार युरोपमधील सर्व राष्ट्रांची निर्मिती झाली. परंतु त्या राष्ट्रामध्ये भिन्न संस्कृतीच्या लोकांची संख्या अल्पप्रमाणात अस्तित्वात होती. त्यांच्या संस्कृतीच्या आचारविचाराचा विकास केला गेला नाही. त्यामुळे या अल्पसंख्यांक समूहामध्ये भितीचे वातावरण निर्माण झाले, म्हणून अल्पसंख्यांक गटानी त्या देशातल्या राष्ट्रीय एकजिनसी संस्कृतीला आव्हान देण्यास सुरुवात केली. त्यातून एकजिनसी संस्कृतीच्या विचारप्रणालीवर टिका होताना दिसते आणि या टिकेचा भाग म्हणून बहुसंस्कृतीवादाचा विकास झाल्याचे दिसते. बहुसंस्कृतीवादाचा विकास प्रामुख्याने तीन टप्प्यामध्ये झाला असे म्हणता येईल तो पुढीलप्रमाणे :-

### १. पहिला टप्पा :-

यामध्ये १९६० च्या दशकामध्ये वर्णवंशविरोधी चळवळ निर्माण झाली होती. ही वर्णविरोधी चळवळ कृष्णवर्णियाचे जे नागरी हक्क आहेत, त्यासाठी संघर्ष करीत होती, ज्याचे नेतृत्व मार्टिन ल्युथर किंग यांनी केले. त्यानी शांततामय प्रतिकाराच्या माध्यमातून कृष्णवर्णियाच्या नागरी हक्कासंबंधीची चळवळ ही अतिशय टोकदार बनविली आणि तिथे स्वत:ची एक वेगळी राजकीय, सामाजिक ओळख प्रस्थापित केली. परंतु याचा प्रभाव कमी होत गेल्यामुळे ब्लॅक पँथरची जहालवादी चळवळ उदयास आली. या चळवळीमध्ये अनेक आफ्रिकन अमेरिकन मुस्लिम या सैनिकी, ब्लॅक पँथरचे नेतृत्व करीत होते. याप्रकारे अमेरिकन संस्कृतीला अंतर्गत विरोध करण्यासाठी अशा प्रकारच्या वेगवेगळ्या सांस्कृतिक विचारांनी प्रेरित झालेल्या संघटना कार्य करताना दिसू लागल्या. परंतु या चळवळीला बहुसंस्कृतीवादाचे उठाव आहे असे संबोधले गेले नाही. तर त्याला एकजिनसी संस्कृतीमध्येच अंतर्भूत असलेला दुसरा आवाज म्हणून ओळखले गेले. फ्रान्समधील स्कॉशियनची चळवळ, बेल्जियममधील प्लॅन्डर्सची चळवळ, ऑस्ट्रेलियातील आदिवासी किंवा मूळवासी चळवळ, न्युझीलंडमधील माओनिस्ट चळवळ इ. चळवळी सुरू झाल्या होत्या.

### २. दुसरा टप्पा :-

१९७० च्या दशकामध्ये वर्णवंशविरोधी चळवळीच्या प्रेरणेतून जगातील अनेक देशांमध्ये या चळवळी सुरू झाल्या, कॅनडामध्ये क्युबेक प्रांतातील फ्रेंच भाषिकांनी आम्हाला स्वायत्तता पाहिजे असे सांगायला सुरुवात केली. अशाप्रकारे प्रत्येक देशातील भाषिक समूह हे आपली वेगळी राजकीय ओळख सांगू लागले. कॅनडात जसे घडले तसे इंग्लंडमध्ये स्कॉटीश व वेल्स राष्ट्रवादाच्यासुध्दा चळवळी जोर धरताना दिसतात. स्पेनमध्ये कॅटॉलॉनिया व बास्क प्रांतामध्ये अनेक विभक्तवादी चळवळी तिथल्या

राष्ट्रवादाच्या विरोधामध्ये सुरू झालेल्या दिसतात. अशाप्रकारे अनेक देशामध्ये विशेषत: पहिल्या जगामध्ये वांशिक राष्ट्रवाद, वांशिक सांस्कृतिक ओळख या राजकीयदृष्ट्या व्यक्त करताना अनेक वांशिक समूह दिसून येतात.

## ३. तिसरा टप्पा :-

दुसऱ्या महायुद्धानंतर युरोपची उद्‌ध्वस्त झालेली घडी पुन्हा प्रस्थापित होण्यास सुरुवात झाली. तेव्हा तेथे काम करण्यासाठी श्रमिक व कामगाराची आवश्यकता होती. त्यामुळे तिसऱ्या जगातील (आशिया आणि आफ्रिका खंडातील) वासाहतिक देशातील लोकांना बोलावण्यात आले. या कारणामुळे तिसऱ्या जगातील अनेक समूह स्थलांतरित झाले. तेव्हा ते समूह आपापली मूळ संस्कृती घेऊन गेले आणि सांस्कृतिक गटाने राहू लागले. ही प्रक्रिया २००० सालापर्यंत चालू होती. परंतु युरोप व अमेरिकेतील देशांनी वेळोवेळी स्थलांतराचा कायदा करून त्यावर निर्बंध घालण्याचा प्रयत्न केला. पण तोपर्यंत स्थलांतरित समूह, गट यांनी आपली सांस्कृतिक ओळख निर्माण केली होती. त्याचबरोबर त्याच्यामध्ये राजकीयदृष्ट्या जनजागृती झाल्याचे दिसून येते. १९९० नंतर जागतिकीकरणाची लाट आली व साम्यवादी जग कोलमडून पडले तेव्हा सगळे वांशिक गट किंवा समूह विखुरले गेले. त्यातून त्यांनी आपापली स्वत:ची सांस्कृतिक ओळख सांगायला सुरुवात केली. त्यामुळे सांस्कृतिक संघर्ष हा एक जागतिक पातळीवरचा प्रश्न निर्माण झाला. या सगळ्या संघर्षातून बहुसंस्कृतीवाद उदयाला आल्याचे दिसून येते.

बहुसंस्कृतीवादाचे राजकारण आज जगभरातील प्रत्येक देशामध्ये सुरू झाले आहे. त्यामुळे त्याचा अभ्यास करणे आवश्यक व गरजेचे आहे. बहुसंस्कृतीवादाच्या विकासामध्ये बिल किम्लिका, चार्ल्स टेलर व भिखू पारेख यासारख्या अभ्यासकांनी मोठे योगदान दिले आहेत. बहुसंस्कृतीवादामध्ये सांस्कृतिक विविधतेला पोषणकारी मूल्य मानले जाते आणि त्याच्या समाजाचे संरक्षण व्हावे, प्रत्येक संस्कृतीचा विकास व्हावा. विविध संस्कृती त्याचबरोबर समूहाचे हितसंबंध जपले पाहिजे अशी भूमिका बहुसंस्कृतीवाद्याची आहे. बहुसंस्कृतीवादामध्ये लोकशाही आणि विविध जाती, धर्म, भाषा असणे गरजेचे आहेच पण त्याहीपेक्षा प्रत्येक सांस्कृतिक समूहाचा विकास झाला पाहिजे. प्रत्येक सांस्कृत्तिक समूहामध्ये व वांशिक समूहामध्ये समानता निर्माण झाली पाहिजे हे बहुसंस्कृतीवादाचे उद्दिष्ट आहे. समाजातील विविध संस्कृतीमध्ये बहुसंख्य असलेला समुदाय प्रभावशाली असतो व इतर संस्कृतीवर वर्चस्व निर्माण करतो. ही विषमता नष्ट करणे हे बहुसंस्कृतीवादाचे काम आहे. बहुसंस्कृतीवाद सार्वजनिक क्षेत्रामध्ये विविधतेला प्रोत्साहित करतो. अशाप्रकारे बहुसंस्कृतीवादाच्या अभ्यासकांनी विचार मांडले आहे त्यांच्या विचारांचा अभ्यास करणे गरजेचे आहे.

## ❑ किम्लिका याचे बहुसंस्कृतीवादाविषयीचे विचार :-

विल किम्लिका हे सध्या क्वीन्स विद्यापीठामध्ये प्राध्यापक आहेत त्यांनी बहुसंस्कृतीवादाबद्दल संशोधन केले असून त्या आधारावर अनेक पुस्तके लिहिली आहेत. त्यामध्ये, 'मल्टीकल्चरॅलिझम-सक्सेस', 'फेल्युअर ॲन्ड द फ्युचर', 'मल्टीकल्चरल सिटीजनशीप : अ लिबरल थेअरी ऑफ मायनॉरीटी राईटस्', 'कन्टेन्पररी पॉलीटिकल फिलॉसॉफी', इत्यादी पुस्तकांचा समावेश होतो. किम्लिका बहुसंस्कृतीवाद हे शब्द वांशिक-सांस्कृतिक समूहाच्या हक्कासंबंधी वापरतो. त्यामध्ये त्यांनी स्थलांतरित, राष्ट्रीय अल्पसंख्यांक, स्वदेशी लोक, जातीय गट, वांशिक-सांस्कृतिक गट इत्यादी घटकांना समाविष्ट केले आहे. किम्लिकाच्या मते, वांशिक-सांस्कृतिक गटाची दोन समान वैशिष्ट्ये आहेत. एक म्हणजे सर्व उदारमतवादी लोकशाही व्यवस्थामध्ये समूहातील नागरिकांचे राजकीय व सार्वजनिक हक्क संरक्षित केलेले असतात. दुसरे म्हणजे वांशिक सांस्कृतिक समूहाना मान्यता देणे आणि सामावून घेणे व त्याची ओळख निर्माण करणे गरजेचे आहे.

किम्लिकाने बहुसंस्कृतीवादाबद्दल विचार करताना समाजातील विविधतेचे दोन प्रकार सांगितले आहे. पहिले म्हणजे, पूर्वीपासूनच स्वयंनियंत्रित असलेल्या सांस्कृतिक समूहाना एकत्रित आणून एका मोठ्या राज्यात त्याचा समावेश केला जातो, त्यामुळे त्या राज्यात सांस्कृतिक विविधता निर्माण होते. दुसरे म्हणजे, विविध व्यक्ती किंवा व्यक्तीसमूह स्थलांतरित होऊन एकत्र रहात असलेल्या समाजात सांस्कृतिक विविधता निर्माण झालेली असते. पहिल्या विविधतेला राष्ट्रीय अल्पसंख्यांक समूह व दुसऱ्या विविधतेला वांशिक समूह असे किम्लिकाने संबोधले आहे. किम्लिकाच्या मते, ही बहुविविधता संरक्षित करणे गरजेचे आहे. त्यामुळे प्रामुख्याने अल्पसंख्यांक समूहांना जी विषमतेची वागणूक दिली जाते ती नष्ट केली पाहिजे आणि त्याची संस्कृती टिकविली पाहिजे आणि त्याचबरोबर त्याचा विकास झाला पाहिजे अशी भूमिका किम्लिकाने मांडली आहे. ही विषमता दूर करण्यासाठी किम्लिका दोन प्रकारचे राजकारण स्पष्ट करतो. ते पुढीलप्रमाणे पहिले म्हणजे पुनर्रवितरणाचे राजकारण आणि दुसरे म्हणजे मान्यतेचे राजकारण होय.

**पुर्नवितरणाचे राजकारण :** हे समाजातील विषमता व अन्याय दूर करण्याचे राजकारण असून ह्या राजकारणाचा पुरस्कार साम्यवादी उदारमतवादी कल्याणकारी राज्याचे पुरस्कर्ते करतात. किम्लिकाच्या मते, समाजात उत्पादन साधनाचे विषम वितरण झाल्यामुळे समाजातील दुर्बल घटकांचे शोषण होते. त्यामुळे आर्थिकव्यवहारात राज्यसंस्थेने सकारात्मक हस्तक्षेप करून आर्थिक विषमता दूर करावी अशी अपेक्षा आहे. परंतु तरीही राजकीय, सामाजिक व सांस्कृतिक विषमता कायम राहण्याची शक्यता आहे. कारण आर्थिक लाभामुळे समाजात बदल होत नाही तर त्याचबरोबर राजकीय, सामाजिक गोष्टींचा विचार करावा लागतो.

**मान्यतेचे राजकारण :** समाजातील वंचित आणि शोषित घटकाना बरोबरीचा दर्जा व मान्यता हवी असते. समाजात काही वर्ग परंपरेने अधिमान्यताप्राप्त असतात, परंतु जे अल्पसंख्य गट असतात, स्त्रिया, समलिंगी गट, त्यांना समाजात मान्यता नसते. मान्यता मिळविण्यासाठी त्यांना सातत्याने संघर्ष करावा लागतो. कमी न लेखता आपले अस्तित्व बरोबरीच्या तत्वावर मान्य करावे असे त्यांचे मत असते, त्यासाठी त्यांचा संघर्ष असतो. आपले वेगळेपणाचे अस्तित्व मान्य करून आपला तिरस्कार न करता वागावे अशी त्याची भूमिका असते.

बहुसंस्कृतीवादामध्ये अल्पसंख्यांकाच्या हक्काना संरक्षण देण्याची जबाबदारी आहे. किम्लिकाच्या विचारातील महत्त्वाचा मुद्दा म्हणजे तो अल्पसंख्यांकांच्या हक्काचे समर्थन करतो, त्याच्या मते, अल्पसंख्यांक समूहांना तीन प्रकारचे अधिकार असावेत. (एक) स्वशासनाचा अधिकार (दोन) बहुसंस्कृतिक हक्क व (तिसरा) विशेष प्रतिनिधित्वाचा हक्क/अधिकार.

## १. स्वशासनाचा अधिकार :-

किम्लिकाच्या मते, राष्ट्रीय अल्पसंख्यांकाना स्वशासनाचा अधिकार असतो, तो असला पाहिजे आणि त्याला मान्य केले पाहिजे. स्वशासनाचे वेगवेगळे आविष्कार असू शकतात किंवा त्याचे कार्यक्षेत्र वेगळे असू शकते. परंतु संघराज्याच्या चौकटीमध्ये राहून त्याना हक्क प्रदान केले पाहिजेत. जे पिढ्यान्‌पिढ्या सांस्कृतिक समूह एका प्रदेशामध्ये राहिले आहेत, त्यांना एक ऐतिहासिक आधार आहे. अशा समूहांनी आपल्या संस्कृतीची ओळख निर्माण करण्याची भावना आहे, ते समूह स्वशासनाची मागणी करतात. स्वशासनाचा अधिकार हा राज्यकीय स्वायतत्तेपुरता मर्यादित असला पाहिजे आणि त्या समूहाची संस्कृती सुरक्षित राहिली पाहिजे.

## २. बहुसंस्कृतिक हक्क :-

किम्लिकाच्या मते, अल्पसंख्यांकाचे बहुसांस्कृतिक हक्क मान्य केले पाहिजेत. त्याच्या संस्कृती संबंधीचे, रितीरिवाजासंबंधीचे, भाषेसंबंधीचे शैक्षणिक इत्यादी हक्क यामध्ये समाविष्ट होतात. कारण प्रत्येक व्यक्ती ही कोणत्यातरी संस्कृतीचा सदस्य असते. त्यामुळे समाजात त्याला त्याच्या सांस्कृतिक सदस्यत्वाची हमी मिळायला पाहिजे. त्याचबरोबर त्याला जर दुसऱ्या संस्कृतीचा सदस्य व्हावयाचे असेल तर त्याला ही मान्यता दिले पाहिजे असे किम्लिकाने मांडले आहे. यामुळे त्या व्यक्तीला खऱ्या अर्थाने जीवन जगता येईल कारण राज्याच्या नियमाबरोबर काही सांस्कृतिक परंपरागत नियम तयार झालेले असतात त्याचा ही व्यक्तीला वापर करण्याचा अधिकार असला पाहिजे. सांस्कृतिक अधिकार हे समूहाना आणि त्याच्या व्यवहाराना एक कायदा प्रदान करतो. त्यामुळे त्यांचे सांस्कृतिक आचार-विचार पाळण्याचा व प्रसार करण्याचा अधिकार असला पाहिजे.

### ३. विशेष प्रतिनिधित्वाचा हक्क/अधिकार :-

या अधिकारामागे महत्त्वाची भूमिका अशी आहे की, ते अल्पसंख्यांक समुदायांना राजकीय प्रक्रियेमध्ये भाग घेणे, धोरण ठरविणे व आपले विशिष्ट विचार व्यक्त करण्यासाठी संधी मिळणे यासाठी आवश्यक आहे. वेगवेगळ्या समूहामध्ये संस्था, घटना, व्यवहार व सामाजिक संबंधाबद्दल वेगळी माहिती असते आणि वेगळा दृष्टिकोनही असतो. त्यामुळे त्या समूहाचे सदस्य सामाजिक कामामध्ये चांगले योगदान देऊ शकतात आणि त्यांना राजकीय प्रवाहात आणले तर त्याच्यामध्ये सार्वजनिक ज्ञान वाढेल व ते राष्ट्राच्या मुख्य प्रवाहात येतील. जे दुर्लक्षित अल्पसंख्यांक आहे, त्याना जाणीवपूर्वक प्रतिनिधीत्व देवून समाजामध्ये एकोपा निर्माण केले पाहिजे, त्यामुळे राष्ट्राची शक्ती वाढेल.

अशाप्रकारे विल किम्लिका यानी अल्पसंख्यांकाचे अधिकर आणि त्याचे बहुसंस्कृतीवादातील योगदान स्पष्ट केले आहेत. कारण अल्पसंख्यांकाची सांस्कृतिक विविधता कोणत्याही प्रकारे समाजाचे ऐक्य धोक्यात आणत नाही तर त्यांना अधिकार उपभोगण्याचे समाधान मिळते. परंतु आधुनिक काळामध्ये अल्पसंख्यांकाचे अधिकार त्याचा राजकीय व्यवस्थेतील सहभाग व सामाजिक व्यवस्थेमधील समावेशन हा वादाचा मुद्दा ठरताना दिसतो.

## ❑ भिखू पारेख याचे बहुसंस्कृतीवादासंबंधीचे विचार

भिखू पारेख हे वेस्टमिनिस्टर विद्यापीठामध्ये इमेरीटस प्राध्यापक म्हणून कार्यरत आहेत. त्याना प्रामुख्याने गांधीवादाचे अभ्यासक म्हणून ओळखले जाते. त्यानी गांधी विचारावर अनेक पुस्तके लिहिली आहेत. दुसऱ्या महायुद्धानंतर स्थलांतरित झालेल्या समूहानी १९९० नंतर आपली ओळख सांगायला सुरुवात केली. कारण त्याना आपापल्या समूहाची संस्कृती, परंपरा जतन करायच्या होत्या. त्यामुळे इंग्लंडमध्ये आशियाई लोकांची संख्या वाढली होती आणि स्कॉटलंड मध्ये फुटीरतावादी चळवळ सुरू झाली होती. त्यामुळे इंग्लंड सरकारने या प्रश्नावर विचार करण्यासाठी (Commission for Multi-Ethnic Britain) नावाची समिती नेमली. त्याचे अध्यक्ष भिखू पारेख होते. या समितीने सरकारला आपला अहवाल सादर केला. त्यातील काही गोष्टी पुढीलप्रमाणे :-

१. जागतिकीकरणामुळे, विज्ञान तंत्रज्ञानाच्या विकासामुळे आणि बदलत्या परिस्थितीमुळे जग हे अत्यंत जवळ येत आहे त्यामुळे स्थलांतराचे प्रमाण वाढत जाणार आहे. त्यामध्ये प्रामुख्याने कामगाराचे स्थलांतर मोठ्या प्रमाणात होत आहे, त्यामुळे प्रत्येक देशातील विविध संस्कृतीचे लोक रहात असल्याचे दिसून येते.

२. सांस्कृतिक संघर्ष हे लोकांमधल्या दोन प्रक्रियेच्या माध्यमातून घडते, पहिला म्हणजे जे

स्थलांतरित झालेले लोक आहेत ते आपली धार्मिक सांस्कृतिक अस्मिता निर्माण करतात दुसरे म्हणजे देशांतर्गत असलेल्या लोकांमध्ये आपली सांस्कृतिक भाषिक अस्मिता निर्माण होते कारण ते स्थानिक परंपरावर भर देतात. त्यातून अस्मितेचे राजकारण निर्माण होते. हे समूह आपल्या अस्तित्वासाठी संघर्ष करतात हे संघर्ष बळाच्या आधारावर दडपून टाकता येत नाही.

३. जगातील बहुतेक देश बहुसांस्कृतिक बनत आहेत, अशा बहुसांस्कृतिक देशात लोकशाही व्यवस्था असली पाहिजे आणि या व्यवस्थेमधील राज्यघटनेत असे बदल करावे की, ज्यामुळे बहुसांस्कृतिक समाजाला सुखीसमाधानाने जगता येईल.

४. बहुसांस्कृतिक समाज निर्मितीमुळे एकात्म राज्याचा जो काळ होता त्यातील सार्वभौमत्वाची कल्पना लयास गेली आहे, त्यामुळे उदार, लवचिक संघराज्याची निर्मिती करणे आवश्यक आहे, म्हणून संघराज्यवाद उदारवाद देशाच्या परंपरेनुसार जगातील सर्व देशानी स्विकारावा.

५. समाजात वेगवेगळे सांस्कृतिक घटक असणे सांस्कृतिक विकासास आवश्यक आहे. त्यामुळे समाजाचा जो साचेबंदपणा आहे तो जाईल. समाजात नवे घटक निर्माण होवून नव्या विचाराने आहे ती संस्कृती समृध्द बनेल. त्यामुळे बहुसांस्कृतिक समाज हा अडचणीचा नसून तो लाभदायी आहे.

६. बहुसंस्कृतीवादामध्ये एक व्यापक सहिष्णू, उदार मताच्या समाजाची कल्पना अपेक्षित आहे. अशा समाजाची निर्मिती करण्यासाठी सर्व धार्मिक श्रध्दांना मान्यता देणे, इतराच्या स्वायत्ततेला महत्त्व देणे, संस्कृतीचे जतन करणे आणि राज्य ऐक्य टिकवून ठेवणे अशा प्रकारची धोरणे अवलंबली पाहिजेत.

अशा मुद्याचा समावेश त्या अहवालात केला होता. त्यांनी (रिथिंकिंग मल्टीकल्चरलीझम : कल्चरल डायव्हर्सिटी अ‍ॅन्ड पॉलिटीकल थिअरी) हे पुस्तक लिहिले आहेत, त्या पुस्तकाच्या निष्कर्षाच्या प्रकरणामध्ये त्यांनी बहुसंस्कृतीवादातील महत्त्वाचे मुद्दे मांडले आहेत. कारण १९७० च्या दशकाच्या सुरुवातीला कॅनडा, ऑस्ट्रेलिया, अमेरिका, इंग्लंड, जर्मनी आणि इतरत्र बहुसंस्कृती चळवळीचा उदय झाला. जरी बहुसांस्कृतिक चळवळ जगभर चालू असली तरी ती मुख्यत्वे अनियोजित स्वरूपात राहिलेली दिसते. या चळवळीने अनेक भिन्न-भिन्न समूहांना आकर्षित केले. परंतु केंद्रीभूत तत्वाच्या मांडणीसंदर्भात ही चळचळ अपयशी झाल्याचे दिसते. कारण यामध्ये चळवळीचे स्पष्ट स्वरूप आणि अस्मिता याची उणीव दिसते.

पारेख यांच्या मते, बहुतेक सर्व समाज हे आज बहुसांस्कृतिक आहेत. काही राहिलेले समाज हे

भविष्यात बहुसांस्कृतिक होतील. त्यांच्या मते, बहुसंस्कृतीवाद हा केवळ कार्यक्रमादिष्टीत राजकीय सिद्धांत नाही तसेच तो तात्त्विक प्रवाह देखील नाही तर तो मानवाच्या जगातील स्वत:च्या संदर्भातील विशिष्ट सिध्दांत आहे तो एकूणच मानवी जीवनाकडे पाहण्याचा दृष्टीकोण देतो. यातील मध्यवर्ती तीन आंतरदृष्टीकोन आहेत. ते काही वेळेस त्याच्या प्रवक्त्याकडून चुकीची मांडणी केली जाऊ शकते. म्हणून तिला काळजीपूर्वक सुधारित स्वरूपात प्रस्तुत करणे गरजेचे आहेत ती आंतरदृष्टीकोन पुढील प्रमाणे आहेत.

## १. मानवाचा सांस्कृतिक अंतर्भाव :-

मानव हा सांस्कृतिकदृष्ट्या त्यातच आंतरभूत आहे कारण तो सांस्कृतिकदृष्ट्या संरचित जगामध्ये राहतो आणि त्यातच त्याचा विकास होतो. अर्थपूर्ण आणि महत्त्वाच्या दृष्टीने व्यक्तीचे सांस्कृतिक व्यवस्थेतील जगणे आणि सामाजिक संबंधाच्या आधारावर सांस्कृतिक ओळख निर्माण होते. याचा अर्थ असा नव्हे की, त्याची सांस्कृतिक पार्श्वभूमी ही त्याच्या विचारप्रवर्गाच्या आणि व्यवस्थात्मक मूल्याच्या अर्थ लावण्याच्या समस्येतून बाहेर पडण्यास असमर्थ आहे. तर तो सांस्कृतिक प्रभावाने खोलवर आकार घेतला आहे. परंतु काही अपवाद लोक हे अन्य संस्कृतीचा स्विकार करतात अन्यथा ते मानव हा सांस्कृतिक जीवनातच अंतर्भूत असतो.

## २. सांस्कृतिक विविधतेची लोकप्रियता आणि आंतरसंस्कृती संवाद :-

वेगवेगळ्या संस्कृतीची चांगल्या आयुष्यासाठी अर्थ आणि दृष्टीकोन वेगवेगळ्या व्यवस्थामध्ये प्रस्तुत केले आहे. प्रत्येक मानवी क्षमतेची मर्यादा आणि भावनाची मर्यादा जाणवते. हे केवळ मानवी अस्तित्वाच्या एका भागापर्यंत पोहचते, त्यामुळे इतर संस्कृतीची आवश्यकता असते. सांस्कृतिक विविधता असेल तर मनुष्याचा जीवन आनंदी व स्वयंपूर्ण होईल. याचा अर्थ असा नव्हे की, प्रत्येक संस्कृती समान समृध्द आहेत आणि त्यात समान आदर मिळण्याचा हक्क असतो, परंतु त्यातील प्रत्येक सदस्याला चांगले जीवन जगता आले पाहिजे यासाठी बहुसंस्कृतीची विविधता लोकप्रियता पावली आहे. याचा अर्थ असा नव्हे की, स्वत:ची संस्कृती पूर्णपणे निरुपयोगी आहे. परंतु कोणतीही परिपूर्ण नाही आणि इतरावर स्वत:ची तत्त्वे लादण्याचा अधिकार ही नसतो. त्यामध्ये प्रत्येक संस्कृती स्वाभाविकता मर्यादित आहे, परंतु त्याच्यातील परस्परामधील संवाद हे फायद्याचेच आहे. त्यामुळे सांस्कृतिक विविधता हे अटळ आहे आणि ती आंतरसंस्कृतीमध्ये संवाद करीत असते.

## ३. प्रत्येक संस्कृतीतील अंतर्गत बहुविविधता :-

प्रत्येक संस्कृती ही पूर्णपणे विकास झालेली नसलीतरी ती अंतर्गत अनेकवचनी असते आणि

तिच्या विविध परंपरा आणि विचाराची कल्पनेमध्ये सतत संभाषण दर्शविते. याचा अर्थ असा नाही की, ते अंतर्गत तर्कसंगती विरहित आहेत परंतु त्याची ओळख अनेकवचनी आणि अस्थिर असते. संस्कृतीचा स्वत:चा आकार बदलतो आणि त्याच्याशी इतराच्या संबंधात बदल होतो आणि त्याच्या अंतर्गत आणि बाह्य विविधता एकमेकांना सशक्त करतात आणि एकमेकांना मजबूत करतात. त्याच्यातील अंतगृत बहुविविधता हे महत्त्वाचे आहे.

अशाप्रकारे भीखू पारेख यानी या तीन महत्त्वाच्या तत्त्वांचा समावेश बहुसंस्कृतीवादात केल्याचे दिसून येते.

## ❑ चार्ल्स टेलरचे बहुसंस्कृतीवादासंबंधीचे विचार

चार्ल्स टेलर हा कॅनॅडियन तत्त्वज्ञ असून तो सध्या मॅकगील विद्यापीठात इमीरीटस् प्राध्यापक म्हणून कार्यरत आहेत. त्यांनी १९९२ साली 'मल्टिकल्चरॅलिझम ॲन्ड द पॉलिटिक्स ऑफ रेकगनीशन' हे पुस्तक लिहिले आहेत. यामध्ये बहुसंस्कृतीवादाबद्दलचे विचार मांडले आहेत. त्यांच्या बहुसंस्कृतीवादाच्या संबंधीचे केंद्रीभूत तत्व म्हणजे सांस्कृतिक गटाच्या हक्काची मान्यता आणि प्रत्येक गटात समानतेची हमी. कारण सर्व संस्कृतीचे मूल्ये समान असतात. टेलरच्या मते, बहुसंस्कृतीवादावर चर्चा करताना मान्यता आणि ओळख यापासून सुरुवात करावी लागते. व्यक्तीला समजून घेण्याची दोन तत्त्वे आहेत. एक म्हणजे आपण कोण आहे आणि दुसरा म्हणजे मानवाचे मूळ स्वभाव काय आहे. म्हणून व्यक्तीची किंवा समूहाची ओळख ही संवाद आणि चर्चेतून निर्माण होणाऱ्या वातावरणात तयार होते आणि या वातावरणातूनच मान्यता मिळण्याची प्रक्रिया होते. त्यामुळे प्रत्येक संस्कृतीला आपली स्वत:ची ओळख मिळविणे आणि त्याना समानतेची मान्यता मिळणे आवश्यक आहे, अशी भूमिका टेलरनी मांडली आहे.

टेलरने बहुसंस्कृतीवादाचा विचार करताना असे म्हटले आहे की, समाजातील प्रत्येक संस्कृतीची ओळख निर्माण झाल्याशिवाय किंवा त्याला इतर संस्कृतीकडून मान्यता मिळाल्याशिवाय त्या संस्कृतीचा विकास होणार नाही त्यामुळे त्याना मान्यता मिळणे आवश्यक आहे. कारण टेलरच्या मते, एखाद्या संस्कृतीला योगदान दिले नसले तरी निदान त्याची विविधता टिकवून ठेवण्यासाठी प्रयत्न करावे, त्याला संपुष्टात आणता येत नाहीत. अनेक संस्कृती जर समाजामध्ये असतील तर त्या समाजाच्या समृध्दीसाठी योगदान देतात. वेगवेगळ्या संस्कृती, वेगवेगळ्या पध्दतीने विकसीत होतात, समृद्ध होतात त्यामुळे जीवन जगण्याला अर्थ प्राप्त होतो. अशाप्रकारे चार्ल्स टेलरने बहुसंस्कृतीवादाबद्दलचे मत मांडले आहे.

या सर्व विचारवंतांच्या विचारांच आढावा घेतल्यानंतर बहुसंस्कृतीवादाची काही मूलतत्त्वे लक्षात येतात ती मूलतत्त्वे खालीलप्रमाणे आहेत.

१. बहुसंस्कृतीवाद वसाहतवादी विचाराच्या विरोधात निर्माण झालेला विचार आहे, कारण पाश्चात्त्य आणि विकसित देशांनी तिसऱ्या जगातील देशामध्ये राज्य करताना, तुम्ही सगळे सांस्कृतिकदृष्ट्या मागास आहात, तुमची विकसित संस्कृती नाही असे सांगितले, परंतु येथील लोक स्थलांतराच्या माध्यमातून विकसित देशात वास्तव्यास गेले, तेव्हा त्याच्यापेक्षा स्वतःच्या संस्कृतीची अस्मिता निर्माण झाली, त्यामुळे त्यांची सांस्कृतिक संघर्ष करण्यास सुरुवात केले आहेत.

२. बहुसंस्कृतीवाद एक सांस्कृतिक ओळख निर्माण करते. कारण उदारमतवाद्याचे म्हणणे असे होते की, सर्व माणसे जन्मतः समान असून सर्वांना नैसर्गिक हक्क आहेत, परंतु माणसे निगुर्ण निराकार नसतात, त्याना स्वतःची सांस्कृतिक, सामाजिक, धार्मिक ओळख असते. त्यामुळे व्यक्तीला आणि नागरिकांना त्याच्या-त्याच्या सांस्कृतिक सामूहिक ओळखीच्या संदर्भात मान्यता दिली पाहिजे, कारण व्यक्तीला नुसते हक्क देऊन उपयोगाचे नाही, त्याला त्याच्याबरोबर स्वतःचे सांस्कृतिक हक्कसुध्दा असले पाहिजेत, त्याला मान्यता देता आली पाहिजे. म्हणूनच अस्मितेचे राजकारण मान्यतेचे राजकारण आणि ओळखीचे राजकारण हे बहुसंस्कृतीवाद्यानी सांगितले आहे. सांस्कृतिक समूह म्हणून आम्ही वेगळे आहोत, म्हणून आमचे वेगळेपण मान्य केले पाहिजे, हे बहुसंस्कृतीवादाचे तत्व आहे.

३. समाजामध्ये असलेल्या सांस्कृतिक बहुविविधतेला स्विकारले पाहिजे अशी भूमिका बहुसंस्कृतीवादाची आहे, कारण जगातील प्रत्येक देशामध्ये बहुविविधता आहे. त्यामुळे ही सांस्कृतिक बहुविविधता मान्य केली पाहिजे, या विविधतेमुळे समाजाच्या एकत्वाला कोणतीही बाधा पोहचणार नाही. प्रत्येक सांस्कृतीक समूहाचा, त्याच्या अस्मितेचा आदर केला पाहिजे, त्याचा जो काही सांस्कृतिक हक्क आहेत तो सुध्दा मान्य केला पाहिजे, एकूणच या चार्ल्स टेलर असे म्हणतो की, नुसती सहिष्णूता आम्हाला (विविध सांस्कृतिक समूहांना) मान्य नाही तर आम्हाला पूर्ण मनापासून स्विकारले पाहिजे, मान्यता दिली पाहिजे.

४. अल्पसंख्यांकाना हक्काची हमी दिली पाहिजे अशी भूमिका बहुसंस्कृतीवादामध्ये मांडली आहे, कारण ज्यावेळी प्रत्येक संस्कृतीला मान्यता देता त्याचे अस्तित्व मान्य करता त्यावेळी प्रत्येक समूहाला एक राजकीय ओळख म्हणूनही मान्यता दिली पाहिजे आणि राजकीय ओळखीचे काही हक्क असतात तेही मान्य केले पाहिजे, कारण अल्पसंख्यांक सांस्कृतिक समूहांना बहुसंख्यांकाकडून भेदभावाची वागणूक मिळत असेल तर या छोट्या-छोट्या सांस्कृतिक समूहांना प्रतिनिधीत्व करण्याची संधी दिली पाहिजे.

अशाप्रकारे वरील चारही तत्त्वे ही बहुसंस्कृतीवादामध्ये महत्त्वाची आहेत, आज जगातील प्रत्येक देश हा बहुसांस्कृतिक आणि बहुधार्मिक बनले आहेत. त्यामुळे तेथे बहुसंख्यांक व अल्पसंख्यांक सांस्कृतिक घटकामध्ये संघर्ष निर्माण झाल्याचे दिसून येते, त्यामुळे अल्पसंख्यांक लोकांना सुरक्षितता मिळणे गरजेचे आहे.

जगभराच्या अल्पसंख्यांक जमाती या आपली अस्मिता जपण्याचा प्रयत्न करतात परंतु अल्पसंख्यांकावर बळाच्या जोराने मुस्कटदाबी करून त्यावर अन्याय केला जातो, त्यामुळे त्या हातात शस्त्रे घेऊन आंदोलने संघर्ष करतात, कारण त्याना त्यांची परंपरा संस्कृती संरक्षित करणे गरजेचे वाटते, त्याची अस्मिता टिकविणे आवश्यक आहे. म्हणून अल्पसंख्यांकाचे संरक्षण करणे बहुसंख्यांक संस्कृतीची जबाबदारी आहे असे म्हणावे लागेल.

## ❑ बहुसंस्कृतीवादावरील टीका

आजच्या काळामध्ये अनेक देशांनी उदारमतवादी लोकशाहीचा स्विकार केला आहे. जवळपास सर्वच देशामध्ये सांस्कृतिक विविधता असल्यामुळे अनेक सांस्कृतिक व वांशिक गट हे स्वायत्ततेची मागणी करताना दिसतात, कारण त्याना त्याचे अधिकार मुक्तपणे उपभोगण्यास संधी मिळत नाही. या पार्श्वभूमीवर बहुसंस्कृतीवाद उदयास आला आहे, परंतु त्यावर काही टिका करण्यात आली आहे ती पुढीलप्रमाणे :-

१. बहुसंस्कृतीवाद हा फक्त सांस्कृतिक समुदायाच्या समानतेचा विचार करतो, त्यामुळे समुदायातील जे लहान घटक आहेत, त्याचा विचार केला जात नाही, त्याच्यावर अन्याय होतो. समाजातील महिला वर्गांना दुय्यम वागणूक मिळते.

२. बहुसंस्कृतीवादी हे अल्पसंख्याक सूमहांना विशेषाधिकाराची मागणी करतात. वास्तविकतः कोणतीही व्यक्ती ही स्पष्टपणे एकाच समुदायाची सदस्य नसते, तर ती अनेकवेळा वेगवेगळ्या संस्कृतीमध्ये, समुदायामध्ये वावरत असते, कारण आजच्या परिस्थितीमध्ये व्यक्ती विभिन्न संस्कृती व सामाजिक प्रभावाबरोबर जोडली गेली आहे. त्यामुळे ती एकाचवेळी अनेक समूहाचा सदस्य म्हणून कार्यरत असते, त्यामुळे त्याना विशेषाधिकार देणे कठीण जाते.

३. बहुसंस्कृतीवादीच्या म्हणण्यानुसार अल्पसंख्यांकाना जर विशेषाधिकार दिले तर, समाजामध्ये अनेक बहुसंख्यांक घटक अल्पसंख्यांकाच्या विरोधात मागणी करतील, की ज्यामुळे राष्ट्रराज्य ही संकल्पना लयास जाईल आणि राज्याचे विघटन होईल. त्यामुळे अल्पसंख्याकांना प्रतिनिधीत्त्व देऊ नये अशी भूमिका टिकाकारानी केली आहे.

४. मार्क्सवाद्याची अशी टिका आहे की, बहुसंस्कृतीवादी पुनर्रवितरणाचे विषयाला मान्यता देते. ते फक्त सांस्कृतिक दृष्टिकोनातून अल्पसंख्यांकांना पुनर्रवितरणाची मागणी करतात, त्यामुळे ही त्याची भूमिका संकुचित वृत्तीची आहे. परिणामत: समाजात अल्पसंख्यांकांच्या बाबतीत भेदभाव केला जातो, याकडे बहुसंस्कृतीवादी दुर्लक्ष करतात.

अशाप्रकारे बहुसंस्कृती वादावर वरीलप्रमाणे टिका केली असली तरीही बहुसंस्कृतीवादाची भूमिका समाजसाठी उपयुक्त आहे.

## ❑ बहुसंस्कृतीवादाचे महत्त्व

आज जगामध्ये बहुसंस्कृतीवादाचे महत्त्व अनन्यसाधारण आहे, कारण राजकीय सिध्दांतामध्ये ही एक संकल्पना म्हणून उदयास आली. ही गोष्टही खरी असली तरी समाजातील सांस्कृतिक समूह परस्पर संघर्ष करीत असतात ते कमी करण्यासाठी ही विचारधारा महत्त्वाची आहे. मूळात या संकल्पनेने समाजात होत असलेल्या सांस्कृतिक भेदभावाकडे लक्ष वेधून घेण्याचे कार्य केले आहे. बहुसंस्कृतिक समाज हा आनंदाने शांततेने विकसित व्हावा, जगातील सर्व सांस्कृतिक समूहाचा विकास व्हावा, त्याना मान्यता मिळावी ही बहुसंस्कृतीवादाची भूमिका मोठे योगदान देणारी आहे. राजकीय ओळख, सांस्कृतिक ओळख, स्वत:ची ओळख, सांस्कृतिक अस्मिता इत्यादी गोष्टी प्रत्येक समाजात आहेत, त्यांना योग्यप्रकारे न्याय मिळवून देण्याचे कार्य बहुसंस्कृतीवाद करतो. परंतु एक प्रश्न उपस्थित राहतो की, सांस्कृतिक विविधता निर्माण करण्यासाठी व्यक्तीचे स्वातंत्र्य व अल्पसंख्यांकाची समानता कमी करणे आवश्यक आहे. यावर बहुसंस्कृतीवादी असे मत मांडतात की, समूहाना लोकशाहीच्या दृष्टीकोनातून संस्थात्मकदृष्ट्या विकसित केले पाहिजे, जेणे करून समूहाच्या आवाजामध्ये व्यक्तीचा आणि अल्पसंख्यांकाचा आवाज ऐकू येईल. त्यामुळे बहुसंस्कृतीवादाचे योगदान महत्त्वाचे आहे.

बहुसांस्कृतिक देशातील अल्पसंख्यांक लोकांकडे पाच पर्याय उपलब्ध असतात.

१) सांस्कृतिक व धार्मिक गटाची वस्ती जर बऱ्याच वर्षापासून एका सलग भूप्रदेशात असेल तर राष्ट्रीय स्वयंनिर्णयाच्या अधिकाराची मागणी करून स्वत:चे वेगळे राष्ट्र स्थापन करणे.

२) आपल्या शेजारी आपल्या धर्माचे पालन करणारे वा आपली भाषा बोलणारे राष्ट्र असेल तर त्या राष्ट्रात मोठ्या प्रमाणात स्थलांतर करणे.

३) अल्पसंख्य घटक बहुसंख्याकाच्या संस्कृतीशी जुळवून घेतात, पण त्याचबरोबर आपले सांस्कृतिक आणि घटनात्मक व कायदेशीर संरक्षण त्याद्वारा प्राप्त करतात.

४) अल्पसंख्यांक गट तर एखाद्या सलग भूभागावर रहात असतील तर केंद्र सरकारकडून ते काही मर्यादित प्रमाणात स्वायत्त व स्वशासित शासनयंत्रणा मिळवू शकतात.

५) आपण अल्पसंख्यांक आहोत म्हणून आपण बहुसंख्य समाजाशी फारसे एकात्म न होता दुय्यम स्थान पत्करून राष्ट्राच्या परिघावर राहू व त्याद्वारा आपल्या संस्कृतीचे व भाषेचे संरक्षण करू, असाही दृष्टीकोन ते स्विकारू शकतात.

## ४.२.४ अनुदारवाद/स्थितीवाद (Conservatism)

जगामध्ये तीन विचारप्रवाह विकसित झाले असून, त्यामध्ये पहिली विचारधारा ही व्यक्ती स्वातंत्र्याच्या मूल्याबद्दल नव्याने निर्माण झालेली भांडवलशाही आणि खाजगी मालमत्तेचे समर्थन करून राज्याचा हस्तक्षेप नको, असा सांगणारा उदारमतवाद. दुसरी विचारधारा म्हणजे समाजामध्ये असलेला वर्गावर्गातील संघर्ष नष्ट करून वर्गविहिन व राज्यविहिन समाज निर्माण करता येईल असा विचार मांडणारा मार्क्सवाद आणि पारंपारिक मूल्यव्यवस्था व रूढीचे समर्थन करणारा अनुदारवाद असे तीन प्रवाह निर्माण झाले आहेत. यामध्ये आधुनिक काळात उदारमतवाद, मार्क्सवाद विकसित झाले असून अनुदारवाद फारसा विकसित झाला नसला तरी जगातील अनेक देशामध्ये अनुदारवादी विचारांवर कार्य करणारे अनेक पक्ष निर्माण झाले आहेत, त्यावरून अनुदारवादी ही आज समाजामध्ये महत्वाची आहे असे वाटते. अनुदारवादी हे चर्च, कुटुंब, खाजगी संस्था इत्यादी ऐतिहासिक महत्त्वाच्या संस्थांचा आदर ठेवून त्यांची देखभाल करण्यावर भर देतात. ते अचानकपणे झालेल्या बदलाना आणि नव्या गोष्टींना विरोध करतात आणि ते असे म्हणतात की, जे बदल होणार आहेत ते पूर्णपणे निर्दोष असण्याची शक्यता कमी आहे, म्हणून आहे ती परिस्थिती असावी, त्यात बदल करू नये अशी भूमिका मांडतात.

### ❑ अनुदारवाद म्हणजे काय?

अनुदारवाद म्हणजे सर्वसाधारणपणे असे म्हणता येईल की, सद्यस्थितीत असलेल्या राजकीय, सामाजिक आणि आर्थिक स्थितीमध्ये बदल न करता त्यांचे जतन करणे होय. अनुदारवादाला कन्झरवेटीझम (Conservatism) हा इंग्रजी शब्द वापरला जातो. कन्झरवेटीझम हे शब्द प्रथम फ्रेंच विचारवंत चटीऊब्रीयंड (Chateaubrind) यांनी वापरले असून त्याने आपल्या मासिकाला, 'ले कन्झरवेटर (Conservator) असे नाव दिले होते. अनुदारवाद ही अशी भावना आहे की, एखाद्या परंपरेची किंवा संस्थांची सवय झाली असेल तर त्यात बदल करू नये कारण आहे ती परिस्थिती योग्य आहे. पर्यायी समाजरचनेपेक्षा ती चांगली आहे. वर्षानुवर्षे ती चालत आलेली असल्यामुळे आपल्याला

चांगल्या परिचयाची झाली आहे. त्यामुळे त्यात बदल करू नये, अशी भूमिका अनुदारवादाची आहे. अनुदारवाद सद्यस्थितीत असलेल्या संस्था, संघटना, परंपरा यांच्यावर विश्वास ठेवतो. त्याबद्दल ममत्व वाटत असल्यामुळे ती कायम राहावीत असा राजकीय दृष्टीकोण असणारी विचारधारा आहे. मुलभूत बदल, आदर्श समाजाची रचना आणि मानवी स्वभावाबाबत उदारमतवादी व समाजवादी विचाराकडे अनुदारवादी विचारवंत संशयाने पाहतात. त्यांना कोणत्याही गोष्टीमध्ये बदल होणे पसंत नसते, म्हणून अनुदारवाद ही उदारमतवादाच्या विरोधात निर्माण झालेली विचारधारा आहे असे म्हणता येईल.

अनुदारवाद ही विचारधारा समाजातील रूढी, परंपरा मोडीत काढणाऱ्यांच्या विरोधातील आहे, कारण ते समाज व्यवस्था ही मानवी कर्तृत्त्वाचा परिपोष मानतात, त्यात जरी काही त्रुटी असल्या तरी त्यांच्या मते समाजाचा पहिल्यांदा आणि नंतर व्यक्तीचा विचार व्हावा, व्यक्तीचा विकास हा समाजामुळे होतो. समाजातील रूढी, परंपरा व मूल्ये याद्वारे व्यक्तीची जडणघडण होत असते, म्हणून रूढी, परंपरा आदरास पात्र आहेत अशी भूमिका अनुदारवादाची आहे, त्याचबरोबर त्यांचे असे मत आहे की, सत्ता ही राज्यसंस्थेकडे असावी. अधिकारपदे ही संस्थाशी जोडली असावीत. या संस्था समाजाच्या मूल्य व परंपरेच्या चौकटीत कार्य करणाऱ्या असाव्यात, त्या मूल्याचे रक्षण करावे, परंपरांचे जतन करावे म्हणून अनुदारवादी नवीन संस्था स्थापन करण्यास विरोध करीत असतात. कारण सर्व समस्या सोडवणारी अशी कोणतीही व्यवस्था नसते. कोणत्याही व्यवस्थेला योग्य अशी समाजव्यवस्था निर्माण करता येत नाही, म्हणून परंपरेनुसार चालत आलेल्या संस्थेच्या चौकटीतच राहून सर्व प्रश्न सोडविणे सोयीस्कर राहिल अशी भूमिका अनुदारवादाची आहे.

## ❑ अनुदारवादाची मूलतत्त्वे

अनुदारवादाची मूलतत्त्वे खालीलप्रमाणे सांगता येतील.

१) अनुदारवादामध्ये रीतीरिवाज, रूढी-परंपरा प्रियता जास्त असते. त्याच्यात बदल होऊ नये, याची काळजी घेतली जाते. त्यांना रूढी परंपरावर विश्वास असून सर्व प्रश्न त्याद्वारे सोडविले जावेत अशी अपेक्षा असते.

२) समाजामध्ये ज्या काही संस्था आहेत, त्या पूर्वापार शतकानुशतके चालत आल्यामुळे त्याचे संरक्षण करणे, त्याचे जतन करणे हे अनुदारवादाचे उद्दिष्ट्ये आहे. या संस्था किंवा संघटना चांगल्या पध्दतीने कार्यरत आहेत, त्यात काही त्रुटी असल्या तर त्यात थोडाफार बदल करावा, परंतु पूर्ण बदल करू नये, ही अनुदारवादाची भूमिका असते.

३) समाजाने वर्षानुवर्षे ज्या रुढी-परंपरा, संकेत, नियम आत्मसात केले आहेत, त्याचे पालन केले पाहिजे, त्याचा जास्तीत जास्त वापर करावा. कोणतेही आक्रमक धोरण स्विकारून नवीन कायदे, नियम करण्याच्या फंदात पडू नये. आहे ते नियम, कायदे पुढे चालू ठेवावे असे अनुदारवादाला वाटते.

४) जो सद्यपरिस्थितीत समाज आहे, त्या समाजाची रचना ही लोकांनी काळजीपूर्वक निर्माण केलेली असते. तिच्यामध्ये मूलगामी बदल करून तिच्या कार्यात व्यतय आणणे म्हणजे अराजकतेला निमंत्रण देणे होय, म्हणून समाजाची घडी बिघडू नये यासाठी आहे ती व्यवस्था समाजामध्ये चालू ठेवावी असे अनुदारवादाला अभिप्रेत आहे.

५) समाजामध्ये एखाद्या गोष्टीमध्ये जर बदल करणे आवश्यकच असेल किंवा ज्यावेळी समाजात बदल करण्याची गरज पडेल, त्यावेळी समाजातील घडी विस्कटू न देता हळूहळू बदल घडवून आणावे, त्यात घाई करून समाजाची घडी बिघडवण्याचा प्रयत्न होऊ नये असे अनुदारवादाला अभिप्रेत आहे.

अशाप्रकारे स्थितीवाद ही एक नकारात्मक विचारधारा आहे जी परिवर्तनाला विरोध करणारी आहे. परिवर्तनाला विरोध करणाऱ्याना अनुदारवादी विचारवंत समजले जाते, त्यात प्रामुख्याने एडमंड बर्क व ऑकशॉट या विचारवंताचे योगदान महत्त्वाचे आहे. दुसऱ्या महायुद्धाच्या काळामध्ये अनुदारवादाचा उपयोग अनेक वेगवेगळ्या अर्थाने वापरले गेले, त्या दृष्टीकोणातून अनुदारवादाचे प्रकार पाडता येतील ते पुढीलप्रमाणे :-

## अ) स्वाभाविक स्थितीवाद :-

स्थितीवादामध्ये कायदेशीर जीवन आणि कार्यशैली यामध्ये परिवर्तन होण्यास निर्बंध घालणारा नैसर्गिक व संस्कृतिक प्रवृत्ती आहे. समाजामध्ये स्वाभाविक व वैधानिक परिस्थिती आहे ती जास्तीतजास्त लोकांनी स्विकारलेले असते. स्वाभाविक स्थितीवादाच्या मते, प्रामुख्याने सवय, जडत्व किंवा गतिशीलता भय आणि अनुकरण इत्यादी घटकांमुळे परिवर्तन स्विकारण्याची तयारी नसते.

## ब) स्थितीनुरूप स्थितीवाद :-

यामध्ये सामाजिक, आर्थिक कायदा धार्मिक, राजकीय व सांस्कृतिक व्यवस्थामध्ये परिवर्तनाला विरोध असतो. हा स्थितीवाद एक सामाजिक व्यवहार आहे, यामध्ये प्रामुख्याने बदलाचे भीती वाटते. हा स्थितीवाद फक्त व्यक्तीपुरता मर्यादित रहात नाही तर त्याचा विचार हा जे जे परिवर्तनाला विरोध करतात त्या सर्वांसाठी असतो.

## क) राजकीय स्थितीवाद :-

राजकीय स्थितीवाद हे राजकीय पक्ष आणि त्यांची आंदोलनाची प्रक्रिया यासंबंधी आहे. राजकीय स्थितीवाद हा नैतिकता आणि असलेल्या संस्थांना मान्यता देतो. तो आक्रमक आंदोलनाला विरोध करतो. राजकीय स्थितीवाद हा सार्वभौम आणि स्थापन झालेल्या समाजाला सुरक्षित करण्याचे काम करतो. त्यामुळे राजकीय स्थितीवादामध्ये संविधानात दुरुस्त करण्यास मान्यता देतात, परंतु मोठे बदल करण्यास विरोध करतात. राजकीय व्यवहारात स्थितीवादी व्यवहारवादाचा आश्रय घेताना दिसून येतात.

## ड) सांस्कृतिक स्थितीवाद :-

सांस्कृतीच्या सातत्यावर भर देणारा, आपली संस्कृती श्रेष्ठ आहे व तिच्या सातत्यावर सामाजिक, राजकीय स्थैर्य अवलंबून आहे असा विचार मांडणारा सांस्कृतिक स्थितीवाद आहे. यामध्ये प्रामुख्याने सातत्याचा आग्रह धरला जातो. मानवी इतिहासात भौतिकवादी स्पष्टीकरणास सांस्कृतिक स्थितीवादी विरोध करून जाणिवा व विचारांचे महत्त्व प्रतिपादन करतो.

अशाप्रकारे स्थितीवाद हे स्वत:ला उदारवादी समाजवादी व मार्क्सवादी विचारांपासून सुरक्षित करण्याचा प्रयत्न करतात आणि जुन्या परंपरा, रीतीरिवाज, नैतिकता, इतिहास आणि जुन्या संस्थाना महत्त्व देतात त्यामुळे स्थितीवादाची वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे सांगता येतील.

## १. इतिहास आणि परंपरा :-

स्थितीवादामध्ये इतिहास आणि परंपरा यांना महत्त्वाचे स्थान आहे. कारण सामाजिक वास्तवता हे ऐतिहासिक दृष्टीकोनातून समजून घेता येते. दुसरी गोष्ट म्हणजे परंपरा या इतिहासातूनच प्रकाशझोतात येतात त्यामुळे परंपरा इतिहासाच्या मुख्य घटक आहे.

## २. मानवी अपूर्णता, पूर्वग्रह आणि विवेक :-

स्थितीवादी हे मनुष्य अपूर्ण आहे असे समजतात कारण मनुषष्याचा आधार हा विवेक नसून पूर्वग्रह आहे. स्थितीवादी हे लोकांना अपूर्ण किंवा अपूर्णतेचे प्रतिक समजतात. स्थितीवादी हे कायम एकटेपणा आणि अस्थिर राहतात त्यामुळे ते स्थिरता आणि सुरक्षेची मागणी करतात.

## ३. जैविक समाज, स्वातंत्र्य आणि समानता :-

स्थितीवाद्याच्या मते, समाज हा जैविक स्वरूपाचा आहे, कारण व्यक्ती समाजाच्या बाहेर राहू शकत नाही. समाजापासून व्यक्ती वेगळे राहू शकत नाही. समाजाशी व्यक्तीचे अतूट नाते आहे. त्यामुळे

समाज व्यक्तीना अस्तित्व प्रदान करते. स्थितीवादाच्या मते, स्वातंत्र्याचा अर्थ, म्हणजे व्यक्तीला एकटेपणा देणे नसून त्याला सामाजकि दायित्व आणि बंधनाशी जोडले आहे. स्थितीवादाच्या मते स्वातंत्र्याचा अर्थ म्हणजे लोकांनी त्यांच्या कर्तव्याचे पालन करणे होय. स्थितीवादाच्या मते, जैविक समाज हा एकतेचा दुसरे नाव आहे. तो समाजातील विविधतेपासून बनतो. त्यामुळे अशा विविधतापूर्ण जैविक समाजामध्ये समानतेला कोणतेही स्थान नव्हते. समानता हे व्यक्ती आणि समूहाचे स्वातंत्र्य धोक्यात आणते.

### ४. सत्ता आणि शक्ती :-

स्थितीवादामध्ये सत्ता आणि शक्ती हे एकाच अर्थाने वापरले जात असून यामध्ये सत्ता महत्त्वाची आहे. सत्ता हा कायदेशीर अधिकार आहे. समाजामध्ये काम करण्यासाठी सत्ता आवश्यक असते. त्यामुळे स्थितीवाद्याच्या मते, सत्ता अनिवार्य आहे. सत्ता व शक्ती स्वातंत्र्याला कोणताच धोका निर्माण करत नाही. बर्कच्या मते, स्वातंत्र्य हे केवळ स्वातंत्र्य असते, ते व्यवस्थेबरोबर जोडलेले असते. स्थितीवादाच्या मते, सत्ता असणे अवश्यक आहे कारण सत्ता लोकांची सुरक्षा करणे, समर्थन करण्यासाठी उपयोगी आहे. समाजामधील सुव्यवस्थेची स्थापना सत्तेच्या आधारावर होते. त्यामुळे स्थितीवादी सत्ता आणि शक्तीला महत्त्वाचे मानतात.

### ५. संपत्ती आणि जीवन :-

स्थितीवाद्यासाठी संपत्ती महत्त्वाची आहे. त्यांच्या मते, संपत्तीमुळे मनोवैज्ञानिक आणि सामाजिक लाभ होतो. ती संरक्षण करते, लोकांमध्ये आत्मविश्वास निर्माण करते, सामाजिक मूल्यांना प्रोत्साहन देते. स्थितीवादाच्या मतानुसार संपत्तीला अराजकतेपासून सुरक्षित ठेवले पाहिजे असे वाटते. संपत्तीधारक लोकांचे समाजामध्ये वर्चस्व असतो. समाजामध्ये कायदा व व्यवस्था निर्माण करण्यासाठी व सुव्यवस्थित जीवन जगण्यासाठी संपत्ती महत्त्वाची भूमिका बजावते. स्थितीवादाच्या मते, संपत्ती कायद्याची सत्ता, आणि सामाजिक व्यवस्थेला सम्मानित करून प्रोत्साहन देते. अशाप्रकारे स्थितीवादी संपत्ती आणि जीवनाला महत्त्व देतात.

### ६. धर्म आणि नैतिकता :-

धर्म आणि नैतिकता यावर स्थितीवाद्यांनी भर दिला आहे. कारण लोक हे स्थितीवादापासून वेगळे झाले की, ते स्वत:चे संतुलन बिघडवून घेतात. राजकारणामध्ये धर्माचे सिध्दांत किंवा नियम नसतील तर लोकांना नियंत्रित करता येत नाही. धर्म आणि नैतिकता नसेल तर स्वातंत्र्याची भिती वाटते. कारण लोकांना धर्माच्या आणि नैतिकतेच्या दबावाखाली व्यवस्थित जीवन जगण्यासाठी भाग पाडता येते.

त्यामुळे समाजातील रूढी, परंपरा, रितीरिवाज हे धर्माचे असल्यामुळे ते जतन करण्यासाठी लोक प्रोत्साहित होतात. त्यामुळे धर्म आणि नैतिकता समाजात असली पाहिजे अशी स्थितीवादाची भूमिका आहे.

अशाप्रकारे स्थितीवादाची वैशिष्ट्ये स्पष्ट करण्यात आली आहे. स्थितीवाद हे फार विकसित झाले नसले तरी त्याचे अस्तित्व टिकून राहिल्याचे दिसून येते. त्याच्या अस्तित्त्वामध्ये आणि टिकवून ठेवण्यामध्ये अनेक विचारवंतांनी योगदान दिले आहे, त्यामध्ये प्रामुख्याने एडमंड बर्क व ऑकशॉट या विचारवंताचा समावेश होतो.

## ❑ एडमंड बर्क यांचे स्थितीवादाबद्दलचे विचार

एडमंड बर्क हा आधुनिक अनुदारवादाचा जनक आहे. कारण १९७० साली लिहिलेल्या 'रिफ्लेक्शन ऑन द रिवोल्युशन इन फ्रान्स' या पुस्तकामध्ये त्यांनी फ्रेंच राज्यक्रांतीवर टिका केली आहे. फ्रेंच क्रांतीकारक प्राचीन सामाजिक, धार्मिक, आर्थिक संस्था उद्धवस्त करीत आहेत, असे बर्कला वाटते. एडमंड बर्क हा इंग्लंडमधील व्हिंग पक्षाचा पुढारी व पार्लमेंटचा सदस्य होता. १६८८ च्या रक्तरंजित क्रांतीमध्ये व्हिग पक्षानेच राजेशाही मर्यादित करून पार्लमेंटच्या वाढत्या हक्कासाठी लढा दिला होता. त्याचा त्यांना अभिमान होता. म्हणून बर्ककडून अशी अपेक्षा होती की, त्याने फ्रेंचक्रांतीला पाठिंबा दर्शविला पाहिजे, कारण त्याने अमेरिकन राज्यक्रांतीत वसाहतकाराच्या बाजूने सहानुभूती दाखविली होती. ब्रिटीश ईस्ट इंडिया कंपनीच्या भारतातील दडपशाहीचा निषेध केला होता, परंतु फ्रेंच राज्यक्रांतीच्या वर्णनानी तो घाबरला होता. तेथील रक्तरंजीत घटनाचा एवढा परिणाम झाला की, त्यांनी फ्रेंचक्रांतीच्या विरोधात भूमिका मांडली आहे.

बर्कने कधीही लोकशाहीवादी होण्याचा प्रयत्न केला नाही किंवा त्यांनी स्वत:ला कधी क्रांतीकारक समजले नाही. त्याने आपल्या काळातील व नंतरच्या काळात निर्माण होणाऱ्या क्रांतीकारी सुधारकांना विरोध केला आहे. क्रांतीकारी सिध्दांत आणि त्याची साधने ही ईश्वराच्या इच्छेविरुध्द आहेत, अशी भूमिका बर्कने मांडली आहे. त्यामुळे त्याच्या मते, रितीरिवाजाचे व परंपराच्या मर्यादा कधीही ओलांडू नये. कारण जेव्हा परंपरा एखाद्या मनुष्याच्या स्वभावाचे अंगभूत गुण बनतात तेव्हा त्या तोडणे कठीण होऊन बसते. बर्कचा हा सिद्धांत दोन गोष्टींवर अवलंबून आहे. पहिला म्हणजे मानवी समाजाची व राज्याची पुनर्रचना करणे हे एका व्यक्तीचे किंवा एका पिढीचे काम नाही. जरी कोणत्याही पिढीने थोडेफार प्रयत्न केले तरी ते यशस्वी होणार नाही आणि दुसरा म्हणजे मूळात असा प्रयत्नच करू नये अशी बर्कचे अनुदारवादासंबंधीची भूमिका होती. त्याने फ्रेंच राज्यक्रांती ही एक व्यक्ती स्वत:च्या विचारानुसार समाजाची निर्मिती करीत आहे, ती जुन्या संस्थांचा किंवा इतिहासाचा अजिबात विचार करत

नाही, असे म्हणून बर्कने व्हिग पक्षाच्या सहकारी नेत्याबरोबर वाद करून तो टोरी पक्षामध्ये प्रवेश केला, कारण टोरी पक्ष हा परंपरा व रूढीच्या जतन करण्यासाठी कार्यरत असणारा पक्ष होता.

फ्रेंच राज्यक्रांतीचे समर्थक हे मानवी हक्क सर्वश्रेष्ठ आहे असे म्हणत होते तर बर्कच्या मते, हक्क कायद्यामुळे माणसाला प्राप्त होतात. त्याचा समानतेवरच विश्वास नाही. निसर्गात समानता नाही व नव्हती. विषमतेशिवाय समाजच स्थापन होऊ शकत नाही. समाजात शहाणे, तज्ञ व श्रीमंत हे दुर्बल अज्ञानी आणि गरीबाला ज्ञान देतात व त्याचे रक्षण करतात असे बर्क म्हणतो. समाज एकाएकी स्थापन होत नाही तर ते शतकानुशतके परंपरा, प्रथा, सवयी, निष्ठा, इतिहास, संस्था, अधिकार इत्यादी घटकावर उभा असतो अशी बर्कची भूमिका आहे. व्यक्ती जन्मत: या पुरातनकाळापासून अखंड चालत आलेल्या समाजाची सदस्य बनते. तिची जाणीव, इच्छा, विरोध यांचा संबंधच नसतो. समाजाची कर्तव्ये आपोआप व्यक्तीवर येतात असे बर्कचे म्हणणे आहे.

मानवी हक्काचा जाहीरनामा क्रांतीकारकानी तयार केला, त्याला बर्कने अराजकाची शाळा व पाठ्यपुस्तक म्हटले आहे. राज्यसंस्था प्राचीन काळी स्थापन झाले आहे, त्यावेळीच फक्त व्यक्तिची इच्छा व संमती आवश्यक होती. एकदा राज्य स्थापन झाल्यावर व्यक्तीची किंवा बहुमताची इच्छा याला अतिशय श्रेष्ठ स्थान देणे चुकीचे आहे असे बर्क म्हणतो. व्यक्ती जन्मताच तिच्यावर सामाजिक बंधने येतात ही बंधने व्यक्ती कधीही तोडू शकतो असे म्हणणे म्हणजे अराजकाला आमंत्रण देणे होईल असे बर्कला वाटते. म्हणून बर्कला अनुदारवादाचे जनक म्हटले आहे. त्याच्या मते, रीतीरिवाज, रुढी-परंपराच्या पलीकडे जावून कार्य करू नये कारण परंपरा या एकदा मानवी स्वभावाचे अंगभूत गुणधर्म बनतात. त्या सहजासहजी तोडता येत नाहीत, त्या तोडणे अतिशय अवघड आहे' अशाप्रकारे एडमंड बर्कने अनुदारवादाचा पुरस्कार केला आहे. त्याच्या विचारातून रूढी-परंपरा महत्त्वाच्या असून त्यात बदल करू नये असा विचार विकसित झाला आहे.

## ❑ मायकल ऑकशॉट याचे स्थितीवादासंबंधीचे विचार :-

ऑकशॉट हे ब्रिटीश स्थितीवादी राजकीय विचारवंत आहे तो लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्समध्ये प्राध्यापक म्हणून कार्यरत होते. त्याने १९६२ साली लिहिलेल्या Rationalism in Politics या पुस्तकामध्ये On Being Conservative हा निबंध लिहिला आहे. त्यामध्ये त्यानी अनुदारवादाबद्दलची भूमिका मांडली आहे. ऑकशॉटचा परंपरावादावरील युक्तीवाद म्हणजेच अनुदारवादाचा विचार आहे. त्याच्या अनुदारवादामध्ये राजकारण, नैतिकता आणि जीवन याचा समावेश होतो. अनुदारवादाचा उदय हा त्यानी केलेल्या विवेकवादावरील टिकेमधून झाला आहे. ऑकशॉटच्या मते, राजकारणाची वैचारिक शैली ही संभ्रम निर्माण करणारी शैली आहे. त्याच्या मते, विवेकनिष्ट योजनेमध्ये विचारधारा हे एक

संक्षिप्त रूप आहे. कोणती शैली वापरायची असेल तर ती परंपरावादी शैली आहे कारण राजकीय कृती व व्यवहार हे वर्तमान काळातील परंपरामधूनच आलेले असतात आणि या परंपरावादी व्यवस्थेत सुधारणा करणे त्या राजकीय कृतीचे कार्य आहे. सर्व कृतीचे स्वरूप हे परंपरागत स्वरूपाचेच असते. ऑकशॉट असे म्हणतो की, प्रत्येक विचार, प्रत्येक आदर्श, प्रत्येक विचारधारा पारंपरिकच असतात. समाजामध्ये व्यवस्था निर्माण करण्याचे काम हेही पारंपारिक स्वरूपाचे असते.

ऑकशॉटच्या मते, राजकारणाला नेहमी पारंपरिक स्वरूपामध्येच पाहिले पाहिजे. पारंपरिक म्हणजे ऐतिहासिक स्वरूपात समजणे होय. कारण परंपरा काहीतरी करणारा, कोणताही प्राचीन प्रकार नसून तो एक प्रवाह आहे. ऑकशॉटच्या मते, राजकीय कृती ही वास्तविक रूपामध्ये आहे, असली पाहिजे, तरच ती काही करण्यामध्ये यशस्वी होईल. जे क्रांती करण्याचा विचार करण्याचा प्रयत्न करत आहेत ते केवळ आपल्याला धोका देत असतात. ऑकशॉटच्या शब्दामध्ये राजकीय कृतीमध्ये लोक बांधिल नसलेल्या आणि बिनआधाराच्या समुद्रामध्ये पोहतात. जिथे रहायला आसरा नाही किंवा थांबण्यासाठी किनारा नाही. जिथे सुरूवात नाही जिथे ध्येय ठरवलेले नाही पण प्रयत्न मात्र जलयानात पोहत राहण्याचे असते. परंतु समुद्र हा तसा मित्रही आहे आणि शत्रूही आहे. मात्र जहाज चालवण्याची कला ही पारंपारिक प्रकार असून तो कोणत्याही वाईट परिस्थितीचे, मैत्रीमध्ये बदल करण्याचे काम करतो. त्याच्यामते, राज्य एक जहाज म्हणून संकल्पीत केले पाहिजे. ते सामाजिक शांतता सुनिश्चित करण्यासाठी वापरले पाहिजे. साहजिकच राज्य सामाजिक प्रगतीच्या आधारावर नवा समाज किंवा युरोपिया करू शकेल यावर ऑकशॉट विश्वास ठेवत नाही.

ऑकशॉटच्या राजकीय पारंपारिक शैलीला केवळ कायदेशीर शैली मान्य आहे. त्यानी मांडलेल्या On Being Conservative मधील भूमिकेमुळे त्यांना अनुदारवादी असे म्हटले जाते. तो असे म्हणतो की, लोकांनी परिवर्तनाचा पुन्हा विचार केला पाहिजे, केवळ अशा सुधारणाना स्विकारलं पाहिजे की जे दोषावर इलाज आहे अथवा जे असंतुलन दूर करतील. परंपरावादामध्ये ऑकशॉटच्या मते, सर्व काही समाविष्ठ आहे, कारण परंपरावाद निरंतर आहे, तो स्थिर आहे तो गतिशील आहे. परंपरावादाची ऑकशॉटची परिभाषा अति विस्तृत परिभाषा आहे त्याचा अर्थ काहीही होऊ शकतो किंवा काहीही होऊ शकत नाही, त्यामुळे ऑकशॉट हा अनुदारवादी/स्थितीवादी चळवळीच्या मुख्य प्रवाहाच्या बाहेर राहिल्याचे दिसून येतो. अशाप्रकारे एडमंड बर्क व मायकल ऑकशॉट यानी अनुदारवादाला योगदान दिले आहे.

## ❑ अनुदारवादाचे महत्त्व

अनुदारवाद हा राज्यातील परंपरा, रुढी, कायदे, नियम यांचे जतन करणे, त्याचे संरक्षण करणे अत्यावश्यक मानत असल्यामुळे अनुदारवादाच्या या विचारावर आधारित अनेक देशामध्ये राजकीय पक्ष

निर्माण झाले आहेत. अनुदारवादी पक्ष प्रथम इंग्लंडमध्ये स्थापन झाले. इंग्लंडमधील टोरी पक्ष हा कन्झरवेटिव्ह पार्टीचे उगमस्थान आहे. टोरी पक्ष हा वंशपरंपरागत राजपद आणि विशेष अधिकार आणि धर्मव्यवस्थेचा पुरस्कार करणारा पक्ष आहे. तर व्हिग पक्षाने नियंत्रित राजसत्ता, पार्लमेंटची सर्वशक्ती आणि धार्मिक सहिष्णुता याला मान्यता देते. जॉर्ज तृतीय यांच्या काळामध्ये टोरी पक्ष सत्तेवर आला आणि लॉर्ड नॉर्थ हे पंतप्रधान बनले, त्याच्या बारा वर्षाच्या काळामध्ये प्रशासनात राजाच्या व्यक्तीगत सत्तेत वाढ झाली. फ्रान्स राजक्रांती आणि नेपोलियनच्या युगानंतरच्या काळात टोरी पक्षाने उदारमतवाद आणि लोकशाही आंदोलनाचे दमन करून इंग्लंडच्या साम्राज्य विस्ताराचे कार्य केले. १८३० मध्ये पार्लमेंटमध्ये सुधारणावादी व्हिग पक्षाचे सरकार सत्तेवर आले, त्यांनी 'रिफॉर्म अॅक्ट' पारित केला, परंतु टोरी पक्षाने काही प्रचलित व्यवस्थामध्ये जी सुधारणा केली त्याचे समर्थन केले नाही, त्यामुळे त्यांना कंझरवेटिव्ह पार्टी असे नाव पडेल. १८२४ साली जॉर्ज कॅनिंगने प्रथम टोरी पक्षासाठी कन्झरवेटिव्ह नावाचा शब्दप्रयोग केला होता. १८३५ साली टोरी पक्षाच्या रॉबर्ट पील याने टेम्नवर्थ घोषणेमध्ये कन्झरवेटिव्ह शब्दाचा स्विकार केला. तेव्हापासून कन्झरवेटिव्ह पक्ष म्हणून टोरी पक्षाला ओळखले जाऊ लागले आणि संरक्षण नीतीच्या कारणावरून या पक्षात फूट पडली. पुढे १८६८ साली बेंजामिन डिजरेलीने कन्झरवेटिव्ह पक्षाचे पुनरुज्जीवन केले आणि त्याने १८७० साली केंद्रीय कार्यालय सुरू केले. तेव्हापासून आजपर्यंत कन्झरवेटिव्ह पक्ष इंग्लंडमध्ये कार्य करीत आहे. त्यानंतर अनेक देशामध्ये अनुदारवादाच्या विचारावर कन्झरवेटिव्ह पक्षाची स्थापना झाली आहे. प्रामुख्याने कन्झरवेटीव्ह पार्टी ऑफ कॅनडा, कोलोंबियन कन्झरवेटिव्ह पार्टी, कन्झरवेटिव्ह पिपल्स पार्टी ऑफ डेन्मार्क, आईसलँडज इंडिपेन्डटस पार्टी, ख्रिश्चन डेमोक्रेसी पार्टी (इटली), स्विडन कन्झरवेटिव्ह पार्टी, स्विस पीपल्स पार्टी, ख्रिश्चन डेमोक्रेटीक पिपल्स पार्टी, कन्झरवेटिव्ह डेमॉक्रेटीक पार्टी ऑफ स्वित्झर्लंड, नॅशनल पार्टी ऑफ ऑस्ट्रेलिया, डेमोक्रॅटीक लेबर पार्टी (ऑस्ट्रेलिया), भारतीय जनता पार्टी (भारत) इत्यादी अनेक राजकीय पक्ष हे अनुदारवादाच्या तत्त्वाच्या आधारावर रुढी-परंपरा, रीतीरिवाजांचे जतन करण्यासाठी कार्यरत आहेत. अशाप्रकारे अनुदारवादी पक्ष आजही कार्यरत असल्यामुळे अनुदारवाद हा विचार आजही समाजामध्ये महत्त्वाचा आहे असे दिसून येते.

## ४.३ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ

- **प्रतिकार :** अन्यायाच्या विरोधात लढणे.
- **बंधन :** आज्ञापालन करणे.
- **समुदायवाद :** समुदायाला महत्व देणे.
- **यथास्थिती :** आहे ती स्थिती ठेवणे त्यात बदल न करणे.

## ४.४ सारांश

राजकीय बंधन आणि राजकीय प्रतिकार या दोन्ही गोष्टींचा विचार केला तर असे म्हणता येईल की, राज्य कशा प्रकारेही वागले तरी त्याचे आज्ञा पाळणे हे नागरिकांचे कर्तव्य आहे, त्यांनी राज्यांनी सांगितलेली जबाबदारी अथवा त्यांनी केलेले नियम व कायदे पाळले पाहिजे, अशी भूमिका राजकीय बंधन स्पष्ट करते, तर राजकीय प्रतिकार हा जर राज्य अन्यायी वागत असेल किंवा कायद्याद्वारे नियमाद्वारे लोकांची पिळवणूक करत असेल तर राज्याला विरोध करण्याचा अधिकार व्यक्तीला असलाच पाहिजे असा विचार मांडण्यात आला. एकूणच राजकीय बंधनाबरोबर राजकीय प्रतिकार करण्याचा अधिकार असावा असा विचार या दोन्ही संकल्पनांमधून स्पष्ट होतो.

समुदायवाद ही संकल्पना राजकीय सिध्दांतात उदयास आली आहे. समुदायवादामध्ये प्रामुख्याने फक्त समुदायाचा विचार केला जातो. कारण व्यक्तीचा विकास हा समुदायात होतो, समाजाशिवाय व्यक्ति जगू शकत नाही, तीचा सर्वांगीण विकास, समाजातच चांगल्याप्रकारे होतो. समुदायवादामध्ये चार्ल्स टेलर, मायकल सॅडल, बिल किम्लिका इत्यादी अनेक विचारवंतांनी योगदान दिले आहे, जेणेकरून समाजामध्ये व्यक्तीचा विकास होईल असा विचार समुदायवादात मांडल्याचे दिसून येते.

बहुसंस्कृतीवाद ही एक संकल्पना राजकीय सिध्दांतामध्ये अधिक महत्त्वाची आहे, कारण प्रत्येक देश हा आज बहुसंस्कृतीक बनला आहे, त्यामुळे अल्पसंख्यांक गटाचा विकास होणे गरजेचे आहे, कारण बहुसंख्यांकाचे वर्चस्व अल्पसंख्यांक समूहावर निर्माण होवून संघर्ष निर्माण होतो. हा संघर्ष कमी करून सर्व संस्कृतीचा विकास करणे असा विचार बहुसंस्कृतीवादामध्ये आहे. यात प्रामुख्याने बिल किम्लिका, चार्ल्स टेलर, भिखू पारेख इत्यादी विचारवंतानी योगदान दिले आहे. बहुसंस्कृतीवादामध्ये अल्पसंख्यांकाचे संरक्षण करणे महत्त्वाचे आहे, त्याचबरोबर समाजातील सगळ्या सांस्कृतिक समूहाना एक स्वत:ची ओळख मिळावी आणि त्याच्या अस्तित्वाला मान्यता मिळावी यासाठी प्रयत्न झाला पाहिजे आणि सगळ्या संस्कृतीबरोबर एकत्रित जीवन जगले पाहिजे, बहुसंस्कृतीक समाज असला तरी कोणत्याही प्रकारचा धोका निर्माण होणार नाही असा विचार बहुसंस्कृतीवादाचा आहे.

स्थितीवाद ही अजून एक संकल्पना आहे ती फार विकसित झाली नाही, परंतु ती जुनी संकल्पना आहे. यामध्ये आहे त्या परिस्थितीत बदल होऊ नये अशी अपेक्षा आहे स्थितीवादामध्ये एडमंड बर्क आणि मायकल ऑकशॉट या विचारवंतांनी प्रामुख्याने मोठे योगदान दिले आहे, त्यामुळे ही संकल्पना आजही अस्तित्वात असून ती राजकीय सिध्दांतामध्ये योगदान देते. आज या संकल्पनेचे महत्त्व सगळ्यांना कळत आहे, कारण स्थितीवादामध्ये अशी भूमिका मांडली आहे की, परंपरा, रितीरिवाज हे

वर्षानुवर्षे समाजात व्यक्तीच्या मनामध्ये रुजलेले असते ते बदलण्याचा प्रयत्न करू नये, त्यामुळे व्यक्तीला मोठ्या प्रमाणात त्रास होतो. म्हणून आहे ती परिस्थिती स्विकारणे गरजेचे आहे.

अशाप्रकारे राजकीय बंधन व राजकीय प्रतिकार समुदायवाद, बहुसंस्कृतीवाद, स्थितीवाद या संकल्पनाचा अभ्यास करणे हे राजकीय सिध्दांत महत्त्वाचे आहेत.

## ४.५ सरावासाठी स्वाध्याय

१. राजकीय बंधन म्हणजे काय? व त्याचे आधार कोणते ते स्पष्ट करा.

२. राजकीय प्रतिकाराची संकल्पना स्पष्ट करा.

३. बहुसंस्कृतीवादासंबंधी चर्चा करा.

४. समुदायवाद म्हणजे काय आहे याचे सविस्तर वर्णन करा.

५. यथास्थितीवादी भूमिका स्पष्ट करा.

## ४.६ अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ


१. **Kymlicka Will** *(2012), "Multiculturalism-Success, Failure and the Future", Migration Policy Institute,* Washingtan.

२. **चौसाळकर, अशोक** *(२०१७), ''आधुनिक राजकीय सिध्दांत''*, युनिक ॲकॅडमी, पुणे.

३. **सुमंत, यशवंत** *(२०१८) : ''विचारसरणीच्या विश्वात''*, युनिक ॲकॅडमी, पुणे.

४. **Kymlicka Will** *(2009)* : *"Contemperary Political Philosophy", Oxford University press.*

५. **Parekh Bhiku** *(2002)* : *"Rethinking Multi-culturalism", Harvard University press.*

६. **पाठक, नवराज** *(२००४) : ''पाश्चात्य राजनीतिक विचारक : भाग-१''*, विश्वभारती पब्लिकेशन्स, नवी दिल्ली.

७. **Mcdonald, Lepghton** *(1997)* : *"Regrouping in Defence of Minority Rights : Kymlicka's Multicultural Citizenship", OSGOCODE HALL LAW JOURNAL Vol. 34, No.2, pp-291-319.*

८. **LUKSICHACIN, Marina** *(2016)* : *"Therozing the concept of Multi-culturalism through Taylor's Politics of Recognition", DVE DOMOVINI, Two Homelands, 24, p.p. 79-90.*

९. **Oakeshoott, Michael** *(1991)* : *"Rationalism in Politics and other Essays", Methuen, Library Fund.*

१०. **Taylor Charles, Gutman Amy** *(1992)* : *"Multiculturalism and the Politics of Recongnition", Princetion : Princeton University press.*

❑ ❑ ❑